साहित्य, संस्कृती, कला व नवे विचारप्रवाह याविषयक विचार मंथनाकरिता

!! डॉ. अनिल नितनवरे साहित्य समूह !!

# तत्रैव



# तत्रैव

अंक – पंधरावा
सप्टे- ऑक्टो २०२२

**मुख्य संपादक**
प्रमोदकुमार अणेराव

**कार्यकारी संपादक**
विवेक कापगते

**मुखपृष्ठ** :
शरद तरडे , मुंबई

**रेखाटने** :
ऑस्टिन डिकोस्टा, नागपूर
प्रमोदकुमार अणेराव, भंडारा

**विशेष तंत्रसाह्य** :
देवानंद घरत ,भंडारा

**---- अनुक्रम ----**


१. मानाचे पान:उल्हास मनोहर
२. गांधी विचारांचे समकालीनत्व:डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी,नागपूर
3. लोकशिक्षिका पुष्पा भावे:डॉ .गीताली वि.मं. पुणे
४. काव्यसंचित:केशव मेश्राम
५. केशव मेश्राम यांची कविता:डॉ.भूषण रामटेके,पुलगाव
६. काव्यउन्मेष:माधुरी मरकड,अहमदनगर व अमोल विनायक देशमुख,परभणी
७. निरंग(कथा) :अक्षय प्रभाकर वाटवे,पुणे
८.आंधळी स्वप्ने(कथा):डॉ.अनंता सूर,यवतमाळ
९. लिली स्वार्ण यांच्या अनुवादित कविता:नेहा भांडारकर,नागपूर
१०. प्रमोद कोपर्डे यांच्या दहा कविता
११. गांधी जयंती :कवी वीरधवल परब यांची कविता:वर्जेश ईश्वरलाल सोळंकी, मुंबई
१२.टाहो(एकांकिका):स्वप्नील चव्हाण मुंबई,कल्याण
१३.अज्ञानाची निर्मिती (द क्लॅश ऑफ इंग्नोरन्स)डॉ.दीपक बोरगावे,सांगवी
१४. सैली -१३ सप्टेंबर ,सायोनारा आणि तिचा सापडलेला नवा अर्थ:पंकज भोसले,ठाणे
१५. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020:एक आकलन:प्रा.दिलीप चव्हाण,नांदेड
१६. बाजूबद्धता, तटस्थता आणि वस्तुनिष्ठता:डॉ.मंदार काळे,पुणे
१७. आकार आणि अर्थ:प्रभाकर बर्वे
१८. अमृता शेरगील:एक महाचित्रकाव्य:पल्लवी पंडित,नागपूर
१९. मी आणि माझा कलाप्रवास:शरद तरडे,पुणे
२०. मी आणि माझा कलाप्रवास:केदार श्रीरंग कुलकर्णी,नाशिक
२१. फँड्री :एक मिथक,एक प्रतिमा:स्वप्नील चव्हाण, जळगाव
२२.स्त्रियांचे समाजातील स्थान:डॉ.सुकेशीनी बोरकर-बन्सोड,ब्रम्हपुरी
२३. गंगुबाई हनगल कर्नाटक गायनातील हिरा:डॉ.राहुल भोरे,भंडारा
२४. सुरेखा भगत यांची संस्कृतीचा प्रतिवाद करणारी कविता:डॉ.अशोक इंगळे,अकोला
२५. अवकाळी पावसाचा दरम्यानची गोष्ट:एक आकलन:नितीन साळुंके,,सातारा
२६. वर्तमानाचे वर्गचारित्र्य मांडणारी प्रगल्भ कविता :असहमतीचे रंग:किरण शिवहर डोंगरदिवे,मेहकर
२७. 'उजेड गाभाऱ्यातला'  रोमँटिक जाणिवेची कविता:प्रा.अरुण ठोके,नाशिक
२८. नशकाप्रमराश्री अर्थात ऋषिकेश गुप्ते:सुनील साळुंके,सोलापूर
२९.प्राचीन विदर्भातील बुद्ध धर्म:डॉ.मनोहर नरांजे ,नागपूर
३०.शिक्षणातील नवे विचार प्रवाह:मिश्रित अध्ययन(ब्लेंडेड लर्निंग)
३१.मुखपृष्ठाविषयी
३२.धक्काचित्र




# वेणी

लहानपणी
आईने बांधलेल्या वेण्या आता स्मृतीत राहिल्याच नाहीत
आठवणीत सुद्धा
तस पाहिलं तर माणूस अर्ध्यापेक्षा जास्त आयुष्य
भ्रमातच जगतो
वेणी
एक संदर्भ म्हणून सांगतो …
आईने लहानपणी बांधून दिलेली वेणी … तो संदर्भ
वयात आल्यावर कुणीतरी आपल्या वेणीत
फुल रुजवावं , म्हणून त्याचा हात … तो संदर्भ
आणि
माझ्या प्रत्यक्ष आयुष्यात
आई नाही
वडीलही नहॆ. आहेत, फक्त केसांनी गळा दाबणारे त्यांचे ते हात

**■ उल्हास मनोहर**



# दृष्टिक्षेप

**डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी,नागपूर**
जेष्ठ कवी ,विचारवंत व संपादक

## गांधी विचारांचे समकालीनत्व

---

गांधी हा शब्द व्यक्तीनाम उरला नसून तो आज जगभरातच शांततामय सहअस्तित्वाची सभ्य मानवी संस्कृती टिकवून धरणारी जीवनमूल्ये, जीवनमार्ग, जीवनाची सार्थकता आणि वसाहतवादी, साम्राज्यवादी, भांडवली वर्चस्वाच्या पार्श्वभूमीवर जीवनाची पुनर्व्याख्या करण्याची दिशा ठरला आहे. त्यासाठी विकासाचे त्याला बांधील प्रारूप,त्यातला तळपातळी पर्यंतच्या लोकांचा कृतिशील व रचनात्मक विकास, चिरंजीवी विकास,शाश्वत विकास आणि त्यासाठी लोक सहभाग अशा विचारव्यूहाचे नाव झाला आहे. शांततामय, नि:शस्त्र, सहयोगी अहिंसात्मक प्रतिकाराची ती दिशा ठरली आहे. त्या नावाचा हा केवळ इतिहास नसून ते वर्तमानही आहे आणि म्हणूनच ते गांधींचे सयकालीनत्वही. जोवर हे साध्य गाठले जात नाही तोवर ते कायमच राहणार आहे.
वसाहतवाद,साम्राज्यवाद, भांडवलशाही शोषण, वर्चस्ववाद या गोष्टी काल होत्या तशाच किंबहुना अधिक अमानवी आणि अक्राळविक्राळ स्वरूपात आज अधिक प्रबळ झाल्या आहेत.काल त्या जगभरच आक्रमकांशी,परकीयांशी संबंधित होत्या.आज त्या स्वकीयांशी संबंधित झाल्या आहेत. परकीय सत्तेविरुद्ध राजकीय मुक्तीसंग्राम जिंकून मानवजातीने स्वकीयांचे,स्वअधिकारांचे लोकराज्य आणले असले तरी ते प्रातिनिधिक, निर्वाचित जनप्रतिनिधींच्या मार्फतचे राज्य झाले.ते गांधींच्या कल्पनेतले व्यक्तीचे स्वराज्य आणि सुराज्य झालेच नाही.ते तसे होणार नाही तोवर गांधी मरणारही नाही.

यापुढे स्वराज्य आणि सुराज्य आणण्यासाठी आवश्यक शांततामय प्रतिकाराचे , त्यासाठी सत्याग्रहाचे बळ पुरवणारे नैतिक उर्जा केंद्र म्हणून ते कायमच टिकणार आहे. त्यामुळेच आजच्या सर्वंकष शोषणाच्या शक्ती,वर्चस्ववादी, भांडवली शक्ती, यांचेच तेवढे साम्राज्य आणून ते टिकवू बघणाऱ्यांसाठी आणि आम्ही म्हणू तेच आणि तसेच जग म्हणजे विकास ठरवणाऱ्यांसाठी गांधी हा सर्वात मोठा शत्रूवत अडसर आहे.त्या विचारांचे वहन करत गांधी मार्गावर चालणारे जगभरातले छोटे छोटे आणि मोठेही नि:शस्त्र गांधी देखील त्यामुळेच आज जगभरच सत्तेकडून विकासद्रोही ठरवले जात आहेत.गांधी हे संपलेले, प्रभावहीन नाव आणि विचार असता तर सर्व प्रकारच्या महासत्तांना अशा छोट्या मोठ्या गांधींच्या विरोधात वागण्या,बोलण्याची वेळ येण्याचे, एवढेच काय तर त्यांच्या विकासाच्या मार्गातील अडसर ठरवून त्यातले अतिरेकी ते असल्याची भाषा वापरण्याचे काहीच कारण नव्हते.याचाच अर्थ गांधी किती समकालीन आहे हे तेच सिद्ध करताहेत.

पं.जवाहरलाल नेहरूंनी देखील महात्मा गांधी यांच्या खुनानंतर जे उद्गार काढले ते असेच होते.ते म्हणाले की हा प्रकाश गेला मात्र तो हजारो वर्षे तळपतच राहील. डॉ मार्टिन ल्यूथर किंग यांना 1959 मध्ये एका पत्रकार परिषदेत विचारले गेले होते की कुठे आहे गांधी,कुठेच तर दिसत नाही,त्यावर ते म्हणाले की मानवतेचा विकास व्हायचा असेल तर गांधींपासून सुटका नाही.जागतिक शांतता, सौहार्द याकडे जाणारी

मानवता देणारी गांधी दृष्टी जग कधीच गमावू शकत नाही.

ही दृष्टी,तिचे समकालीन औचित्य कशात आहे?

ते तळपातळी पासून माणसाची नैतिक उभारणी,जीवनाची पुनर्व्याख्या, विकासाच्या एककल्ली शोषक स्वरूपातून चाललेला संस्कृती विनाश रोखण्यासाठी,समन्यायी,चिरंजीवी,शाश्वत विकासातून रचनात्मक समाजाची उभारणी करण्यात आहे. धर्मसमन्वयाच्या अहिंसात्मक जीवनमार्गाशिवाय,शांततामय सहअस्तित्वाशिवाय, सत्याच्या आग्रहाशिवाय ,अपरिग्रहाच्या अर्थशास्त्राशिवाय हिंसा, शस्त्र,दहशत,भय, वर्चस्व, अण्वस्त्रे या पासून मुक्ती शक्य नाही.ती शक्य होत नाही तोवर गांधी विचार आणि गांधी मार्ग यांना पर्यायच नाही. आज म्हणूनच कधी नव्हे एवढा गांधी विचार आणि गांधी मार्ग अपरिहार्य आहे. प्रेम, सेवाभाव, त्यागभावना, करूणा, प्रज्ञा, शील, नैतिकता या मानवी मूल्यांची जी जागा बाजाराच्या मूल्यांनी बाजाराच्या अर्थव्यवस्थेसाठी घेतली आणि स्वार्थ,भोगवृत्ती,लालसा, गळेकापू स्पर्धा, हिंसा, टोकाचा द्वेष,अधार्मिकता, अनैसर्गिकता, अनैतिहासिकता, अनैतिकता, दहशत यांनाच अधिकाधिक प्रतिष्ठा प्राप्त करून देत शौर्याच्या व्याख्येतच अनिष्ट बदल घडवले त्याची गांधीयुगात सुरूवात होत होती.त्यापासून मुक्तीसाठीच गांधीविचार आणि गांधी मार्ग जगभर स्वीकारला गेला.आज तर त्या काळात ज्याची सुरुवात होती त्या साऱ्या वृत्ती, प्रवृत्तींनी कळस गाठला आहे.नवधर्मवाद,नवसांप्रदायिकता,नवसाम्राज्य आणि नववर्चस्ववाद, नवअधिनायकवाद यांच्या नवयुगाचा सामना गांधीमार्गाशिवाय आत्मबळाने करणारा कोणताही पर्यायी मार्ग उपलब्ध नाही.त्यामुळे सर्व प्रकारच्या प्रागतिक वैचारिकतेचा गांधीविचारांशी समन्वय साधण्याचे प्रयत्न होत आहेत.मुख्य प्रवाही माध्यमे जरी बाजाराच्याच तेवढ्या हितसंबंध रक्षणाची माध्यमे झाली असली व म्हणून या विचाराला विकासद्रोही ठरवणाऱ्यांची ती माध्यमे झाली असली तरीही तळपातळीवर जगभरच आज गांधीविचार हेच पर्यायी माध्यम म्हणून उभे आहे.

1967 साली प्रकाशित एका ग्रंथाच्या प्रस्तावनेत आर.आर.दिवाकर यांनी म्हटल्याप्रमाणे गांधींचे जीवन हीच एक मोठी प्रयोगशाळा आहे,ज्यात ते प्रयोग स्वतःवर करत, त्यातून सत्याचा शोध घेत,ते प्रयोग हे मानवी समाजाचा भाग करत, सौहार्द आणि शांतीचा शोध घेत .गांधी स्वतःला कृतिशील आदर्शवादी म्हणवून घेत. या विचाराचे खरे बळ आणि सौंदर्य हा विचार हा वर्चस्व आणि सत्ताकेंद्रीत्वाविरूद्ध,सर्व शोषक व्यवस्था व राज्ययंत्रापासून माणसाला संरक्षित करणारा माणूसकेंद्री विचार आहे यातच आहे.


आधुनिक मानवाने गमावलेले नैतिक आत्मबळ,शांती,प्रेम,करूणा त्याला परत प्राप्त करून देणारा हा विचार आहे.


माणूस म्हणजे त्याची स्वयंजाणीव ,बरे ,वाईट यांचा विचार करणारी व हिताचे काय,अहिताचे काय याचा विवेक असलेली ती जाणीव आहे.ही टिकली तरच मानवता टिकते,ही संपुष्टात आणली गेली म्हणजे मानवी मूल्येच संपुष्टात येतात,जे आज होते आहे.गांधींचा माणसाच्या या स्वयंजाणीवेवर विश्वास आहे.हीच त्यांची नैतिक उर्जा आहे.त्यासाठी मानवतेवरील प्रेम, सेवाभाव,त्यागभावना कायम टिकवण्याचे गांधींचे प्रयत्न आहेत. सर्वोदय हे त्यांचे उद्दिष्ट आहे.त्यातून कोणालाच गाळणे,वगळणे त्यांना मान्य नाही.हे प्रत्यक्षात आणण्यासाठी सत्याचा आग्रह आहे.ती त्याची प्रत्यक्ष कृती आहे. शोषण आहे तोवर त्यापासून मुक्ती हवी आहे,ती हवी आहे तोवर गांधी अमरच आहे. गांधीमार्ग हा एक एकट्याने,गर्दीने वा समूहाने जगण्याचा नव्हे, मार्ग आहे,त्याचा जो सामुदायिक नैतिक प्रभाव आहे तो व्यक्तिगत आत्मबळाचा आहे.ते टिकले तर सामुदायिक नैतिक बळ टिकेल असा हा विचार आहे. सत्याचा आग्रह हा अशा नैतिक बळाशिवाय

शक्य नाही.या जीवनमार्गाचा जीवनपद्धत म्हणून स्वीकार आज जगभरच होत असतांना गांधी समकालीन नाही,त्या विचारांचे आज औचित्य नाही हे केवळ माथेफिरूच म्हणू शकतात.डोके ठिकाणावर असणारा कोणताही माणूस हे म्हणणार नाही. गांधीमार्ग स्वीकारणे म्हणजे तुमचे जीवनच अंतर्बाह्य बदलून घेणे असते. गांधींनी स्वतःतच अगोदर तसा बदल घडवून दाखवला ,सत्याचे प्रयोग करून दाखवले, माणूस या मार्गाने बदलू शकतो, निर्भय बनू शकतो,एकटा माणूस साम्राज्याशी लढू शकतो आणि त्याचे हे बळ सामूहिक करून दाखवू शकतो हे सिद्ध करून दाखवले.याचा अर्थ हा विचार,हा मार्ग हे कोणतेही केवळ वैचारिक तत्त्वज्ञान नसून तो प्रत्यक्षात जगण्याचा विचार आहे. गांधीनीच म्हटल्याप्रमाणे त्यांचे जीवनच त्यांचा संदेश आहे.गांधी नावाचा एक माणूस हे करू शकतो याचा अर्थ माणूसपण शिल्लक असणारा कोणीही हे करू शकतो हा गांधींनी,गांधीविचाराने,गांधीमार्गाने आधुनिक जगाला दिलेला आत्मविश्वास आहे आणि तो अमर आहे.

❑❑❑

ग्रंथाली प्रकाशन,मुंबई



गीताली वि.मं. पुणे
स्त्री मुक्ती चळवळीच्या प्रमुख कार्यकर्त्या.ज्येष्ठ लेखिका व 'मिळून साऱ्याजणी' मासिकाच्या व पुरूष उवाच या दिवाळी अंकाच्या संपादिका.



**डॉ.गीताली वि. मं.**
पुणे

# लोकशिक्षक पुष्पा भावे

शब्दकळा, कलाजाणिवा आणि समाजभान या तिन्हींचा मनोज्ञ संगम असणाऱ्या विदुषी पुष्पा भावे आज आपल्यात नाहीत. त्यांची प्रकृती ढासळत असतानाही शेवटच्या श्वासापर्यंत त्या साहित्य, संस्कृती आणि समाजहिताच्या राजकारणाचा विचार करत होत्या. त्या विषयी संवाद साधत होत्या.

2019 च्या यवतमाळच्या साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटक म्हणून ख्यातनाम साहित्यिक नयनतारा सहगल यांना दिलेलं निमंत्रण आयोजकांनी रद्द केलं, त्याच्या विरोधात साहित्यिक - कलावंतांनी ‘चला एकत्र येऊ या’ हा कार्यक्रम आयोजित केला होता. मुंबईतल्या या कार्यक्रमाला स्वत: नयनतारा सहगल उपस्थित होत्या. एका परीनं त्यांची क्षमायाचना करण्याचा तो कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमात शेवटी पुष्पाताई व्हीलचेअरवर आल्या. व्याख्यान, परिसंवाद कुठेही बोलताना कधीही साधं कागदाचं चिटोरंही न वापरणाऱ्या पुष्पाताईंनी त्या दिवशी आपलं भाषण वाचून दाखवलं, तेव्हा काळजात चर्रर झालं. मात्र पुष्पाताईंचं नेहमीप्रमाणेच नेमकं भाष्य करणारं, ठाम भूमिका घेणारं आणि विवेक जागवणारं निर्भय भाषण ऐकून उमेद वाढली. त्या म्हणाल्या, ‘प्रश्न मूलभूत स्वातंत्र्याचा आहे. समूह जीवनाच्या चारित्र्याचा आहे. समाजजीवनात असलेल्या नैतिक पोताचा आहे. या समाजजीवनाचा नैतिक पोत सुधारला पाहिजे. त्यासाठी सर्वांनी नेटाने प्रयत्न केले पाहिजेत. हे काम विचारवंतांनी, कलावंतांनी नेटाने करायला हवे. हे काम करताना तळागाळातून येणाऱ्यांच्या हातात हात मिळवायला हवेत. अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याबरोबर संवादात पारदर्शकता हवी. हिंसाचाराच्या भयाचे वातावरण निर्माण झाले आहे. हे भय वातावरणात भरून राहिले आहे... कलावंतांना नाडणाऱ्या या परिस्थितीविषयी नयनतारा सतत व्यक्त होत आल्या आहेत. या परिस्थितीचे विचक्षण समीक्षण करणारे भाषण त्यांनी आयोजकांकडे पाठवले आणि त्यातून त्यांनी आपल्याला जागे केले, त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक धन्यवाद!’

आपली विविध प्रकारची स्वातंत्र्ये आज धोक्यात आहेत. जिच्यात वेगळेपण आणि सत्तारूढ विचार प्रणालीला विरोध आहे त्या गोष्टींवर भयंकर हल्ले होत आहेत, लेखक एकटा पडत चालला आहे. अशा या परिस्थितीमुळे लोकशाहीचा पराभव होतो आहे का, असा सजग नागरिकांच्या काळजावर घाव घालणारा प्रश्न पुष्पाताईंच्याही मनात होता. मात्र पराभव अल्पजीवी असतो, यावर पुष्पाताईंचा विश्वास होता. मार्टिन ल्यूथर किंगप्रमाणेच ‘नैतिकतेचा वैश्विक परीघ लांबचं वळण घेऊन जाणारा असला, तरी तो अंतिमत: न्यायाच्या दिशेनेच वळतो,’ यावर त्यांची निष्ठा होती. त्यामुळे आज त्यांच्या पश्चात नैतिकतेचा परीघ न्यायाच्या बाजूनं वळवण्याचं जिकीरीचं काम आपणही निष्ठेनं करायला हवं, हीच त्यांच्या कार्यकर्तृत्वाला आदरांजली!

जिथं जिथं चांगलं काम तिथं तिथं पुष्पाताईंचा सहज आणि सजग सहभाग असायचा. सांस्कृतिक समीक्षक, सामाजिक कार्यकर्त्या असणाऱ्या मराठीच्या प्राध्यापक पुष्पा भावे सगळ्यांच्या आवडत्या ‘बाई’ होत्या. पाच-सहा

दशकं त्यांनी अथकपणे कार्य करत सामाजिक - राजकीय जाणीवेची पेरणी केली आणि अक्षरश: हजारो सजग नागरिक घडवले. ‘आधी केले मग सांगितले’ या पठडीतल्या असणाऱ्या बाई स्वत: अन्याय आणि शोषणाविरुद्ध संघर्ष करणाऱ्या अनेक आंदोलनात अग्रभागी होत्या. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर आंदोलन, देवदासी पद्धत आणि त्यातून होणाऱ्या लैंगिक शोषणाला विरोध करणारं आंदोलन, न्याय्य मोबदल्यासाठी निपाणी येथील बिडी कामगारांना संघटित करणं, दलित मुलींना साहित्याची ओळख करून देत त्यांच्यात हक्कांविषयी जाणीव - जागृती करणं, सत्तेचा दुरुपयोग करणाऱ्या आणीबाणीच्या काळात सरकारच्या चुकीच्या धोरणांवर टीका करणारं साहित्य छापून वितरीत करणं, भूमिगत असणाऱ्या पन्नालाल सुराणा, मृणाल गोरे यांना स्वत:च्या घरात ठेवून घेणं इ. इ. आजूबाजूला काय चालू आहे याकडे लक्ष ठेवत, नवे विचार समजून घेण्याची पुष्पाताईंची सतत तयारी असे. त्यामुळे त्या नेहमी ताज्या - रसरशीत वाटत. तरुण - उगवत्या पिढीतल्या कार्यकर्त्यांना सतत वैचारिक पाठबळ आणि अडी-अडचणीला जिव्हाळ्यानं धावून जाणाऱ्या बाई या समग्र शिक्षक होत्या. कामाचा विलक्षण झपाटा, निरंतर भ्रमंती करणाऱ्या बाई सामाजिक - राजकीय जनआंदोलनं, वंचित - दलित - कष्टकऱ्यांचे संघर्ष, साहित्य, संस्कृती, स्त्रीवादी विचारांच्या चळवळी अशा अनेक चळवळींमध्ये अग्रेसर असल्यामुळे महाराष्ट्रात पुष्पाताई पुरोगामी चळवळीचा चेहरा होत्या. ‘प्रश्नाचं राजकीय स्वरूप लक्षात घेऊन बोलणं महत्त्वाचं’ असं त्या सांगत, हे त्यांचं वैशिष्ट्य होतं.

अशा या राजकीय - सामाजिक क्षेत्रांत सखोल चिंतन, वाचन आणि सक्रीय सहभाग असणाऱ्या पुष्पाताईंचं साहित्यिक योगदानही अनमोल आहे. राजकारण समाजकारण रोजच्या जगण्यातले प्रश्न सोडवण्याबाबत हातभार लावतं, तर साहित्य मनाची मशागत करतं. साहित्यातून मनावर होणारे संस्कार दीर्घ काळ टिकणारे असतात. त्यामुळे त्याचं अनन्यसाधारण महत्त्व असतं, याची जाण पुष्पाताईंना होती. मात्र त्यांच्या कार्यबाहुल्यामुळे त्यांना संख्यात्मक दृष्ट्या जास्त छापील साहित्य निर्माण करायला जमलं नाही. (हे खरं तर समाजाचं मोठं नुकसान आहे.) मात्र त्यांचं मौखिक साहित्य अमाप आहे. त्या काळात त्यांची भाषणं ध्वनिमुद्रित झाली असती, तर त्यांचे शब्दांकन करून ते पुढच्या पिढीसाठी खूप मार्गदर्शक झालं असतं. असो.

सुसंस्कृत मराठी मानस साहित्यप्रेमी आणि नाट्यवेडे आहे. पुष्पाताईंनी लहान वयात असताना विनोबांच्या भूदान चळवळीवर एक नाटक लिहिलं होतं, हे फारच थोड्यांना माहिती असेेल. ‘आम्ही केवळ करमणूक म्हणून नाटकाला जातो, तिथे कोण डोक्याला ताप करून घेणार?’ असं म्हणणाऱ्या मराठी माणसाचं नाट्यवेड फक्त करमणूक, मनोरंजनात वाहून जाऊ नये या तळमळीतून त्यांनी नाट्यसमीक्षा लिहायला सुरुवात केली. संगीताचा जसा कान असावा लागतो, तसे नाटकाचे रसिकत्व असण्यासाठी एक समग्र भान असावं लागतं. ते भान जागं करण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले.

‘कोणत्याही विषयाला स्वत:चे तर्कशास्त्र आणि अमूर्त तत्त्वज्ञान असते, तसे ते नाटकालाही आणि रंगमंचीय प्रयोगाच्या संप्रेक्षणालाही आहे. ते कठीण वा अमूर्त आहे म्हणून पाठ फिरवून कसे चालेल?’ असा खडा सवाल करत त्यांनी प्रेक्षकांना करमणूक म्हणजे मखखपणे सुशीतल आसनात बसणे या विचारापासून परावृत्त करण्याचा आटोकाट प्रयत्न आपल्या नाट्यसमीक्षेतून केला.

कलाव्यवहार हा राजकारण आणि पर्यायानं सत्ताकारण यांच्या संदर्भात घडत असतो म्हणून समीक्षेला त्याचं मत हवं अशी पुष्पाताईंची आग्रही भूमिका होती. त्यांना स्वत:ला सांस्कृतिक राजकारणाची सखोल जाण होती, रंगभूमीच्या समग्रतेचं अन्य कलांचं भान त्यांच्या नाट्यसमीक्षेत

अनेक ठिकाणी प्रतिबिंबित होतं, असं जाणकारांचं मत आहे.

1969 मध्ये लिहिलेला 'थिएटर ऑफऍब्सर्ड' हा त्यांचा प्रबंधात्मक लेख त्यांच्या साहित्य, संस्कृती आणि कला या क्षेत्रांतल्या सखोल अभ्यासाचा परिपाक होता. प्रायोगिक रंगभूमीचे समाजाशी नाते इतरांपेक्षा वेगळे कसे हा प्रश्न त्यांनी ऐरणीवर आणला. त्या काळात बहुतेक स्वतंत्र सामाजिक मराठी नाट्यसंहितांमध्ये प्रारंभिक कंसात असणारे (स्थळ : दिवाणखाना) हे दोन शब्द सामाजिक नाटकांचा खुजेपणा दाखवतात. नाटक पाहणं ही एक सामाजिक सांस्कृतिक कृती आहे, असं म्हणत पुष्पाताईंनी प्रेक्षकांना त्या दिवाणखान्याबाहेर काढण्याचं महत्त्वाचं साहित्यिक काम केलं, त्यासाठी त्यांनी 'माणूस' साप्ताहिकात 1972-73 मध्ये नाटकासंदर्भात लेखमाला लिहिली. त्यांची नाट्यपरीक्षणं म्हणजे नाटक कसं पाहावं, त्या अनुभवाचं विश्लेषण कसं करावं आणि त्यातील नाट्यात्मता अनुभवल्यावर त्या साऱ्याची भाषिक मांडणी कशी करावी, याचा तो वस्तूपाठ होता. मराठी नाटक केवळ करमणूकप्रधान न राहता लक्षणीय आविष्कार व्हायचे असेल तर नाटककाराचे आणि दिग्दर्शनाचे जीवनभान, त्यांना गवसलेला रंगमंच आणि त्यांनी सादर केलेल्या नाट्यानुभवाशी सहकंपन पावणारा प्रेक्षक हे एका पातळीवर यायला हवेत, असं त्यांचं मत होतं. प्रयोग समीक्षेचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट रसिकांना आकलनाला, अर्थनिर्णयनाला मदत करणे, त्यांची अभिरूची संस्कारित करणे हे आहे. अर्थनिर्णयनासाठी एका वाङ्मयीन प्रवासातील भाषेची संवेदना, ती मधील बदलती रूपे, कला जाणिवेचा संस्कार, मूल्य जाणिवांचे अन्वय हे सूक्ष्मपणे जाणूनच लेखक वा नाटककार जाणता येतो.

प्रत्येकाचं जगणं हे एक पुस्तक असतं असं म्हणतात. पुष्पाताईंच्या जगण्याचा विशालपट बघता;त्यांचं आयुष्य एक जाडजूड (आकाराच्या आणि आशयाच्या दृष्टीनंही) ग्रंथच होता. त्याची एक झलक आपल्याला 'लढे आणि तिढे'- मेधा कुलकर्णी आणि 'पुष्पा भावे विचार आणि वारसा'- गणेश विसपुते आणि वैशाली रोडे संपादित दोन ग्रंथांमधून मिळते.

पण कोणत्याही समीक्षेमध्ये मूल्यनिर्णयनाच्या दिशेने स्वत: पाऊल टाकावे लागते आणि प्रेक्षकाला, वाचकाला असे पाऊल टाकायला मदत करावी लागते. शिवाय कोणताही एक नाट्यप्रयोग सुटा नसतो. तो त्या संस्कृतीतील नाट्यसाहित्य आणि रंगमंचीय परंपरांचा अन्वय घेऊन येतो. तो संदर्भही जोडून घ्यावा लागतो. प्रेक्षकांचे, वाचकांचे काही प्रकारचे स्मरण जागे करावे लागते. केवळ रंगकर्मी निष्णात असून चालत नाहीत, तर प्रेक्षकही संस्कारित का असावे लागतात या विषयीचं त्यांचं हे विश्लेषण अत्यंत महत्त्वाचं आहे. नाट्यसमीक्षेचं मूलभूत काम प्रेक्षकाला विचारप्रवृत्त करणं हे आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता.

पुष्पाताईंचं विश्लेषणात्मक आणि सैद्धान्तिक असं हे समीक्षालेखन परखड असलं, तरीही त्यात कुठेही विखार नव्हता. अनेक कलावंत, दिग्दर्शक, नाटककार त्यांच्या समीक्षेनंतर त्यांच्याशी चर्चा करायला उत्सुक असत. नाट्यवर्तुळात त्यांचा दरारा होता. संबंधित व्यक्तींशी जिव्हाळ्याचे संबंध असले, तरी समीक्षक म्हणून आवश्यक असणारी अलिप्तता त्या राखत. त्या काळात बहरू लागलेल्या रंगभूमीला त्यांनी मूल्यभान दिलं. 'सखाराम बाईंडर' आणि 'मराठी प्रेक्षक' या 'माणूस'मधील लेखात सखाराम बाईंडर अश्लील आहे, समाज विघातक आहे, हे मत मला मान्य नाही, असं सांगताना काही महत्त्वाचे मुद्दे त्या मांडतात. त्या लिहितात, 'स्त्री-पुरुष संबंध हा इतका गुंतागुंतीचा अनुभव असतो की, त्यामुळे काव्यात्म प्रीतीच्या गहिऱ्या रंगापासून ते पाशवी वासनेच्या भयावह स्वरूपापर्यंत त्याची अनंत रूपे वाङ्मयात व्यक्त होऊ शकतात. सखाराम बाईंडर या

नाटकाचा सर्वांगीण परिणाम उत्तेजक नसून जुगुप्सेचा आणि माणसाविषयीच्या अतीव करुणेचा आहे. हा परिणाम जिथे आहे, तिथे अश्लीलता लोकानुरंजनासाठी आलेली नसून जीवनाचा एक भेदक अनुभव व्यक्त करण्यासाठी अपरिहार्यपणे आलेली आहे. नाटक प्रौढांसाठी आहे. ज्या माणसाला समोर दिसणाऱ्या दृश्यांचा संपूर्ण कलाकृतीच्या चौकटीत विचार करता येतो, शृंगारदृश्यामुळे ज्याचे चित्त अतार्किकपणे विचलीत होत नाही, जीवनातील अनेक गुंतागुंतीचे अनुभव जाणून घेण्याची ज्याची तयारी आहे, अशा माणसालाच प्रौढ म्हणावं', असं त्या निक्षून सांगतात.

महेश एलकुंचवार यांच्या दोन अंकी 'गार्बो' मधली भडक वाटणारी हिंसा ही वेगाने हरवणाऱ्या मानवी सृजनात्मक शक्तीच्या शोधातून, त्या शोधानंतर येणाऱ्या हताशतेतून निर्माण झाली आहे. हिंसा ज्या वेळी रंगमंचावर आविष्कृत होते, त्या वेळी ती विविध गहन मानवी अनुभव व्यक्त करते. नाट्यकृतीत योजली गेलेली हिंसा शस्त्राने केलेल्या हत्येपेक्षा जास्त क्रूर म्हणून अधिक परिणामकारक असते. आजच्याच नाटककारांना हिंसेचा आविष्कार का करावासा वाटतो? कारण एखादे निरुपद्रवी जनावरही कोपऱ्यात गाडले असताना चाल करून येते, त्याचप्रमाणे परिस्थितीच्या कोंडीत सापडलेला आजचा 'माणूस' स्वत्व राखण्याच्या या आणीबाणीच्या प्रसंगी- क्रायसिस ऑफ आयडेंटिटी- क्रूर श्वापदासारखा आक्रमक होतो. हे त्याचे क्रूर रूप विकल आणि केविलवाणे असते. गार्बोच्या नाट्यलेखनात रचनात्मक दृष्ट्या आणि प्रयोग संकल्पनात शैलीच्या दृष्टीकोनातून काही तरी निश्चित खटकत होते, काय ते शोधून काढणं त्यांना जमलं नाही. पण त्या म्हणतात, 'या आणि अशाच प्रयोगांच्या अपयशानेही, मतभेदांनीही व्यावसायिक रंगमंचावरील यशापेक्षा अधिक लक्षणीय असा विकास होणार आहे.'

पुष्पाताईंनी 'मिळून साऱ्याजणी' मासिकात सलग दोन वर्ष (१९९४-९५) 'राजकारणाच्या अंगणात' आणि 'राजकारण आपल्या घरात' या दुपानी लेखमाला लिहिल्या. मध्यमवर्गीय कुंदाताई, घरकाम करणारी अनसूया तिची पुढच्या पिढीतली शिकलेली मुलगी मंजुळा आणि पुष्पाताई यांच्यामधला सहज-सोपा, मोकळा-ढाकळा मनाला भिडणारा संवाद हे या लेखमालेचं वेगळेपण होतं. एखाद्या साध्या घटनेतूनही राजकारण, अर्थकारण, समाजकारण आणि संस्कृतीकारण कसं प्रतिबिंबित होतं, हे त्या साध्या उदाहरणातून दाखवून देत होत्या. लेखमालेत काही संकल्पना, राजकीय - सामाजिक घडामोडी त्या संदर्भात प्रातिनिधिक शंका, प्रश्न यांना सोपेपणानं उत्तरं देण्याचा प्रयत्न करत सजग नागरिक होण्यासाठी काय करायला हवं, हे त्या सांगत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ऱ्हासाचं कारण म्हणजे शिवसेना! असंही त्या परखडपणे लिहित. क्रौर्य आणि बीभत्सतेला शौर्य मानलं शिवसेनेने! याविषयी त्यांना दु:ख आणि सात्विक संताप येत असे. तो व्यक्त करायला लागणारं धाडस त्यांच्यापाशी होतं. 'मिळून साऱ्याजणी' मासिकाच्या दशकपूर्तीच्या निमित्तानं 'कहाणी साऱ्याजणी'ची या नाट्याविष्काराची समृद्ध संहिता पुष्पाताईंनी 1999 मध्ये लिहिली. अतिशय काटेकोरपणे शब्द वापरत बाई म्हणून बायांना सोसाव्या लागणाऱ्या यातनांना अगदी नेमकेपणानं या संहितेत हात घातला आहे. 10 वर्षातल्या कथा, कविता, मुलाखती, लेख, संवाद या सगळ्यांतून त्या गोष्टीचे अंतस्थ पदर, त्यांचा पोत पुष्पाताईंच्या ओघवत्या भाषा प्रवाहातून झिरपत मनात घर करून राहतो, असं जाणकारांनी नोंदवलं.

पुष्पाताईंनी दक्षिण आशियाई पुरुषत्वाचा सखोल अभ्यास केला. 'मिळून साऱ्याजणी'च्या मार्च अंकात 'पुरुष प्रतिमेची घडण, संदर्भ : दक्षिण आशिया' या लेखात संदर्भ संपन्नता विषय मांडणी सुस्पष्ट करते. त्या लिहितात, 'पुरुष प्रतिमा फक्त स्त्रीच्याच संदर्भात घडत नाही. इतर पुरुष, राजकीय

प्रवाह, त्यातले संघर्ष असे अनेक घटक पुरुष प्रतिमा घडवत असतात. भारताच्या संदर्भात जातीय संघटनाही या जडणघडणीवर संस्कार करत असते. खरं तर सद्यस्थितीत हा लेख मुळातूनच वाचायला हवा. त्यातून पुरुष बलात्कार का करतात, हिंसाचारी का होतात, याचं मूळ कारण कळायला मदत होईल.'

पुष्पाताईंनी लिहिलेल्या प्रस्तावनांमधल्या त्यांच्या लखलखीत विचारांच्या आणि विश्लेषणांच्या प्रकाशात पुस्तकाचं अंतरंग उजळून निघतं. उदाहरणार्थ, प्रतिमा जोशी यांच्या 'जहन्नम' या कथासंग्रहाला लिहिलेली प्रस्तावना, 'समूह जीवनाची गुंतागुंत', 'लेकी वाचवण्याच्या गोष्टी' ही 'सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी' हा निवृत्त सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी राबवलेल्या 'मुली वाचवा' मोहिमेच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या कथासंग्रहाची प्रस्तावना. 'विश्लेषक दस्तऐवज' ही ॲड. निशा शिवूरकर यांच्या 'लढा टाकलेल्या स्त्रियांचा' या पुस्तकाची प्रस्तावना. 'स्त्रीमिती - निवडक मिळून साऱ्याजणी' या नीलिमा गुंडी संपादित पुस्तकाच्या प्रस्तावनेत 'साऱ्याजणी'चं सार त्यांनी मांडलं आहे. त्या लिहितात, 'लेख संग्रहावर नजर टाकल्यावर वाचकांच्या लक्षात येईल की, वाचकांना भय वाटणार नाही, अशा पद्धतीनं यात अमूर्त स्त्रीवादी विचार, धर्मचिकित्सा, शांतताविचार, निकोप समाजजीवन, स्त्री-पुुरुष नाते, इतिहासातील व्यक्तींकडे नव्याने पाहणे... पण येथे विषयांची यादी महत्त्वाची नाही. व्यक्ती आणि समाज या दोन्हीत परिवर्तन घडवू पाहणारा दृष्टीकोन यामध्ये आहे. माणसाविषयी अपार करुणाही त्यामागे आहे.'

आणि सरतेशेवटी पुष्पाताईंच्या सर्वांत जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे राजकारण! स्त्री चळवळ, इतर आंदोलनं आणि सर्व वयोगटातल्या त्या राजकारण कसं सर्वस्पर्शी, सर्वव्यापी आहे आणि ते आपल्या सर्वांच्या जगण्याच्या सर्व पैलूंवर कसा प्रभाव टाकतं हे उलगडून दाखवत असत. त्या संदर्भात मी त्यांची इचलकरंजीला मे 1996च्या 'विचारवेध संमेलना'च्या वेळी खासगीत मुलाखत घेतली होती. त्या मुलाखतीत त्यांनी ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे असणारे अनेक मुद्दे मांडले होते. त्यातले काही आजही महत्त्वाचे असणारे मुद्दे इथे आवर्जून मांडते आहे. त्या तेव्हा म्हणाल्या होत्या...

'स्वातंत्र्य चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ अशा अनेक चळवळीत स्त्रिया सहभागी झाल्या. मात्र काही सन्माननीय अपवाद वगळता दैनंदिन राजकारणाच्या संदर्भात स्त्रिया सहभागी होताना दिसत नाहीत. तिच्या वेगवेगळ्या जबाबदारीतून सार्वजनिक जगायला तिला वेळही काढता येत नाही आणि बाहेरचं क्षेत्र पुरुषाचं आहे असा तिचा समज करून दिला आहे. आज राजकारण जास्त गुंडागर्दी, पैशाचं होत चाललं असताना तिच्याकडे पैसा नाही आणि क्षमता पण नाही, मात्र आता स्त्रियांच्या राखीव जागांचं प्रमाण वाढल्यामुळे ग्रामपंचायत पातळीवर ती सहभागी होताना दिसते. तिची क्षमता हळूहळू निर्माण होईल. जे पुरुष राजकारणात सहभागी होतात, त्यातल्या किती जणांची क्षमता असते? पण या मुद्द्यांची कधीच चर्चा होत नाही. स्त्रियांनी स्त्रियांचंच राजकारण करावं असं मला वाटत नाही. त्यांनी सर्व प्रकारच्या राजकारणात भाग घ्यावा. कारण संसदेपासून ग्रामपंचायतीपर्यंत होणारे निर्णय तिच्या जगण्याच्या प्रतवारीवर परिणाम करतात. स्त्रियांनी राजकारण करण्यासाठी आपल्याला स्त्रियांंचं राजकीयकरण वेगाने करायला पाहिजे. आज स्त्रीविरोधी गट म्हणजे शिवसेना, भाजप त्यातच स्त्रिया जास्त आहेत. ही चुकीची असली तरी वस्तुस्थिती आहे.

राजकारणाकडे बघण्याचा बायकांचा आणि पुरुषांचा दृष्टीकोन काही वेगळा आहे, असं काही मी मानत नाही. बाईला पाण्याचा प्रश्न, सफाईचा प्रश्न इ. खरे प्रश्न कळतात, म्हणून बायकांनी नगरपालिका पातळीपर्यंतच सहभागी व्हावं, अशी एक मांडणी आहे, त्याच्याशी मी अर्थातच सहमत नाही. शिवसेनेची सर्व विचार करण्याची पद्धत

नगरपालिका पातळीवर आहे, ठाकरेही तसंच बोलतात. त्यांना राष्ट्रीय rhetoric पटतं, ते दुसऱ्याचा द्वेष करायला सांगतात. एक काळ असा होता की, बायका सांगत की एक पिढी शिवसेनेमुळे वाया गेली. पण आज शिवसेनेमुळेच त्यांना सत्ता, संपत्ती मिळते, त्यामुळे कुणी बोलत नाही. पण एके काळी शिवसेनेत हिंसा शिकवली जाते, अशी त्यांची तक्रार होती.

राजकारणाची खरी जाणीव असणं म्हणजे संपूर्ण स्तरांचा संबंध बदलणं, अंतर्स्तरांचा संबंध बदलणं, एवढी जाणीव सामान्य माणसाला आहे, असं कुणी मान्य करणार नाही आणि ज्या बायका इतकं बंदिस्त आयुष्य जगल्या, त्यांना तर ती जाणीव कशी असणार? राजकारणाची प्रक्रिया त्रिस्तरीय आहे, ह्याचं शिक्षण घेण्याची गरज आहे.' नंतर पुष्पाताई म्हणाल्या, 'लोक मला विचारतात, तुम्ही राजकारणाच्या विषयी इतकं बोलता, पण तुम्ही राजकीय पक्षाच्या सदस्य नाही, हा दुटप्पीपणा नाही का? तेव्हा हा दुटप्पीपणा नाही, असे मी सांगते कारण मला मान्य असणारा एखादा पक्ष असणं किंवा नसणं हा एखाद्या देशाच्या वस्तुस्थितीचा संदर्भ आहे. पण माझी राजकीय जाणीव असणं / नसणं हा माझ्या राजकारणाचा एक भाग आहे. प्रश्नाचं राजकीय स्वरूप लक्षात घेऊन बोलणं महत्त्वाचं!'

'राजकारणात जाणं ही मूल्यात्मक वाईट गोष्ट नाही. पण चळवळीतला माणूससुद्धा सांगतो की, माझा राजकारणाशी काही संबंध नाही. जरी तुम्ही राजकीय पक्षात नसलात तरी तुम्हाला राजकीय भान असायला हवं. स्त्रीमुक्ती चळवळ अपॉलिटिकल कशी असू शकेल? तसंच नर्मदा बचाओ आंदोलन- एवढी मोठी चळवळ नॉन-पॉलिटिकल राहूच शकत नाही. प्रा. गो. पु. देशपांडे म्हणत तसं एकेका मुद्द्याचं बायफर्केशन केल्यानी लोकांना सपोर्ट करायला सोपं जातं कारण मग काही राजकीय भूमिका घ्यावी लागत नाही. एखादी स्त्री राजकारणी आहे, हे शिवीसारखं वापरू नये. ज्यांची कुणाची क्षमता आहे, त्यांनी जरूर राजकारणात जावं आणि त्या राजकारणात गेल्या म्हणजे चळवळीला सोडून गेल्या असंही मानू नये. राजकारण ज्या स्वरूपाचं आहे, तिथं निवडून येण्यासाठी काही मार्ग अवलंबावे लागतात. स्त्री चळवळीतील कार्यकर्ती राजकारणात गेल्यावर आपण बाहेरच्या लोकांनी तिनं काय करावं ते तिच्यावर सोडावं. तिच्या सद्सद्विवेकावर ते ठेवावं. आपण तिच्या विवेकाचे राखणदार होऊ नये.

स्त्री चळवळीमुळे एक नक्की झालं की, प्रत्येक पक्षाच्या घोषणापत्रात स्त्रियांसाठी काही करायला पाहिजे असं म्हणावंसं वाटतंय. शरद पवारांनी महिला धोरण जाहीर केलं हे इंडिकेशन आहे स्त्री चळवळीचा रेटा असल्याचं. तसंच एका वर्षात जळगाव केसचा निकाल लागला हा पण स्त्री चळवळीचाच परिणाम आहे. पण हा रेटा पुरेसा परिणामकारक नाही. खेडेगावातल्या बाईला पुरेसं संरक्षण नाही. त्यांच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करायला हवं. पिण्याचं पाणी, राहायचं घर आणि दारूबंदी या तीन मुद्द्यांवर भर दिला, तर बायकांचा सहभाग वाढेल आणि यातून जे राजकारणीकरण (पोलिटिसायझेशन) होईल ते नुसती शिबिरं घेऊन, व्याख्यान देऊन होणार नाही. बाईला जीवनाविषयी बऱ्यापैकी आकलन, शहाणपण असतं. मानवी संबंध चांगले कळतात. पण आजच्या राजकारणाचा पोतच बदलला आहे. राजकारणाला खूप पैसा लागतो, त्यात गुंडगिरी आहे. पूर्वी मृणालताई, अहिल्याताई मानवी संबंधांच्या पायावर काम करत. दर महिन्याला लोक आपल्या पगारातले पैसे घरी जाण्यापूर्वी आणून देत, त्यातून त्यांचं ऑफिस चालायचं पण आता त्या पोतापर्यंत जाणं अवघड आहे.

खऱ्या अर्थानं मुक्तपणे कसलं ही दडपण न ठेवता स्त्रियांनी राजकारणात भाग घेतला, तर त्यातून गुंडगिरी कमी होईल. स्त्री चळवळीचा यासाठी फायदा होऊ शकेल. आपण केवळ प्रतिनिधींनी काय करायचं यापेक्षा मतदारांचंसुद्धा याबाबतीत

प्रशिक्षण करायला हवं. मतदारांनी का नाही एक गट करून आमदार किंवा नगरसेवकाला मदत करायची? तळागाळाच्या चळवळीतून उमेदवारांनी यायला पाहिजे. हे बाईविषयीच नाही पुरुषांविषयी पण मी म्हणते आहे. आजवर सामान्य माणूस, चळवळीच्या कार्यकर्त्यांनी पण राजकारणासंदर्भात सोवळेपणाची भूमिका घेतली. याला राजकारणी पण जबाबदार आहेत. ते सांगतात, विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी, स्त्रियांनी राजकारणात पडू नये.

राजकारण वाईट ही भूमिका मला अजिबात पटत नाही. राजकारण वाईट असेल तर मग असेल हिंमत तर तुम्ही ते सुधारून दाखवा. हे बोलायला सोपं पण करायला कठीण आहे आणि पहिला ठपका माझ्यावरच येतो. तत्त्वनिष्ठा बोलता बोलता जे परदेशी निधी घ्यायला लागले, त्यांच्याविषयी मला वाटतं ही कसली तत्त्वनिष्ठा! कारण तत्त्वनिष्ठा म्हणून तुम्ही अपोलिटिकल राहणार आणि परदेशी निधी तर सर्वांत पॉलिटिकल आहे, पण लोक हे मान्य करत नाहीत. मी परदेशी निधी घेणार नाही, पण दुसऱ्या कोणी घेतला तर त्याविषयी मी सारखी चिकित्सा करणार नाही. Holier than thou ही भूमिका मला मान्य नाही.

आजच्या अर्थव्यवस्थेनं निर्माण केलेलं जे राजकारण असेल त्याला तोंड देण्यासाठी विस्थापितांची आणि जे बेकार होणार त्यांची एक प्रचंड चळवळ उभी करावी लागणार आहे. सर्व विस्थापितपणा जोडत गिरणगाव, इतर धरणग्रस्त असं सर्वांना कुणी हिंमत असली, तर जोडून मोठ्ठी चळवळ चालवायला हवी...

अशी मोठी चळवळ उभारण्याचे प्रयत्न चालूच आहेत. मात्र त्या चळवळींना मार्गदर्शन करणारा पुष्पा भावे नामक वैचारिक दीपस्तंभ आज अस्तित्वात नाही. पण आपल्या सर्वांमध्ये त्यांनी जी विचार बीजं पेरून ठेवलेली आहेत, त्याचं भरघोस पीक निघण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू या. कारण काळ मोठा कठीण आहे...

डॉ. गीताली वि. मं.
ब-२, ५०१ कुमार प्राईड पार्क,
सेनापती बापट मार्ग,
पुणे ४११०१६
संपर्क : ९८२२७४६६६३

❑❑❑

**जाहिरात**



# काव्यसंचित



**केशव मेश्राम**

साठोत्तरी पिढीतील महत्वाचे कवी. मेळा, उत्खनन, जुगलबंदी, अकस्मात, चरित, कृतकपुत्र, अनिवास हे कवितासंग्रह, हकीगत आणि जटायू, पोखरण या कादंबऱ्या, पत्रावळ,धगाडा,मरणमाळा हे नऊ कथासंग्रह प्रसिद्ध. गतकाळाचे वास्तव नजरेसमोर ठेऊन वर्तमानाला सामोरे जाणारी त्यांची कविता असून ' आत्मपीडेतून आत्मशोधाचा प्रत्यय 'हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव आहे. व्यक्तिगत भावानुभवांचे केंद्र न सोडताही विराट समूहवेदनेशी समन्वय साधणारी कविता असे त्यांच्या वर्णन करता येईल.अनेकांर्थ सूचक शब्दरचना,मानसिक स्पंदनाचे चढउतार आणि टवटवीत प्रतिमायोजना हे केशव मेश्राम यांच्या कवितेचे विशेष होय.

---

## केशव मेश्राम : सहा कविता

### 1. बंद दरवाजे

सगळया नजरा रोखलेल्या आकुंचित माझ्यावर, अविश्वासाचे धावरे ढग त्यांच्या डोळयांत गच्च भरलेले

मी पेटवली लालबुंद मने; सळसळती दाट अरण्ये
माझे मन उन्मन खळखळले कितीकांच्या ओठांतून
गरगरले आत्मतृप्त शेवाळ पुंज झुळझुळत्या प्रवाहाच्या थंड खोल भोव-यात
कुरवाळली माझ्या शब्दांनी, डोळयांतील तिरस्काराची धार पावले माझी ताठ एकाच जागी गोठलेली

एवढेच ,मी एवढेच म्हणतो : माझ्या भूमिकेवर माझी निष्ठा आहे
जितका आहे द्वेष तुमच्या डोळयांत माझ्याविषयी.
त्यांच्या जुनाट वाडयांचे अजस्त्र दरवाजे
करकरत बंद होताहेत.... अडसर लागताहेत.
माझ्या हाकांना मोकळे आहे रान आणि मळवट भरलेले तडतडते सरण.

### 2. एक दिवस मी परमेश्वराला..

एक दिवस मी परमेश्वराला आईवरून शिवी दिली : तो लेकाचा फक्त फक्कन हसला, शेजारचा जन्मजात बोरूबहाद्दर उगीचच हिरमुसला,

एरंडेली चेहरा करून मला म्हणाला : "तू असा रे कसा, त्या निर्गुण निराकार अनाथ जगन्नाथाला काहीतरीच बोलतोस ?
शब्दांच्या फासात त्याचा धर्मफणा धरतोस ? "

पुन्हा एकदा मी कचकून शिवी दिली,
विद्यापीठाची इमारत कमरेपर्यंत खचली,
माणसाला राग का येतो या विषयावर आता तेथे संशोधन सुरू आहे,
उदबत्तीच्या घमघमाटात भरल्या पोटाने भावविव्हळ चर्चा झाली, माझ्या वाढदिवशी मी परमेश्वराला शिवी दिली.

शिवी दिली, शिव्या दिल्या, साटांसारखे शब्दांचे फटकारे मारीत मी म्हटले,

साल्या! तुकडाभर भाकरीसाठी गाडीभर लाकडं फोडशील काय ? चिंधुक नेसल्या आईच्या पटकुराने घामेजले हाडके शरीर पुसशील काय ?
बापाच्या बिडीकाडीसाठी भावाबहिणींची हाडके झिजवशील ?
त्याच्या दारूच्या घोटासाठी भडवेगिरी करशील ?

बाप्पा रे, देवबाप्पा रे ! तुला हे जमणारच नाही,
त्यासाठी पाहिजे अपमानित मातीत राबणारी,
प्रेम करणारी मायमाऊली....
एक दिवस मी परमेश्वराला आई वरून शिवी दिली.

3. **माझ्या आयुष्यात**

माझ्या आयुष्यात तुला जागा दिली...
म्हणालो आभाळाने कुणाचे अस्तित्व नाकारायचे नसते एखाद्या इवल्याशा पाण्यात बुडून जायचे असते.

माझ्या आयुष्यात मीच उभा होतो दाटीवाटीने,
कुणी पुटपुटले : ' स्वतःला अडकवायला
अशा कारणांच्या खुंट्या बऱ्या दिसतात...
कुणी डाफरले : ' ज्याची उंचीच बेताची
साला ! स्वतःलाच आभाळ समजू लागलाय.
कुणी बोलले : ' बुडायचेच असेल तर पुरते
कुठलेही पाणी... आंघोळ एकदाच असते...

तरी दिली आयुष्यात माझ्या, तुला जागा...
जागाच होतो गुहेत धुमसत... असावध नक्कीच नाही.

घुसमटलेल्या कोंदट जाळीत जळक्या फुलांचा उग्रगंध झरझरला,
प्रकाशाने व्हावे प्रतिबिंबात द्विगुणीत
तसे माझे मन फाकले, सामावले तुला :
आता तर काळोखाची शिंपलीही मिटली,
माझ्या आयुष्यात तुला माझ्याइतकीच जागा दिली.

4.**आजीची गोष्ट**

गाडाभर रद्दी खरडून
महाकवी बनवणाऱ्या देशात.... बेटा तू का पैदा झालास ?
मरून गेला आजा तुया, लोकांची लाकडं फोडून,
घट्टे पडले तरहाताले बाळंतपणं करून करून,
बाप तुवा मिलात जातो तरासनच्या साच्यावर
माय तुयी वायंडरीमधी...
चालते सारे पैशावर.
अरे ! जेथी तेलमेल नाही... मानमाणुसकी नाही,
तेथी बाप्पा, काहून आलास ? आलास तं आलास,
तूही जातीचा मरण घेऊन आलास !
बेटा सांग ! का पैदा झालास ?

शिकावा खावाले शिळंबासं आंबीलकढी असंल तसं
घरात काही नसंलच तं पेवावा पानी ताकंच जसं,
उन्हाले भेवावं कहाले ?
सुर्व्या तं आपल्याच गरम रक्ताचा, मी जाईन मातीघरी तवा आणजो- कोरा कपडा तुया घामाचा,
दुकानातून इक्ताचा,
शेकजो नसा आतड्यावाणी...बापजाद्याची म्हणजो गाणी,
नोको जाऊ देवाधरमात, तिरथ जत्रेच्या नस्त्या भरमात,
रडावा नाही... धवावां नाही, आलास बाप्पा पैदा झालास, हाती धरून सब्बल पक्की,
आता चांदावाणी हास
गाडा ओढ, पेटव रद्दी... एवढ्यासाठी तं तू आलास... बेटा ! मान्साले मानूस कर...

तरच तू शाईर झालास... आमच्या घरात आलास,
आता रडू नोको हास

**५. पूर्तता**

अंगभर पसरते एकान्तसमयी हताशेची सुस्ती
सापाच्या विषासारखी,
फुटलेत माध्यावर एकदम इतके ढग
मनाची लसलसती मुळे धुऊन धुपून गेलीत.
... अमित्र आभाळाखालचे हे सांगावे कुणाला ?

क्षण एक एक तरतरत चढतो मणका मणका बधीर
बनत जातो, पुराने घुसळावा तळ गाठाळणाऱ्या
रक्तासारखा तळहातावरच्या रेषाही तशा परागंदा,
अस्तित्वाचे माजवण जिभेवरल्या शब्दांना अलगद
टिपणारे
क्षण जळवेसारखे तृप्त सुशान्त

खडकावर उगवलेल्या शेवाळाशी आता साधतो
आहे अखेरचा मूक संवाद
माझ्या जगण्यावरच पिवळट वेलींचा मलूल गुंता,
माथ्यावरल्या फुटक्या ढगांची अपरिहार्य पूर्तता !

**--- केशव मेश्राम**
**(डॉ गिरीश सपाटे यांच्या सौजन्याने)**



प्रा.डॉ.भूषण रामटेके,पुलगाव
कवी, समीक्षक व वैचारिक लेखन करणारे महत्वाचे लेखक म्हणून महाराष्ट्रात ख्याती. उजेडाची कविता , तुटलेल्या लोकांची कविता आणि मी रांगेतच उभा आहे हे तीन कवितासंग्रह, जागतिकीकरण व साहित्यसमीक्षा हा समीक्षग्रंथ आणि धर्म,धम्म व जातीचे राजकारण हा वैचारिक लेखांचा संग्रह त्यांचे नावे आहे.अनेक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित .



**प्रा.डॉ.भूषण रामटेके**
**पुलगाव**

# केशव मेश्राम यांची कविता

आंबेडकरवादी मराठी साहित्यिकांच्या पहिल्या पिढीतील एक महत्त्वाचे नाव म्हणजे केशव मेश्राम. ते एक कथाकार, कांदबरीकार, ललितलेखक, समीक्षक व कवी म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात परिचित आहेत. त्यांच्या साहित्याचा खास एक चाहतावर्ग उभ्या महाराष्ट्रात आहे. आंबेडकरवादी साहित्याच्या पारंपरिक चाकोरीबाहेरचे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले गेले. त्यांच्या 'उत्खनन' ह्या पहिल्या कवितासंग्रहापासूनच त्यांचे वेगळेपण नजरेस भरले. त्यांच्या साहित्यकृतीने मराठी साहित्य समृद्ध झाले. केवळ आक्रोश, टाहो, प्रचारी ह्या विशेषणांपासून त्यांची कविता दूर राहिली. 'आंबेडकरी कवितेतील भावकविता' हे विशेषण त्यांच्या कवितेला शोभून दिसते. पहिला कवितासंग्रह 'उत्खनन'मध्ये एकाच वेळेस दोन केशव मेश्राम दृष्टीस पडतात. एक भावकवी केशव मेश्राम तर दुसरे आंबेडकरी केशव मेश्राम, त्यामुळेच कदाचित प्रा. बाळकृष्ण कवठेकरांनी त्यांना कोणत्याही एकाच मार्गाने चालावे, असे सुचविले होते. आणि केशव मेश्रामांनी पहिला मार्ग जवळ केला.

त्यांचा स्वकेंद्री स्वभाव आणि समष्टीचे विलक्षण भान यांच्या संमिश्रणातून कवितेचे एक नवे रसायन निर्माण झाले. एक दिवस मी परमेश्वराला हया कवितेत म्हणतात

"साल्या! तुकडाभर भाकरीसाठी
गाडीभर लाकडं फोडशील काय?
चिंधुक नेसल्या आईच्या पटकुराने
घामेजले हाडके शरीर पुसशील काय?"
('उत्खनन'. पृ . 74)

देवबाप्पा हे कधीच करु शकणार नाही. असे भडकपणे मांडतात. परंतु तसे त्याचे व्यक्तिमत्त्व नाही. 'उत्खनन' मधील 'अजूनहीं' या कवितेतून प्रेयसीला जेव्हा कवीची जात कळते तेव्हा ती तिऱ्हाईतासारखी कशी वागते. याचे चित्र प्रखरपणे मांडतात. ती पुढे आपली ओळखही दाखवित नाही. आणि भेटलीच तर

"नंतर ती भेटली गडबडीतच, तिने हात हालवला,
त्यानंतर ती हसली पुसटसे
आणि मग एकदा ओठांच्या कडांवरुन झुळूक गेली..
आता ती दिसते, गर्दीतल्यासारखी, गर्दीतच."
('उत्खनन', पृ. 36)

हे जातीयतेचे दुःख कवीला त्याच्या अंतापर्यंत असल्याचे दिसून येते. यामुळेच कदाचित कवी निसर्गाकडे वळताना दिसतात. असे असले तरी पारंपरिक निसर्गकवितेसारखी त्यांची निसर्गकविता नाही. निसर्ग प्रतिमांचा वापर व्यक्तिगत दुःख आणि

समष्टीचे दुःख चितारण्यासाठी ते करतात. 'एकली भयाणभोर झाडे', 'झाडे माझी, माझ्या जातीची', 'तृप्त, परित्यक्त झाडे', 'झाडे शहराने टाकलेली 'अशा प्रतिमांनी दलित जीवनाचे दुःख शब्दांकित करतात.

चौथी पास झाल्यावर ते 1948 मध्ये शिकायला मुंबईला आले. तेथेच त्यांना वाचनाची सवय लागली.. तेथील वाचनालय व ग्रंथालयांमध्ये जाऊन वाचन करीत. परंतु पुढे पालकांच्या आपत्तीमुळे त्यांचा मुंबईतील मुक्काम आणि शिक्षण सुटले. अकोल्याला जावे लागले. अकोल्याला येवून बाबूजी देशमुख वाचनालय येथे वाचन करावयास जात. तेथेच त्यांनी "संत आणि पंडित कवींच्या कविताचे पद्धतशीर वाचन केले. मोरोपंत, रघुनाथ पंडित, श्रीधर, निरंजन माधव, मध्वमुनीश्वर, नागेश, विठ्ठल, तुकाराम, रामदास, एकनाथ, केशवसुत, तांबे, बी., भ. श्री. पंडित, कोलते, माटे, अत्रे यांच्या वाचनमाला, महाराष्ट्र सारस्वत, पांगारकर, आजगावकरांची वाङ्मयेतिहासावरील आणि द.सी. पंगू ची अनेक संपादित पुस्तके 1953 ते 1958 ह्या कालखंडात, हजारोंच्या संख्येने वाचून काढली. "1 असे वाचनाचे संस्कार त्यांच्यावर झाले. अमरावतीच्या लेखक कवींशी बऱ्यापैकी स्नेह जमून आला. उद्धव शेळके, मनोहर तल्हार, मधुकर केचे, मुरार लांडे, तुळशीराम काजे, प्रभाकर सिरास आणि सुरेश भट यांच्याशी लेखन विषयक चर्चा व पत्रव्यवहार होता.

तसेच त्यांना काही खास सन्मान प्राप्त झाले. 1978 मध्ये मुंबई येथे भरलेल्या अस्मितादर्श लेखक वाचक मेळावाचे अध्यक्ष, मुंबई उपनगर साहित्य संमेलन विलेपार्ले 2001 मध्ये अध्यक्ष. 2002 मध्ये महाराष्ट्र फांऊडेशनचा दलित साहित्याचा योगदानासाठी पुरस्कार 2004 मध्ये पिंपरी चिंचवड येथे भरलेल्या अकरावे कामगार साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. मराठी कोकण नवोदितांचे 9 वे साहित्य संमेलने अध्यक्ष (पुणे 2004), फुले-शाहू परिवर्तनवादी अकादमी पुणे द्वारा लेखक- सन्मान पुरस्कार (2003). 2004 मध्ये मुंबई येथे मराठी पत्रलेखक संमेलनाचे अध्यक्ष आणि सर्वोच्च मानाचा तुरा म्हणजे 2005 मध्ये नासिक येथे भरलेल्या 78 व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. यावरुन त्यांच्या अजोड व्यक्तिमत्वाची खात्री पटते. विशेष म्हणजे त्यांची बिनविरोध निवड. डॉ. यशवंत मनोहर याबद्दल म्हणतात, "...केशव मेश्रामांच्या वाङ्मयीन गुणवत्तेला अध्यक्ष केले गेले याचा आनंद वाटतो. हा पुरावा महाराष्ट्राच्या उमद्या वाङ्मयीन संस्कृतीचा आहे." 2 ते सार्थ आहे.

केशव मेश्रामांचे काव्यविशेष:

केशव मेश्राम यांच्या कवितेवर सुरुवातीच्या काळात बा. भ. बोरकर, शांता शेळके, पु.शि.रेगे, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर इत्यादी प्रभुतींचा प्रभाव दिसून येतो. हे खरे असले तरी, उमेदवारीच्या काळात आणि आपला वैचारिक पिंड तयार होण्याच्या काळात असे घडत असते. पुढे कवीला त्याची कविता सापडत असते. आपला वैचारिक गोतावळा त्याला सापडत असतो. तो खऱ्या अर्थाने कवितेकडे वळत असतो. केवळ एखाद दुसऱ्या कवितासंग्रहावरुन, त्याच्या रुपरंगावरुन त्या कवीची खऱ्या अर्थाने मूल्यमापनाची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. केशव मेश्राम हे एखाद दुसऱ्या कवितासंग्रहामध्ये, त्याच्या चौकटीमध्ये बंदिस्त होणारे कवी नव्हेत. स्वतः आपल्या काव्य निर्मितीप्रक्रियेबद्दल कवी म्हणतात. "काव्यलेखन करताना एखादी भूमिका असल्याचे मला स्मरत नाही. तरीही काही गोष्टी माझ्या मनात पक्क्या असतात. पण ती निश्चित भूमिका मात्र खास नव्हे.... माझी पहिली कविता 1958 च्या अखेरीस प्रसिद्ध झाली; तेव्हापासून काही नवीन लिहावेसे वाटले की ह्या कवींच्या शब्दांनी आपल्यावर कुरघोडी करु नये एवढी दक्षता मी घेतो. त्यांच्यासारखेच लिहायचे, मग लिहायचेच का ? हा विचार ह्या वेळी मनात असतो."3 यावरुन पूर्वसुरींचा प्रभाव केशव मेश्रामांवर प्रभाव टाकू शकला नाही हे सिद्ध होते. लेखनाकडे परिहार्यता व अटळता म्हणून ते पाहतात. पूर्णतः समाधान मिळाल्याशिवाय ते स्वस्थ बसत नाहीत.

कवितेवर केशव मेश्रामांचे जीवापाड प्रेम आहे. एवढेच नव्हे तर "कविता हाच वाङ्मयप्रकार मी

निवडतो; कारण मला तो माझ्या श्वासोच्छवासाइतका माझा वाटतो. मोजक्या शब्दांमध्ये मी माझी कैफियत मांडू शकतो.”4 असे प्रामाणिकपणे सांगतात.

केशव मेश्राम यांच्या कवितेचा प्रवास भावकाव्यापासून सामाजिक जाणिवेच्या कवितेकडे थोडाफार सरकताना दिसून येतो. त्यांच्या सुरुवातीच्या 'उत्खनन'मधील 'शब्द माझेच उरावे', 'असे फुलावे कळीने', 'ऋणाईत ',' झड', 'सामोरी', 'परवल', 'सर', 'रानगौरा','मेळा', 'पिंपळ', इत्यादी कविता पाहिल्या म्हणजे भावकाव्य कशास म्हणावे? हे कळते. तसेच 'बंद दरवाजे', 'आम्ही जळतो', 'झाडे', 'नाच', 'खिडकीबाहेर', 'लोक चालतील', 'पाखरे', 'शरणागत', 'मी एक निरंकुश','भयाण', 'डाग', 'एक दिवस मी परमेश्वराला', 'माझ्या उदासिनते 'पासून', 'आभाळछत्र' या कविता सामाजिक जाणिवेच्या आहेत. परवल मधील 'उन चाफ्यांच्या साक्षीला असणारा कवी पुढे 'आभाळछत्र' मध्ये 'सदासर्वकाळ वावरतो मी ही तुझ्या उंच आभाळछत्राखाली' असे म्हणतो. हा आभाळछत्र दुसरा-तिसरा कोणीही नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत.

कवी स्वत: 'मुखवटे' कवितेत म्हणतो की,

"ज्यांना शब्द वाटतात केवळ मुखवटे,
त्यांना काय आणि कसे सांगावे. "
(उत्खनन, पृ. 40)

ते आपल्या बदललेल्या मनोभूमिकेबद्दल असे सांगतात. परंतु म. सु. पाटील यांना " वास्तववाद ही काही त्याच्या पिंड -प्रकृतीशी जुळणारी भूमिका नाही. तो त्याने धारण केलेला मुखवटा आहे"5 असे वाटते, हे मत पूर्णतः स्वीकारणीय आहे, असे मला वाटते. प्रत्यक्षात 'उत्खनन' कवितासंग्रहामध्ये कवीने उण्या- पुऱ्या वीस वर्षातील कविता समाविष्ट केल्या आहेत. शांता शेळके त्यावर अभिप्राय देताना म्हणतात, "मेश्राम ज्या दलितवर्गातले आहेत, त्याचे खोल संस्कार त्यांच्यावर झालेले आहेत. तशीच नागर, उच्चभ्रू समाजात वावरताना होणारी या विशिष्ट वर्गाची कुचंबना ससेहोलपटही त्यांच्या संवेदनाक्षम मनाने अचूक टिपली आहे."6 हे खरेच आहे कारण कवी अत्यंत संवेदनशील मनाचे आहेत. त्यांना 'ओठात एक आणि पोटात एक' ठेवून जगता येत नाही. 'जुगलबंदी' मध्ये 'कबुली' या कवितेत कबुली देतात.

" मोकाट मोकळ्या रस्त्याने
मी मोकाट : हात बांधून ......... ओठ शिवून,
डोक्यात फुटल्या धरणाचा विचारवेग,
अंधार डोळ्यातून आरपार तापलेल्या सुरीसारख्या."
('जुगलबंदी', पृ. 78)

गरिबीने त्यांना मात्र खूपच छळले. त्यांची पहिली सात-आठ वर्षे बाल्याची बेकार गेली. मात्र त्या पुढील दहा वर्षे समजुतीची झपाटलेली गेली आणि त्यानंतरची पोटाचा हिशेब शिकविणारी अशाप्रकारच्या अवस्थांची चित्रे ते कवितेतून साकारतात. बालपणी वाट्याला आलेले दु:ख 'माझे बालपण 'या कवितेत मांडतात.

"माझे बालपण
गावाबाहेर बाहेर
थोरमोठ्यांच्या शिव्यांचा
ज्याला रोजचा आहेर. "
('जुगलबंदी', पृ. 66)

हे असे बालपण त्यांना पायात बाभळीच्या काटयाप्रमाणे भासे. म्हणून असे बालपण कोणलाही मिळू नये असे त्यांना वाटते. 'दलित कुटंबकाव्य' हा आंबेडकरवादी कवितेचा जिव्हाळ्याचा विषय आहे. प्रा. रा. ग. जाधवांनी 'निळी पहाट' मध्ये यावर जास्त प्रकाश टाकला आहे. एकट्या 'जुगलबंदी' मध्ये 'आजीची गोष्ट', 'बापाच्या आठवणी ऐकल्या नंतर', 'माझा देश म्हणजे', 'बाप कोणाचा मरत नाही', 'माझे बालपण', 'माझ्या आपुल्यात' एवढ्या कविता कुटुंबकाव्याशी निगडित आहेत. 'अकस्मात' मध्ये 'जत्रा' व 'कृतकपुत्र' मध्ये 'रस्ता तोडायचा अजून' ह्या कवितासुद्धा आपले नाते समाजजीवनाशी कसे आहे, हेच सुचवितात. व्यक्तिगत समष्टीच्या व्यापक क्षेत्रात समाविष्ट करून एक नवे विश्व केशव मेश्रामांची कविता

निर्माण करते. त्यामुळे ग्रेस ज्या वाटेने गेले, त्या वाटेने केशव मेश्राम अंशतः गेल्यामुळे, "अनेकविध भावानुभवांचे आंतररूप सामर्थ्याने प्रकट करणारी ही कविता रसिकांना अस्वस्थ आनंद देऊन जाते. त्याला दंश करते. ती अवस्थेतूनच उचंबळून आली आहे."7 अशी दखल मराठीतील ज्येष्ठ समीक्षक निर्मलकुमार फडकुले यांनी घेतली आहे. केशव मेश्रामांच्या त्यांच्या कवितेचे एक नवे रुप आपल्या दृष्टीस पडते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जो धम्म दिला, तो विज्ञानवादी आहे. हा विचार आंबेडकरवादी कवितेचा प्राणतत्त्व आहे. केशव मेश्रामसुद्धा याला अपवाद नाहीत. विज्ञानवाद, बुद्धिवाद, तर्कशुद्धता, निरीश्वरवाद, अनात्मवाद या पायांवर आंबेडकरवादी साहित्याचा डोलारा उभा आहे. केशव मेश्राम सुद्धा 'मी फक्त' या कवितेत सांगतात.

"कुठल्याही दगडासमोर कधी थबकलो नाही
.....मारून घेत हलक्याने आपल्याच गालफडांवर
शिरूही दिला नाही कधी... कानांत पश्चातापाचा वाटा
ऐकवून अल्लाद दोन बोटे ओठांवर.... नाही केली चुंबनखूण
निरूद्देश नाहीच फिरत : कुठल्याही कळसाला... बुद्धी विकून
नसेल मिळाला अद्याप मुक्काम : चालायचे पण कधी थांबलो नाही. "
('कृतकपुत्र',पृ.31)

पावलांना नक्की दिशा नव्हती. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही दिशा दिली. परिच्छेद 'उत्खनन' मधील 'आभळछत्र', 'जुगलबंदी' मधील 'बाप कोणाचा मरत नाही', 'अकस्मात' मधील 'तो गेल्यानंतर' या कविता विशेष लक्षणीय आहेत. उपरोधाचा स्वर 'कृतकपुत्र' मध्ये तीव्र झालेला आहे.

"कोणाच्याही श्वासाने डुलत नाहीत पाने
गात नाहीत ओठेही रुमझुमते गाणे
झाली आहेत पाखरे : भुकी दीन करुण
जनावरांचे गोठेही बकालच बनले आहेत."
('कृतकपुत्र', 'पृ.85)

असे असले तरी, 'मला तर... चालतच राहिले पाहिजे... दोरी श्वासाची तुटेपर्यंत' हे भान त्यांना बाबासाहेब आंबेडकरापासून प्राप्त झाले आहे.

पुढे काळ बदलला बाबासाहेब जाऊन बावीस वर्षे झालीत. बाबासाहेबांनी काही स्वप्नं पाहिली होती. ती पुढे पूर्ण होऊ शकली नाहीत. त्याचे शल्य केशव मेश्राम यांना वाटते. म्हूणन 1978 साली लिहिलेल्या 'बाप कोणाचा मरत नाही' या कवितेत म्हणतात.

"त्याने पाहिली स्वप्ने, दिल्या टकरा,
त्याने पेटविली कुचाळ पुस्तके, धडकवली मने,
तो होता असा : हरखते, हरवते आमची वाणी,
तो तर असा होता ज्याने जाळून दाखविले पाणी,"
('जुगलबंदी', पृ.62)

आपण मात्र कृतज्ञ ठरलो. बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारत बनवू शकलो नाही. म्हणून आपण कोणाचे नाव लावतो याची थोडीतरी लाज धरली पाहिजे असे मेश्रामांना वाटते. मेश्रामांची कविता डोळ्यात झणझणीत अंजन घालण्याचे कार्य करणारी कविता आहे. केवळ शब्दबंबाळपणावर, तिच्या उच्च - तीव्र स्तरावर विश्वास नाही. हाच सूर त्यांच्या 'तो गेल्यानंतर' ह्या कवितेत दिसून येतो.

"तो गेल्यानंतर त्यांनी मिश्यांना पीळ दिला,
नंतर ठोकली जोमदार विजयी आरोळी,
कुणी फिरविल्या थाळ्या पुतळे उभारण्यासाठी,
सुरू केल्या व्याख्यानमाला संसदा सभा नि मंच
टॅक्सीतून भटकत घेऊ लागले एअरकंडिशनी जबरेलंच,
दीनदुबळ्यांच्या दिडक्यांचे दिवाळे बोंब तरीही रामसेफ
पोटाचे नगारे मिरवत.... गावगन्ना जमिनीत असेच रोप,
हवेत विरेतो त्याची राख ह्यांनी उघडले उदीचे कारखाने,
झोपड्यात जातानाही ऐकू लागले वॉकीटॉकीचे फेसाळ गाणे

नंतर तर त्यांच्या अनेक नंबरी धंना वरकतीचा पूर
आला
कमावलेल्या मिश्यांना त्यांनी पुन्हा पुन्हा पुरुषार्थी
पीळ दिला."
('अकस्मात'. पृ. 62)

तो गेल्यानंतर असे समाजविघातकी ज्यांनी मुखवटे चढवून सत्तेच्या जागा हेरुन त्यांनी एकुलता उभा हत्ती विकला. म्हणूनच 'एप्रिल ते डिसेंबर...त्याच मात्रा उगाळण्याचाही कंटाळा आला' असे म्हणतात.

बाबासाहेब आंबेडकर आपल्या जगण्याचा श्वास आहे. त्यांच्यामुळेच 'अक्षरांचे निळेजर्द आभाळ' कवीच्या डोक्यावर आहे.

"..... दगडांच्या दडपणाखालून आम्हाला मुक्त
करुन
तूच दाखविलास अजिंठ्यातला समग्र संबुद्ध
महामानव
शेंदूर गुलालाची खरवडून पुटे.... केलास आमचा
चेहरा
स्वतः ची स्वतःलाच दृष्ट लागण्यासारखा देखणा,
तू उभे केलेस..... गाळात रुतलेले मूकनायक :''

('चरित'. पृ. 47)

असा हा नाडीपरीक्षा करणारा दलित समाजातील पहिला डॉक्टर होय, ज्याने दलितांच्या युगदुखण्यावर दवा केली.

आंबेडकरोत्तर कालखंडात घडलेल्या घटनांचा समग्र आढावा काव्यात्म शैलीत केशव मेश्राम चितारतात.

अस्वस्थ करणारी कविता :

कवीचा 'उत्खनन' ते 'कृतकपुत्र' पर्यंतचा प्रवास लक्षणीय आहे. 'मुक्काम लांबतोय खरा... रस्ता तोडायचा उरला केवढातरी' ही खंत त्यांना स्वस्थ बसू देत नाही.

" सरकत नाही आहे काही केल्या
काळाचा जख्मी घोडा थोडासाही....
मी तर असा..... लटकतोय वेताळफांदीला
नाही जमत घेणे, मोकळा श्वास ही."
('कृतकपुत्र', 'पृ.49)

असे श्वास कोंडून कधीही प्राण मोकळे होत नाहीत हे त्यांना ठावूक होते. असा हा आत्ममग्नतेचा स्वर तीव्र होऊन ते म्हणतात -

"आता कोण्याच गावाचे प्रवास नकोसे वाटतात
फाटतात प्रतिष्ठेच्या चलनी नोटा होऊन निरुपयोगी
सोंगीभजनात रमावी माणसे तसे व्यवहार दिसतात
फसतात सारेच गाळात.... भासतात झाडेही
विरागी."
('कृतकपुत्र', पृ.62)

असा हा प्रवास त्यांना जीवघेणा वाटतो. म्हणून आता कोणी कैवारी बननू येईल? असेही वाटत नाही. म्हणून 'आमचेच आम्ही कैवारी' बनले पाहिजे असे 'कैवारी' कवितेमध्ये सुचवितात. अत्त-दीप-भव हे तत्त्व यात दिसून येतो. आणि केशव मेश्राम यांची कवितासुद्धा बुद्धत्त्वाच्या मार्गाने जाणारी कविता आहे. हेच दिसून येते.

डॉ. भालचंद्र फडके यांनी केशव मेश्राम या कवीची ओळख करुन देताना लिहितात, "दलित कवीत अगदी वेगळा प्रकृतिधर्म असलेले कवी म्हणजे प्रा. केशव मेश्राम ! त्यांच्या कवितेत वेदना आहे तसा त्यांच्या कवितेत विद्रोहाचा स्वर आहे. पण त्यापेक्षा त्यांच्या कवितेचा प्रयत्न चालला आहे तो स्वतःला शोधण्याचा."8 हा शोध केशव मेश्राम शेवटपर्यंत घेत राहिल्याचे दिसून येतात. 'स्व' च्या शोधात त्यांची कविता फिरताना दिसते.

प्रा. रा. ग. जाधव त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आढावा घेताना नमूद करतात, "प्रा. मेश्राम म्हणजे एक अस्वस्थ पण अतंर्मुख, उत्कट पण गंभीर, संवेदनशील पण संयत असे एक व्यक्तिमत्त्व आहे. कालकल्पनेने सतत अशांत होत जाणारे त्यांचे मन वर्तमानाच्या मध्यधारेत उभे राहून सतत घडले-घडते-घडणार यांच्या विचाराने व्यग्र झालेले दिसते."9 भूतकाळातून आपण काही शिकले पाहिजे, नवे जग घडविले पाहिजे हा आशावाद त्यांना बळ देतो. परंतु प्रत्यक्षात विपरीत घडत असल्यामुळे पुढे कवीला निराशा वाटते. काही

मूठभर लोकांच्या हाती सत्ता आली, काहींनी आपल्याच पदरात सर्व पाडून घेतले, हे पाहून त्यांचे मन विषण्ण होते.

"राबवते आहोत आम्ही... तुमच्यासाठी निधर्मी लोकशाही
ज्यात चालतात कुळीदार ... गब्बर कुणी निडर गुन्हेगारही''

जग हे बदमाशांचे, गुन्हेगारांचे झाले आहे. केवळ विशिष्ट वर्ग सत्तेत ताव मारतो आहे. त्यामुळे कवी उपरोधिक स्वरात आपले मनागत मांडतो.

"मी नसताना जवळपास..... कावळे बिचारे कसे जगतील ?"

('कृतकपुत्र',पृ.16)

आपल्या सभोवतालच्या कावळ्यांना काबूत ठेवणारा कवी, हल्लाबोल करतो, तेही वेगळ्या रुपात, परंतु त्यांच्या कवितेचा सूर कमालीचा उपरोधिक असतो. कधी कधी आपल्या कविकुळालाच नपुंसक वंश म्हणून हिणवतो.

"असे कसे आमचेही कविकुळ ? कसा हो नपुंसक वंश ?
भोगतात शोषित ऐश्वर्य.... व्हावा त्यांना कडकडून अखेरचा अंधारदंश "

('कृतकपुत्र',पृ. 37)

अशी स्वक्लेशाची भाषा कवी करतो.

असंग्रहीत कविता :

केशव मेश्राम यांचा 2005 मध्ये 'अनिवास' हा सहावा कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतरच्या असंग्रहित कवितांचा येथे परामर्श घ्यावयाचा आहे. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे 'अनिवास' नंतरची त्यांची कविता कशी बदलली, तिने आशय आणि अभिव्यक्तीचे कोणते नवे रूप साकारले, हे पाहायचे आहे. 'अस्तित्त्व : तडे तुकडे' (कवितारती, दिवाळी अंक 2003), 'व्याकुळ', (कवितारती, दिवाळी अंक 2005), 'स्टेशन : मोडीत निघालेले' (कवितारती, दिवाळी अंक 2006), 'आकस्मिक' (कवितारती, दिवाळी अंक 2007), 'क्लोरोफॉर्मच्या गुंगी' (अस्मितादर्श, वार्षिक विशेषांक 2006), 'सरहद्दीवरच ' (आकांक्षा, दिवाळी अंक 2006), 'मुक्तमोकळे' (आकांक्षा, दिवाळी अंक 2007), 'जगजाहीर' (सर्वधारा, जुलै / ऑगस्ट / सप्टेंबर 2007) इत्यादी असंग्रहित कविता आहेत.

'अस्तित्व : तडे तुकडे' या कवितेत कवी 'रूपाविरूपांच्या चक्कीत स्वतःच्याच..... सापडतो मी नव्याने'। हे सांगतात आणि मला हे माझ्या निर्लज्ज अधू डोळ्याने पाहावे लागते याची खंत व्यक्त करतात. जागतिकीकरणाचे नवे जग सर्वांना गिळकृत करावयास निघालेले आहे. याची साक्ष स्वतः 'साक्षीस फक्त' या कवितेतून देतात. हे जग केवळ पैसेवाल्यांचे, अनैतिक कृत्य करणाऱ्यांचे आहे. 'सर्व काही पैशांनी विकत घेता येते', या विचारधारेचे आहेत. म्हणूनच त्यांच्याच भाषेत म्हणजे जागतिकीकरणाच्या भाषेत ही कविता बोलते.

"कसा होणार या गच्चगर्दीच्या कहाणीचा शेवट ?
निरर्थ झालेल्या संगणकांच्या वाझोट्या संकेतखुणा करवतलेल्या खोडांसारख्या सगळ्याच लुळ्यापांगळ्या साईट
अंधारसरी आभाळातून भरभरून कोसळताहेत'
लॅपटॉपची दोरी स्वतः साठीच आता ज्याच्या त्याच्या हातात.
वाट पाहतो आहोत कवटी शहराची फुटण्याची
अस्ताव्यस्त सैरभेर: अचाट व केवळ स्परपाट."

(कवितारती, दि.अं. 2004, मलपृष्ठावरील कविता)

अशाप्रकारे आजच्या युगाच्या समस्यांचे निराकरण करण्यास सज्ज असणारी ही कविता आहे.

त्याचप्रमाणे जुन्या घटनाचक्राचे तत्कालीन संदर्भ येऊन आलेली कविता म्हणजे 'जगजाहीर' ही कविता व्यक्तिगत स्वार्थ पदरात पाडणाऱ्या व्यक्तीची ही कविता आहे. त्याचे आकलन काव्यात्मशैलीत व उपरोधिकपणाने रेखाटतात.

"पंचाहत्तरी साजरी करणाऱ्या मित्रांनो......
करु देत मला मनःपूर्वक अभिनंदन उत्साहात
देहीक मोडतोडींच्या काही: खुणा येतच नाही टाळता
स्मृतिकोशात बंदिस्त असलेली घटनाचक्रांची रिळे
तुम्ही सांभाळलीत नेटकेपणाने: वळलात सर्रकन :
...... एक पायरी मागे"

(सर्वधारा,जुलै/ऑगस्ट/ सप्टेंबर 2007, मुखपृष्ठावरील कविता)

एक पायरी मागे सरकाणाऱ्या बेगडी अनुयायी ठरलेल्या समाजावचा कवी खरपूस समाचार घेतात. असंग्रहित कवितांमधूनही कवीची समाजाविषयीची तगमग दृष्टीस पडते.

काव्यशैली :

केशव मेश्राम यांची काव्यशैली आंबेडकरी कवितेत भिन्न ठरलेली आहे. आशय अंगात मुरवून अभिव्यक्तीच्या लिलया सहजपणे त्यांची कविता करते. प्रतिमाप्रचुरता हे त्यांच्या कवितेचा प्राणतत्त्व आहे. त्यांच्या 'उत्खनन' ह्या कवितासंग्रहापासून ते 'अनिवास' पर्यंतच्या काव्यप्रतिमा पाहिल्या म्हणजे त्याची खात्री पटते. निसर्ग प्रतिमांमध्ये 'झाडा'चे त्यांना विलक्षण आकर्षण आहे. एकाच वेळेस 'झाड' ही प्रतिमा व्यक्तिगत पातळीवर आणि समूह पातळीवर नाम-निर्देशत्व सुचविते. 'उभी असतात गावाबाहेर', 'परित्यक्त', 'एकली भयाणभोर झाडे', 'झाडे 'माझी'' माझ्या जातीची', 'झाडे शहराने टाकलेली', 'परित्यक्त झाडे', 'व्रतस्थ झाडे', 'सावली नसलेले निष्पर्ण झाड', 'मनात लावलेस असले झाडे', 'कोवळ्या उन्हाला रेलून उभी असतात झाडे'. या प्रतिमा पाहिल्या म्हणजे वाचक थक्क होऊन जातो. त्याच्या कवितेतील 'झाड' ही प्रतिमा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. झाडांच्या प्रतिमांतून ते दलितांचे दु:ख व्यक्त करतात, सोबतच त्याची तीव्रता भेदकपणे चित्रीत करतात.

तसेच त्यांच्या कवितेत 'सूर्यप्रतिमा' येतात. 'सूर्यप्रतिमा' आंबेडकरवादी कवितेचे लक्षणीय वैशिष्ट्य आहे. सूर्यप्रतिमांची पखरण पाहण्यासारखी आहे. 'सकाळच्या चिवचिवाटांचा लगबगता सूर्य', 'समग्र सूर्य', 'सूर्यापुढे पसरतो किट्ट काळोख', 'रोजचा मलूल सूर्य', 'विस्तारतो आभाळभर सूर्य ' इत्यादी सूर्यप्रतिमा वैशिष्ट्यपूर्ण रीतीने कवितेत येतात आणि काव्यमूल्य वृद्धिंगत करतात.

त्याबरोबरच त्यांच्या कवितेतील इतरही प्रतिमा पाहण्यासारख्या आहेत. ‘देहधर्माच्या कचरा कुंडीत', 'चिखली क्षितिजकळयाहून', 'खोलगर्द पाण्याची शेवाळलेली तळी', काळोखाचा वजनदार रुळ', 'शब्दांचे देवमासे नव्या किनाऱ्यावर अंधारात धुकणारी भयकारी पाखरे', 'पडवया आयुष्याचा झाडणारा मोहोर', 'धमोळ्यांनी चिडचिडलेला लंगडा दिवस', 'मिचमिच्या डोळ्यांची गॉगली दुपार', 'मन कलिंगडासारखे कोरणारी ही सुशिक्षित नखे ' अशा प्रतिमांनी त्यांची कविता लिप्त आहे.

असंग्रहित कवितांतील प्रतिमांच्या बाबतीत मात्र केशव मेश्राम काहीसे बदललेले आहे. जागतिकिकरण आणि त्याचे संदर्भ नव-प्रतिमांतून व्यक्त करतात, ते नक्कीच पाहण्यासारखे आहे. 'उजेडगाण्यांची होती धूम' शहर पडलंय स्वस्थ गिळून ‘टेक्निलायझर' तसेच

" गिऱ्हाईके फूटपाथची... दुकाने खेटणारी....डोल्याखुणांची
स्वस्त मस्त कामुक इशारे : फेक पैसा... हो मोकळा.... ने हवे ते ! "

(कवितारती. दि.अं.2005, मलपृष्ठावरील कविता)

पुढे 'लॅपटॉपची दोरी' स्वतःसाठीच आता ज्याच्या त्याच्या हातात आलेली आहे. व कवी या शहराची कवटी फुटण्याची वाट पाहतात. 'संगणकीय प्रतिमा' त्यांच्या कवितेतून सहजपणे अवतरतात.

"बघतोय मी ज्येष्ठांनो ही विलक्षण जादू-ई-किमया तुमची
ओठ दाबून... मान झुकवून तुमच्या अनुभव पोतड्यात डोकावलो
जवळच्यांच्या जाहीर व्हाव्यात समग्र किंमती... अरेरे खंतावलोच मित्रांनो

(सर्वधारा, जुलै / ऑगस्ट / सप्टेंबर 2007, मुखपृष्ठावरील कविता)

'लॅपटॉपची दोरी' किंवा 'जादू-ई-किमया' अशा प्रतिमांतून कवी बदलत्या जीवनाचे चित्र रेखाटतो. 'जादू ई-किमया ' ही प्रतिमा तर श्लेष साधून विशेष अनुभूती मिळवून देते. त्या जादूई किमयेने शोषितांचे जग ताब्यात घेण्याच्या प्रयत्न पुरेश्या केले आहे, हे ही सूचित करते. एकंदरीत केशव मेश्रामांच्या कवितेतील प्रतिमा आशयाला गडद रंग देण्याकरिता पुरेश्या सक्षम ठरल्या आहेत. मात्र त्या

काळजाचा ठाव घेताना दिसून येत नाहीत. अपरिचित प्रदेशात घेऊन जातात -

उदा. 'बुब्बुळातून सरसरतोय हायरोग्लिफिक लिपीतला अवाच्च मजकूर' किंवा 'फुजियानाच्या उफाळता -अग्निज्वाळा' ह्या होत. त्यांच्या कवितेतील प्रतिमा कालपरत्वे बदलत गेल्या आहेत. परंतु दुर्बोध मात्र नाहीत. एवढे निश्चित. नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर वामन निंबाळकर , अर्जुन डांगळे, प्रल्हाद चेंदवणकर, त्र्यंबक सपकाळे, हिरा बनसोडे, नरेश इंगळे, चोखा कांबळे यांच्या बरोबरीने कवितालेखन केले असले तरी, केशव मेश्रामांनी समूहाच्या सुरात सूर मिळवूनही स्वतः चे पृथगामित्व जोपासले. त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्ये विशद करताना असे म्हणता येते की, केशव मेश्राम हे मराठी कवितेचे कृतकपुत्र ठरत नाहीत, तर ते खरेखुरे पुत्रच शोभतात. असे मला प्रामाणिकपणे वाटते.

**********

**प्रा.डॉ.भूषण रामटेके**
'जेतवन' लुंबिनीनगर,
पुलगाव, जि. वर्धा. पिन – 442302
भ्रमणध्वनी-093255442302.

E-mail: bhushan.ramtekephd@gmail.com.

**संदर्भ टिपा**

केशव मेश्राम, 'शब्दबंध', शारदा प्रकाशन, ठाणे, 1998, पृ.3

यशवंत मनोहर, 'प्रा. केशव मेश्रामः एक अष्टपैलू प्रतिमा', 'कवितारती' संपा. पुरुषोत्तम पाटील, दिवाळी अंक, व 19 अंक 6, व 20 अं. 1, सप्टेंबर-ऑक्टोबर, नोव्हेंबर-डिसेंबर, 2004, पृ. 7

केशव मेश्राम, 'समन्वय' दु.आ., परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, 2005, पृ. 16

4. 'तत्रैव', पृ. 21

म.सु.पाटील, ‘दलित कविता', लोकवाङ्मय ग्रह, मुंबई, 1981, पृ.22-23

शांता शेळके, 'अभिप्राय', 'उत्खनन', केशव मेश्राम, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
1997 मलपृष्ठावरील मजकूर

निर्मलकुमार फडकुले, ‘अभिप्राय', 'अकस्मात', केशव मेश्राम, सुरेश एजन्सी, पुणे, 1984, मलपृष्ठावरील मजकूर.

भालचंद्र फडके, 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह' श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 1977, पृ. 163

रा.ग.जाधव, ‘निळी पहाट’, दु.आ., श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 1979 , पृ. 12

# काव्यउन्मेष- १

रिंगण (कविता संग्रह)

दिनमित्रकार मुकुंदराव पाटील उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार, दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषद कोल्हापूर उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार, नामदेव ढसाळ उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार, कविवर्य नारायण सुर्वे पुरस्कार, अश्वघोष काव्य पुरस्कार..

अशा विविध सतरा पुरस्कार प्राप्त कविता संग्रह



**माधुरी गणेश मरकड**

---

**रिनोव्हेशन**

*********

रेषारेषांतून गुंतलेले आयुष्याचे संदर्भ,
कधीतरी अचानक निसटायला लागले,
वीण उसवायला लागली..

विश्वासाचे धागे तुटायला लागले,
संशयाचे ढग वाढायला लागले..

कि ,समजून जावं
नातं मरणपंथाला लागलेय,
शेवटचे काही दिवस, महिने बाकी आहेत..

असेल इच्छा तर,
पडाव बाहेर, किंवा मग,

घ्याव नातं रेनोव्हेशनसाठी,

बोचणारे, टोचणारे भूतकाळाचे संदर्भ,
टाकावेत झटकून रेषारेषातून,

भांडणाच्या, मौनाच्या असह्य गाठी,पिळे
सोडवावेत शक्य असतील तर,

हसऱ्या चेहऱ्याने ,गोड बोलण्यानं
परतावं परत त्या शालजोडीत..

आपल्या बाजूनं करावं आपण हे सर्व काही,
आपल्यासाठी ,समोरच्या साठी

पण नसेल असोशी समोरच्याची,
नसेल ओढ पूर्वीसारखी,
तर स्वाहः म्हणून द्यावं सोडून,

तसंही शेवटी,

घर काय किंवा नातं काय..
रिनोव्हेट केलं तरी,
वरवरची चमकदार रंगरंगोटीचीच असते,
मूळची फ्रेम तर जुनीच असते,
खिळखिळी झालेली,
तकलादू झालेली..

**असोशी..**

**********

रसरसलेल्या धगधगीत निखाऱ्यावर ठेवावीत
हिरवीकंच ओली लाकडं
जळण्यासाठी,
नियतीनं वाढून ठेवलेल्या सुख दुःखाच्या
निखाऱ्यावर ठेवावं हिरवकंच ओलं आयुष्य..
जसं

अगदी तसंच..

जळताना त्याला  धुमसावं लागतं,धुपावं लागतं,
अर्धवट जळल्याचा त्रास सोसावा लागतो..

नाही होत ते तयार
आपलं सत्व सोडायला...

त्याच्या ठिबकणाऱ्या जीवनरसाने..
धगधगते  निखारे विझु लागतात, रसरसीत लाव्हा
शांत व्हायला लागतो..

त्याच राखेची ऊब घेऊन,
एक हिरवा कोंब..
उगवुन येतो अंगावर लाकडाच्या,
काही दिवसातच..

आयुष्यातही करावी लागते अशीच
मात दु:खावर..
नियतीच्या थपेडयांना द्यावे लागते उत्तर..
धुमसून ,धुपवून का होईना..
मृत्यूच्या टोकाशी जाऊन  फिरावे लागते परत

लाकूड असो की माणूस
प्रत्येकामध्ये असतो जगण्याच्या
असोशीचा कोवळा कोंब जिवंत..
जो देतो लढायला ऊर्जा, जगायला बळ..

अट फक्त एकच..
लढण्याची उर्जा,
जिंकण्याची आस कायम ठेवायची..

**ओळख**
**********

मला वाटते
मी कदाचित ओळखते तुला
किंवा
कदाचित मी ओळखू लागले तुला..

माझा दावाच आहे की
मी ओळखते तुला
चांगल्या प्रकारे..

तुझ्यातील पुरुषत्वाच्या लाटा,
तुझ्या चेहऱ्यावरील वेळोवेळी
बदलणाऱ्या रेषा..

तुझ्या डोळ्यातील पसंती नापसंतीचे भाव,
तुझ्या बोलण्यातील शाब्दिक लयदार
चढ-उतार..
तुझ्या स्पर्शातील आपले परकेपणाचे
अन्वयार्थ..

हे सारे आणि सहज ओळखीचे माझ्या..

पण..
राहिला ओळखायचा..

मांजरासारखा नखं आत ओढून बसलेला
तुझ्यातील पुरुष,
वेळी-अवेळी फणा काढून बाहेर निघणारा
तुझ्यातील पुरुषी इगो,

काळानुरूप कमी होत जाणारी
तुझ्या माझ्यातील असोशी,
वेळेवर सोयीच्या वेळी जाणवणारा तुझा
मालकीहक्क,

मी सर्वस्व अर्पण करताना,
तू राखून ठेवलेला तुझा
सर्वस्वी पणा.
तुझे स्वतंत्र अस्तित्व मान्य करतानाच,
माझी स्पेस सोयीस्कररीत्या विसरणारा
तुझा दुटप्पीपणा,

तू फक्त ,तू आहेस,
लफ्फेदार ,रेषेदार आयाळ असणारा पुरुष,

तरीही माझा भाबडा दावा,
मी ओळखते तुला,
पुर्णपणे..

**सल**

**********

मी दडपुन टाकते
माझ्या अनेक इच्छा,आकांक्षा ,
महत्वकांक्षा ,
शांततेत जगण्यासाठी,
वाद टाळण्यासाठी,
काही भ्रामक सुखांसाठी,

मी जगते,
थोडेसेच क्षण माझ्यासाठी.
बाकी कर्तव्यासाठी,
दुसऱ्यांच्या सुखासाठी,
त्यांच्या समाधानासाठी,

मी मारते मन,
माझी स्वप्नं,
माझा स्वाभिमान,
आणि बरेचदा आत्मभान ही,

मी  मारते माझे शरीरही,

त्याच्या सुखाबद्दलची असोशी,
माझी त्याबद्दलची मत,
आवड,निवड,नकार, होकार..

का????
मला जगान आदर्श नारी म्हणावं..
आदर्श मुलगी
आदर्श बहिण
आदर्श पत्नी
आदर्श सून
आदर्श आई

आदर्शपणाचं चक्र भयानक आवडतं मला..
रक्तातील बंडखोरी उसळ्या मारते
तरीही संस्काराच्या झाकणाखाली
तिला मी बिनदिक्कत झाकते.

सोवळ्या ओवळ्याचे सोपस्कार करते,
खोटं हसते, खोटच छान दिसते,
सोनेरी पिंजऱ्यात खोटच बागडते..

मनाची भूक तर लहानपणापासूनच मारते
त्याचे शरीरावर होणारे परिणाम
स्वीकारते,
त्यांना बाहेर दाखवण्याची परवानगी
नाकारते..
चांगुलपणाच्या झुलीखाली  सगळं सहजच
झाकते..

कदाचित,
शरीराच्या  आणि मनाच्या  हाका ऐकल्या तर,
काय होईल??
या कल्पनेनेच कोसळते,..

कोण मी,????
मी,

कुठलाही क्लास,
कुठलाही जात,धर्म,पंथ,
यांच्या पलिकडे असलेली,
आदिम, आधुनिक,
नव्या, जुन्या जगात फक्त
स्त्री..
एवढीच ओळख असणारी..

**आधार**
**********

स्वतःच्या लढाया स्वतःलाच
लढायला लागतात..

विश्वासाचे, साथसोबतीचे आधार
अशावेळी नेमकेपणानं ढासळतात..

विस्मयतेला, हताशेला सोबत घेऊन
रणांगणात उतरायचं..
लढायचं आणि जिंकायचं..

एवढेच ध्येय ठेवले तरी..
टोचणाऱ्या, खुपणाऱ्या जखमा
रक्तबंबाळ करतात मनाला..

दोन शब्दांच्या आधाराच्या अपेक्षा..
मोठ्ठ दगडी ओझं बनतात..

नातं किती वेळा नापास होतं,
परिस्थितीच्या परीक्षेत?
किती वेळा तंतोतंत उतरतं?

हा मनाच्या नी भावनांच्या
व्यापाराचा खेळ..

खेळणारा एखादा मेंदूने खेळेल..
एखादा मनाने...

युनिव्हर्सल ट्रूथ असल्यासारखं..

मेंदूने खेळणारा नेहमीच नफ् यात..
मनाने खेळणारा नेहमीच तोट्यात..

**माधुरी मरकड**
चैतन्य, बहिणाई सोसायटी ,नित्यसेवा स्टॉप
सावेडी अहमदनगर ४१४००३
मो..७९७२३६४७१५ ई-मेल -
madhurimarkad७३@gmail.com

❑❑❑

# काव्यउन्मेष- २



नव्या पिढीतील प्रतिथयश कवी,नुकताच लोकवाङ्मय प्रकाशनातर्फे 'आठ फोडा अन बाहेर फेका' हा कवितासंग्रह प्रसिद्ध.

**अमोल विनायक देशमुख**

---

**दवाखान्याच्या कविता.....**

**१. एकच कळ असावी या सृष्टीत....**

भळभळत्या वेदना
कुठवर ? कुठवर ? चोळाव्या
ह्याने त्याने मी नी समस्त प्राण्यांनी

हा जन्म असाच जाणार
या जखमेला सोसत सोसत
आता तर त्याचे अवधानही येत आहेत
सर्वांगावर

केव्हा येईल खपली या वेदनेवर
केव्हा होईल निदान
केव्हा होईल उपचार

मुळात या वेदनाच का व्हाव्यात निर्माण
या वेदनेशिवाय का नसू नये ही सृष्टी

हे सर्व दवाखाने व्हावे कायम नेस्तनाबूत
या जखमा व्हाव्या बऱ्या

नवनिर्मितीची एक कळ सोडून
येऊ नये वार्डाबाहेर कोणताच
स्निग्ध आवाज

**२.दुःख फक्त दुःख असते..**

लाखांशी जींदगान्या बेडवर पडून
वेंटीलेटरवर
काही व्हरांड्यात
काही रांगेत उभ्या
या जखमांची व्हावी नोंद नी व्हावा त्यावर इलाज
म्हणून लावताहेत पेशंट आणि सोबतचे नातलग
कॉउंटरवर नंबर
भानगड झाली अशी की कुणालाच नाही बेड
या दुःखाच्या पेशंटची
गर्दी अफाट या विश्वात पावलोपावली
या दुनियेतील
दुःख वेडे ...फार फार वेडे
दुःखाची माया वेडी
दुःखाची माया आंधळी
दुःख पाहत नाही दवाखान्यात दाखल करणारा
दुःख पाहत नाही
त्याच्या इलाजाच्या पद्धती
दुःख पाहत नाही इलाज करणारा
दुःख पाहत नाही इलाज करणाऱ्याची कोणतीच
पार्श्वभूमी
दुःख पाहत नाही
गरजेच्या वेळी रक्त देणारा
की गरजेच्या वेळी धावून येणारा

दुःख फक्त दुःख असते
दुःख फक्त दुःख असते

## ३. या दवाखान्यात असते सारे सारखे...

बाळंतीण झाली
डॉक्टरांनी केले सिझर
ते बाळ आलं जन्माला नागवं
आता
त्याला लावली एक काळी टिक
ते झालंय एका धर्माने शिक्कामोर्तब

हा दवाखाना
देऊन गेलाय कित्येकांना जन्म
ज्यानं अगणित बाळांना दिलाय
जन्म
- कोणत्याच टिकेशिवाय

हा दवाखाना आहे निधर्मी
इथे असतात फक्त दोन जाती
एक पेशंट
दुसरा डॉक्टर

ज्यांच्या कपाळावर नसतो कोणताच टिळा

इथेच सोडूनही गेलेत लाखांशी
कुणी स्वर्गात कुणी जन्नंत मध्ये
तर कुणी धर्मानुसार परकायेत
हा दवाखाना पाहत नाही त्वचेवरील धार्मिक खूण

शरीर प्राण सोडून गेल्यावर
हा दवाखाना देतो
सर्वांना एकच रिपोर्ट
' It is no more '

## ४. विषाणू : माणसापेक्षा सदैव असतो वरचढ...

माझ्यात तुझ्यात ह्याच्यात त्याच्यात
एक विषाणू कार्यरत असतो
जो पोखरून टाकतोय
हरेकाची
प्रतिकारशक्ती हर दिवसाला

या विषाणुने फैलावलेल्या आजाराचे
निदान होईल असे तंत्र नाही
हा आजार गंभीर असून
तो सदोदित
फिरतोय
या शरिराकडून त्या शरीराकडे

हा आजार
फक्त खातोय शरीराला
मनाला
मनाच्या इच्छाशक्तीला

या आजाराच्या इलाजापायी
गाठलेत ज्याने त्याने दवाखाने
खिशाच्या मापाप्रमाणे
नी काहींनी गाठलेत महाराज
काहींनी मंदिरे
नवस
काहींनी सैलानी काहींनी दर्गा
मात्र हा आजार छातीठोकपणे आहे उभा
इथल्या वातावरणात तट्ट उभा
ज्याने माणसाला हजारदा करून दिलीय
जाणीव
विषाणू हा माणसापेक्षा सदैव असतो वरचढ...

**५. वार्डात आणि वार्डाबाहेर**

असंख्य वार्ड आहेत
या दवाखान्याच्या कॅम्पसमध्ये
प्रत्येक वार्डात आहे
आपापल्या परीने
आजार सोसत असलेला पेशंट

काही साधे आजार
काही दुर्मिळ आजार
काही बरे होणारे
काहींवर नाहीच अजून इलाज

काही विषाणूंनी पसरलेले
काही जिवाणूंनी पसरलेले
काही वातावरणीय बदलाने
काही शरीराच्या बदलाने
काही ॲक्सिडेंट झाल्याने
काही बाईंचे काही पुरुषांचे
काही मुलांचे  काही वार्ध्यक्याचे
काहींनी केलाय या जगाला
सोडून जाण्यासाठी आत्महत्येचा प्रयत्न
काही आले आहेत
स्वतःच्या कुरुपेला सुंदर बनवायला

प्रत्येक आजाराला आहे
स्पेशल निदान पद्धती
नी प्रत्येक आजाराला आहे
स्पेशल डॉक्टर
प्रत्येक आजाराला आहे
स्पेशल ट्रीटमेंट
प्रत्येक आजाराला आहे
तसाच खर्च

प्रत्येक वार्डाबाहेर आहे
धावपळ
कुणी पेशंट दाखल करतोय
कुणी डॉक्टर शोधतोय
कुणी मेडीकल घेतोय
कुणी डॉक्टरांना विनवणी करतोय
कुणी पेढे वाटतोय
नवा पाहुणा आल्याचे
कुणी फोडतोय
आकाश फोडणारा हंबरडा
जिवलग गेल्याने
कुठे दुःख तर आहे कुठे आनंद

कुठे डॉक्टर आहेत गडबडीत
इमर्जन्सी पेशंटच्या
इलाजाच्या तयारीत

आवारात फिरतेय काळीज कापणारी आवाज करणारी
अँबुलन्स

कुठे शिकावू डॉक्टर आहेत
पाहत आहेत
या साऱ्या जखमांना
कुठे हेच शिकावू पाहत आहेत
नव्या पेशंटची आवर्जून वाट...

सृष्टीच्या गतीप्रमाणे फिरतोय दवाखाना
वार्डात आणि वार्डाबाहेर..

**-- अमोल विनायकराव देशमुख**
महेंद्र नगर,परभणी
संपर्क – 7620949985
mail - amoldeshmukhkausadi@gmail.com

# कथास्पर्श

**अक्षय प्रभाकर वाटवे,** पुणे

गेली सहा सात वर्षे लघुकथा, ललित, कविता लेखन करतात. महाराष्ट्र टाइम्स, लोकमत, दिव्य मराठी वगैरे वृत्तपत्रांतून त्यांचं लेखन प्रकाशित झालं आहे. हंस, संवादसेतू, अक्षरधारा, महाराष्ट्र टाइम्स, पुरुष उवाच वगैरे दिवाळी अंकासाठीही त्यांनी लेखन केलं आहे. तसेच अक्षय वाटवे हे गेली काही वर्ष सातत्याने विविध अभिवाचनाच्या प्रयोगात सहभागी होतात. मराठीसह प्रसिद्ध हिंदी लेखकांच्या साहित्यावर आधारित अभिवाचनाचे प्रयोग ते सादर करतात,



**अक्षय प्रभाकर वाटवे**
पुणे

## निरंग

त्याच्या रुळणाऱ्या दाढीच्या केसांत एकही जटा नव्हती. तो उंचापुरा होता. एका उंचं शिखराच्या टोकावर तो उभा होता. अंगावर एक पांढरं वस्त्र निव्वळ लौकिक लज्जा रक्षणासाठी होतं. योग्य वेळ येताच खांद्यावर मारलेली त्याची गाठ सोडून तेही त्यागलं जाणार होतं. काळी, किंचित लालसर झाक असलेली त्याची बुबुळं स्थिरावली होती समोरच्या विस्तीर्ण नभोपटलावर. कुठेही पहात नव्हता तो, किंवा जिथे त्याने त्याची नजर रोखली होती ते सामान्यांच्या नजरेच्या टप्प्यात नव्हतं. अगदी माझ्याही नाही.

मी, हं... कोण मी? लौकिकात तशी माझी असेलही काहीबाही ओळख पण, शिखराच्या ज्या टोकावर तो उभा आहे, तिथे पोचेपर्यंत माझ्या सगळ्या ओळखीचे रंग वितळून जातील माझ्यावरून.

ते न वितळू देता मला त्याच्या पर्यंत पोचायचंय. कारण, त्याच्या पारदर्शकतेचा, त्याच्या उंचीचा, डोळ्यांच्या अथांगतेचा आणि खांद्यावरची गाठ सोडल्यावर त्याला सर्वार्थानं नग्न करणाऱ्या त्या शुभ्र वस्त्राचा मोह पडलाय मला. भुरळ म्हणा हवं तर. कधीपासून?

साल दिनांक ठाऊक नाही. संथ लयीत शीळ फुंकत मी चाललो असताना या घाटीच्या एका वळणावर हा एका वेगळ्याच बाजूने माझ्या समोर अवतीर्ण झाला. डोळे बारीक करून किंचित हसला. मला 'ये' म्हणाला. ती वेळ अशी होती की, माझ्या बाजूने सूर्य उगवून त्याच्या बाजूने कलत होता. मी त्याच्याबरोबर जाण्यास 'हो' म्हणालो कारण माझ्या हातात अख्खा दिवस शिल्लक होता. तेव्हा आमच्या सहप्रवासात मला केव्हा दिसलं नाही पण, आज जाणवतंय त्याच्या अंगावरचे सगळे रंग वितळत होते. त्याच वेळी त्यांचा भडकपणा सरत जाऊन शीत संगती निर्माण झाली होती.

तो 'चल' म्हणाला, तेव्हा मी निघालो. तसंही मला या वळणापुढचा रस्ता ठाऊक नव्हता. तो अनोळखी वाटा सराईतासारख्या पावलाखालून तुडवीत होता. पायाखाली टोचणारे काटे टाचेने चिरडताना त्याच्या तोंडून हुंदकाच नव्हे तर अस्फुट हुंकारही निघत नव्हता. वाटेत आलेल्या प्राणी, पाखरांना झुलवीत होता. उडवून लावीत होता. त्याचं वृद्ध होणारं शरीर मजबुती टिकवून होतं. आश्चर्य म्हणजे चढण चढताना जी धाप त्याला लागायला हवी ती धाप मला लागत होती!

त्याच्या जीवन रसाचं रहस्य तो मला चालताचालता सांगत असे. काही स्वादिष्ट फळं त्यानं मला चाखवली. काही मुळ्या माझ्या खिशात माझ्या नकळत सरकवल्या. माझं मनगट हलके दाबून

म्हणाला, 'अनुभवाच्या आहे, सिद्ध केलेल्या. येतील कामी, आज उद्या.'
'तू असताना काय गरज मला या मुळयांची?' मी बेफिकीरीने म्हणालो.
तो हसला. त्या मंद स्मित पसरलेल्या चेहऱ्यावर मावळतीच्या थोडं अलिकडचं सोनेरी ऊन पसरलं होतं.
त्या क्षणी मला तो देवदूत भासला.
तो थोडा अधिक उंच झाला.
त्याची दाढी जी किंचित काळी-करडी होती, तिच्यातला करडेपणा सरत गेला.
त्याच भरात मी उत्तेजित होऊन समोर असलेली मोठी चढण झपाट्याने चढून गेलो. फुलल्या श्वासाने आणि धपापत्या उराने लालबुंद होऊन मी  किंचित मागे राहिलेल्या त्याच्याकडे अभिमानाने पहात होतो.
आता त्याची दाढी पूर्ण शुभ्र झाली होती. विचारवंतांच्या चेहऱ्यावरची प्रसन्न शांतता त्याच्याही चेहऱ्यावर होती. त्याच्या अंगावरचे सगळे रंग पूर्ण फिके होऊ लागले होते. त्याच्याजवळ लौकिकदृष्ट्या आकर्षक असं काहीच उरलं नव्हतं. मात्र ही तीच वेळ होती ज्या वेळी त्याच्या भोवती अखंड चिवचिवाट होता. वेगवेगळ्या प्रकारचे, स्वभावाचे प्राणीपक्षी त्याच्या भोवती अक्षरशः पिंगा घालत होते. काही सुंदर रंगीत फुलपाखरं अधूनमधून त्याच्या खांद्यावर विसावत. अरे हो, हे सांगायचंच राहिलं की, हा रस्ता निर्जन मुळीच नव्हता, सर्वार्थानं गजबजलेल्या रस्त्यावर तो त्याच्या जागी उभा होता. त्याच्या भोवती सारं काही होतं. तरीही तो मात्र गूढ विरक्तीनं घेतलेला वाटायचा.
त्याची नजर मी तेव्हा नीट निरखली आणि मला जाणवलं की तो पलीकडे पहातो आहे, समोरच्या वळणाच्याही पलीकडे. माझ्याही पलीकडे. तो जिथे होता तिथून मला म्हणाला,
'पलीकडे पहा, अधिक पलीकडे' मी पाहू लागलो. पलीकडचं वर्णन करू लागलो तसा त्याचा हुरूप वाढला.
दोघांचेही चालणं अविरत सुरू होतंच.
आता आम्ही बरोबरीनं चालू लागलो होतो. प्रत्यक्षात तो फार पुढे पोचला होता केव्हाचा.
"आपण कुठे जात आहोत?" मी अस्पष्टपणे त्याला विचारलं
"हूं" एवढंच उत्तर देऊन तो चालत राहिला. का?
"मला कळायला हवं, आपण नक्की कुठे चाललो आहोत, म्हणजे किमान पोचायचं ठिकाण तरी सांग? आत्ता चालतो आहोत तो रस्ता खूप गर्दीचा आहे. वाटेत खूप माणसं येतात. कधी पोचणार कुठे थांबणार हे कळायला नको?" मी आता जरा चिडका झालो होतो.
"हूं" तो पुन्हा काही नं बोलता चालू लागला.
"चालणं महत्त्वाचं. नाही का? पोचणार तर आहोतच आपण. चाल तू पोचलास की कळेल तुला." त्याच्या गंभीर गोलाई असलेल्या आवाजात तो म्हणाला.
"तुला भान आहे का? आता रात्रही होईल थोड्यावेळाने... दिवस संपत आला." मी फणकाऱ्याने म्हणालो.
"कोणाचा? माझा? की, तुझा?" यावेळी त्याने माझ्याकडे पाहिलं नाही.
सूर्यास्त झाला.
अपरिहार्यपणे थांबा घेऊन आम्ही बिस्तरा लावला.
उशाशी हात घेऊन आकाश पाहताना मला लुकलूकणाऱ्या चांदण्या खुणावत होत्या.
मान वळवून मी त्याच्याकडे पाहिलं.
तो स्वस्थ होता. संथ श्वासाचा आवाज मला ऐकू आला. त्याच्या अंगावरचा शेवटचा रंग पूर्ण वितळून जात असल्याचा मला भास झाला. त्या रात्री त्याच्या अंगावर मी ते वस्त्र पहिल्यांदाच पाहिलं. शुभ्र. खांद्यावर गाठ मारलेलं. अंगभर गुंडालेलं शुभ्र वस्त्र.

त्याला नीट पाहून घेतलं. मग काही एक विचार करून उठलो. निघालो. चालू लागलो. ही वाट मात्र वेगळी होती. चालताचालता नवी ठिकाणं मला दिसली. वेगळी फुलं, पानं, पक्षी, झाडं, वेली, माणसं. काही जुनीही भेटली पण यावेळी नव्याने कळली. ती रात्र उलटून पहाट झाली त्याला आता कैक वर्ष लोटून गेली. आज अचानक तो त्या शिखरापाशी दिसला. कधीनाकधी आम्ही पुन्हा भेटणार असा संशय मला होताच… आज चालताना काही कोस पुढे मान ताठ ठेऊन नजर समोर रोखून चालणारी एक अस्पष्ट आकृती दिसली. कुतूहलानं खात्री पटवून घ्यायला आणि पुन्हा एकदा त्याला भेटायला माझा रस्ता बदलला. तोच होता तो. शेवटचं पाहिलं त्या पेक्षा अधिक पोक्त. केस, दाढी, वस्त्र शुभ्र असलेला. त्याची कांतीही हा उजळू लागली होती. पण अजून काही अंतर बाकी होतं. त्याला जिथे पोचायचं होतं त्या शिखराच्या वाटेवरचा हा शेवटचा पडाव होता. अजून फक्त काही मैल..

त्याचं त्या रात्रीचं बोलणं मला आठवलं.

"पावला मागून पाऊल उचल. चाल. चालत राहा. वाट फुटेल थांबू नकोस. रंग चढत जातील. झिंग येईल. तळपुन झळाळून निघशील. एक क्षण असा असेल की मध्यानीचा सूर्य फिका पडेल. थांबू नकोस. चालत राहा. वाटा, काटे, धूळ, दगड, माणसे; अडकत, ठेचकाळत रहाशील. अडक. स्वतःला सोडव. चालत रहा. फळे खा. पाणी पी. तोंड पूस. निघून जा. चालत राहा निरंग होई पर्यंत."


त्याच्या गोलाई असलेल्या गंभीर आवाजातले शब्द पुन्हा वाहू लागले माझ्या डोक्यात. मी झटका बसल्या सारखा स्वतःला पाहू लागलो.

माझीही दाढी वाढली होती. रंग वितळू लागले होते. माझा चेहरा आता नक्की कसा आहे हे मला दिसत नव्हतं. पण दाढी करडी होऊ लागली होती. नव्या वाटेवरून चालताना अनेक चित्रविचित्र गोष्टींनी माझी बॅग मी भरून घेतली होती. ती पाठीवर होती. तिला हात लावून चाचपून अंदाज घेतला तर त्यातल्या कितीतरी वस्तू कालौघात सांडून गेल्या होत्या. मी सावध झालो. माझ्या अंगावरचे रंग कधी पासून वितळू लागले मला आठवत नाही. मला समोर तो दिसत होता. जवळ वाटत असला तरी लांब होता. मी खांद्यावरची बॅग तिथेच टाकली. चालू लागलो. त्याच्याच दिशेने.

माझ्या सगळ्या ओळखीचे रंग वितळून जातील माझ्यावरून. ते न वितळू देता मला त्याच्या पर्यंत पोचायचंय कारण, त्याच्या पारदर्शकतेचा, त्याच्या उंचीचा, डोळ्यांच्या अथांगतेचा आणि खांद्यावरची गाठ सोडल्यावर त्याला निरंग करणाऱ्या त्या शुभ्र वस्त्राचा मोह पडलाय मला.

**© अक्षय प्रभाकर वाटवे**
**९७६६९९१४२१**

❑❑❑



# कथास्पर्श

डॉ.अनंता सूर
गजानन महाराज महाविद्यालय , मुकुटबन जिल्हा यवतमाळ येथे मराठी विभाग प्रमुख
कथालेखक, स्तंभलेखक ,समीक्षक म्हणून ओळख.अनेक राज्यस्तरीय पुरस्काराचे मानकरी.



डॉ.अनंता सूर

# आंधळी स्वप्ने

आम्ही दोघं तिघं जन खोऱ्यानं सिमेंट कालवायलो.बायका टोपले उचलून बिलडिंगवर नेयाला लागल्या. त्या बायकात माझी बायको सुमनबी होती.आमच्या समद्यांच्या कपाळावरून बदाबदा घाम गळाडयला.कपाळावरचा घाम कवा कवा तोंडात जायला.पन आम्हाले त्याची जराबी पर्वा नव्हती. घाम खारट लागायला. सालं हे खारटपणच आयुष्याला सुंदर बनवते. चविष्ट बनवते. तेवढा रातदिन ढोरावांनी घाम गाळतो तरीबी आपलं आयुष्य चविष्ट बनलं नाही. आपलं आयुष्य कधी चविष्ट बनणार कोणाला ठाव ?असंच आमचं झिंगाभोई अन दिसलं ते खाई म्हणत समद्याचं घाम उपसून जगणं चाललेलं. कित्येक पिढ्याबी आमच्या अशाच मुक्या जितराबासारख्या बर्बाद झाल्या.

आयुष्याची वाट चालताना खाचखळग्यात आपण लई डाव पडलो. पडून उठलो.चुकुन शिकलो. पुन्हा कधीही न चुकण्यासाठी. पण काय करू यार,सारं कळत असूनबी उठून पडतो.शिकून चुकतो.असं का होते? असं कोण करायला भाग पाडते? आपण साहेब व्हावं, चार पैसे हातामंधी खेळावे,घोडागाडी हाती असावी, मायबापाला सुखाने चार घास चारावं म्हणून मायबापानं मह्याकडून किती स्वप्न बघितली.पण स्वप्नांना स्वप्नांनीच खाऊन घेतले.आपली सारी स्वप्न हातातल्या रेतीवानी घसरून चकनाचूर झाली.असा विचार करत करत मी आमच्या मानसांसंग काम करीत होतो.

तेवढ्यात रामभाऊने आवाज दिला," ओ नामदेवराव ...आरं ओ नामदेवराव" तसा मी एकदम मह्या सपनाच्या इचारातून भानावर आलो.

मी "काय झालं बा रामभाऊ?" म्हणत मान वर करून पाह्यलं .तसा

तो "कवाचा आवाज देतो. बहिरा झालास की काय म्हणायचा घरात बसलेल्या गोमीसारखा असा गुमश्याम व्हायला."

मी " नाही ...नाहीतं" म्हणत आपल्या भूतकाळातील विचारातून उभ्याउभ्याच भानावर आलो. तसं रामभाऊनं," सुट्टी झाली जेवायला चाल.भुकेनं पोटामंधी सारखे कावळे वरडायले. तुम्हास्नी नाही का भूक लागली?"

" याच्या आईला. मला ध्यानच नाही. मी आपला सपन रंगविण्यामंधी,इचारामंधीच गुंतलो." तसं चेहरा न्याहाळत रामभाऊनं," आहो सुमनवहिनी काही झालं झालं का भाऊला?"असं विचारताच सुमनच माझी बाजू सावरत," काही तर नाही झालं भाऊजी ...तुम्ही काऊन शंका घ्यायले यायच्यावर.समदं तर बरं हाये आमचं"म्हणत मोकळी झाली.

" मग असं का करत्यात वैनी नामदेवभाऊ ?पाठीमांग एखादं हट्टी कुत्र लागावं तसा" रामभाऊच्या प्रश्नाचा आग्रह तिला समजला.

"दोन-तीन दिवसापासून आमचे हे असंच करीत हाईत."म्हणत सुमननं अपेक्षित असलेलं रामभाऊला स्पष्टीकरण दिलं. तरीही पुन्हा,

" काही भांडनगिडन झाले का रातच्याले तुमचे ?"म्हणत रामभाऊनं चांभारचौकशीदाखल विचारलं.

" नाही हो भाऊजी" म्हणत एकदाची ती शांत बसली. तोच त्यानं आपली बेरकी नजर मह्याकडं केली. मी मात्र आभाळभर नजर फिरवू लागलो. तोच-

"आहो नामदेवभाऊ तुमची तब्येत बरोबर नाही हाये का आज?"

"तब्येत बरोबर आहे दादा" मी रामभाऊला समजावणीदाखल उत्तर दिलं तसा-

" मंग असं चीत नाई थारी अन पावनतीर्थ करीसारखं इसरभोळ्यावानी का करता नामदेवभाऊ तुम्ही?"म्हणत प्रश्न केला.

" जुने दिवस आठवले की होते तसं... मन बेचैन होते रामभाऊ"

" गरीबी तुम्हीच नाही आम्हीसुद्धा बघितली हो नामदेवा."रामभाऊ त्याच्या अधिक जवळ सरकून मन मोकळं करीत बोलू लागला.

" आपण सर्वांनी कमी जास्त गरिबी बघितली म्हणून तर नखभर सुख, हातभर दुःख पचवूनबी आपण मजूर आहोत."

"नोकरीसाठी जराशी खटपट करायची होती ना.मंग कायले आपण अशी मजुरी,हमाल्या केल्या असत्या. चालता काळ त्याच्या गळ्यात माळ आसते भाऊ" रामभाऊच्या बोलण्यानं डोकं भानावर आलं.

" खूप केली.आताही करतच असतो. जाऊद्या चला जेऊन घेऊ" म्हणत उठलो तसा पुन्हा रामभाऊनं मह्याकडं तिरकी नजर करत प्रश्न केला.

"नामदेवभाऊ, तुम्ही मोबाईल घेणार होते ना" मी पुन्हा शांत झालो.

"मागं तिच्या हिवतापात दवाखान्यात पैसे गेले ना. मोबाईल गेला डॉक्टरच्या खिशात. होते नोयते जवळचे समदे पैसे बिमारीले गेले."

"मग... आता कोणाले फोन करायचा झाला मंजी "

"एवढी गरज वाटत नाही मोबाईलची. मागच्याच वर्षी घेतला होता एक जुना मोबाईल.तोबी परवाच्या दिवशी असंच नळावर हात धुता धुता पाण्यात पडला. खराब झाला.आता बघतो पुढच्या महिन्यात मजुरीच्या पैशातून."

मग आम्ही गोष्टी गोष्टीत निघालो शिदोरी खायला. बोरिंगवर आलो. हातपाय धुतले. समद्या बरोबर चालत चालत भितीच्या सावलीला आलो. सुमनने भाकरीचा पालव सोडला. मी बुक्कीने कांदा फोडला आन आम्ही दोगं नवरा-बायको लागलो पेंडवरणासंग हावऱ्यावाणी भाकरी खायला. सोबतचेही आपापली पालवं सोडून जेवू लागले भाकरी. जराशा वेळानं आमच्यासंग समद्यांचं जेवण झालं.बोरिंगवर जाऊन समद्यायनी हात धुतले. एकाएकान बोरिंग हलवून पाणी पेले.पाच-दहा मिनिट आराम करावं म्हणून तेथेच भितीच्या सावलीला गेलो. माती हातानं लोटलाट करून जागा साफ केली. एक मोठा दगड उशाला घेऊन मी आंग टाकलं.

डोळे मिटले. डोक्यात आठवणींचे काहूर माजले. स्वतःचा विचार स्वतःच करू लागलो. जिंदगीमंधी जगलेल्या उन्हाळ्या- पावसाळ्याचे चित्र डोक्यात उभे राहिले. गावोगाव फिरून आमच्या पिढ्या खपल्या. पायाले भवरा नागोबा नवरा तसा आमचा बाप हितभर पोटासाठी गावखोरीत पालं टाकून बाप समद्या भावंडांना घेऊन फिरायचा. अशात व्यवस्थेनं नाकारलेल्या भटक्यांच्या पालात मी जन्माला आलो. आम्ही सात-आठ भाऊ-बहीण होतो. काही भुकेने मेले काही अंधश्रद्धेत गेले. जे दोन-चार वाचले त्यांच्या जगण्याचे वांदे झाले.

"वस्तीगृहात टाका.जगण्याचा प्रश्न मिटतो "असं एका शायन्या माणसानं बाबाला सांगितलं आणि चुकून आपलं नातं हाततलं भिकेचं वाटं सुटून शाळेशी जुळलं.जीव तोडून शिकू लागलो.शाळा करू लागलो. जीव लावून अभ्यास करायचो. बाबा बिराड घेऊन पोटापायी गावोगावी भटकत होता.

पोटाला टाचाटीभा घालत होता. माझी याद आली की कवामवा मला भेटायला यायचा. तवा मास्तर अभिमानानं बाबाला माझ्याबद्दल खूप सांगायचे. मग बाबा मी ऑफिसर ,मोठा साहेब होण्याचे स्वप्न बघायच...

जसजसा पहिल्या नंबरात एक एक वर्ग पास होऊ लागलो तसतसं मला कळू लागले.कळु लागल्यावर साहेब होण्याचे स्वप्न बघू लागलो.आन पुन्हा नव्या जोमानं अभ्यास करू लागलो. पुढे बापाच्या स्वप्नासाठी मह्यी धडपड सुरू झाली.

सुट्ट्यात चिंधी बाजारातली कापड घालून मी पालावर जायाचो.पालावरची समदी उघडी,नागडी शेंबडी पोरं मह्या भौती गोळा होयाची. शाळा कशी असतीया,शाळेत काय शिकवित्यात, मास्तर कसा असतोया असं सगळं सगळं खोदून विचारायची.

पावसाळ्यात खाण्या राहण्याची पालावर आबाळ राहतीया. वस्तीगृहात भाकर भेटतीया. समदी पोरं एक दिवस वस्तीगृहात घेऊन गेलो. बिचारा वार्डन नवीन लागलेला. पालावरच्यावाणी पोरं गोंगाट करायले.वार्डन फुल दारू पिऊन होता." काय तरास देयाले भडविचे" म्हणून पोराईला त्यानं खूप ठोकलं.बिचारे अंधारातच पळून गेले. मुलीच्या वस्तीगृहात सुमन तेवढीच टिकली.आन पोराच्या वस्तीगृहात मी नामदेव टिकलो .

कवा मवा मी पालावर जायचो. पोरापोरींना शाळेत चला म्हणायचो. बिचारे छडीला भेयाचे. तालाले ताल नाही अन हालाले हाल नाईसारखा कारभार. पुढे ते असेच बापजाद्यावानी मायबापाबरोबर गाढव वळीत गावोगाव भटकून पोट भरू लागले. गावगावी ढोराडुकरावानी उकिरडे फिरत जगू लागले.

एक दिवस आपलं शिक्षण संपलं. पालावर आलो, 'नोकरी धर' म्हणून मायबापानं टुमनं लावलं.झिंगरातला पाय घुंगरात फसल्यागत मी मुलाखती देत शाळा, कॉलेज फिरू लागलो. खिसा फाटका असल्यामुळे नोकरी लागंना. मुलाखती देऊ देऊ दमछाक झालो. लग्गा लागल्याबिगर डगा वाजत नाही हे ध्यानात आलं. पालावरले समदे हसायले. शिक्षण घेऊन पोरगं वाया गेलं म्हणायले. काम भी जमंना, पण काय करणार. पोट होतं ना. शेवटी लागलो शेंडी तुटो का पारंबी तुटो म्हणून मायबापाच्या हाताखाली काम करायला...

यंकामामाची पोरगी सुमन बारावी पास झाली.बिराडावर आली. तिच्या बापान लग्न करण्यासाठी मला विचारलं. मी "स्वतःच्या पायावर उभा राहिलो नाही" म्हणून सुमन आवडत असूनबी नकार दिला.तवा यंकामामा सुमनसाठी दुसरा नवरदेव बघू लागला. उन्हाळभर बघूनबी नवरदेव सापडला नाही म्हणून पुन्हा यंकामामा शांत बसला.

दिवस पावसाळ्याचे होते. आमची सात आठ पालं गावगोदरीत उभी होती. गडी- बायका समदे पालावरचे कामावर जायचे. लेक्रंबाळ पाल राखत मीबी बिराडावर राहायचो. सुमन एकुलती एक. तिचा बाप तिला काम करू देयाचा नाही. टुकार लोक, गावरेडे तरास देतात म्हणून यंकामामा तिला पालावरच ठेवायचा. सुमनसाठी नोकरीवाला पोरगा भेटंना.आन सुमनला पालावरचा अशिक्षित पोरगा करंना. कारण अशी नादर पोरगी बायको करनं म्हणजे बिराडावर तिलाच सांभाळावं लागंल. गावरेड्याच्या,पोलिसांच्या जबड्यातून वाचवावं लागंल.ज्याचं नळे, त्याला कळे.नवरदेव बघू बघू यंकामामाची उन्हाळभर दमछाक झाली. पोरीला उगीच एवढी शिकविली म्हणायला. दिवस असेच आल्यापावली जात होते. पालावरचे भिताड रचायचे काम करायचे. एका गावचं काम आठ-दहा दिवसांमध्ये संपलं की पुढच्या गावाला जायचो. पोटापायी भटकायचो.

. तेवढ्यात सुपरवायझरने हाक मारली मी खाडकन उठलो. बघतो तर काय सुमनसोबत समदे काम करायले. मी बोरिंगवर गेलो. तोंडावरून पाण्याचा हात फिरवला आन मसाला कालवायच्या कामाला लागलो.साला आज कामावर ध्यान लागत नव्हतं.

डोक्यात आठवणीने काहूर माजविले. तसेच काम करत करत चार-पाच वाजले.

विजा कडाडू लागल्या.आभाळ गडगडू लागलं.आन चक्कधार पावसाले सुरवात झाली.मी त्या दिवशी पालावरच होतो.लेक्रं आन सुमनबी पालावरच होती.गडी बायका समदे कामावर गेलेले.पुन्हा जोरात वीज कडाडली तशी सुमन पळत मह्या पालात आली. भिजून आम्ही वलेचिंब झालो. खालून पाण्याचा लोंढा आला. आन दोघं दोन दगडं ढुंगणाखाली घेऊन समोरासमोर एकमेकांकडे पहात बसलो.

सुमनची आंगावरची कापडं भिजून वलीचिंब झाली. तिच्या अंगाला चिकटली. आरपार समदं दिसायलं. मी बेभान झालो. तिचाही तोल सुटला. आन आम्ही दोघांनी गळ्याला गळा कधी लावला ते आम्हाला कळलेच नाही.पुढे मला भाक्रीत,पालात, झोपेत, काम करताना सुमनच दिसायली. तिची प्रतिमा आरशावानी येऊन मह्यापुढे उभी राहिली.कवामवा ती चोरून मह्याकडे बघायची. दोघायची नजरेला नजर भिडायची आन आमच्या साऱ्या अंगात वीज चमकायची. असे आन असेच दिवस जात होते.

जाता जाता रिश्त्या नात्याचे धागे जुळले. पानी पिना छानकर, लडकी देना जानकर म्हणत यंकामामानं रितीरिवाजानं आमचं लग्न पार पाडलं. आन आम्ही नवरा-बायको झालो. आमचा पालावरचा संसार चालू झाला. पोटाले लागले खडक तं जात्यावर बसते तडक म्हणत जगू लागलो.

एक दिवस जवळच्या वडगावात चोरी झाली. भल्या पहाटेला पोलीस पालावरआले.आम्हाला दंड्यानं ठोकपिट केलं.सुमनची खूपच ओढाताण झाली. माझ्या ध्यानात आलं. बिराडावर एवढी सुंदर बायको घेऊन राहणं चांगलं नाही.

पुढे अशीच एका मजूर माणसाशी माझी दोस्ती झाली. आन मी सुमनसह पोटापाण्यासाठी ही मुंबई नगरी गाठली. आता आम्ही दोघं नवरा-बायको ह्या बिल्डिंगवर रोजमजुरी करतो. पोटाले भाकर बांधल्यानं भूक जात नाही म्हणून रात्रंदिस राबतो. इथल्या मजुरांच्या झोपडीत आम्ही आमचीबी एक झोपडी उभी केली.

तेवढ्यात कामाला सुट्टी झाली आन मह्या विचाराची धार तुटली. आम्ही सारे लगबगीने निघालो. आलो तसेच धावत आमच्या झोपड्यापाशी.चूल चेतवुस्तर पावसाला सुरुवात झाली. आभाळ फुटल्यागत पाऊस वैरी होऊन झोडायला लागला.

ताटव्याची झोपडी बदाबदा गळाया लागली. आम्ही भिजून वलेचिंब झालो. खालून पाण्याचा लोंढा आला. दोघांनी दोन दगडं ढुंगणाखाली घेतले. समोरासमोर बसलो. वाऱ्यानं मेणबत्ती विझली. सारा अंधार गुडूप. विजा चमकल्या की त्या उजेडात एकमेकांचे अंधुक चेहरे दिसायचे. झोपडीच्या दारातून समोरच्या टोलेजंग इमारती दिसतात.त्यातला उजेड दिसतो.तेथेही माणसंच राहतात.त्या इमारतीमध्ये उजेड आणि झोपडीमंधी जीवघेना अंधार.पाटील कढीवर आन गोसाई मढीवर असं जगणं चाललेलं. आपण स्वातंत्र्याच्या एवढ्या वर्षात हे बदलू शकलो नाही. मग जगातली सर्वश्रेष्ठ आपली लोकशाही कशी?आता तुम्हीच सांगा ना राव.असे काहीबाही सवाल डोक्यात फिरू लागले. तेवढ्यात बेफाम वारा आला आन आमच्या झोपड्या उडून गेल्या. आम्हाला लेक्रंबाळ नव्हते. बायकोचा महिना थांबला पण या आकांतामध्ये बाकीच्यांची लेक्रंबाळ चिरचिर चिरकायली. आता झोपड्यात गेल्या तर पावसापासून बचाव कसा करणार? पाण्यानं लावली झड, पावना मनतोय पड असं झालंय आमचं.आता आपलं काही खरं नाही. आमच्या नवरा बायकोचे तर दहा गेले अन चारच राह्यले.

मी जागेवरून उभा राहून रामभाऊच्या झोपडीकडं पहात आवाज देऊ लागलो.

" रामभाऊ...आरं ओ रामभाऊ" तसा पलिकडून मह्या आवाजासंग रामभाऊ "आरे नामदेवभाऊ कुठे हाईस?"म्हणून मह्यी चौकशी करू लागला. पावसाचा जोर एकसारखा वाढू लागला. तसा जागेवरूनच

मी," तुम्हालाच आवाज देतुया. उत्तम आन प्रकाश कुठे आहेत?"अशी चौकशी केली. तेव्हा पलिकडून आमच्या दिशेने मोठ्या आवाजामध्ये

" हितंच हाईत,पाऊस भाय धुवाधार बरसत हाय गड्या.आता ह्यो पाऊस उघडण्याची चिन्ह दिसत नाही."म्हणून रामभाऊ सांगू लागला.

" मग...आता या पावसामंधी काय करायचं आपुन?"म्हणत मी रामभाऊपाशी चौकशी केली. तेव्हा उलट तो थोड्यामान थांबला आन

" तूच सांग. आम्हाला तर ह्या वल्या झोपडीमंधी काहीच सुधरत नाही" असं रामभाऊ उत्तर देऊ लागला. तेव्हा मीच नजरेपुढं दिसणाऱ्या बिल्डिंगकडे बोट दाखवून त्याला सांगितलं.

"चला, समोरची बिल्डिंग आहे ना. त्याला खेटून उभे राहू. म्हणजे पावसापासून आपल्या समद्यांचा निदान रात्रभर तरी कसाबसा बचाव होईल,"

" चला"म्हणत मह्या मागं मागं समदे आले. मी सुमनचा हात धरला. मग आम्ही निघालो समदे एका मागं एक. आलो चालत चालत बिल्डिंगच्या बाजूला. तिथं झाडंगिडं होती. पावसाचा झपका उंच बिल्डिंग असल्यामुळे लागत नव्हता. थांबलो. समद्यांची रात तशीच उभ्याउभ्या पाऊस जाण्याची वाट पाहण्यात निघून गेली. आभाळ फुटल्यावाणी पाऊस कोसळत होता.

सकाळी सकाळी पाऊस उघडला. मग आम्ही त्या बिल्डिंगच्या बाजूला असलेल्या उंचवट्यावर येऊन बसलो. अंगातले कपडे आंगातच वाळून गेले. रातभर जागल्याच्यानं समद्यांचे डोळे कचकच करत होते.तेवढ्यात उत्तम झोपड्यावर जाऊन आला.समदे भांडेकुंडे, समदा संसार वाहून गेला होता. झोपड्या भुईसपाट झाल्या. तिथं कमरेइतकं पाणी होतं. खोलगट जागा असल्याच्यानं सारं वाहून गेल्याचं उत्तम सांगत होता. पुन्हा नव्यानं संसार उभा करावं लागंल गड्या.आता पालं जवा उभी करायची तवा उभी करता येईल पण आजचं जेवायचं कसं? दाळ ना रोटी, लगन अर्ध्या राती या भितीनं आम्ही संभ्रमात पडलो.बसलो समदे तसेच बिल्डिंगकडे बघत. त्या बिल्डिंगीतून एक गोरीपान पोरगी पांढरे कुत्रं घेऊन बाहेर आली. त्याला गेटजवळ आणून बांधलं. ताटात बिस्किट ठेवले. कुत्रा एकेक बिस्किट खात होता आणि आमच्याकडे बघून एकसारखा भुंकत होता.भिकारचोट म्हणून जणू आम्हाला शिव्या देत होता.

असं कसं रे नामदेवा तुमच्या लोकशाहीचं.माणसापेक्षा कुत्र्याची सरबराईस जास्त होते. तरी तुमची लोकशाही श्रेष्ठच का? या विचाराने मन कासावीस झालं.तशी सुमन म्हणली "आता हामचं जगणं दे दान सुटे गिरान झालं.राम्ह म्हणल्याशिवाय जीवाले आराम नाह्यी व माय." आन आमच्या बायका हातात भांडे घेऊन वस्तीच्या दिशेने भिक मागायला गेल्या. त्यंच्याकडं पाह्यताना तोंडाले मुस्कं, गांडीले बोड्या लावल्यागत आमची अवस्था झाली. मी आन रामभाऊ कधी कुत्र्याकडे तर कधी बायकांकडे पाहू लागलो. आमची मोलमजुरी करून सन्मानाने जगू पाहणारी आंधळी स्वप्ने या लोकशाहीत रात्री वाहून गेली की काय या विचारानं माझं डोकं चक्रावून गेलं.रातीच्या धुवाधार पावसानं आमची इथल्या लोकशाहीत जगण्याची नवी वळखच पुसून टाकली व्हती.

डॉ.अनंता सूर
कल्पना मार्बलमागे,
छोरीया ले आउट, गणेशपूर,
ता- वणी, जि- यवतमाळ पिन-
445304भ्र.9421775488
मेल:dranantasoor@gmal.com

# अनुवाद:भावानुवाद

नेहा भांडारकर, नागपूर
सुप्रसिद्ध कवयित्री ,लेखिका ,अनुवादक



**नेहा भांडारकर**
**नागपूर**

## लिली स्वार्ण यांच्या अनुवादित कविता

---

**1) मला आश्चर्य वाटते**

मला आश्चर्य वाटते की
मी का जन्मले नाही
ज्यू, हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन धर्मात?

पण असे असले तरीही
मला त्याचे अजिबात वावडे नाही
मी रोज त्याच मरगळीसह
असंख्य विचारांचे काहूर डोक्यात ठेवतच
माझ्या उबदार बिछान्याबाहेर पडते

महिलांवरील अत्याचारांवर आणि
त्यांच्या कमनशीब होण्यावर मला धडधडतं
मी त्याच विचारांना कुरवाळत बसते
माझं डोकं ठणकतं जेव्हा मी
माझे रक्तदाबाचे औषध घेण्यास विसरते

मला उन्हाळ्यातील तीव्र सूर्यकिरणच
जास्त आवडतील काय?
कदाचित माझ्या उपस्थितीत माझ्या मित्र-मैत्रिणींनी
सरदारजींचे आणखी विनोद केले असेल काय?
असे असंख्य, कदाचित निरर्थक प्रश्न
मला उगाचच भेडसावतात

मला भारतातील इतर जाती-धर्म अनुभवायचे आहेत
दुसऱ्या धर्मात जन्म घेऊन त्यांच्या श्रद्धांबद्धल मला जाणून घ्यायचे आहे

मी जन्मले ती वेळ, जागा किंवा गर्भ मी निवडलेला नाही
तसेच मी माझ्या प्रार्थनेची पद्धत ही निवडलेली नाही

मला मंदिरातील आरती तसेच
ग्रंथ गुरू साहिबमधील जपजी साहिबचा
पावन दिव्यपाठ माहिती आहे
जेव्हा मी सर्वशक्तिमान अल्लाच्या नावात
आशा आणि इच्छांची जाणीव अनुभवते
तेव्हा मी सहज इन्शाहल्ला म्हणते

ज्याप्रमाणे कॅथलिक चर्चमधील
वर्जिन मेरीसाठी मी उच्चारते "हेल मेरी"
आणि बायबलनुसार
"स्वर्गात असलेल्या माझ्या सर्व शक्तिमान देवबापाचा"
उदो उदो करते
अगदी त्याच सहजतेने
मी गुरुद्वाऱ्यात "वाहेगुरु" चा जयजयकारही करते

चला; आपसातील भांडणे आणि युद्धे सोडून देऊ या
कदाचित पुढचा श्वास आपण घेऊ शकणार नाही
उद्याची पहाट पाहण्यासाठी मी जगु शकणार नाही

जगात प्रेम आणि शांतता पसरवू या
रक्ताच्या नद्या वाहवणाऱ्या गोळ्यांऐवजी
रक्तदान करू या
चला, पुन्हा एकदा प्रेम करायला शिकूया!

2) माझं रुधिर रंगी लिपस्टिक

हे असे दिवस आहेत की मी विव्हळ होऊन
माझ्या रुधिररंगी लिपस्टिकच्या मागे लागलीय
काही गहन अर्थाच्या शोधात

मेरुदंड नसलेल्या या जगावर
माझा क्रोध आणि रोष दर्शविण्यासाठी
मी आपसुकच
जगाच्या वेडग्रस्त दृष्टीवर
किरमिजी रंगाचां प्रकाशझोत टाकते
क्रोधाने घेरलेला हा लाल रंग
मला अंतर्बाह्य मजबूत करतो...
माझ्या चेहऱ्याकडे माझे लक्ष  अधिकच वेधून घेतो

आणखी चालणार नाही हे!...
मूढता शून्यता अविचारीपणा
तोंडसुख घेण्याचा क्षुद्रपणा...छे!

थरथरत माझ्या धनुष्याकृती ओठांवर
बाण ताणले जातात
आसुरी शक्तींचा नाश करण्याची तळमळ बळावते
त्या लाल वस्त्रांकित शरीरामागे दडलेल्या
विलक्षण पराक्रमी आकृतीकडे लक्ष वेधत
स्त्रीशक्तीची एक मूक आठवण मला होते

स्त्री शक्तीचं प्रतिक...
आदि शक्ती दुर्गा, वाघावर बसलेली
शांत, आत्मविश्वासाचं सक्षमीकरण करणारी
लाल चकाकणाऱ्या रंगाची शक्तिशाली आभा
प्रेम, तळमळ आणि संवेदनशीलता
तसेच धैर्य, जोम आणि इच्छाशक्ती प्रबळ करणारी
किंवा कादंबरीतील
तळपती ओ' हारा बनलेली स्कार्लेट
किंवा क्रोधित जोहानसन रेज जणू

राग, क्रोध आणि तणावाचं आवरण माझ्या ओठांवर
..
एक संमिश्र कंपन...

मला वाटतं आजचा दिवस
त्या अशाच दिवसांपैकी एक असावा
ज्या दिवशी मी माझ्या
स्वर्णिम जरतारी बनारसी साडीशी मिळत्या जुळत्या
टोमॅटो लाल रंगाची लिपस्टिक शोधत असावी
स्त्री शक्तीच्याच विचारात गढून..

**3) शांती**

शांतीच्या अंगावर खोल घाव दिसताहेत
त्या विश्वसुंदरीला पांढऱ्या वस्त्रात लपेटलेले आहे
रक्ताचे लाल थेंब तिच्या
सॅटिनच्या चमकत्या
मूळ पांढऱ्या साडीला
लालेलाल करीत आहे

तिला प्रेमाच्या उबदार चादरीत गुंडाळा
तिला श्वास घ्यायला खूप त्रास होतोय
तिला या दलदलीतून वर काढा
थांबवा तिचे अंग विच्छेदन
तिचे कापलेले पाय परत द्या तिला

तिचे स्वातंत्र्य परत द्या तिला

तिचे रडणे विश्वाला गुदमरवत आहे
ती स्वत:च्या रक्तरंजित आयुष्यात  वळवळतेय
तिच्या तेजस्वी आभेला डाग लावू नका
प्रार्थना करा की तिचा सन्मान
कलंकित होणार नाही

शांती आज विश्वाची तारणहार आहे
भयंकरपणे गोंधळून गेलेल्या या जगाची
उधाणलेल्या, दूषित मानसिकतेचे
रक्षण करू शकणारी
आज ती एकमेव ' मसिहा ' आहे

तिचे फाटके अवशेष परत द्या
तिला चव्हाट्यावर आणू नका
पॅचवर्क गोधडीसारखी
तिची भूमिका तिला पार पाडू द्या
शांतीला सुंदर खळखळून हसू द्या

विश्वाला त्याचा श्वास परत मिळू द्या
तुम्हाला प्रेमाची ऊब हवी असेल तर
शांतीला शरण जा
घेऊ द्या तिला तिच्या मिठीत,
तुम्हा सगळ्यांना!

**4) सांजवेळीचे  किस्से**

संध्याकाळ रंगात आली ...
गुलदस्ता बनून
सांजेच्या गाडीवर स्वार होत
लालचुटुक रंगांनी डूचमळत, काठोकाठ भरून
स्वर्गातील पक्षी बनून

माझ्या हृदयाची विण गुंफल्या गेली
लाल शेंदरी रंगछटांच्या झावळ्यांमधून
चुंबकीय अतिसंवेदनशील किरणे
उत्कट भावनावेशाच्या मिरवणुकीत सामिल झाले

ही भिजलेली स्वप्नभारीत संध्या
मी अर्पण करावी काय
तुझ्या सुगंधित मधाळ श्वासांना?...
कविते!

प्रेम, पावित्र्य अन् निर्मळतेचं प्रतीक असलेले
ल्युपिन, लैव्हेंडर, लिलाक, लार्क्सपूर
सुगंधी श्वासांमधून आदळलेत माझ्या पासळ्यांवर
माझ्या हृदयाच्या पोर्टलवर ठोठावत राहिलेत
एका निश्चयी करारी जांभळ्या शांततेसह

पॅन्सी, साल्विया, सिनेरिया, डायनथस
या सगळ्यांना घ्यायचे होते चुंबन माझ्या आत्म्याचे
लालचुटुक गुलाबानेही चतुराईने
दु:खाचे काटे म्यान केले मला बघून

मी मात्र माझ्या डोळ्यांना टोचू दिली
त्याची काटेरी वेदना
कारण मला रात्रीच्या चंद्राला टाळायचे होते
माझं अंतर्मन भावविव्हळ असताना
मी कशी बरे सामोरी जाऊ शकेन  त्याला?
जेव्हा भूक मिटविण्यासाठी धरलेल्या
डाव्या तळहातावरील चांदीच्या थाळीतूनच
होत असेल बाणांचा वर्षाव
आणि लिहीत असेल बायबल
एखादी संघर्ष आणि विजयाची गाथा?

हेच ते गुपित, जे अत्र तत्र सर्वत्र

मी जगापासून लपवू ठेवू बघत होते

दरम्यान...

:

संध्याकाळ  रंगात आली गुलदस्ता बनून
सांजेच्या गाडीवर स्वार होत...

**5) माझी गोष्ट**

मी मातीच्या त्या गोळ्याबध्दल लिहितेय
जो आपण इतरांपेक्षा अधिक वेगळे
अधिक काहीतरी असल्याचे भासवतो
आणि सर्रास रमत असतो आपल्याच कळपात
कवडीभर ज्ञान नसलेला हा
मठ्ठ माणूस मग अनाठायी पडतो
नैराश्याच्या आणि ओहोटीच्या खड्ड्यांमध्ये

हे उत्तम प्रकारे कमावलेलं शरीर,
हे पूर्णत: छिन्नीने तासल्यासारखे कामुक चेहरे
ज्याला स्वतःचा अंत नाही असे वाटणारे
दांभिक वृत्तीना दांभिक भूमिकेला
उदात्तपणे आश्रय देणारे
फाजील चिकित्सक
दहशतीने ग्रासलेले पिडीत
सतत उपहासच करावा अशी ही माणसं
त्यांच्या सर्वव्यापी डोळ्यांत असतो
केवळ हरवलेला आत्मा

स्वतःच्या मर्यादांची खिल्ली उडताना बघून
त्यांच्या मुठी वळतात लढण्यासाठी
त्या पुन्हा करू बघतात घोडचूका
पायदळी तुडवण्यासाठी
काही मातीचे गोळे
घट्ट जीन्समध्ये गोलाकार उंचवटे
दाखवण्यात मानतात धन्यता
वरचढपणा आणि श्रेष्ठत्व मिरवण्यासाठी
दिखावा करणाऱ्या या गुलछड्या
त्यांना ग्रासलं असतं एखाद्या सैतानी जीवांनी
या ख्यातकीर्त 'दिवा'
हजारोंना  प्रेम प्रक्षेपित केलेलं
त्यांचं हृदय
हरवलेल्या प्रियकराचा शोध घेतात त्या
अव्याहतपणे
त्यांचं जीवन चक्र असंच सुरू असतं
त्यांची मनं हव्यासासाठी तहानलेली
अध्यात्मिक मोक्षासाठी असलेली तृष्णा भागवायला
त्या भटकत असतात गोंधळून, मती गुंग झाल्यासारख्या
गळून गेलेले केस कधी चिपकत नसतात पुन्हा टाळूला
किंवा सावरता येत नसतात एखाद्या जेलने
मग तो परमेश्वराच्या प्रासदातील फकीर असो वा
वेडा भक्त,  सूफी,  विचारवंत वा
दरवेशींच्या वर्तुळात प्रवास करणारा भिक्षुक असो
ती माझी किंवा तुमची कथा असू शकते
तुम्ही ठरवा मित्रांनो
कारण कथा स्वर्गात लिहिल्या जातात
पण फक्त नरकात सडण्यासाठी.
मला गालिबची परिवेदना जाणवते
त्याच्या कथनातून...

:

"हर एक बात पे कहते हो तुम, के तू क्या है
तुमही कहो के ये अंदाज- ए-गुफ्तगू क्या है!!".

**मूळ पंजाबी/इंग्रजी कवयित्री...लिली स्वर्ण, चंदिगढ**

**मराठी भावानुवाद...नेहा भांडारकर,नागपूर**

❑❑❑

# **प्रमोद कोपर्डे यांच्या दहा कविता**



**प्रमोद कोपर्डे**
**सातारा**

प्रमोद कोपर्डे ,सातारा

ज्येष्ठ कवी ,कादंबरीकार, नाटककार, व ललित लेखक म्हणून महाराष्ट्रात सुपरिचित.त्यांच्या अनेक पुस्तकांना राज्य शासनाचे व प्रतिष्ठेचे पुरस्कार प्राप्त झालेले आहे.

१)
सरत्या थंडीत झाडांच्या गाभ्यात
धुकं गच्च दाटून

झाडं स्वत:शीच बोलत उभीयत आत्ममग्न होऊन
थांबा, बोलू नकाअजिबात काहीच
रहा अगदी चिडीचूप
पाखरांच्या डोळ्यामधील झोप पूरी
झालेली नाही अजून

झाड आळोखेपिळोखे देतील आणि
होईल चिवचिवाट
वितळेल धुके, उगवेल नितळ सकाळ
येताच कोवळे ऊन .

२)
जखमी झाल्या पाखराला झाडानंही नाकाराव
इतकीही होलपट कुणाच्या माथी येऊ नये
शेवटी असतंच झुडूप कुठंतरी आधाराला
फक्त नव्या जखमा जीवलगांनी देऊ नये

पुन्हा असेलच नव्यानं भरारी
पंखांमध्ये
फक्त मायेच आकाश कधी फितूर होऊ नये

३)
विस्कटल्या जगण्याला भुणभुण भुंगे छळत राहणारे
आतआतून ठणकत्या शारीरयातनांनी
पोखरत जाणारे

दिसायला आहेचकी झाड अगदी वरवर  धडधाकट
त्यालाच माहितीय कधीतरी नक्की आपण

कोसळत जाणारे

जर समजा नाहीच आलं     मायेचंही आभाळ
पुन्हा झाकोळून
असेलच त्याचं उद्याचं मरण हमखास
आजच येणारे

४)
कुणाचं लक्षच नाही पूर्वीसारखं मनापासून
शेवाळं साठत चाललंय केव्हाच
तळ्यावर
फुटत होतंही कधी आतून पाझर
उफाळून
कितीतरी असायची गर्दी भरून काठावर

आतल्याआत आटेल तळं कधीही उन्हाळ्यात
उरतीलच मग काहीबाही कहाण्या वाऱ्यावर !

५)
पाहिली ना, डोळ्यांत प्राण आणून
तुझी वाट पाहिली
आतात ओढल्या
जीवाच्या तळातून
तुझी वाट पाहिली
जळून खाक होत राहिल सगळंच तू आला नाहीस

वाट पाहणंही सोडून दिलं
तरी आला नाहीस

राख थंड करण्यासाठी उगा थोडाफार
कोसळून गेलास
आता तू माफी मागण्याचा अधिकारही
गमावून बसलास

६)
सोसतोय मी उन्हाच्या झळा माझ्या म्हणून
कसलीच तकार न करता
खोलवर जीवातून
असंच झालं आजपर्यंत
त्यात नवं काय!
राखच होणार आणखीन काय होणारंय जळून।

पुन्हा कदाचित फुटेल कोंभ जळक्या जिवाला आलाच
जर का जीवलग सखा पाऊसही धावून |

७)
आभाळ नुस्तंच फिरत राहिलंय
शहरावरून
शहरही थकून गेलंय मनधरणी करून करून
नाहीच त्याच्या मनात मग शहर
काय करणार
बस्स आतल्या आत विस्कटेल
कुढून कुढून

शहराला निःसत्व होण्याशिवाय पर्यायही नाही
नाहीच आला पाऊस तर कोसळेल
झुरुन झुरून

८)
तुझ्या येण्याची डिंडीम तरी वाजली चारही दिशांतून
आता येथील महामूर कोसळशीलही
अगदी जीवातून
काळीज बघ ना अगदी कसं सुपाएवढं
मोठं होत जातंय
तू शब्द पाळलास की मन असं येतंय
काठोकाठ भरून

वाहू देत नद्यानाले पिकू देत शेतंभात
कणग्या भरू देत पडू देत घासमुटका सगळ्यांच्या मुखात
इतकंच मागणं !

9)
कोरडया भूमीवर कोसळला पाऊस
मुरून गेला
कुठे दाखवायलाही ओलसरशी जागा
दिसत नाही
तळ्यावर उमटते हळुवार तरंग थरथरले
काठाकडे संथपणे सरकत राहिले विरले नाही
जे मिळावं वाटलं कधीतरी ते कधीही मिळालं नाही
जे वाट्याला आलं थोडं तेही शिल्लक उरलं नाही.

१०)

उपटून टाकली वाळकी रोपं उन्हाळ्यात
कुंडीमधली समूळ


पावसात लावू काही नव्यानं निवांतपणे
मनात होतो ठरवत
अचानक वाकडातिकडा पाऊस उगवून
कोवळे जीव कुंडीत
आशा खोलवर जिवंत ठेऊन कशा अंधारात
बीया असतील जगत !

मनातल्या कुंडीआत
कवितेच्या बियांही
अशाच घुसमटतात
आणि खोल अंधारातून कागदावर हळुवार
येवून उतरतात !

( आर्ष पब्लिकेशन्स, पुणे
यांच्यामार्फत येणा-या
" पुन्हा दिशान्ताची वाट"...या संग्रहातून.)

प्रमोद मनोहर कोपर्डे,
एफ १,ज्योती हाइटस्, १५४, गुरूवार पेठ (बागेसमोर)
सातारा ~ ४१५००२ मो.नं.~ ९८९०१६६१२२
इ.मेल. ~ pramodkoparde5

❑❑❑



## गांधी जयंती :कवी वीरधवल परब यांची कविता

वर्जेश सोळंकी, मुंबई

नव्वदोत्तरी पिढीतील अत्यंत महत्त्वाचे कवी

'वर्जेश ईश्वरलाल सोलंकी यांच्या कविता', 'ततपप', 'मम म्हण', 'वेरविखेर' , हे कवितासंग्रह व 'पेरूमल मुरुगण' , 'दीडदमडीना' हे गद्य लेखन प्रसिद्ध



**वर्जेश सोळंकी**
**मुंबई**

गांधी जयंती

गांधी जयंतीला मुलं शाळेत आलीच नाहीत
समोरच्या रिकाम्या बाकड्यांना गुरुजी म्हणाले,
"तिकडे विदेशात गांधीवर सध्या खूप काही बोललं जातंय
तेव्हा आता आपणही या निमित्ताने काही उजळणी करु"

रिकाम्या बाकड्यांनी नेहमीप्रमाणे माना डोलावल्या
भरघोस टाळया वाजवल्या

रंगीबेरंगी फुलांच्या हाराखाली दिसेना गांधीची प्रतिमा
गुदमरला त्यांचा जीव अरबत्त्यांच्या केमिकली धुरात

तर आत्ता गांधीनी काय काय म्हटलं आहे
शाळांबद्दल, शिक्षकांबद्दल, विद्यार्थ्यांबद्दल
प्रसंगोपात... समान... अनिवार्य वगैरे वगैरे....

तर काहीतरी म्हटलेलंच असणार त्यांनी
त्यांच्या चमत्कारिक स्वभावधर्माप्रमाणे...

पण आपण आता दोन-तीन घोषणा देऊन आवरतं घेऊया
चला फोटो घ्या पटापट

हे फोटोचं आणि घोषणांचं युग आहे
लिहुन टाका भरगच्च अहवाल सप्रमाण सादर

रिकाम्या बाकड्यांनी जोरदार घोषणा दिल्या
पुन्हा पुन्हा भरघोस टाळया वाजवल्या
कॅमे-यांच्या फ्लॅशमध्ये उजळून निघाले गांधीजी!

मग तक्रारीच्या सुरात गुरुजी पुन्हा पुटपुटले,
"खरं तर मुलांनी यायलाच हवं होतं या प्रसंगी
गांधी तर खूपच महत्वाचे होते
आणी खूपच महत्त्वाचे होते
आणि खूपच महत्वाचं बोललं जात असतं
त्यांच्यावर अशावेळी
पण ऐकणारं कोणीच नसतं समोर..."

सकाळी सकाळी उठून यायला त्रास
च्यायला आम्हालाही होतोय
पण गांधीसाठी उठावंच लागतं ना नाईलाजानं

आता तर मुलंच आली नाहीत
आली नाही म्हणजे
नक्कीच दुसरीकडे कुठेतरी गेली असतील
कुठे गेली असतील नक्की...?
हा थोर वारसा
वायफळ समजून.

गांधी जयंतीला मुलं शाळेत आलीच नाहीत अशा ओळींनी कवी कवितेची सुरुवात करतो. जयंतीच्या दिवशीच आपल्याला खरे म्हणजे थोर माणसांची व त्याच्या कार्याची आठवण येते. ह्या निमित्ताने त्यांच्या तसबिरीला हार चढवला जातो, वर्तमानपत्रांची पानं भरली जातात.वृत्तवाहिन्यावरुन त्यांच्या नावाची एखादी पट्टी सरकते. मात्र ह्या कवितेतून कवी वेगळाच अनुभव मांडतो. एरवी शाळेत गैरहजर असतील विद्यार्थी तरी चालतं मात्र गांधी जयंती, पंधरा ऑगस्ट, 26 जानेवारी ह्या दिवसांना भारताच्या इतिहासात एक महत्वाचं स्थान आहे. ज्या महात्म्याने सत्य व अहिंसाचा मंत्र देऊन ब्रिटीशांची राजवट उलथवून लावली. त्यासाठी त्यांना प्राण गमवावे लागले. अशा राजकीय संत म्हणून देशविदेशात ज्यांच्या नावाचा डंका आहे, करोडो लोकांचे जे श्रद्धास्थान आहेत त्यांच्याच जयंतीला शाळेत इतका सन्नाटा पाहून, मुलांची अनुपस्थिती पाहून कवी हतबल होतो. समोर मुलं नाहीत, रिकामे बाकडे आहेत, हे रिकामी बाकड्यांना पाहणं नशिबी यावं अशा उदासीनतेचा करुण थर त्याच्या मनोपटलावर साचत राहतो.

कवी हा मुळात शिक्षक आहे.समाजवादी विचाराचा आहे. तो ह्या शाळेचा गुरुजी आहे. गांधी जयंतीच्या निमित्ताने त्याला आलेला अनुभव हा बोचरा व जीवघेणा असा आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळालं व ते आपल्याला मिळवून देणा-या प्रत्ययी आपली भूमिका काय हे मांडण्याचा प्रयत्न कवीने ह्या कवितेतून केलेला आहे. गांधी जयंतीच्या निमित्ताने मुलांनी यावं व त्यांच्या कामाची दखल घेतली जावी, गांधीबाबाची एखादी शिकवण जरी अंगीकारली तरी खूप इतकीच माफक अपेक्षा त्याने केलेली असते. मात्र पाहतो तर काय जयंतीच्या दिवशीच मुलं गायब. मुलांच्या गैरहाजरीवरुन एका गोंधळाला सुरुवात झालेली असते. अशा प्रकारचे अनुभव आपल्याला खूप ठिकाणी येत राहतात. कोणीतरी आव्हान करतं की सुट्टीच्या दिवशी समुद्रकिना-यावरचा प्लास्टीक कचरा साफ करायचा आहे. मात्र त्याच दिवशी कोणालानकोणाला आपापली वैयक्तिक कामं पूर्ण करायची असतात. रक्तदान शिबिरं ही आजकाल उत्सवी झालेली असताना आपण पाहतो वगैरे.

रिकामे बाकडे पाहून कवी हतबुद्ध होतो. रिकामे बाकडे त्याला व्यथित करतात. रिकाम्या बाकड्यांना पाहून तो उद्विगपणे म्हणतो तिकडे विदेशात गांधीवर सध्या खूप काही बोललं जातंय. जिकडे पिकतं तिकडे विकलं जात नाही ह्याचा त्याला आठव होतो. रिकामे बाकडे ह्या प्रतिमेमधून कवी आजच्या लोकशाही व्यवस्था - काळाचं भयावह सूचन करतो. रिकामी म्हणजे आजची फोफस व तकलादू समाजव्यवस्था असं कवीला म्हणायचं आहे का? लोकशाही व्यवस्थेत अशा सोयीस्कररित्या गैरहजर राहणाऱ्या महाभागांची जंत्री खूप मोठी आहे. आजचा माणूस असा अनेक गटातटात विभागला गेला आहे. सगळ्याच क्षेत्रात कंपूगीरीने शिरकाव केलेला आहे. ही टोळकी ठरवतात कुठे जायचं किंवा कुठे नाही जायचं. तुम्ही काय खायचं, प्यायचं, फिरायचं, पेहराव कुठला करायचा, अन्न कुठलं शिजवायचं, कुणाला घरात घ्यायचं, कुणाला प्रार्थनास्थळी प्रवेश द्यायचा, कोणाला शैक्षणिक क्षेत्रात पदोन्नती द्यायची,न्यायक्षेत्रात कुणाच्या बाजुने निकाल लावायचा, मतदान कोणाला करायचं, कोणाला सरकारी समित्यावर बसवायचं, कोणाला मानसन्मान द्यायचा. अशी एक भ्रामक स्थिती आज सांडपाण्यातल्या अळयांसारखी पैदा झालेली आहे. एकेक ओळीमागून कवी हेच सुचवत राहतो.

कवी म्हणतो विदेशात ज्या माणसाबद्दल आदर आहे तो आपल्याकडे नाही. विदेशातल्या अभ्यासू व्यक्ती आपल्याकडे येऊन साबरमतीच्या आश्रमाची भेट घेतात, मीठाचा सत्याग्रह, चले जाव, अशा रणसंग्रामाची माहिती घेतात. सत्य व अहिंसा हाच

खरा मानवी जीवनाचा राज व धर्म आहे हे त्यांच्या देशात बिंबवताना दिसतात. असो.

कवी स्वतःचा तोल ढळू देत नाही तो म्हणतो ठिक आहे रिकाम्या बाकड्यांनो आपण ह्या निमित्ताने महात्म्याच्या कामाची उजळणी करु. त्यांच्या कामाचे पाढे गिरवू, बाराखडी लिहू. त्यांनी जो उपदेश केला तो अंगीकारु. असं सगळं घडून येताना रिकाम्या बाकड्यांनी नेहमीप्रमाणे आपल्या माना डोलावल्या, टाळ्या कुटल्या. त्यांच्या रक्तात काही भिनलंच नाही. काही डोक्यात गेलंच नाही. सत्य व अहिंसेचा राजमार्ग ज्यांनी आपल्याला दाखवला त्यालाच आपण केराची टोपली दाखवली. असहिष्णुतेचा मंत्र ज्याने दिला त्याची मात्रा काही लागू झालीच नाही. आज आपण पाहतो कितीतरी भयावह घटना होताना दिसताहेत. जातीय दंगली, मॉबलिंचिंग, कौटुंबिक हिंसाचार, अबलांवर बलात्कार, सामुहिक हत्याकांड,लैंगिक शोषण, अशा घटना विकोपाला गेलेल्या आहेत. स्पृश्य-अस्पृश्य ह्यावरुन माणसं हमरीतुमरीवर येत आहेत. बरेच झाले ठेचला त्याला! मारो साले को! काट दो! आमच्या बद्दल काही वाकडतिकडं लिहिलं, बोललं, घोषणाबाजी केली तर याद राखा  अशी मर्दुमकीची भाषा वापरत आहेत. जातधर्मपेहरावच्या आधारे माणसाची ओळखपरेड करुन खूनखराबा करीत आहेत. हे सर्व पाहून अमुक वर्ग मनोमन खूष होत आहेत, हिंसा हाच परमधर्म. काटयानेच काटा निघेल, लातो की भूत बातोसे नही मानते. अशी विचारसरणी सद्यकाळात वाढीस लागलेली आहे. गांधीबाबाच्या औषधाच्या बाटलीवर एक्सपायरी डेटचं लेबल चिकटवण्यात आलेलं आहे.

स्वतःला थेट प्रश्न विचारण्याऐवजी बेमालूमपणे हे रिकामी बाकडे भरघोस टाळ्या वाजवत आहेत.  ह्या रिकाम्या बाकड्यांना रंगीबेरंगी फुलांच्या हाराखाली व जीव गुदमरवणा-या अगरबत्त्यांच्या धुरांनी समोरच्याचा जीव कोंदाटून गेलेला आहे ह्याची जाणीव नसते. ते उत्सवात व डी.जे. च्या कानठळ्या देणा-या संगीतात मश्गुल आहेत. महात्म्याने एकंदर व्यवस्थेबद्दल काय म्हटलेलं असतं हे त्यांच्या खिजगणीही नसतं किंवा समजूनही घ्यायचं नसतं. ह्या बाकड्यांना फक्त जल्लोष करायचा असतो, साहेब लोकांच्या पुढे पुढे राहून, फोटो सेशन करायचं असतं, आपली वैयक्तिक कामे शिताफीने उरकून घ्यायची असतात. त्यानंतर तू कोण व मी कोण अशा अविर्भावात हे रिकामी बाकडे फिरत असतात.

कवी म्हणतो आजचं युग हे घोषणेचं युगं आहे, बॅनरबाजी, जाहिराती, विविध चॅनलमधून जो तो हात धुवून घेत आहे. गंगा बह रह रही है हात धो लो. दिवस रात्र, सकाळ संध्याकाळ, अनेक सोशल मिडियाच्या माध्यमातून, टीव्ही व रेडिओच्या माध्यमातून घोषणा सुरु आहेत. आपलाच ब्रॅन्ड, धर्म, पक्ष, व्यवस्था, शासन, इतिहास, भूगोल कसा महत्वाचा आहे, काय तिची बाजारु किंमत आहे, काय तिची क्षमता आहे, तो खरेदी केल्याने किंवा अंगीकारल्याने कसे भविष्य आहे हे पटविण्यात राजकीय व सांस्कृतीक सेल्समन कामाला लागलेले आहेत. त्यांनी त्यांचे स्लोगन, गाणी व कवनं बनविलेली आहेत, राजकीय व सांस्कृतीक राजदूत तोंडाला रंग लावून उभे आहेत, जागोजागी नेटवर्कचे तंबू लावलेले आहेत,ह्या देशाची फ्रॅन्चाईजी पाण्याच्या भावात द्यायची आहे. न भूतो न भविष्यती पाहिलेला हा अद्भुत काळ आहे. येथे राजा आहे, गुलाम, बेगम, बादशाह व मनोरंजनासाठी प्रवक्ते कम जोकर आहेत. ताटात तोडी लावायला लोकशाहीचा पापड व अभिव्यक्तीचा रायता आहे. जेवण झाल्यावर असहिष्णोतेचे डेजर्ट आहे. सर्वकाही आहेच्या नावाखाली सर्वकाही नाहीचा फालुदा आहे. न्यायव्यवस्थेचे लेमन ज्युस आहे. आंबट ढेकर आली तर पोलीसी दंडेलशाहीची जिरागोळी आहे. ह्या जयंतीच्या निमित्ताने कवी ही अशाच दारुण अनुभवांना सामोरा जातो. जयंती साजरी झाली असा

भरगच्च अहवाल वरती त्याला द्यायचा आहे. ती झाली की नं झाली मात्र कागदोपत्री झाली तरी बस्स! वरच्यांची मर्जी खालच्यांना राखायची असते. पापी पेट का सवाल असतो. एखाद दोन फोटो काढून वेळ मारुन न्यायची असते. कवीला आतून वाटत असतं की खरेच आज मुलांनी यायला हवं होतं, गांधीबाबाच्या शिकवणीचे दोन-चार डोस त्यांनी घ्यायला हवे होते. नेक्स्ट जनरेशन म्हणून तो मुलांकडे पाहत असतो. हीच मुलं आपला देश घडवतील. गांधीबाबाची शिकवणूक पूढे नेतील अशी आशा बाळगून असतो . मात्र मुलांच्याच अनुपस्थितीमुळे तो धास्तावतो.ह्या निमित्ताने त्यांना खूप काही महत्वाचं ऐकायला मिळणार होतं. मात्र ते ऐकून घेण्यासाठीचे कानच आज उपलब्ध नव्हते. जाणीवपूर्वक ह्या आजच्या पिढीने त्याला बगल दिली होती. हे समोरच्याचं ऐकून न घेणं आजच्या काळात वाढत चाललेलं आहे. हम करे सो कायदाची पिलावळ वाढत चाललेली आहे. कवी वैतागतो. अगदी स्वतःवर. चिडून उठतो. आपण पण इतक्या सकाळी उठून कशाला इकडे आलो. इकडे तर मुलंच आली नाहीत. त्याला प्रश्न पडतो की ही मुलं कुठे गेली असतील? कवी पुन्हा प्रश्न विचारतो कुठे गेली असतील ही मुलं नक्की?

आजच्या मुलांना काय हवे आहे, ह्या रिकामी बाकड्यांना काय नेमके हवे आहे. विविध माध्यमातून येणा-या बातम्या त्याला अस्वस्थ करतात की ज्याने इंजिनियर म्हणून शिक्षण घेतले तोच बॉम्बस्फोटाच्या कटात स्लीपर सेल म्हणून सहभागी होता, संगणकीय शिक्षण घेतलेल्या अभियंत्याने बॉम्बस्फोटाची जबाबदारी उचललेली, ज्याने वकीलीचे शिक्षण घेतले तोच माफियांच्या गाडीत बसलेला, ज्याने वैद्यकीय अभ्यास केला त्यानेच स्त्रीभृण हत्येचे कांड केले, टीकटॉक व पबजी ह्या आधुनिक खेळापायी एका मुलाने दहाव्या मजल्यावरुन उडी मारुन नाहक जीव गमावलेला. अशा कितीतरी घटना त्याच्या दृष्टीपटलावरुन धावत्या गाडीसारख्या निघून जातात. असे असंख्य आवाज त्याला ऐकू येतात. ही मुलं आली नाही म्हणजे त्याच्या पोटात भीतीचे अनामिक गोळे उठतात.मुलं कुठे गेली? हा गांधीबाबाचा वारसा म्हणजे एक थोतांड, बकवास आहे, ही मास्तरांची शिकवण म्हणजे निव्वळ बडबड आहे ह्यातून काही निष्पन्न होणार नाही. उलटपक्षी ह्यामुळेच आपला ऱ्हास होत आहे की काय!! हे सगळं झुठ व फसवं आहे असा कयास ह्या मुलांचा झाला आहे की काय? शाळेत न येता त्यांना हव्या असणाऱ्या भलत्याच शाळेत मुलांनी मोर्चा वळवला की काय अशी संशयाला जागा कवीच्या मनात निर्माण होते.

वीरधवलची ही कविता वाचकांसमोर अनेक प्रश्न उपस्थित करते. आजच्या समाजमनाचा अख्खा कालाचिथडा, गांडुगिरीचा लेखाजोखा मांडते. कुठे गेली असतील नक्की…? असा आवाज जंगलातल्या किंकाळी सारखा आपला पिच्छा करित राहतो.

❑❑❑

# टाहो(एकांकिका)

स्वप्नील चव्हाण, कल्याण
कवी ,कथाकार, नाटककार ,नट आणि मालिकालेखक म्हणून सुपरिचित. पंधरा वर्षांपासून नाट्यक्षेत्रात कार्यरत.अलीकडेच ,रज्जूत मज्जा' हा कथासंग्रह प्रकाशित..



**स्वप्नील चव्हाण**
**कल्याण**

---

एके दिवशी मला कुणीतरी
अर्धवट झोपेतून उठवलं
मी खूपप चिडचीड केली. मला कळत नव्हतं काय राहून गेलं होतं काही स्वप्नंही नव्हतं पडलं खास
काय सुटलं होतं.
कसलेही नव्हते निशाण मनावर
मी खूप संतापलो, संबंध दिवस मी संतापलेलाच होतो.

एके दुपारी
मला कधी झोप लागली
कळलंच नाही.
बाहेर काळे ढग होते. मिटटं अंधार आणि घट्ट पडदे.
मला कुणीतरी खूप संध्याकाळ झाल्यावर उठवलं .तो रविवार असावा बहुतेक.
मी खूप चिडचिड केली, मला उशीरा का उठवलं म्हणून...
जसं माझा सुटून गेलेल्या दरम्यानच्या आयुष्य तुकडया साठी मी दोषी धरत होतो सगळ्यांना.

मग एकदा माझं अभ्यासाचं वर्ष होतं .मी गाइड घेउन एका कौलारु थंड दुपारी
झोपलो..

मला कुणीतरी पटटयाने फोडलं आणि मला दचकून जाग आली.
त्यानंतर पंधरा वर्ष
कुणीही कितीही प्रेमाने उठवलं मला. मी दचकून उठणं सोडलं नाही. ती दचक अजूनही मनाला भरलेली लचक म्हणून मी स्वतःच जागं होउन अंथरून सोडणं पसंत करतो तेव्हापासून..
एके दिवशी मला
स्वप्न पडलं
काहीच खास नव्हतं त्यात

दु:स्वप्न ,सुस्वप्न काहीच नव्हतं झाकोळ होता. माणसं होती. ढग होते माणसांचीच सुरू होती गोष्ट.. तरी जाग आल्यावर कितीतरी काळ ,कितीतरी दिवस त्या स्वप्नाचाच सूर लागला होता आयुष्याला .ती माणसं, त्या स्वप्नाचा कंटेक्स्ट कधीच नाही आठवला परत.पण त्यातून सुटलेला रेसीड्यू वर्ख अजून आहे सोबत. तो काय आहे माहीत नाही.
आता,

मला झोप नसतेच
नुसतं ठळक ठळक दृष्यांचं कोलाज असतं आयुष्यानं आई घालून ठेवलीय. स्वप्नं बघण्याच्या माझ्या मूलभूत अधिकाराची..

सनाः झोप रे, उशीर झालाय, उदया ऑफीस असेल
अनंतः ऑफीस रोजच असेल, कविता आत्ता आहे. उद्या असेलच सांगता येणार नाही.

सनाः कवितेमुळे जास्त अस्वस्थ असतोस तू.

अनंतः म्हणजे?
सनाः म्हणजे तुझं एक्स्प्रेशनच तुला मारतंय.
अनंतः व्यक्त होणं गुन्हाय ?

सनाः स्वतःवर अन्याय आहे!
अनंतः कसा?
सनाः एक तर तुम्हा लिहिणाऱ्यांचा पावित्रा, स्वतःला गरीब बापूडा मानून समाज बघायचा, त्यातला असमतोल, अन्याय हे तुमचं इन्स्पिरेशन आणि मग इतरांच्या जगण्याला उपयुक्तेचं साहित्य म्हणून लिहून, ते लिखाण प्रसिध्द करून त्यातून वाहवाही लुटायची. कवितेच्या क्षेत्राचं काय झालंय हे तुला वेगळं सांगायला नकोच.

अनंतः मी स्वतःपुरतं लिहितो!

सनाः नी मग फेसबूकवर टाकतोस. तुझी कविता फेसबूकवर बघितली ना की असली कळ जाते सांगू डोक्यात. जसं परदेशात रस्त्यावर गिटार वाजवून टोपी फिरवणारे अस्तात ना. तसा लाइक्स मिळवायला अस्वस्थं असतोस तू!

अनंतः रस्त्यावर गिटार वाजवणारे कमी दर्जाचे असं म्हणायचंय का तुला?
सना: सॉरी मला तसं म्हणायचं नव्हतं. मला वाटतं कविता, ही तुझी, तुझ्यापुरती मर्यादीत रहावी. तू साधी ती कुणाला वाचूनसुध्दा दाखवू नयेस.. तरंच तिला न्याय दिला असं होईल..

अनंत :कविता म्हणजे अकरावं बोटच जणू..एक अवयव हवानकोसा...

सनाः झोप.

अनंतः तुझं खरंही असेल सना. मला खूप सुचतं.. सतत सुचत राहतं!

सना: बट यु आर बीकर्मींग प्रीजनर ऑफ युवर ओन डिवाइस..
अनंतः मी काय चुकतोय ?

सनाः तुझ्या कमकुवत मनामुळे तू व्यवहारात जगाकडून, समाजाकडून काही अवाजवी. इंप्रॅक्टिकल अपेक्षा घेउन बसला आहेस.

अनंत: जोवर समाजात इंबॅलन्स आहे, मला सुचत राहील

सना: एक्जॅक्टली! ज्यादिवशी बॅलन्स येईल, त्यादिवशी काय करशील?

अनंतः बॅलन्स येइल?

सनाः म्हणजे तुलाही अपेक्षीत नाहीये तसं हेच ना ?
अनंत नाही तसं नाही! पण मी कुठलंही परिवर्तन व्हावं म्हणून लिहीत नाही!
रानाः मग काय हेतू आहे तुझ्या लिहिण्याचा?

अनंत: मला असं काही ठरावीक नकोय. माझा कुठला स्पेसिफीक झेंडा नाही, जग बदलण्याची अशी माझी इच्छा नाही.
सनाः फक्त निरर्थक लिहायचंय नी अनुकंपेच्या आधारे प्रसिध्द व्हायचंय!
अनंतः काही उपयोग असेल तरच माझी प्रतिभा महत्वाची का? सनाः उपयोग नाही, पण परिवर्तन ?

काही नवं घडण्याची अपेक्षा ? काय करायचं तुझ्या हया प्रतिभेचं?
अनंतः सध्यातरी मला माझ्या हया कवितेसोबत झोपायचंय!

सना: तू नुसतंच झोपावस! कवितेच्या आधाराशिवाय!
अनंतः गूड नाइट!! उदया क्लाइंट मीटींग आहे मला!
सना: हॅपी रियलायजेशन! मिस्टर व्हाइस प्रेसिडेंट !!

अनंतः

हम नींद से सुकून के वादे नही करते
किये हुए वादे सपनो मे आने लगे है !!

(बायको झोपते, अनंतवर प्रकाश, अनंत उठतो, बेडवरून बाहेर येतो.)

अनंतः दुसऱ्या दिवशी मला क्लाइंट मीटिंग होती. ऑफिसला वेळेत पोहोचणं भाग होतं, माझ्या ऑफिसला लागूनच मागे एक निमूळती बोळ होती, त्या बोळीत उतरून मी गेटच्या दिशेने चालत निघालो तेंव्हा, तेंव्हा मला दिसला एक लहान मुलगा, ट्राफीकच्या विषारी धूरातून, खणलेल्या खड्डयांच्या मातकट कणांमुळे कंटॅमिनेट झालेल्या अस्वच्छ सूर्यप्रकाशातून चालत निघालेला एक गरीब कामगाराचा मुलगा. अवघ्या तीन साडेतीन वर्षाचा..!

(हे बोलत असताना मागे एक कॉर्पोरेट ऑफिस उभं रहावं, सोबत दोनतीन कलिग्स. हातात
चहाचे कप वगैरे)

अनंत :पेट्रोल प्यायलेल्या सडकेवर पडणारे त्याचे इवलेसे पाय,

बारीक पॉपकॉर्न सारखं नाजूक नाक, परिस्थितीशी फुगलेले अटळ गाल,

नर्मजर्द चुटूकले ओठ आणि आणि त्याच्या कपाळावर ,डोळयाच्या थेट बाजूला गर्द लाल
भळभळती जखम,

त्या जखमेतून तार तार गळणारा मेणकट पू, रक्तातल्या हिमोग्लोबीनचा सडका उग्र वास,
त्याच्या संपूर्ण गोंडस चर्चेवर काळाने ओढलेला मोठा ओरखडा जणू!

तो कुठून आला होता, त्याला काय झालं होतं की तो होता चिरंजीव, चिरःकाल जखमेची शिदोरी घेऊन हिंडणारा, अश्वत्थामा ???
अन हया सगळयात, त्याचे डोळे??

त्याच्या डोळयात होता एक जालीम थंडपणा, निर्विकार ॲक्सेप्टन्स ! एक रितेपण, आजन्म दाबून ठेवलेल्या भूकेतून निर्माण झालेले तेज..! त्याने मला पाहिलं अन मी त्याला. त्याची ती नजर मी कधीच विसरू शकणार नाही, त्याचे ते डोळे....
मला त्याला मदत म्हणून फक्त शंभर रूपयेच देता आले. मला माझ्या पडलेल्या पहिल्या
जेन्युइन प्रश्नाचा साधा पाठलागही नाही करता आला??
अश्मीतः उसमे इतना रिएक्ट होनेका क्या है?
समीराः हा म्हणजे, तुला तो दिसला, यु फेल्ट बॅड ॲण्ड देन इटस ओके..! संपलं ते!
अनंतः त्याचं पुढे काय झालं असेल ??

समीरा: कुणीतरी घेतलीच असेल ना त्याची काळजी. तू पैसे दिलेस ना? चिल!

अश्मीत: चलो चलो, व्हेंडर आगया ! अनंत चल, नैतो सुबोध बोम्ब मारेगा !

अनंतः समीरा..

समीराः येस सर?

अनंत: तुला रडू येतं का रडू ?

समीराः हो येतं ना!

अनंतः कधी? कितीदा ?
समीराः माझा लॅपटॉप डॅमेज झालेला तेंव्हा ! माझं पाच वर्षांचं काम वाया गेलेलं, कसला काही
बॅकअप च नव्हता!

अनंत तू कुणासाठी रडून तुला किती वर्ष झाली?

समीराः व्हेन माय डॅड पासड अवे..
अनंतः ते स्वतःसाठी झालं!
समीराः नाही ना! डॅड साठी!
अनंतः ते तुझे डॅड होते

समीरा: दुसऱ्यांचे डॅड मेल्यावरही रडता आलंय मला हया आधी अनंतः आत्ता मी जे बोललो ते रडण्यालायक आहे का गं?
समीराः तुम्ही रडून करणार काय? व्ही पी मस्ट नॉट क्राय, व्हीपी मस्ट बी टफ !!!
अनंतः या! करेक्ट!

समीरा: तुम्हीच रडलात तर कंपनी काय आदर्श घेईल? जो व्हिपी डीमोनीटायजेशनला कंपनी बुडतेय की काय असं वाटत असताना नाही रडला. तो एका झोपडपटटीतल्या चिलटासाठी रडतोय होय ?? चलो चलो हरी अप, क्लाइंट इज वेटींगा
अनंतः या! राइट! असंही सगळयाच गोष्टींची सगळी जवाबदारी मी एकटाच थोडी घेऊ शकतो ?

अनंतः

मलाच खूप वाटतं आणि कुणालाच काहीच वाटत नाही की सगळयांना जेवढं वाटायला हवं त्याहून अव्वाच्या सव्वा मला वाटतं ?? माझ्या डोळयांसमोरून जातच नाही तो मुलगा, सगळयांच्या डोळयासमोरुन कसा सहज निघून जात असेल रोज ? सहजच असतात मानची व्यवहार होऊन जातात, जुळून येतात
गरीब मुलं हयाआधीही पाहिलीच नव्हती का मी शहरात ? सहजच असावं हया इमारतींचं तालेवार पणे उभं रहाणं, सहजच असावं सरकार घरदार ठोकळेबाज वस्तूंचे आकार

(वरील कविता होत असताना मॅक डी उभं रहावं, अनंत बायकोसोबत बसून)

बायको : मॅक डी सक्स!! आपल्या लेवलचं नाहीये हे

अनंतः मला माहित्येय

बायको: एवढया मोठया कंपनीचा वाइस प्रेसीडेंट मॅक डी मधे बसलाय! दहा वर्षापूर्वी अप्रूप होतं सगळयांना, आता त्यांनी बिजनेस वाढवायच्या नादात आणि नीच्च मध्यमवर्गापर्यंत पोहोचण्याच्या प्रयत्नात स्वतःला कॉमन साधारण बनवून टाकलंय.. इथे कुणीही येतात यार, त्या जोकर सोबत सेल्फी घ्यायला नी फेसबुक वर अपलोड करायला, चीप टाइप्स पीपल

!! आता ना तू हयाहून उच्च दर्जाच्या जागी न्यायला हवंस मला..

अनंतः अशा जागा, मेट्रो शहरांत मुद्दामून निर्माण केल्या जातायत! प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था जेंव्हा एकाच वेळी अनेक श्रीमंत माणसं पैदा करते तेंव्हा त्यांना खर्च करायला अशा जागा निर्माण करत राहावा लागतात त्यांना!
बायको : मग मला का आणलंयस इकडे? आणि तू बाहेर का बघतोयस सारखा ?

अनंतः मी तुला नॉर्मल करायला आणलंय इथे!
बायको : मी नॉर्मलच आहे! ऑफिसमधे जाताना, जखमी मुलं पाहून त्याचं भावनिक भांडवल नाही करत मी

अनंतः मी शेवटचं कधी रडलो होतो माहितीये?
बायको: आय डोन्ट रिमेंबर स्पेसिफीकली!

अनंत :तू शेवटचं कधी रडली होती आठवतंय!
बायको : मी माझ्या बिदाईच्या दिवशी रडले नव्हते माइंड यू अनंतः स्वतःसाठी नाही! कुणासाठी तरी ?
बायकोः डोन्ट नो, मेबी लास्ट एक्स सोडून गेला तेंव्हा त्याच्यासाठी ?
अनंतः ते त्याच्यासाठी नव्हतं! ते त्याच्या मुळे, स्वतःसाठी होतं! बायको : तुला काय म्हणायचंय स्पष्ट बोल ना!
अनंतः मला सकाळचा तो मुलगा पाहून रडावसं वाटलं! खूप रडावसं वाटलं! हमसून हमसून. ओक्साबोक्शी टाहो फोडावासा वाटला!

बायको : मग?

अनंतः पण क्लाइंट मीटिंग होती! बायको : रडून काय होणारेय?

अनंतः हलकं वाटेल!

बायको: अश्रू लपवून संकटांशी दोन हात करणारा पुरुष आवडतो मला!
अनंतः माझं पौरूष रडण्यात कमी होतं!

बायको : धोनी बघितलास का तू? कधी रडत असेल तो ? असला तरी दाखवत असेल कुणाला ? अनंतः ही त्याची व्यक्त होण्याची पध्दत आहे.
बायको: तुला व्यक्त व्हायला अडवतंय कोण? पण मी मला कसा पुरुष आवडतो ते सांगितलं!
अनंतः आणि स्त्री पुरुष असं कॅटेगरायजेशनच असेल तर मग तुला का नाही येत रडू? तुझं हृदय नाही का मुलायम ?
बायको : ॲनीवेज ! तू तुझ्या कविता ना जरा जास्तंच सिरीयसली घ्यायला लागलायस!

अनंतः तू घेत नाहीस ना, मग मला घ्याव्याच लागतील!

तबायको : हे बघ अनंत, फॅक्ट इज प्लेन. तो एक मुलगा म्हणजे जग नाही. जगात सगळी कडे अन्याय आहे! आणि, मूळात जगात भिकारी हा प्रकार आता राहिलेलाच नाही, हे सगळे ब्लॅक मेलरस आहेत ब्लॅकमेलर्स, कुणी खरं नाहीये, हयांच्या टोळया असतात, परदेशात फलेंटस असतात, हे विमानात चढून भीक मागतात. हे कसले भिकारी? ही तर अर्थव्यवस्थेला लागलेली कीड आहे. असंख्य असे ह्यात ज्यांना काही करायचंच नाहीय! त्यांना फक्त अवलंबून रहायचंय!! जशी बांडगूळं वाढतात!
अनंतः तो मुलगाही खोटा असेल ?

बायको : असूही शकतो!
अनंतः श्योर?
बायको :आय मीन, माझ्या मैत्रिणीच्या पुऱ्यात असे कित्येक लोक ट्रॅप लावून लूटतात. हल्ली
कडेवर मूलं घेऊन, आम्ही हरवलोय, आम्हाला औरंगाबादला जायला, मुरादाबादला जायला पैसे हवेत असं म्हणणाऱ्या कितीतरी बायका भेटतात, सो ही सरासर लूट नाही? इन फॅक्ट दर
वेळी भीक देऊन तू लहान मुलांना पळवणाऱ्या रॅकेटस ना सरळ सरळ बळकट करतअसतोस !!
अनंत: व्हॉट अबाउट समवन जेन्यूइन ?
बायको :म्हणजे?
अनंतः एखादा सच्चा गरजू ? बायको: त्याची जबाबदारी आपली नाहीये अनंत
अनंतः मग कुणाचीय?
बायकोः कुणीही घेवो! आपल्याला काय ?
अनंतः कुणी म्हणजे कोण ? नाव सांग!
बायको: सरकार!
अनंतः सरकार आपली जवाबदारी नाही घेऊ शकत आहे
बायको: कुणीही!
अनंतः तेच तर! कोण? नाव घे
बायको: यु आर इरिटेटींग नाउ अ डेज. आय ॲम गोइंग !! बाय!!!!!!
(सना उठून जाते अनंत बाहेर पडू पहातो, मॅक डी च्या बाहेर भिकारी मागे लागतो)
भिकारी : सोये सोये नही उठयो, जब उठयो तो बहिरो गुंगो
काल ललाट पे धरी रहा, तुम समझयो कीट पतंगो

अनंतः रस्ता सोड! ( गाडीच्या लॉकचं रिमोट दाबतो, टवीक टवीक असा आवाज येतो)
भिकारी:द्या बाबू द्या काहीतरी द्या!
अनंत: मॅक डी च्या बाहेरचे भिकारी.भिकारीच नाहीत मुळात भिकारी: हम भेस बदल या देस बदलकर आए ?
हम बदल भी क्या सकते हैं गर हम चाहे?
अनंत:तू सद्या तरी तुझा attitude बदल
भिकारी: तुम्ही नॉर्मल व्हायला आलेलात न? मध्यमवर्गीय आउटलेट मध्ये? मग आर यु फिलिंग नॉर्मल? या नॉर्मलतेला निर्मल करूनक फुटू दे कविता...समाज मनाला रुदन फुटू दे कविता पढीता पढीता
अनंत:माझा रस्ता सोड!
भिकारी: तो मुलगा खरा होता की खोटा ? त्या बोळीत जो तुम्हाला दिसला ?
अनंतः तूओळखतोस त्याला ?

भिकारी: फक्त कारुण्याने डबडबलेले डोळेच खरे वाटतात तुम्हाला?
अनंत: पण तो मुलगा कोण होता हे माहित्ये तुला ?
भिकारी: सगळं सांगेन. बसा तर. त्या बाकावर!
(अनंत बाकावर बसतो)
भिकारी: मला भीक दया.
अनंतः असं कोण मागतं ? इतक्या थंडपणे?
भिकारी: गयावया करू? हंबरडा फोडू? पाया पडू?
अनंतः ते तर अजिबात नाही आवडत मला. भावनांचे भेसूर प्रदर्शन नी त्याला चिकटून येणारे
इमोशनल ब्लॅकमेलींना
भिकारी: मुळात धडधाकट लोकांनी भीक मागूच नये अशा माताची असतात लोकं मग असं मागू? मला कॅन्सर आहे, माझ्या दोन्ही किडन्या फेल आहेत ? माझी फुफ्फुस निकामी झालीयत? मला हातपाय नाहीयेत साहेब!
अनंतः करुणा ही उधार अवसानातून आणता येत नाही! भिकारी : म्हणजे आमची अवस्था करूण असो, नसो, कारुण्य तुम्हाला वाटले पाहिजे, त्याचा

उगम तुमच्या अंतःकरणातून व्हायला हवा, हो ना?
भिकारी: पण हे तर तुम्ही तुमच्याच भुमिकेविरुध्द बोललात! कारुण्य तुम्हाला वाटले पाहिजे हा
अनंतः हो!
क्रायटेरीया असेल तर म्हणजे मग भीक मागणं ही रिप्रेजेंटेशनची कला झाली! आव आणणं.
रडणं, आततायीपणा करणं
अनंतः एखाघ्याप्रती मन सेन्सेटीव व्हायला काय मटेरीयल लागत असावं? मला दिसणाऱ्या
दृश्याचं त्या त्या वेळी मी केलेलं इंटरप्रिटेशन! तुझ्यातून माझ्यात काहीतरी फ्लो होणं! एक उर्जा,
इमोशनल एनर्जी! पण जेंव्हा कळून चुकतं की गरजू म्हणून आपल्या समोर आलेली व्यक्ती खरी गरजू नव्हतीच त्यानंतर काय होतं.. ज्या दिवशी हा विश्वास पहिल्यांदा तुटतो त्यानंतर आपली विश्वास करण्याची कपॅसीटी कायमची दूषित होऊन जाते.. गरजूपणा नी त्याचं प्रगटीकरण हे जोवर प्रोफेशन नव्हतं तोवर विश्वास ठेवणं शक्यही होत! आता सतत तुमच्या मागण्याने मन शरमिंदा होत होत निबर बनलंय, सेन्सीटीवीटी मरणं हे त्यातूनच घडलं असावं! आणि पर्यायाने अनेक मूडस आणि भावनांनी भरलेल्या मानवी मनात सतत कारुण्यच उत्पन्न होत राहील ही अपेक्षा करणंही मुर्खपणाय !

भिकारी: अच्छा भीकेचं जाऊ द्या तुम्ही तुमच्याकडे जास्त असलेली एखादी वस्तू मला दयाल?
अनंत हो! का नाही?
भिकारी : ग्रेट! ही एक चांगली सुरवात आहे! देण्याचा इंटेंट तुमच्यात आहे! हया जगात अशी असंख्य लोकं आहेत जे खोटया नोटाही नाही देऊ इच्छीत.जे कप फुटल्यावरही त्यांना ब्रश ठेवायला वापरतात.. जुन्या चप्पल बुटांचे त्यांच्याकडे खोके पडून आहेत, पण ते त्यांनी नातवांसाठी जपून ठेवलेत, जुने कपडे भांडीवाली देतात किंवा ॲण्ड फैक्टरीत देवून च्युत्या बनतात..

अनंतः मी तेवढा उपयुक्तता वादी नाही!
भिकारी:आणि साठेबाजही ?
अनंतः नाही!

भिकारी: सर! मी तुमच्या अस्तित्वाची शप्पथ घेउन सांगतो, तुमच्या अस्तित्वाची अशाकरता कारण माझ्या अस्तित्वात बहूमूल्य असं काहीही नाही! तर शपथ अशी की देण्यात मजा आहे सर.. जॉय ऑफ गिविंग इज द मोस्ट ब्युटीफूल थिंग इन लाइफ !
अनंतः पण ते देणं तुमच्या सारख्यांना नाही!
भिकारी : मग कुणाला? मल्ल्या, नीरव, नी डीएसके? मगाशी मॅक डी मधे शोषितांची बाजू घेत होतात. तर माझ्याशी एवढा वाद का घालताय? की हे करूणपणाचं फक्त आपापल्या वर्तुळापुरतं मर्यादीत स्तोम आहे ?? बसून बायकोसमोर अनंता: मला वाटतं मॅक ही आाणि एटीएम च्या बाहेर उभे रहाणारे तुम्ही सगळे भिकारी नाही आह्मात! लुटारू आहात.. कारण तुम्ही माणसाला त्याच्या गिल्टनी मारता. हॉटेल मधून आपल्या आयुष्यातलं एक चमचमीत डिनर खाऊन येणाऱ्या माणसात तुम्ही सेल्फ डाउट क्रीएट करता.तुमच्या कावेबाज पणात एक हेतू असतो एक प्रश्न, आलास चापून? पण आमचं काय? हया गिल्टनी भारलेला माणूस मग नाइलाजाने खिसा खाली करतोच!
भिकारी: आमचं काय हा प्रश्नं महत्वाचा नाही??

अनंत :आम्ही तुमच्या परिस्थीतीला जवाबदार नाहीओत !
भिकारीः मग जवाबदार कोण?
अनंत:शासन
भिकारी:मला नाव सांग

अनंतः अधिकारी सिस्टम !
भिकारी: नाव सांग नाव
अनंतः पंतप्रधान!

भिकारी: पण आम्ही तर त्यांना भेटू शकत नाही !
अनंतः तुमच्या साठी योजना वगैरे आखत असतात ते! आणि त्या योजनांसाठी टॅक्स भरतो आम्ही! नोकरदार सगळयात व्हल्नरेबल घटक आहे समाजाचा! तो टॅक्सही भरतो आणि सहनही करतो.. तुमचं एकदम ऐटीत चाललंय राव, मेकअप करायचा, फाटके कपडे घालून ट्रेनमधेही लोकांमध्ये गिल्ट क्रिएट करत सुटायचं, मला ना संताप होतो, तुमच्या लोचटपणाचा.. एकदा भीक मागून भागत नाही तुम्हाला.. चार वेळा पाया पडता, तुमचा तो गुडघ्यांना केला जाणार हलका निर्बल, गर्भगळीत स्पर्श लागटपणाची परिसीमा, तो स्पर्श आत्म्यापर्यंत त्रास येतो गाडीच्या सिग्नलवर संपूर्ण विश्वातली करूणा डोळयात साचवून काचेवर केलेला नॉक संपेपर्यंत मनाचे तुकडे तुकडे करतो, कारण तुम्हाला म्हणायचे असते. तू नाहीत बसलायस, तू जवाबदार आहेस हया सर्वस्वाला.. आता दे हफता, दे आमच्या गरीब असण्याचे कपेन्सेशन, दे भरपाई आमच्या नरकयातनांची..! लोचट! लोचट... क्रूर साले! तुमच्याकडे दुर्लक्ष करण्यात जेवढया हालचाली केल्या जातात त्याचा समाजात खुला तमाशा बनवता तुम्ही लोक, कारण प्रत्येक भीक न देणाऱ्या माणसाला कुतूहल असते की त्याच्या शेजारचा माणूस हा भिकारी कसा हँडल करतो हयाची.. अभिनय सुरू असतो, उर्जा खर्च होते नाहक..! गिल्ट येते..!!
भिकारी: पण हे सगळं खरंय! तुमच्यावर जबाबदारी आहेच अनंतः का? का? घेऊ मी जवाबदारी? माझी चूक काय ? भिकारी: कारण तु त्याबाजूला आहेस बस!
अनंतः मग तू या बाजूला का आहेस? कर मेहेनत, घडव उत्कर्ष!
भिकारी: सर, मी जिकडे जलमलो, तिथे तुमचे विचारही जायला घाबरतात, तुम्हाला स्वप्नात दिसणारी झोपडपट्टी सिनेमातील असते. क्लीन ॲण्ड नीट. सर, पैसा कमवणं हा एकच फॅक्टर नसतो सर, टाइम नसतो आमच्याकडे..
अनंतः टाइम नसतो ?? हाहाहाहाहा!!!!!
भिकारी : काळ नसतो सर काळ आता बघा ना, तुमचे खापरपणजोबा वगैरे तुमच्या इतकेच श्रीमंत नसणार, पण ते योग्य काळात हया शहरात आले. त्यावेळी त्यांना स्वस्तात जागा मिळाल्या, नोकरी वगैरे करत, कमवत कमवत एक एक वर्ग पुढेपुढे जात ते उच्च मध्यमवर्गात झाले, पण हयाला काळ जावा लागला.. जो आम्हाला मिळालाच नाही.. आज माझ्या भिकारी असण्याचा फायदा, कदाचित माझ्या पणतूला होईल. माझ्या झोपडीची जागा कदाचित करोड रूपये असेल उदया! पण आजच्या काळात अटक झालेल्या माझं काय? मी तर ऑटोमॅटीकली भिकारी या कॅटेगरीतच येणार ना? म्हणून तुमच्या सारखे लोक जेंव्हा म्हणतात मेहनत करके खाओ तेंव्हा आम्हाला अनेक प्रश्नं पडतात, मेहेनत कर कुठे इंजिनिअर सतरा हजाराची नोकरी करत असलेल्या देशात बारावी पास भिकाऱ्यानी मेहेनत करावी तरी कुठे??
अनंत: कितीतरी सक्सेस स्टोरीज ऐकायला मिळतात! कितीतरी लोकं स्वतःला मेहेनतीच्या
बळावर दारिद्रयाच्या दृष्टचक्रातून काढूनच घेतात...
भिकारी : लेटस टॉक ऑन बेसीस ऑफ नंबर्स ! आपल्या देशात तीनशे साठ मिलीयन म्हणजे छत्तीस करोड लोक गरीब आहेत, त्यात मेहेनत करून योग्य वेळी योग्य संधी मिळून वर आलेले किती असतील? एक टक्के? दोन टक्के? समजा दोन टक्के, म्हणजे बहात्तर लाख ? मग उरलेल्या पस्तीस करोड अठठावीस लाख लोकांचे काय करणार आहोत

आपण? की त्यांना फक्त नियतीच्या हवाले करून सडण्यासाठी सोडून दयायचं आहे? त्यांची जवाबदारी क कोण घेणार? ज्या हॉटेलात जेउन टॅक्स देऊन तू बाहेर येतोयस त्या टॅक्सचा फायदा सरळ सरळ तुला नाही मिळत तर तो आम्हाला कधी मिळणार?
अनंतः दिस इज रिडीक्युलस! दिस इज प्लान्ड ब्लॅकमेलींग! ही लूट आहे लुट !!
भिकारी: लूट ?? हरामखोर! (अनंतच्या गळयाला चाकू लावत) आता तू मला जे काही देणार
आहेस ती लूट असेल!
अनंतः लिव मी! मी आरडा ओरडा करेन
भिकारी: सगळयात आधी तुझं स्वरयंत्र कापेन मी! काढ, कोट काढ, ब्लडी रिच ब्रेट!!
(अनंत. कोट वगैरे काढतो, सगळं त्याच्या हवाले करतो)

भिकारी बस !! बस !! साला, भिक मागायला कारुण्याचा वापर केला तर रडायला आलं असतं
तुझ्या हळव्या मनाला..
(अनंत बसतो)

भिकारी: काळाच्या या फ्रेम मधे तू अन मी समान झालोत आता! कुठल्या कंपनीत काम करतोस?
अनंतः इंश्युरन्स ॲण्ड फायनान्स !
भिकारी: ग्रेट! लोकांना त्यांच्या उदयाची भीती दाखवून त्यांच्या आज विकत घेता तुम्ही! कुठल्या सेक्टर लूटट नाहीये रे मादररचोद / फार्मा, एफएमसीजी, एज्युकेशन सॉफ्टवेअर एन्टरटेनमेंट?? कोणत्या सेक्टर मध्ये लूट नाहीये? तुमची मार्जीन, नफे तोटे गळे कापू स्पर्धा, कुठल्या व्यवहारात लूट नाहीये? दलाली खाणं, भ्रष्टपणे कॉट्रॅक्ट देणं, बोली लावणं, वस्तू विकणं, मला सांग माणसाचा कुठला व्यवहार विशुध्द उरलाय आज ?? प्रत्येकाला संपत्तीचा जास्त तुकडा ही जर प्रामाणिकपणे आपल्या स्वतःशी दिली गेलेली कबूली असेल आणि एकमेकांचं शोषण हा जगण्याचा मार्ग असेल तर मग आम्ही नं लूटता प्रामाणिकपणे तुमच्या कमाईचा थोडासा हिस्सा मागतो तर त्यात तुम्हाला लुट वाटते? निदान तिथे कुठल्याही
दिखाव्याखेरीज ग्राउंड लेवलला पैशाचा सरळसरळ एक्स्चेंज तरी दिसतो.. तुम्हाला जबाबदारी घ्यावी लागेल.. तुमच्या असस्तित्वाच्या परिणामांची जबाबदारी, तुम्ही निर्माण केलेल्या या शोषण साखळीची जबाबदारी! यू वील हॅव टू ओन इट!! दिस इज लाइक पेइग टॅक्स फॉर व्हॉट यू हॅव बीन टू अस! जसं परमेश्वराला आपल्या कर्मासाठी दानाचा टॅक्स देता तसा जिवंत माणसांसाठीही दयावा लागेल!
अनंतः त्या मुलाचं काय? तो खरा होता की खोटा ?
भिकारी: ते तुला नं कळू देणं हीच तुझी शिक्षा!! नाऊ गेट लॉस्ट !

(अनंत जाऊ लागतो)

भिकारी: आणि हे घे तुझ्या सगळया वस्तू परत !
अनंतः का?
भिकारी मी भिकारी आहे. लुटारू नाही !
अनंतः एक वय होतं जेव्हा मला समाजासाठी काहीतरी करावसं वाटायचं, मग ते वय गडप झालं, ती उम्मेद संपल्यावर मी फक्त मान्य करत सुटलो. प्रत्येक वस्तूचं तसं तसं असणं.
भिकारी: जगात दोनच प्रकारची लोकं आहेत, एक याचक, गरजू आणि दुसरा देणारा, जर करुणेच्या नजरेनं आणि सर्व विश्वाला बंधुत्वाच्या आधारावर तोललं तर देणं आणि घेणं हे व्यवहार किती सोपे होउन जातील!!
अनंतः तुजला तुझे खरेसे नाहीत स्पर्श लेका,
जे स्पर्शते खरे ते, तेही खरे उरे का ?
जो भाव पांघरूनी, झोपी उनाड गेला

तो भास माणसाचा, तुझ होतसे बरे का ?
(मागे घर तयार होते) (अनंत सोफयावर उभा)
अनंतः बार्टर सिस्टमची टर उडवणाऱ्यांना हवं होतं समान चलन दळण वळण जीवन मरण एकच कारक एकच कारण पैसा दया नाहीतर ठेवा तारण जारण मारण, वशीकरण वस्तूच्या बदल्यात वस्तू असं पुन्हा आलं समीकरण तर बदलून जाईल, अर्थकारण
बदलून जाइल सत्ताकारण...
बदलून जाइल समाजकारण..

सनाः वेड लागलंय तुला..दोन दिवसात बँक बॅलन्स अर्ध करून बसलायस.. हे समाजवादी विचार
तुला घेऊन बुडतील..
अनंतः तू बोललेलीस ना? नुसत्या लिहिण्यातून काय होतंय? घे, मी जगतोय त्या दिशेनं, करुणा अनुकंपा, सहानुभूतीच समाज वाचवेल. बी मस्ट स्टॉप विन ओवर प्रॅक्टिकल! दातृत्वातला आनंद आपण उपभोगून पहायलाच हवा! त्यातूनच फुटेल एक निर्मळ हुंदका, एक
नवा टाहो, जाणिवांचा!!

(अंधार होतो, अचानक एक हॅट आणि कोट घातलेला माणूस घरात शिरतो. त्याच्या हातात
बंदूक)
बंदूकधारीः अनंत देशमुख ?
सना: व्हॉट यू आर अप टू?? प्लीज डोन्ट शूट हिम!
बंदूकधारी आम्हाला ऑर्डर्स आहेत.
अनंतः कुणाच्या?
बंदूकधारीः आमच्या संघटनेच्या! च्यामायला तुझ्या..
कम्युनीझम हटवायला आम्हाला दोनशे वर्ष
लागली आणि तू काय चालवलंय ?
अनंतः तुम्ही हयाला इझम म्हणून का बघताय ? तुम्ही माणुसकीच्या नात्यानं बघा!

बंदूकधारी :लय माणूसकी आहे हा देशात यांना लाडावून ठेवलंय! घराबाहेर कायदे आहेत, उंबऱ्याआत संस्कृती आहे, सीमेवर सैनिक आहेत, लेखक लिहीत आहेत, तू मायला
कवितांवर पाडतोयस कविता, अजून काय माणूसकी नी बंधुभाव हावा तुला?
अनंतः या देशात करुणेला थारा नाही!

बंदूकधारी :करुणा तेही! आणि कोण म्हणतं थारा नाही! आता ए मेरे वतन के लोगो लावून करा धापाच बायकांवर टेस्टींग, नाय रडल्या तर नाव बदलीन!
अनंतः संगीतावर रडणं म्हणजे ड्रग्स घेऊन नशा केल्यासारखं आहे. माझं ठाम मत आहे की
या शहराने कुणाच्या दुःखासाठी अश्रू वहावणं केव्हाच बंद केलंय!
बंदूकधारी: जॉय ऑफ गिव्हींगच्या पोटचा, नालायक!!

अनंतः पण तू आहेस कोण? आलायस कुठून?
बंदूकधारी :मी ऑल इंडीया भांडवलवाद अ‍ॅण्ड वसाहतवाद संघटनेचा सक्रीय कार्यकर्ता आहे! अनंतः पण भारत तर निरपेक्ष राष्ट्रहे!
बंदूकधारी: च्यामायला (हसतो) तुम्ही पण लिखीत शब्दांवर गेलात राव! डोळे झाकून चालता की काय बाहेर?
सना:पण तुम्ही असा बंदुकीचा घाट मांडलाय? ती ठेवा खाली! निदान लोकशाही तरी आहे न देशात?
बंदूकधारी: हाय ना ! लोकशाही व्हाया भांडवलशाही असल्यानं सगळा गुंता झालाय! म्हणजे आम्हाला लोकांच्या मताने चालायचंय ,पण लोकांचं मतच तर एक काहीतरी नाही ना
सनाः म्हणजे?
अनंत म्हणजे,
पूर्ण देशाला

एकाच वेळी कळलं की मोबाइल हावाच,
सोबत वायफायबी
की मग पूर्ण देशात नेटवर्कचे टावर बिनविरोध बसले
प्रत्येक ट्रेनमधे चार्जर चे स्लॉटस
गावाखेडयात रिचार्ज ची दुकाने
हॉटेलात फ्री वायफाय

नगरसेवकांनी ,रेल्वेनी
तातडीचा प्रश्न म्हणून
मोबाईल पल्याडच्या अफाट पोकळीतील अनंत निश्चल प्रश्नांना बोच्यात भरून या व्यवस्थेतल्या इतर अन्यायाकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून
आपापले न्यूड पीक्स, सेक्स चॅटनी सकाळचे जीवन तत्वज्ञान शिकवणारे गूड मॉर्निंगचे मेसेजेस स्मुदली एक्स्चेंज करता यावेत
याकरता वायफाय पोर्ट बनवायला सढळ दिली परवानगी
आणि कुणालाही खास आंदोलन करावे लागले नाही । देशाच्या आयुष्याच्या कक्षा
पाच इंचीनी दहा बाय दहाच्या खोलीतील सेक्शुअल प्लेजर ते
साडेपाच इंची एकवीसी प्लेजर झाल्या!
एंजीनीअरींगचे शेत नी डॉक्टरकीचे बेत अफाट माजले एकाच वेळी
हरितक्रांतीत ही माजवू

अनंत :जुबल्या डीडीएलजे गाजवून गावठी तोडून, जर्शी पाजवून
लोकांची मन, शरीरे खिळखीळी झाली एकाच वेळी!
एकाच वेळी लागल्या ना पोटटयो,
इंग्लिश मेणबत्त्या सव्वीस अकराला
अशोकचक्राला
असंच एकाच वेळी देशाला कळत चाललंय की

जिमिनीत हाये पैसा
किंवा
उमाराय करावा लागेल
किंवा
या गोळया मेडीकल वरून आणून दाखवा
शेवटी बॉस ची चाटायलाच लागते किंवा
बायकांना होतेच रे गुडघेदुखी
किंवा
प्रेम गेलं बोच्यात झव बिनधास्त
किंवा
बेस्ट फ्रेण्डला पण मी झोपताना आय लव्ह यूच म्हणते रे शोन्या
किंवा
आपल्या देशात शंभरेक हिटलर लोकशाहीच्या चादरीत अदृश्य फिरतायत रे बाप्पा!! किंवा पंधरा ऑगस्ट ला रंग दे बसंतीवर रडणारा नी गुडीपाडव्याला शोभा यात्रेत ढोल बडवणारा खरा ट्रेडीशनल
किंवा
ढोल बडवणारा डीपी ठेवणारी अथवा उगीच पुरुषांना कमी लेखणारी मुलगी म्हणजे
स्टीरियोटाइप मोडत्ये बरं का?
किंवा
केस कर, मन फिरवू साल्याला
किंवा
नोटबंदीत श्रीमंतांची कुठे आली नावं
किंवा
मिडीया पॉलीटीशियीन्स च्या घरची रांड आहे
किंवा
शेती करामा आते कैच मजा ने राव
किंवा
सत्तर हजार जातींनी मिळून एकाच वेळी मागावं आरक्षण आणि करावी एकाच शीटला अडीचशे माणसे भरण्याची मागणी
किंवा

पंडया रनाउट झाला भेंचोद मॅच फिक्स होती
असे किती तरी किंवा अव्वाच्या सव्वा माजलेत देशात
माहितीये देशाला
एकाच वेळी...

एकाच वेळी माहीत असलं ना की इथे सगळ्यांना काय हवंय तर देता आलं असतं लगेच अमर मूळ शोधून एकच एक अंतीम उत्तर
पण प्रत्येकाचा मानसिक काळ वेगळा असल्याचा होतोय फायदा, एकाच वेळी देशात कशालाच
कुणाचंच काहीच नं वाटणाऱ्यांना!!
बंदूकधारी हयाला तर मरणारच !!

सना: प्लीज.. मी पाय पडते तुमच्या

बंदूकधारीः वहिनी पाया बीया नको. तुम्ही मॉडर्न

सना: म्हणजे?

बंदूकधारी: तुमच्याने झेपेल तेवढयाच गयावया करा!!
सनाः अहो पण या एकटया माणसामुळे तुम्हाला कितीसा फरक पडतोय ?
बंदूकधारी: आंदोलनाचं फॅड आलंय देशात. हयाना अजून पंचवीस माणसं जरी जॉइन झाली तरी अर्थव्यवस्थेचं किती नुकसान आहे माहीत्येय? या व्यवस्थेचा स्वतःचा एक स्पीड आहे. एका नियमीत गतीनं गरीब लोक श्रीमंतीकडे ढकलली जात राहतात नी तळाला अजून गरीब येत राहतात.. तुमच्या हालचाली या सबंध चक्राचा फोर्स डिस्टर्ब करत आहेत!
सनाः तू समज ना अनंत! असं काय करतोस ?

बंदूकधारी :व्हाय यू आर डिस्टरबिंग नॅचरल बॅलन्स ? अन्नसाखळी सारखं आहे हे, बड़ी मछली
छोटी को खाती है हेच सत्य आहे. गरीब श्रीमंत ही दरी हेच सत्यय, हे चिरंतन आहे.. कुठल्याही काळाला कॉन्स्टंट !
अनंतः या हिशोबाने स्वतःला प्रगत मानणाऱ्या माणसांनी मग चतुःवर्णीय जातीव्यवस्थाही मान्य करावी, सगळया प्रकारचे भेद मान्य करावेत, डिस्क्रीमीनेशन मान्य करावं, अन्याय मान्य करावा, कर्माचा सिध्दांत मान्य करावा, माणसाचा जन्म हा गतजन्माचे फलीत असते हे
ही मान्य करावे
सनाः तुला समजत का नाहीये अनंत हया चारचौघात मान्य करायच्या गोष्टी नाहीत! उघड बोलण्याच्या गोष्टी नाहीत..! बेसिकली ही कविता नाही तुझी!
अनंतः मी उलट बॅलन्स आणणार आहे आता सगळ्यांना समान करणार!
बंदूकधारी: वहिनी कम्युनीझम एक थॉट म्हणून चांगला असतो कृती म्हणून नाही, सांगा बरं हयाला, आता डोक्यात जातोय हा माझ्या !
अनंतः मग मला सांग जेन्यून भिकारी आणि इंजेन्यून भिकारी हयातला फरक कसा ओळखायचा?
बंदूकधारी: फरक ओळखायला जायचंच नाही.. जग फार दूषित झालंय.. सब को अपने अपने हाल पर छोड दो! भेदभाव किंवा कमीजास्त असणं गरजेचं आहे. त्यामुळेच हया सिस्टम मधे जान आहे. सगळे समान झाले तर क्राइम बंद होतील, चोर पोलीस, कारखाने, बिजनेस, रोजगार, प्रोडक्शन बंद, कंसंप्शन बंद, चंगळवाद बंद .. नाकर्त्या आणि अल्पसंतुष्ट माणसांची सगळं बंद.. जत्रा भरेल, कुणालाच काही मिळवायचं नाही असं निःस्वार्थी सॅच्युरेटेड जग महामंदीकडे वळेल, आणि आपण सगळे उपाशी मरा मूळात तो प्रलय असेल! आपली बनावटच अधिकाधिक रिसोर्सेस, संपत्ती साठवण्याच्या हेतूने झालीय कारण

आपला अहम त्या पध्दतीने प्रोग्रामड आहे, आपल्याला भूक आहे, कुणाला कमी आहे, कुणाला जास्त, ती समान करता येऊच शकत नाही!! काही गोष्टी लाइलाज आहेत, किंवा असं म्हणू की तुला जे दोष वाटतात तेच दोष या वर्गव्यवस्थेला चालवायला आवश्यक विभवांतर आहे! अनंतः डागण्यांचे पोषाख करा

श्रावणांचे वैशाख करा
रक्त वाहात्या तान्हुल्यांची
स्मारके हकनाक करा !

बंदूकधारी :तो रक्त वहाणारा, तान्हुला, मीच आहे! ही माझीच गोष्ट आहे अन मी आभाळभर मोठा आणि काळभर अफाट पसरलोय..

ह्या चिरत्वाचे उसासे हंबरी आतंकिले
मारण्याचे तारण्याचे खूळ मी आकल्पिले
त्या उदयाच्या गाढ जखमा झोपू दे सडकेवरी
चिरकालातून उद्धारु दे महीवरी

(हॅट काढतो, रक्त आणि जखम दिसते)

बंदूकधारी: मी एकाच दिवसात लहानही होतोय, मोठाही होतोय, पण मी फक्त मरत नाही। ही घ्या बंदूक ! यापुढे मी पुन्हा कधी सडकेवरून जाताना दिसलो तर मला ठार करा, तसा मी होत नाही पण त्यामुळे तुम्ही मात्र खूप मोठया डिलेमातून जायचे वाचू शकता !

अनंतः पण तुला भीक दयायची की नाही ?


बंदूकधारी: ते त्या क्षणाच्या अनुभूतीवर आधारलंय, मला शंभर रूपये दिलेत म्हणून आज मी लवकर मोठा झालो ..कधी दिवसदिवसभर काहीच मिळत नाही. मी शैशवातच मरतो। अनंतः मग निर्णय कसा करायचा?

बंदूकधारी: इटस अ चान्स ! कधी दयायचं कधी नाही दयायचा असाच आपोआप एक बॅलन्स तयार होत राहील! कारण तुमच्या सारखे करोडो लोक याच द्वंद्वातून जात आहेत जगभर !! (अनंतला हुंदका भरून येतो, तो टाहो फोडायला जाणार इतक्यात सना त्याचं तोंड दाबते)

सनाः शु sss !!!! शहर झोपलंय! त्यांना तुझा टाहो आयता देऊ नकोस, लेट देम टेक देअर ओन कॉल!!!

**---- स्वप्नील चव्हाण,कल्याण**

(एकांकिकेच्या कोणत्याही प्रकारच्या रूपांतरण, अभिवाचन, सादरीकरण स्वरूपातील कुठल्याही प्रकल्पाकरिता लेखकाची परवानगी घेणे आवश्यक असेन.)



डॉ.दीपक बोरगावे, सांगवी
ज्येष्ठ कवी ,लेखक, इंग्रजी साहित्याचे गाढे अभ्यासक, अनुवादक



डॉ.दीपक बोरगावे
सांगवी

## अज्ञानाची निर्मिती ('द क्लॅश ऑफ इग्नोरान्स')

अज्ञानाच्या निर्मितीचे एक शास्त्र असते. मानवी इतिहासामध्ये ते कायम वापरले गेले आहे. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे सॅम्युअल हंटिंग्टन; उजवे साम्राज्यवादी अमेरिकन विचारवंत. एडवर्ड सैद यांनी 'द नेशन' या नियतकालिकात २२ ऑक्टोबर २०११ रोजी या अनुषंगाने हंटिंग्टन यांचा समाचार घेतला होता. त्या संबंधी काही संक्षिप्त..

सॅम्युअल हंटिंग्टन (१९२७-२००८) यांचा "The Clash of Civilizations?" हा 'फॉरेन अफेअर्स' या जगप्रसिद्ध अमेरिकन नियतकालिकात प्रसिद्ध झालेला दीर्घ लेख (हा जवळपास बत्तीस पानांचा लेख आहे) अभ्यासकांना मराठीत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मी या लेखाचे भाषांतर मराठीत केले होते. हा अनुवाद 'खेळ' या वाङमयीन नियतकालिकाच्या मार्च, २०१५ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. एडवर्ड सैद यांचा "The Clash of Ignorance" हा लेख २२ ऑक्टोबर २०११ रोजी 'द नेशन' या नियतकालिकात प्रसिद्ध झाला. या लेखाचेही भाषांतर मी केले होते. सैद यांचा हा लेख म्हणजे हंटिंग्टन यांच्या लेखावरील अभ्यासपूर्ण प्रतिक्रिया आहे.

जागतिकीकरणाच्या धुक्यात तिसरे आणि चौथे जग हरवून जात असताना ग्लोबल इकॉनॉमीचा विस्तार करत जाणे हा अमेरीकन साम्राज्यवाद्यांचा राजकीय अजेंडा आहे. जगात सांस्कृतिक कलहाचे राजकारण करायचे आणि आंतरराष्ट्रीय अस्वस्थता टिकून ठेवायची अशा राजकीय हेतूनेच हंटिंग्टन यांनी हा उपद्व्याप केला आहे. याची वस्तुनिष्ठ समीक्षा व्हावी असे वाटते. हा लेख या दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे.

हंटिंग्टन हे अमेरिकेची साम्राज्यवादी भूमिका मांडणारे कडवे उजवे विचारवंत आहेत, असे मानले जाते. फ्रान्सिस फुकोयामा (१९५२-) यांच्या "The end of History and the Last Man" (१९९२) या ग्रंथात फुकोयामा यांनी संस्कृती सपाटीकरणाची (flattening of culture) संकल्पना मांडली आहे. या गृहितकात फुकोयामा यांचे असे म्हणणे आहे की, उदारमतवादी लोकशाहीचा जगभर प्रसार आणि सार्वत्रीकरण झाल्यामुळे घराणेशाही, फॅन्सीझम आणि कम्युनिझम अशा तिच्या प्रतिस्पर्धी विचारसरणीवर लोकशाहीने विजय मिळवला आहे. म्हणून लोकशाहीच्या या जगभरच्या सार्वत्रिक योगदानामुळे मानव जातीच्या विचारसरणीच्या संक्रमणाचा हा अंतकाळ आहे. त्यामुळे आजची शासनव्यवस्था ही आता मानवी इतिहासातील शेवटची शासनव्यवस्था ठरेल.

या गृहितकाला हंटिंग्टन त्यांचा विरोध होता. या प्रतिरोधातूनच 'द क्लॅश ऑफ सिविलिझेशन्स?' हा लेख त्यांनी लिहिला असावा. नंतर हंटिंग्टन यांनी त्याचे पुस्तकही केले आहे. पण पुस्तकापेक्षा हा त्यांचा लेख खूप गाजला.

अमेरिकेचे समर्थन करणारे साम्राज्यवादी, आक्रमणवादी आणि वर्चस्ववादी विचारांना सैद्धांतिक वैधता या लेखातून मिळवण्याचा हंटिंग्टन यांचा इरादा आहे, अशी त्यांच्यावर टीका झाली. खरे पाहता चीन आणि जगातील इस्लामिक आणि सनातनी संस्कृती विरुद्ध पुकारलेले हंटिंग्टन यांचे हे युद्धच आहे, असे काही टीकाकारांनी म्हटले आहे. हंटिंग्टन यांनी केलेले सिविलिझेशन्सचे हे वर्गीकरण फारच सोपे, सुलभ आणि अतार्किक आहे. सिविलिझेशन्समधील अंतर्गत कलह, ताणतणावांचे विश्लेषण या आणि अशा अनेक गोष्टींची इथे दखल घेतली गेलेली नाही.

'द क्लॅश ऑफ इग्नोरान्स' हा एडवर्ड सैद यांचा लेख ११ सप्टेंबरच्या हल्ल्यानंतर प्रसिद्ध झाला; या घटनेला विशेष महत्त्व आहे. सैद यांनी हंटिंग्टन यांच्या गृहितकाला या लेखातून सणसणीत उत्तर दिले आहे. शीतयुद्धोत्तर कालखंडात जागतिक संघर्षाचा स्रोत हा सांस्कृतिकच राहणार आहे, असे हंटिंग्टन यांचे प्रतिपादन आहे. मुख्यत्वेकरून त्यांचा सिद्धांत हा 'पाश्चात्य' विरुद्ध 'इस्लाम' असा आहे आणि संघर्षाची दोष रेषा (the fault line) ही भविष्याच्या युद्धाची दोष रेषा आहे असे त्यांचे म्हणणे आहे. पाश्चात्य, इस्लाम असे जे लेबल्स हंटिंग्टन यांनी वापरले आहेत ते खूप धोकादायक आहेत. त्यामुळे अगोदरच विस्कळीत झालेल्या वास्तवात अजून गोंधळ निर्माण होऊ शकतो. मुळात पाश्चात्य, इस्लाम, अस्मिता, संस्कृती यासारख्या कल्पना/संकल्पना या खूपच क्लिष्ट आहेत. शिवाय त्या सतत प्रवाही असतात. बदलत असतात आणि सापेक्षही असतात. मात्र, हंटिंग्टन साहेबांनी त्या स्वतःला हव्या तशा वापरल्या आहेत. पाश्चात्यांची संस्कृती ही नेहमीच तुलनात्मकरित्या इस्लामला अडचणीत मदत करणारी संस्कृती आहे असे चित्र हंटिंग्टन यांनी रेखाटले आहे.

११ सप्टेंबरची घटना ही जगाला हादरवून टाकणारी घटना होती. दहशतवाद्यांचा हा हल्ला धर्मांध माथेफिरूचा हल्ला होता. पण इस्लाम धर्माशी त्याचा संबंध जोडला गेला. त्यामुळे जगभर इस्लामविरोधी वातावरण तयार झाले. यात मूलभूतवादी आणि पाश्चात्त्य संस्कृतीच्या बाजूने जाणारा एक गट... म्हणजे ज्याला आपण आधुनिक वगैरे म्हणतो असे दोन समूह होते. शिवाय 'इकडेही नाही आणि तिकडेही नाही' अशी बहुतांशी इस्लामी जनता ही दोलायमान स्थितीत अडकलेली होती. कारण त्यांना त्यांच्या रोजीरोटीचा सवाल मोठा होता. त्यांना या गोष्टीशी काहीच देणे घेणे नव्हते. पण या सगळ्या गदारोळात त्यांचेच खूप हाल झाले. हे निष्पाप जीव होरपळून निघाले. ११ सप्टेंबरच्या हल्ल्यानंतर पाश्चात्त्य मिडीयाने हंटिंग्टन यांचीच भाषा आणि शब्दकळा उचलली आणि आगीत तेल ओतण्याचे काम केले.

हंटिंग्टन यांचे भाकीत खरे ठरले वगैरे म्हणून आणि ते एक प्रेषित आहेत म्हणून त्यांचेच गाणे आळवण्याचे काम केले. हा सर्व काय प्रकार होता? वास्तव काय होते? आणि काय घडवले जात होते? याची सूक्ष्म चिकित्सा सैद यांनी केली आहे.

डेबेनॉर इलिश यांची 'ब्रेडविनर' (२०००) या शीर्षकाची एक कादंबरी आहे. ही कादंबरी अफगाणिस्तानमधील तालिबानी राज्यात (State) सामान्य माणसाच्या जीवनाचे चित्रण करणारी ही कादंबरी आहे. दहशतवादी तालिबानी संघटनेने देशाच्या मोठ्या भागावर ताबा मिळवला आहे. सामाजिक संस्था, मस्जिद, धर्मस्थळे, बँका, विमा कंपन्या, शाळा, महाविद्यालये, हॉस्पिटल्स, रेडिओ, रोजचे सर्वसाधारण जीवन जगण्याचा सामान्यांचा हक्क, रस्ते... या सर्वांवर त्यांचा ताबा आहे. त्यामुळे सारे जीवनच ठप्प झाले आहे. परवाना नावाची एक अकरा वर्षाची मुलगी ही या कादंबरीची नायिका आहे. ही मुलगी आपले वडील, आई, लहान भावंडे यांचे संगोपन करते. ही मुलगी असल्याने, स्त्रीलिंगी असल्याने तिला घराबाहेर पडण्यास तालिबानी राज्यात परवानगी नाही. म्हणून ती मुलाचे वेशांतर करून घराबाहेर अन्न मिळवण्यासाठी बाहेर पडते. ही

कादंबरी जरी एका पाश्चात्त्य स्त्री पत्रकाराने लिहिली असली, तरी या कादंबरीत सामान्य अफगाणी जीवनाचे आणि जनतेचे वास्तववादी चित्रण आहे. सामान्यांना रोजच्या संघर्षातून इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा अस्तित्वासाठीचा आणि जगण्याचा लढा हाच महत्त्वाचा असतो. रोजीरोटीच्या संघर्षात सापडलेली ही माणसे दहशतवादाच्या फंदात कधीच पडत नाहीत, हे या कादंबरीतून दिसते.

आज आपल्याकडचे काय चित्र आहे? संहितांचे मीडियामार्फत प्रसार, कार्पोरेट आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांना फायदा होईल अशी आर्थिक नीती, सामान्य शेतकरी आणि जनतेला वेठीस धरून सामान्य जनतेचे प्रश्न हे सर्व बाजूला सारून त्यांचे अमुर्तीकरण (abstraction) करण्याचे उपद्व्याप सुरू आहेत. म्हणजेच धर्म आणि धर्मांधता केंद्रस्थानी ठेवून सामान्य माणसांचे लक्ष मूळ प्रश्नांपासून विकेंद्रीत करण्याचा हा एक राजकीय खल असतो, जसे अल कायदा, तालिबान सारख्या दहशतवादी संघटना ह्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचा भाग असतात. अमेरिका-युरोप यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी ही रोपटी लावलेली असतात आणि जेव्हा त्यांचा प्रचंड रूपात विस्फोट होतो, तेव्हा मात्र ते त्यांना संपवण्याचा प्रयत्न करतात.

समूह जीवनात सर्वसामान्य जनतेला धर्माबद्दल खूप नाजूक आणि संवेदनशील असे महत्त्वाचे स्थान असते. पण मानवी इतिहासात धर्माचे राजकारण करून जेते आणि सत्ताधारी नेहमीच गैरफायदा घेत आले आहेत. जेते त्यांना सोयीचा असतो तो खोटा इतिहास नेहमीच लिहीत आले आहेत. सैद यांनी हाच मुद्दा आपल्या लेखात इस्लामच्या बाबतीत मांडला आहे.

अरब-इस्लामिक इतिहासातल्या सर्वसमावेशक संस्कृतीच्या लढाया सातव्या शतकापासून सुरू झाल्या होत्या. पण त्या सर्व विस्मरणात गाढल्या गेल्या. खोटा इतिहास रचण्याचे बरेच प्रयत्न झाले. इतिहासाचे विकृतीकरण/विरूपिकरण करून पाश्चात्यांनी स्वतःचे वर्चस्व टिकवण्याचा प्रयत्न केला. इस्लामच्या बाबतीत 'जिहाद' चा उल्लेख नेहमी केला जातो. पण 'क्रुसेड' बद्दल मात्र काही बोलले जात नाही. जिहाद असो किंवा क्रुसेड असो त्याचे धार्मिक अर्थ आपणास सांगितले जातात, तसे ते मुळीच नसतात. हा संहिता अपभ्रंशाचा प्रकार आहे. जुडाइझम, ख्रिश्चनिटी आणि इस्लाम या तीनही धर्मांची समांतर किंवा पुढेमागे अशी सरमिसळ होत गेली. त्यातून दीड हजार वर्षात युरोप आणि युरेशियाची (ज्याला आधुनिक म्हणता येईल तशी सांस्कृतिक) निर्मिती झाली. पण स्वतःचा वर्चस्ववादी घोडा पुढे दामटायचा असल्यामुळे पाश्चात्यांनी हे कधीही मान्य केले नाही. स्वतःच्या बचावाची आखणी करताना मानवतावाद, विज्ञान, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र आणि इस्लामचे इतिहासलेखन या गोष्टींची नवीनच निर्मिती केली. असा एक नवाच दृष्टिकोन सैद यांनी या लेखात मांडला आहे. सोळाव्या शतकात ज्या रेनसां (Rennissance) कालखंडाचे युरोपियन इतिहासात वारेमाप कौतुक केले जाते, त्यात जुडाईझम आणि इस्लामचा काही वाटा आहे नाही? का ती एकट्या ख्रिश्चॅनिटीचीच कमाई आहे? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे वास्तविक पाहता, युरोपने ग्रीकांच्या ज्ञानमीमांसेबरोबर इस्लाम संहितेतून खूप मोठ्या प्रमाणात ज्ञानाचा वारसा प्राप्त केला. तो आपल्या समाज विकासासाठी वापरला. यात गैर असे काहीच नाही.

इतिहासातील प्रवाह हे असे एककल्ली नसतात. युरेशियाच्या प्राचीन संस्कृतीच्या इतिहासात, किंबहुना जगाच्या प्राचीन इतिहासात इस्लाम हा सुरुवातीपासूनच एक भागीदार म्हणून आणि एक आंतरिक घटक म्हणून कार्यरत होता. हे प्रागतिक इतिहासकारांनी दाखवून दिले आहे.

याच दिशेने आपणांस भारतीय इतिहास पुनर्लेखनाचाही विचार करता येईल. भारतीय इतिहास आणि संस्कृती निर्मितीमध्ये मुस्लिम समाजाचे मोठे योगदान आहे. याचे दाखलेही उपलब्ध आहेत आणि


हे भारतीय प्रागतिक इतिहासकारांनीही दाखवून दिले आहे (उदाहरणार्थ, रोमिला थापर). याचे अलीकडचे एक उदाहरण म्हणजे, कॉम्रेड गोविंद पानसरे यांचे शिवाजी महाराज यांच्यावरील पुस्तक, "शिवाजी कोण होता?" पारंपरिक आणि हिंदू इतिहासकारांनी शिवाजी हे मुस्लिम विरोधी होते हे गृहीतक धरून शिवाजींच्या इतिहासाचे लेखन केले आहे.अफझलखानाचा वध, आग्राहून सुटका आणि शाहिस्तेखानाची बोटे शिवाजीने कशी कापली हे सर्व तिखट मीठ लावून केलेले कथन म्हणजे शिवकालीन इतिहास अशी काहीतरी विचित्र लोकप्रिय संहिता या मंडळींनी निर्माण केली आहे. पण पानसरे यांनी पारंपरिक शिवकाळाच्या इतिहासाला छेद देवून शिवाजी हा रयतेचा राजा होता, तो मुस्लिम विरोधी नव्हता, सामान्य जनतेच्या प्रश्नांविषयी त्याला चाड होती आणि ती सोडवण्याचा त्यांनी आयुष्यभर आटोकाट प्रयत्न केला, अशी मांडणी केली आहे. सैद म्हणतात त्याचप्रमाणे इतिहासाचे विकृतीकरण थोपवण्याचा हा कॉम्रेड पानसरे यांचा प्रयत्न आहे.

एकेश्वरवादी (Monotheism) सांस्कृतिक परंपरा, पॅलेस्टाईनचा मुद्दा, स्थानिक प्रश्नात अमेरिकेची अकारण नाक खुपसण्याची वृत्ती, उत्तरआधुनिक कालखंडातील बदलत्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय छुप्या संहितांची सरमिसळ

आणि अशा पद्धतीने दहशतवादास अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा अमेरिकेचा उद्योग आणि या सर्वांचे पर्यवसन एका खोल गर्तेत होत जाणे या सर्व गुंतागुंतीचे संक्षिप्त आणि योग्य ऐतिहासिक दाखले देत सैद यांचे विवेचन या लेखात आले आहे. वास्तविक, हा एक ग्रंथाचा विषय असून सुद्धा सैद यांनी या गुंत्याचे थोडक्यात विवेचन/विश्लेषण केले आहे. अमेरिकेच्या साम्राज्यवादी धोरणाचा एक भाग म्हणून संस्कृती संघर्षाच्या नावाखाली इतिहासाचे विरूपीकरण करून जगात युद्धाच्या सावल्या सतत जिवंत राहाव्यात, विशेषत: पाश्चात्य आणि इस्लाम यांच्यातील ताण सतत जिवंत राहावा, म्हणजे त्याचा निःपात करताना जगाची सहानभूती अमेरिकेबरोबर कायम राहिल. यासाठी केलेला हंटिंग्टन यांचा हा वैचारिक आणि सैद्धांतिक खटाटोप आहे. असा निष्कर्ष सैद यांनी काढला आहे.

**********

**दीपक बोरगावे**



# सैली-13 सप्टेंबर, सायोनारा आणि तिचा सापडलेला नवा संदर्भ...

पंकज भोसले,ठाणे
मुख्य उपसंपादक लोकसत्ता
साहित्य आणि चित्रपटाविषयी विपुल लेखन .रहस्यकथांवर संशोधन. 'विश्वामित्र सिंड्रोम' हा कथासंग्रह प्रकाशित.



पंकज भोसले
ठाणे

---

श्रीकांत सिनकर यांच्या सैलीचा आज वाढदिवस... बळबळे हे पुस्तक वाचायला लावलेल्या वरिष्ठ सहाक-याचा सकाळी मॅसेज आला, तेव्हा तो कसा साजरा करायचा याचा विचार आला. अजूनही मराठीत अशा प्रकारचे एकमेव पुस्तक आहे, याचा अनेक वाचकगणांना पत्ता नाही. शिवाय सैली वाचलेल्यांना त्यांनी सैलीवरच आणखी एक कादंबरी सायोनारा नावाची लिहिली होती, याचा देखील तपशील माहिती नाही. सिनकरांची गेली जवळ जवळ पन्नास वर्षे वाचनस्पर्श न लाभलेली म्हातारी ही कादंबरी मला गेल्या बुकरवाचन काळात प्राप्त झाली होती. ती आता प्रकाशित करण्याची गरज आहे. अगदी अलिकडे अलिकडेपर्यंत मला सिनकरांची वय वर्षे तीस ही कादंबरी हाती लागली नव्हती. नुकतीच ती मिळाली. या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे ती त्यांची प्रकाशित झालेली पहिली वहिली रहस्य कादंबरी. त्यात नवा संदर्भ गवसला तो त्यातही एक सैली नावाची व्यक्तिरेखा आहे. म्हणजे सिनकरांच्या पहिल्या वहिल्या प्रकाशनापासून सैली त्यांच्यासह होती. पोलीस लेखन गाजल्यानंतर काही वर्षांनी सैली प्रकाशित झाली. तिची मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या संदर्भ विभागात अबकडई दिवाळी अंकातली प्रतही मुद्दाम जाऊन पाहिली. मानकर काकांनी बहुदा सैलीचे पहिले चित्र काढले होते. सैलीवर जयंत पवार हे पटकथा लिहिणार होते, शशिकांत सावंत यांनी त्यासाठी पवारांना प्रत पुरवली होती, असा संदर्भ मागे शशिकांत सावंत यांच्याच पोस्टवर वाचल्याचे आठवते. हे काम नंतर राहून गेले. तुकडा तुकडा चंद्र या कथेत जयंत पवारांना श्रीकांत सिनकर हाच निवेदक का घेतला, त्याचा तपशील मी गेले काही महिने सिनकरांच्या मुंबईवरच्या कादंबऱ्यांमध्ये शोधतोय. जयंत पवारांना तो विचारायचा राहून गेल्याची खंत मला गेले वर्षभर सतावत आहे.

यंदाच्या बुकर वाचनानेही कपाळात गेल्या असताना सैलीवर माझ्या अभ्यासवृत्तीसाठी केलेल्या टिपणातील काही कच्चा भाग इथे जोडतो. सैली हे मास्टरपीस न वाचलेल्यांसाठी... तिच्या वाढदिवसानिमित्ताने...

सैली आणि सायोनारा...

'लोकसत्ता'मध्ये प्रीतम हॉटेलचे मालक कुलवंतसिंग कोहली यांनी लिहिलेल्या सिनकर यांच्याविषयीच्या लेखामध्ये सिनकरांच्या आयुष्यातील एका पर्वाविषयीचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. वीस ते पंचवीस वर्षे सिनकर या हॉटेलात सलग जात. त्यांच्या बहुतांश आत्मचित्रांमध्ये या हॉटेलचा उल्लेख आढळतो. कोहली यांनी या लेखात म्हटले आहे की, श्रीकांत अगदी दररोज येत असे. त्याची तब्येत बरी नसेल तरच तो चुकत असे. आमच्या येथे 'ॲरिस्टोक्रॅट' या त्याच्या आवडत्या व्हिस्कीचा पेग

त्या काळात साधारणत: २५ रुपयांना मिळत असे. तो व त्याचे मित्र वीसएक पेग घेत असत. तो त्याच्या मित्रांना कधीही पैसे देऊ  देत नसे. त्या काळात दिवसाला पाचेकशे रुपये खर्च करणारा तो आमचा ग्राहक होता. जेवढी वर्ष त्याला येता आले तो आला. त्याने कधीही आमच्याकडे उधारी ठेवली नाही. रोजच्या रोज पैसे द्यायचा.' १९८० च्या दशकामध्ये जवळजवळ दररोज पाचशे ते हजार रुपयांचे मद्यासेवन करणाऱ्या या मराठी लेखकाला ही चैन परवडते कशी हा प्रश्न त्यातून निर्माण होतो.  कितीही गाजका असला, तरीही मराठी लेखकाचा दैनंदिन खर्च आणि सिनकर यांचा ऐषोआरामी थाट कुणालाही चाट पाडू शकतो. पण या सगळ्यांचा थांग जाणून घ्यायचा असेल, तर 'सैली : १३ सप्टेंबर' या त्यांच्या आत्मचरित्रात्मक पुस्तकाचा एक दिवसीय अनुभव अत्यावश्यक आहे.

'न्यूयॉर्कचा जगन', 'दत्तू बॉयलर', 'सैली : १३ सप्टेंबर', 'जीन जिमलेट' या पहिल्या आवृत्तीतील व्यक्तिचित्रांमध्ये या लेखकाच्या लेखकाच्या लहानपणापासूनच्या आयुष्याचा बाह्ूयांगाने बराच उलगडा होऊ शकतो. काही वर्षांपूर्वी या पुस्तकाची दुसरी आवृत्ती आली. ज्यात 'सुंदर सावली पडली' या पुढल्या लिहिल्या गेलेल्या एका लेखाची भर पडली आहे. यात व्यक्तिचित्रे आणि आत्मचित्रे यांची इतकी जबरदस्त गुंफण झाली आहे, की ते वाचल्यावर आजवर मराठीत अशा प्रकारचे प्रामाणिक लेखन झाले नाही, हे कुणीही कबूल करेल.

१९५५ साली मटकापूर्व काळातील 'न्यूयॉर्क कॉटन' लॉटरीचा एक प्रकार हाताळणाऱ्या मध्यस्ताशी मैत्रीने वयाच्या पंधराव्या वर्षात आलेली लक्ष्मीगंगा, देशी दारुच्या अड्ड्यावरच्या दत्तू बॉयलरकडे शिकलेली दारू गाळपाची प्रक्रिया, वेश्येवरच्या अमाप प्रेमाचा फुलगुच्छ स्वत:च्या हाताने कुस्करणारा आषक मस्त कलंदर आणि श्रीमंत जीन जिमलेटसोबतच्या आरस्पानी क्षणांच्या गाथा या व्यक्तिचित्रांमध्ये दडल्या आहेत. सिनकरांविषयी अधिक जाणून घ्यायचे असेल, तर या पुस्तकाच्या नव्या आवृत्तीइतका दुसरा मोठा ऐवज नाही.

'सैली : १३ सप्टेंबर' या पुस्तकाला सिनकरांनी 'आत्मचरित्राऐवजी' म्हटले होते. म्हणून माधव मनोहरांनी तिला प्रस्तावना देताना 'प्रस्तावनेऐवजी' म्हणत सिनकरांविषयीच्या तपशीलांचे मोठे गाठोडे सोडले होते. सिनकरांनी त्यांना लिहिलेले पत्रच त्यांनी प्रस्तावनेऐवजीच्या आरंभी डकवून दिले. त्या पत्रातील थोडा मायना हा सिनकरांच्या दैनंदिन जगण्याचा भाग सांगणारा आहे.

'प्रिय माधवराव,

एका महत्त्वाच्या कामांसाठी मला आपली भेट घ्यायची आहे. वस्तुत: मी आपणास आणखी काही वर्षे भेटणार नव्हतो. पण आता ते जमणार नाही.

साधारणत: एक तास आपण मला कधी देऊ शकाल? आपण कळवाल तो दिवस आणि वेळ मला मान्य असेलच; परंतु माझी थोडी अडचण अशी आहे की, सकाळी १० ते १२ आणि संध्याकाळी ६ ते १० या वेळेत मी मद्यासेवन केलेले असते. अर्थात तरीही मी आपणाबरोबर बोलू शकेन. परंतु कोणत्याही सकाळी १० पूर्वी जर आपण भेटू शकलो, तर चांगले होईल.

श्री. ग. वा. बेहेरेंचे चिरंजीव रवी माझे एक पुस्तक प्रकाशित करीत आहेत. या पुस्तकाला केवळ आपलीच प्रस्तावना हवी आहे. आपण असे का विचाराल, तर मी आपणास कोणतेच उत्तर देऊ शकणार नाही. 'मी स्वत: प्रस्तावना लिहिणार नाही. मला केवळ माधवरावांचीच प्रस्तावना हवी आहे. ते देत असतील तर ठीकच आहे. नाहीतर मला कुणाचीच प्रस्तावना नको.' असे मी बेहेरे यांना म्हणालो आहे.'

चार कथांचे बाड घेऊन सिनकर माधवरावांकडे गेले. त्यांनी त्या कथा वाचल्या आणि सिनकर यांच्या लेखनशैलीला धरूनच प्रस्तावनेची शैली अधिक

धारदार प्रामाणिक केली. अडीअडचणींच्या काळात श्रीकांत सिनकर नावाचा तरुण माझ्याकडून अमूक इतकी रक्कम घेऊन गेला. लवकरच ते परत करतो म्हणाला आणि तेरा वर्षे याने आपल्याला तोंडच कसे दाखविले नाही, याचा तपशील पुरवत त्यांनी सैलीमधील लेखनाचे यथायोग्य असे कौतुक केले.

माधव मनोहरांनी लिहिले आहे की,
आजवरचे या लेखकाचे जे लोकप्रिय लेखन होते, ते अन्य कोणाच्या अनुभवातून, लेखकाच्या संशोधनातून वा प्रारंभिक लेखन होते, त्याचप्रमाणे काहीसे कल्पनेतून निष्पन्न झाले होते. प्रस्तुत पुस्तकात जे लेखन समाविष्ट आहे, ते यापैकी कोणत्याच प्रकारचे वा जातीचे नाही. तर ते केवळ स्वानुभवनिष्पन्न आहे. आणि येथे जे अनुभव आहेत. ते ज्या पांढरपेशा मध्यमवर्गाचा तो जन्मत: प्रतिनिधी होता, त्या वर्गाचे वा त्या वर्गास शोभतील असेही नाहीत.
श्रीकांत सिनकरचे शालेय शिक्षण कोणत्या इयत्तेपर्यंत झालेले आहे, ते मला माहिती नाही. कारण साहित्याच्या क्षेत्रात अशा ॲकॅडेमिक शिक्षणाची किंमत शून्य असते. मग ते अत्त्युच्च पदवीचे असो. वा अगदी मुळीच नसो. साहित्यात जे चलनी नाणे चालते ते केवळ अनुभवाचे.'
हा अनुभव सिनकरांच्या गाठीला आफाट होता. अन् सकाळी १० ते १२ आणि सायंकाळी ६ ते १० या कालावधीत रसपानाचा नियम न बुडविणारा हा लेखक वेगवेगळ्या प्रकारचे आयुष्य कसा जगत होता, त्याची नोंद या पुस्तकातून होऊ शकेल. या पुस्तकाच्या नव्या आवृत्तीमध्ये लेखक सतीश तांबे यांची प्रस्तावना सिनकरांच्या जगण्यावर आणखी प्रकाश टाकणारी आहे. त्यात त्यांनी त्यांच्या लेखनाच्या स्वरुपाचे उत्तम विश्लेषण केले आहे.
'त्याचं अनुभवविश्व हे त्या काळातील मराठीला पेलणारं नव्हतं. अर्थात त्या काळातही भाऊ पाध्ये लिहीतच होते. ज्यांच्या कथा-कादंबऱ्यांतील आशयद्रव्य हे साधारणपणे श्रीकांतच्या अनुभवविश्वाशी मिळतं-जुळतं होतं. परंतु श्रीकांतचं लिखाण हे रिपोर्ताज पद्धतीचं होतं. शिवाजी पार्कसारख्या उच्चभ्रू वस्तीत जन्माला येऊनही श्रीकांतची उठबस ही पांढरपेशा लोकांमध्ये नव्हती.श्रीकांत कॉलेजात तर गेलेलाच नसावा आणि माझ्या अंदाजाने त्याचं शालेय शिक्षणदेखील पूर्ण झालेलं नसावं.तो स्वत: जरी त्याच्या पूर्वायुष्यावर फारसं बोलायचा नाही, तरी तो लहानपणीच घरातून पळून गेला होता आणि त्याचं आयुष्य त्यामुळे फूटपाथवरच्या लोकांबरोबर गेल्याच्या त्याच्याविषयी वदंता होत्या. सध्याच्या भाषेत बोलायचं, तर त्याची उठबस अधोविश्वातील गयागुजऱ्या लोकांबरोबर होती आणि लिखाणाचा पिंड खरं तर पत्रकाराचा होता.'
या पत्रकारी पिंडातून 'सैली : १३ सप्टेंबर'मधील व्यक्तिचित्रे उभी झाली आहेत. पण ही व्यक्तिचित्र समाजासाठी थोर माणसे असलेल्यांची नाहीत. 'न्यूयॉर्क कॉटन' ही लॉटरी चालविणारा जगन, दारु गाळप करण्याची कला साधणारा दत्तू बॉयलर, जिच्या सिनकर प्रेमात पडले ती नेपाळी वेश्या सैली आणि प्रेमभंगानंतर केवळ स्त्री सहवासाची गरज पूर्ण करू देणारी जीन . सामान्य माणसांच्या दैनंदिन चाकोरीबद्ध आयुष्यात या व्यक्ती येण्याची शक्यता शून्य. पण सिनकरांच्या आयुष्याचा ती महत्त्वाचा भाग आहेत. त्यांच्याविषयी सांगताना स्वत:विषयीची माहिती ते मुक्तपणे उधळतात.
दत्तू बॉयलरची ओळख ही विक्रोळीत नोकरीवर असताना त्यांना झाली. या नोकरीतील पगारापेक्षा अधिक खर्च त्यांचा होता. तो केवळ न्यूयॉर्क कॉटन लॉटरीमुळे पूर्ण होत होता. पगाराच्या रकमेहून अधिक तीस-चाळीस रुपये ते कॅंटिनमध्ये भरीत होते. कधी स्कूटर तर कधी कारने ते या कंपनीत जात. मित्रांवर पैशांची उधळण करीत. या कथेत दत्तू बॉयलरचा दारू गाळपाची कृती विस्ताराने वाचायला मिळते.

त्याचबरोबर त्याच्याशी वाढत गेलेल्या मैत्रीची कहाणी थक्क करते.

यातल्या सगळ्याच कहाण्यांमध्ये सिनकर यांनी जीव ओतला आहे. सर्वाधिक चटका लावून जाते, ती कथा अर्थातच 'सैली'ची. तिच्याविषयी त्यांनी केलेले वर्णन पहा.

' ... सैली हे प्रकरण विलक्षण आहे. तिचं व्यक्तिमत्त्व भव्य नाही. दिव्य नाही. आकर्षक नाही. आठ वर्षांपूर्वी आमच्या ताटातुटीच्या शेवटच्या काळात तर मी तिला 'पांढरी म्हैस', 'सफेद हत्तीण', 'गोरं पिंप' काय वाटेल ते त्या स्थूलमानास शोभेल, अशा नावाने हाक मारत होतो. पण ती कशीही असली, तरी ती माझ्यासाठी वादळ होती. ती वेश्या जरुर होती. भर बाजारात साडेतीन रुपयांपासून साडेसात आणि प्रसंगी सोळा रुपयांवर आपला देह उघडा करणारी ती वेश्या होती. आजही आहेच.पंधरा वर्षांपूर्वी मी तिला प्रथम पाहिली, जेव्हा ती नेपाळहून नुकतीच आली होेती. माझा तिचा काही परिचय नव्हता. पण जेव्हा दिसली, अगदी प्रथम दिसली, तेव्हा मनात एकच विचार आला... बायको असावी तर अशी! आखूड स्कर्ट, बाहेरच्या उघड्या मांड्या ंकवा बरीचशी उघडी पडलेली तिची छाती मी पाहत नव्हतो. मी पाहत होतो तिचा कमालीचा भावुक चेहरा, आणि त्याहीपेक्षा लाजाळुंच्या फुलासारखी तिची ओलसर नजर. त्या दिवसापासून अगदी शेवटपर्यंत एक वेश्या असूनही मला कधी ती तशी दिसली नाही. किंवा कदाचित मीच ठरविले असेन की त्या दृष्टिकोनातून तिच्याकडे पाहायचे नाही आणि अखेरपर्यंत नाहीच पाहिले. आणि यापुढेही पाहाणार नाही...'

सैलीची गाठ पडल्यावर सिनकर यांना सर्वाधिक आनंद होतो, तो तिच्याबरोबरच्या सहवासाचा. या सैलीशी आणि तिथल्या कुंटणखान्याशी वाढत जाणाऱ्या स्नेहातून निर्माण होणाऱ्या विलक्षण अनुभवांची पोतडी सिनकर ओतू लागतात. त्यांच्या बेफाट आणि दिशाहीन जीवनाला आधार द्याायला सैलीसारखेच कुणीतरी त्यांना जवळ हवे होते. सैलीच्या रुपाने ती पोकळी भरून निघाल्यामुळे त्यांच्या आयुष्याला खरी गती आली होती आणि म्हणूनच तिच्याशी लग्न करण्याचा हट्टाग्रह त्यांनी जगजाहीर केला. संपूर्ण शहरातील परिचितांमध्ये त्यांच्या या घोषणेने खळबळ माजल्याचे सुंदर मासले त्यांनी या कथेमध्ये दिले आहेत. आपण लेखक असल्याचे त्यांनी सैलीपासून लपवून ठेवले होते. त्यांचा मित्र जयंत नेरुरकर यांनी सैलीला त्याबाबत सांगितल्यानंतर सिनकर प्रचंड रागावलेले दिसतात. १९६४ पासून ते ७० पर्यंत छापून आलेल्या सगळ्या गोष्टी आणि पुस्तके त्यांनी सैलीच्या हवाली केल्या होत्या. सैलीला घेऊन बाहेर भटकणे, सिनेमा बघणे इतपत मुभा त्यांना त्या कुंटणखान्यातून मिळाली होती. कारण त्या भागाला त्यांनी आपले दुसरे घरच केले होते. वारंवार विनवूनही सैलीने त्यांच्या लग्नाचा प्रस्ताव नाकारला. १९७१ साली दारूच्या नशेत सैलीशी केलेले भांडण आणि तिला तुरुंगात टाकण्यापर्यंत त्या भांडणाचे झालेले पर्यवसान यांमुळे हे नाते तुटले. पण सैलीला ते कधी विसरले नाहीत.

आठ वर्षांनी सैलीला भेटण्याचे त्यांनी अंगावर अक्षरश: काटा आणणारे वर्णन केले आहे. १३ सप्टेंबर १९७९ रोजी तिच्या वाढदिवसाच्या दिवशी तिला भेटायला गेल्यानंतर घडणाऱ्या प्रसंगांची ती माळ वाचकाला अस्वस्थ करते. पुढे या कथेच्या शेवटी आणखी आठ वर्षांनी म्हणजे १३ सप्टेंबर १९८७ च्या दिवशी सैलीला भेटायला जाण्याचा मुहूर्त त्यांनी ठरवून टाकला होता. त्या मुहूर्ताला ते सैलीला भेटले की नाही, याचा उलगडा होत नाही. पण सैलीला गमावल्याची खंत त्यांना पुढल्या आयुष्यभर कायम साथ करून राहिली. सिनकरांनी आपल्या घरात सैलीची देवाहून मोठी तसबीर लावली होती, हे सतीश तांबे यांनी सांगितले.

सैलीशी फारकत झाल्यानंतर चार वर्षांनी अरुंधती नावाच्या एका सुस्वरुप आणि श्रीमंत घरातील

तरुणीशी त्यांची मैत्री झाली. तिच्यावरची कथा म्हणजे 'जीन जीमलेट'

या जीन जिमलेट कथेच्या आरंभाचे काही उतारे इथे मुद्दाम देतो.

' आज ८ ऑक्टोबर १९८०. सर्वपित्री अमावस्या. हे असले दिवस मला आवडणारे आहेत. अमावस्येला मी अनेक नव्यानव्या कामांचे मुहूर्त केलेले आहेत. बरीच काही चांगली कामे केलेली आहेत. प्रवासही केला आहे आणि मनपसंत पोरीबरोबर झोपलोही आहे.

जिला पाहून केवळ किळसच वाटावी, अशी झिंज्या वाढवलेली आणि डोक्यावर टोपली घेतलेली 'आवस' मागणारी कुरूप बाई पाहून मला नखशिखान्त पॉश असलेली जीन आठवली.

सिनकर यांना सैलीप्रमाणेच जीनच्या सहवासाचा सर्वाधिक आनंद होत होता. तिचा सहवास त्यांच्यासाठी नशा होती. खरीखुरी कॉकटेलची नशा. प्रीतमच्या गार्डनमध्ये, धावत्या टॅक्सीत, बिर्ला मातोश्री सभागृहात आणि फोर्ट-फाऊंटनच्या रस्त्यांवरून चालताना उघड्या वातावरणात जीनची जी नशा त्यांनी अनुभवली. त्या नशेचा एक टक्का अनुभवही 'ब्लू डायमंड'च्या किंवा हेरिटेजच्या एअरकण्डिशन रुममध्ये आली नाही, असे त्यांनी नमूद केले आहे.

या जीनने आयुष्यात कधी विमान प्रवास न केल्याची आणि त्याचे आकर्षण असल्याची माहिती मिळताच सिनकरांनी तिच्यासह विमानप्रवासाची तजवीज केल्याचे तपशील कथेत आहेत. एक मैत्रीण म्हणून आवडलेल्या जीनला स्वत:च्या बायकोच्या रुपात कधीच पाहू शकत नाहीत. उलट तीच गळ्यात पडेल ही भीती सतत राहते. 'आपण तुझ्याशी लग्न करणार नाही', या त्यांच्या वाक्यावर 'मी देखील तुझ्याशी लग्न करणार नाही', असे जेव्हा जीन उत्तर देते, तेव्हा त्या उत्तर देण्याच्या अंदाजावर देखील सिनकर भाळून जातात. किंबहूना तिच्या अतिमोकळ्या आणि बेदरकार स्वभावाचे आकर्षण त्यांना सतत वाटत राहते. तिचे वागणे आणि बोलणे त्यांना नेहमीच अस्वस्थही करते. लग्न ठरल्यावर सिनकरांच्या आयुष्यातून अचानक निघून गेलेल्या जीनच्या कृत्याचा ते कायम विचार करीत राहतात.


जीन जीमलेट या व्यक्तिरेखेसारखीच एक व्यक्तिरेखा त्यांच्या पहिल्या कादंबरीत डोकावली आहे. 'तू जिंकलीस, मी हरलो' या कादंबरीत ती कुसूम या नावाने आली आहे. त्यांचा नायक शशिकांत सिन्नरकर यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या आणि प्रचंड श्रीमंत घरातील असलेल्या कुसूमचेच जीन अतिप्रगत रुप वाटते.

दुसऱ्या आवृत्तीत 'सुंदर सावली सापडली' हे पाचवे आत्मचित्र त्यांनी लिहिले आहे. रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांच्या प्रेमात पडलेल्या नर्सचे. त्यांना परावृत्त करण्यासाठी सिनकरांनी 'सैली'ची प्रत वाचण्यास दिली. सिनकरांचा आयुष्यपट वाचल्यानंतर तिने त्यांच्यासोबत विवाहाचा निर्धार आणखी पक्का केला. संसारी झाल्यानंतरही सिनकरांच्या जगण्याचा कैफ बदलला नाही. सैलीवरचे त्यांचे प्रेम आटले नाही. 'सैली : १३ सप्टेंबर' ही झाली सैलीची एक बाजू. दुसरी बाजू पाहायची असेल, तर 'सायोनारा' ही कादंबरी वाचणे अनिवार्य आहे.

आता ही 'सायोनारा' त्यांनी कोणत्या दिवाळी अंकात लिहिली किंवा पहिली आवृत्ती कधी काढली याचा तपशील उपलब्ध नाही. गंमत अशी की अनेकांना ही कादंबरीच माहिती नाही. 'सैली'च्या नजरेतून श्रीकांत सिनकर' असे या कादंबरीचे स्वरूप आहे. ही कादंबरी इतकी गडप होती की सैलीची तीस वर्षांनी दुसरी आवृत्ती निघाली, त्यात सहज जाऊ शकली असती. सतीश तांबे यांना विचारणा केली असता, त्यांना सिनकरांनी कथा-कादंबऱ्या लिहिल्याचाही तपशील ज्ञात नसल्याचे सांगितले. 'सिनकर स्वत:विषयी कुणाला काही माहिती करून देत नसे. स्वत:च्या लिखाणापासून तो पूर्णपणे अलिप्त होता.' असेही त्यांनी नमूद केले.

सैलीला नेपाळमधून फुस लावून कसे आणण्यात आले. कारखान्यात काम लावून देण्याच्या आमिषाने मुंबईत आणल्यानंतर कुंटणखान्यात जबरदस्तीने कसे राबविले गेले, तिथे सिनकरांची म्हणजेच ‘राजा’ची सैलीशी कशी ओळख झाली, याचा सारा वृत्तान्त सैलीच्या निवेदनातून व्यक्त होतो. सैलीशी नाते तोडण्यात केलेली चूक त्यांना सुधारायची असावी. या कादंबरीच्या रुपाने त्यांनी बऱ्याच चुकांचे परिमार्जन करण्याचा प्रयत्न केला आहे. सैलीला सुखरुप नेपाळला धाडण्याचा प्रकार येथे होतो. जो वास्तवात कधीच झाला नाही. सुखान्त रुप असले, तरीही सैली आणखी ठसण्याच्या दृष्टीने सिनकरांनी प्रयत्न केलेले दिसतात. एकाच कथेची दोन रुप असलेला हा कादंबरी लेखनाचा प्रयोग त्यांनी करून पाहिला. तो यशस्वी झाला असला, तरी पुस्तक गाजले नाही. मनोरमा प्रकाशनाने ही कादंबरी ‘मोनालिसा’ या कादंबरीसह एकत्रित छापली आहे. ज्यांनी सैली या पुस्तकाचा सिनकरांचा प्रयोग भावला, त्यांच्यासाठी या कादंबरीचे वाचन अनिवार्यच आहे

-- **पंकज भोसले**



# समकाळ

दिलीप चव्हाण हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे इंग्रजीचे प्राध्यापक आहेत. राजकीय भाषाविज्ञान हे त्यांचे अभ्यासक्षेत्र आहे. त्यांची "शिक्षण : जातवर्गीय वास्तव आणि समतावादी पर्याय" (1997), "फुले-शाहू-आंबेडकर आणि जातिव्यवस्थाअंत" (1998, 2003 सहलेखन), "स्त्री शिक्षणाचा संघर्ष" (2003, 2007) "डॉ. आंबेडकर आणि भारतीय शिक्षणातील जातिसंघर्ष" (2003), "साम्राज्यवाद : भाषा आणि संस्कृती" (2005, 2011, 2014 - हिंदी अनुवाद) आणि "Language Politics under Colonialism : Caste, Class and Language Pedagogy in Western India" (2013), "समकालीन भारत : जातिअंताची दिशा" (2019, 2020), "जातवार जनगणना कशासाठी?" (2021), "कोरोना आणि स्त्री-पुरूष विषमतेचा प्रश्न" (2022) ही पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.



प्रा.दिलीप चव्हाण, नांदेड

## राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०: एक आकलन (भाग- ३ व ४)

प्रश्न : भारतात सध्या शिक्षणाची स्थिती काय आहे?

राष्ट्रीय शिक्षण धोरणात भारतातील शिक्षणाच्या सद्यस्थितीचे वास्तवदर्शी मूल्यमापन करण्याचे टाळण्यात आलेले आहे. यापूर्वीची धोरणे, आयोग, शिक्षणाच्या क्षेत्रातील उपलब्धी, अपयश यांचे परखडपणे मूल्यमापन करणे धोरणकर्त्यांना शक्य होते. तसे त्यांनी करायलादेखील हवे होते. कोणत्याही अहवालात / धोरणात संबंधित विषयाचे मूल्यमापन, सद्यस्थितीचे आकलन अपेक्षित असते.

खरंतर, या सरकारला मागील सरकारांनी शिक्षणप्रश्नाकडे कसे दुर्लक्ष केले, त्यांनी काय चुका केल्या असे मांडता आले असते. पण तसे करणे या धोरणकर्त्यांनी जाणीवपूर्वक टाळलेले आहे. याचे कारण म्हणजे, तसे केले तर भारतीय शिक्षणात मोठी वैगुण्य आहेत, हे मान्य करावे लागेल. आणि तसे एकदा मान्य केले की, त्यांच्या निराकरणासाठी कटिबद्ध असण्याची ग्वाही द्यावी लागेल. असे आव्हान पेलण्याची तयारी या धोरणकर्त्यांची नाही!

या धोरणात असे लिहिले आहे की, कोणत्याही शिक्षणव्यवस्थेचे मूल्यमापन access (उपलब्धता), equity (समता), quality (गुणवत्ता), accountability (उत्तरदायित्व) and affordability (परवडणारी क्षमता) या पाच निकषांवर करण्यात यावे. मात्र, या निकषांवर भारतातील शिक्षणाच्या सद्यस्थितीचे वास्तवदर्शी मूल्यमापन भारतातील शिक्षणाच्या सद्यस्थितीचे मूल्यमापन टाळण्यात आलेले आहे.

याच निकषांनुसार आपण भारताची स्थिती बघूयात :

Access :

राष्ट्रीय शिक्षण धोरणात शिक्षणाच्या उपलब्धतेबाबत खालील विधान करण्यात आले : “The implementation of previous policies on education has focused largely on issues of access and equity.” या विधानाने मागील धोरणांना शिक्षणाच्या उपलब्धतेबाबत ‘क्लीन चीट’ दिली. भारतात मागील ७५ वर्षांमध्ये शिक्षणाची उपलब्धता निश्चितच वाढली; पण शिक्षणाच्या उपलब्धतेचा प्रश्न पूर्णपणे सुटला नाही. तो का सुटला नाही, याची चिकित्सा या धोरणात नाही.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार, जगातील सर्वाधिक निरक्षर (एकूण निरक्षरांच्या तब्बल ३७ टक्के) हे भारतात (२८.७ कोटी) आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार ५-१७ वयोगटातील तब्बल ८.४ कोटी बालके हे शाळाबाह्य आहेत. (https://www.thehindu.com/opinion/op-ed/still-too-many-children-out-of-school/article62111134.ece) शालाबाह्य असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या इंग्लंडच्या एकूण लोकसंख्येच्या दीडपट आहे आणि जर्मनीच्या एकूण लोकसंख्येएवढी आहे.

Equity : भारतात शिक्षणातील समतेचा प्रश्न कधीही गांभीर्याने हाताळला गेला नाही. सर्वांना शिक्षण उपलब्ध करून देणे म्हणजे शिक्षणात समता आणणे नव्हे! सर्वांना समान शिक्षण, समान शैक्षणिक सुविधा (इमारत, क्रीडा, प्रयोगशाला, क्रीडांगण, पिण्याचे पाणी, शौचालय, वीज, इंटरनेट, इत्यादी) उपलब्ध करणे म्हणजे समान शिक्षण! भारतात असे घडले नाही. लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेत भारतात शिक्षणाचा प्रसार झाला; तथापि, शिक्षणप्रसारातून समाजाची घडी विस्कटली जाऊ नये यासाठी भारतीय अभिजनांनी विविध क्लृप्त्या शोधल्या. वासाहतिक काळात विकास पावलेल्या बहुस्तर शाळापद्धतीचा या अभिजनांना उपयोग झाला. स्वातंत्र्योत्तर काळात खासगी / विनाअनुदानित शाळांची रचना करून या अभिजनांनी गरीब-श्रीमंत, कनिष्ठजातीय-वरिष्ठजातीय मुलामुलींचे शालेय स्तरावरील अभिसरण टाळले. जातीसमाजातील जातीय पूर्वग्रह आणि दुजाभावाने वर्गसमाजात जात-वर्गीय रूप धारण केले.

भारतात १९७८-मध्ये खासगी विनाअनुदानित शाळांचे एकूण शाळांमध्ये प्रमाण हे ३.४ % होते; हे प्रमाण २०१७-मध्ये ३४.८ एवढे वाढले. (https://www.statista.com/statistics/1175261/india-share-of-school-enrollments-over-time-by-school-type/) आज भारताची स्थिति अजून बिकट झाली आहे. आज भारतात ३.५ लाख खासगी विनाअनुदानित शाळा आहेत आणि त्या शाळांमध्ये ८.७ कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. (https://www.youtube.com/watch?v=slBL43yLTuk)

भारतात सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाचा कायदा पारीत करण्यात आल्यानंतरची ही स्थिती आहे.

Quality : या संख्यात्मक अपयशापेक्षा गुणात्मक अपयश काही वेगळे नाही. 'असर' अहवालाने शालेय शिक्षणाच्या गुणवत्तेचे पुरते वाभाडे काढले आहेत. उच्च शिक्षणात पुरता गोंधळ आहे. गुणवत्तचे ढोल विविध महाविद्यापलये आणि विद्यापीठे स्वत:च वाजवित आहेत, परंतु आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची छबी विशेष अशी चांगली नाही. जगातील सर्वाधिक उद्धृत केल्या जाणाऱ्या ४,००० संशोधकांमध्ये (ग्लोबल हायली-सायटेड रिसर्चर्स २०१८ लिस्ट) केवळ १० भारतीय आहेत. टाइम्स हाईयर एज्युकेशन वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगनुसार जगातल्या सर्वोत्कृष्ट ३०० विद्यापीठांमध्ये भारतातील एकही विद्यापीठ नाही. पहिल्या पाचशे विद्यापीठांमध्ये भारतातील एकूण १,३०० विद्यापीठांपैकी केवळ सहा विद्यापीठे आहेत. 'ईएफए ग्लोबल मॉनिटरिंग रिपोर्ट – २०१०' नुसार शैक्षणिक विकासाच्या बाबतीत १२८ देशांमध्ये भारताचा क्रमांक १०५ वा होता. अगदी अलीकडे स्वित्झर्लंडमधील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेवलपमेंट या संस्थेने केलेल्या पाहणीत असे आढळले की, पाहणी केलेल्या ६४ देशांच्या यादीत भारताचे स्थान ५९वे होते. (https://www.thehansindia.com/hans/opinion/news-analysis/education-system-leading-india-down-the-hole-692943#)

Affordability : शिक्षणाचे मूल्यमापन करताना ज्येष्ठ शिक्षणतज्य जे. पी. नाईक (१९०७-८१) यांनी समता (equality) गुणवत्ता (quality) आणि संख्या

(quantity) हे निकष निश्चित केले होते. तथापि, जागतिकीकरणाच्या काळात शैक्षणिक मूल्यमापनाच्या नवनव्या कसोट्या प्रसृत करण्यात आलेल्या आहेत. affordability या कसोटीचा उल्लेख राष्ट्रीय शिक्षण धोरणात करण्यात आलेला आहे.

शिक्षणाची जबाबदारी ही प्राय: सरकारची आहे, या भूमिकेला जसजसे आव्हान मिळू लागले तसतशा नवनव्या संकल्पना शिक्षणविषयक चर्चाविश्वात स्थीर होऊ लागल्या. शिक्षण दिवसेंदिवस महाग होत आहे, असे अनुभवायला येत असताना ही चर्चा महागाईच्या परिभाषेत करण्याऐवजी परवडण्याच्या परिभाषेत करण्यात येत आहेत.

भारतात पालकांचा शिक्षणावरील खर्च दिवसेंदिवस वाढत चालला आहे. मागील दशकात शिक्षणावरील खर्चात चारपट वाढ झाली. १९५१-५२ मध्ये शिक्षणावर ८६.५ कोटी रुपये खासगी खर्च होता; तर २०१९-२० या वर्षी हा खर्च ५,१४, ७६३.६ कोटी रुपये एवढा वाढला. (Venkatanarayana Motkuri and E. Revathi, Private and Public Expenditure on Education in India: Treand over last Seven Decades CESS-RESEPPG Research Brief#2 18 September 2020) भारतात शिक्षणावर सार्वजनिक खर्चापेक्षा खासगी खर्चाचे प्रमाण वाढत आहे. शिक्षणाच्या खासगीकरणामुळे हे घडले.

Accountability : उत्तरदायित्व या संकल्पनेचा उल्लेख धोरणात करण्यात आलेला आहे. ही संकल्पना विद्यार्थी व शिक्षण संस्थेच्या मूल्यमापनाशी संबंधित आहे. याद्वारे विद्यार्थी, शिक्षक आणि प्रशासन यांच्या कार्यपद्धती व विकासाचे मूल्यमापन अपेक्षित असते.

शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून जबाबदारी ही राज्यसंस्थेची आहे, हे आधुनिक काळातील मूल्य आहे. भारतात ती जबाबदारी सरकारने पूर्णपणे पार न पाडता उत्तरदायित्वाची चर्चा केली जाते. म्हणजे, महाविद्यालयांमध्ये पुरेशा सुविधा उपलब्ध देता त्यांच्या मूल्यमापनाचा घाट घातला जातो. सुरुवातीला ऐच्छिक असलेले मूल्यमापन कालांतराने सक्तीचे केले जाते. अशा मूल्यमापनातून शैक्षणिक संस्थांची प्रतवारी करून तथाकथित युगवत्तेचा अभाव असलेल्या संस्थांना अनुदानापासून वंचित ठेवण्याचे विवेकीकरण करता येते.

थोडक्यात, भारताची शैक्षणिक स्थिती चिंतनीय आहे

प्रश्न - शिक्षण धोरणात राजकारण असते का?

शिक्षणाकडे पाहण्याचे साधारणपणे दोन दृष्टिकोण आहेत :

एक दृष्टिकोण काहीसा भाबडा असा आहे. यामध्ये असे गृहीत धरले जाते की, शिक्षण हे पवित्र क्षेत्र आहे. शिक्षणात राजकारण नसते. अभ्यासक असेही मानतात की, शिक्षण हे व्यक्तीविकासाचे साधन आहे. एखाद्या व्यक्तीने शिक्षण प्राप्त केल्यास तिचा विकास होतो. शिक्षणाकडे राष्ट्रविकासाचेदेखील साधन मानले जाते. विविध देशांची सरकारे, सरकारी शिक्षणतज्ज्ञ, यूनेस्को यांची धारणा साधारणपणे अशी आहे.

आपण शिक्षणाकडे जेव्हा अशा दृष्टिकोणातून बघतो तेव्हा आपण शिक्षणव्यस्थेला स्वायत्त / तटस्थ व्यवस्था म्हणून बघत असतो. तसेच, शिक्षणाचे प्राथमिक प्रयोजन हे व्यक्तीविकास आहे, असेही गृहीत धरत असतो. म्हणजे, लोककल्याण हे शिक्षणाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे, असे आपण समजतो. अशावेळी, आपण शिक्षणव्यवस्थेला व्यापक समाजव्यवस्थेचा भाग म्हणून बघण्याचे नाकारतो. शिकलेली एखादी व्यक्ति अर्थार्जन करायला लागली म्हणजे आपण तात्काळ त्या व्यक्तीच्या भौतिक उन्नयनाचे श्रेय शिक्षणाला देतो; तथापि, याच शिक्षणव्यवस्थेतून अनेक बेरोजगार तयार होतात आणि अनेक बेरोजगारांना मागे सारून एका व्यक्तीला राजगार मिळाला असतो याकडेही

आपण दुर्लक्ष करतो. एखाद्या व्यक्तीच्या बेरोजगारीसाठी आपण त्या व्यक्तीच्या अपात्रतेस जबाबदार धरतो. असा विचार शिक्षणाबाबत केलेला 'अराजकीय' विचार आहे.

शिक्षणाबाबतचा दुसरा दृष्टिकोण हा राजकीय आहे. हा एक प्रकारचा वर्गीय दृष्टिकोण आहे. या दृष्टिकोणात शिक्षणाकडे व्यापक समाजव्यवस्थेचा जैविक भाग म्हणून पाहिले जाते. इथे शिक्षणव्यवस्था ही व्यापक समाजव्यवस्थेची उप-व्यवस्था असते. समाजातील उत्पादनव्यवस्थेला शिक्षणव्यवस्था अनुकूल राहते आणि शिक्षणाचे प्राथमिक प्रयोजन हे व्यक्तीविकास नसून उत्पादनव्यवस्थेला सकुशाल मनुष्यबळ पुरविणे आणि प्रस्थापित मूल्यांना उचलून धरणारे शिक्षित तयार करणे, हे आहे असे या दृष्टिकोणात मानले जाते. म्हणून, पाऊलो फ्रेअरी (१९२१-९७) यांनी शिक्षित व्यक्तीविषयी "The educated man is the adapted man, because he is better "fit" for the world." असे मत व्यक्त केले होते.

शिक्षणाबाबतचा हा राजकीय दृष्टिकोण मार्क्सवादाने प्रभावित आहे. मार्क्स (१८१८-८३) आणि फ्रेडरिक एंगेल्स (१८२०-९५) यांनी "साम्यवादी जाहीरनामा" (१९४८) या पुस्तकात हे मत व्यक्त केले होते : "And your education! Is not that also social, and determined by the social conditions under which you educate, by the intervention direct or indirect, of society, by means of schools, &c.? The Communists have not invented the intervention of society in education; they do but seek to alter the character of that intervention, and to rescue education from the influence of the ruling class."

शिक्षणाविषयी अ. रा. कामत यांनी साधारणपणे अशी भूमिका मांडली : वस्तुतः, शिक्षणव्यवस्था ही स्वायत्त वा स्वयंभू नसते. ती जात्याच मुक्तिदायीसुद्धा नसते. आधुनिक काळातील कोणत्याही देशातील शिक्षणव्यवस्थेचे स्वरूप तेथील राजनीती व राजकीय धोरणांवर अवलंबून असते. औद्योगिक क्रांतीनंतर 'सार्वत्रिक शिक्षण' ही भांडवलशाहीची गरज बनल्यानंतर शिक्षणक्षेत्र हे राज्यसंस्थेच्या आधिपत्याखाली आणले गेले. शिक्षणावरील खर्चाचा प्रमुख वाटा सरकार उचलत असल्यामुळे सरकारचा शिक्षणव्यस्थेवर प्रभाव असतो. शिक्षणाच्या कुठल्या उपभागांना किती अर्थसाहाय्य करावे, त्यांचा कारभार कसा चालवावा, इतकेच नव्हे तर शिक्षणाचा आशय, अभ्यासक्रम, अध्यापन, परीक्षापद्धती, संशोधन इ. निर्णयाबाबत शासकवर्ग, प्रशासन यंत्रणा, विद्यापीठे आदी माध्यमांतून प्रभाव गाजवत असतो.

शिक्षणात राजकारण ओतप्रेत भरलेले असतेच. तथापि, या राजकारणाची जाणीव सर्वसामान्यांना होऊ नये, याची आटोकाट काळजी घेतली जाते.

शिक्षणधोरण कसे समजून घ्यावे, याचे प्रशिक्षण शिक्षणव्यवस्थेत दिले जात नाही. सरकारी धोरण हे 'सरकार'चे असते. त्यात राजकारण नसते. 'सरकारी धोरण' हे आपण चिकित्सा न करता स्वीकारायचे असते, असा समज करून घेतला जातो. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांचे कार्य हे सरकारी धोरणाची केवळ अंमलबजावणी करणे, हे आहे असेही समजले जाते.

शिक्षणधोरणाची आखणी करण्यात सत्ताधारी वर्गाचे हितसंबंध गुंतलेले असतात, हे समजून घेतले जात नाही. उदाहरणार्थ,

१) वासाहतिक शिक्षण आयोगांचा हेतु हा भारतीय राजकीय उग्रतेचा निरास करणे, हा होता. हंटर आयोगाने असे लिहिले की, आदिवासींचा उद्रेक कमी करण्यासाठी त्यांना शिक्षित करा. आदिवासींची विद्रोहप्रवणता कमी करणे आणि त्यांचे गृहिणीकरण करणे, हा हेतु आदिवासींच्या शिक्षणामागे होता. थोडक्यात, आदिवासींच्या शिक्षणामागे ब्रिटिशांचे विशिष्ट असे हितसंबंध होते.

२) तसेच, पहिल्या विद्यापीठ शिक्षण आयोगामागे देखील (१९४८) प्राथमिक शिक्षणाच्या प्रश्नाला दुय्यम लेखण्याचा हेतु होता. ८४ टक्के जनता निरक्षर असताना पहिला शिक्षण आयोग हा उच्च शिक्षणासाठी स्थापन करण्यात आला होता. तोही डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन (१८८८-७५) यांच्यासारख्या वर्णद्वेष्ट्या विचारवंताच्या अध्यक्षतेखाली!

३) १९८६-च्या शिक्षण धोरणात ‘जवाहर नवोदय विद्यालय’ ही महागडी आणि फसवी योजना जाहीर करण्यात आली. त्यातून राजीव गांधी (१९४४-९१) यांना उद्ध्वस्त होता चाललेल्या ग्रामीण जनतेला प्रतीकात्मक दिलासा द्यायचा होता; तसेच ग्रामीण उच्चभ्रूंना शासकीय दातृत्वातून इंग्रजी माध्यमाचे शिक्षण उपलब्ध करून द्यायचे होते. (जिज्ञासूंनी मायरन विनर यांचे “The Child and the State in India” ही पुस्तक जरूर वाचावे. https://press.princeton.edu/books/paperback/9780691018980/the-child-and-the-state-in-india)

ही केवळ उदाहरणे झालीत.


कोणत्याही शिक्षण धोरणाचे आकलन करताना दोन प्रश्न विचारले पाहिजेत. एक भौतिक हितसंबंधांबाबत आणि दुसरा मूल्य व विचार यांबाबत :

एक : या शिक्षण धोरणात कुणाचे हितसंबंध संवर्धित / संरक्षित केले जाणार आहेत?

दोन : या शिक्षण धोरणाद्वारे विचारप्रणालीचे / संस्कृतीचे कोणते राजकारण पुढे नेले जात आहे?

प्रचलित राष्ट्रीय शिक्षण धोरणदेखील राजकीय स्वरूपाचे आहे. या धोरणातील ‘राष्ट्रीय’ हा शब्द या धोरणाप्रती सहमती / अधिमान्यता मिळविण्यासाठी योजण्यात आलेला आहे. या धोरणाचा हेतू शिक्षणाचे १) खासगीकरण / ) बाजारीकरण करणे आणि २) जमातीकरण / ब्राह्मणीकरण करणे हे आहेत. याविषयी पुढे चर्चा होईलच!

- प्रा. दिलीप चव्हाण
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड
dilipchavan@gmail.com



# तर्कवितर्क

डॉ. मंदार काळे,पुणे हे संख्याशास्त्र(Statistics) विषयामधील पीएच.डी. असून त्यांनी संख्याशास्त्रीय संगणक प्रणालींवर बरीच वर्षे काम केले आहे. सध्या ते पूर्णवेळ ब्लॉगर असून विविध विषयांवर विश्लेषणात्मक लेखन करत असतात.



**डॉ. मंदार काळे,पुणे**

## बाजूबद्धता, तटस्थता आणि वस्तुनिष्ठता

१. तीन भूमिका:

आदिम काळात माणूस टोळ्यांच्या वा कळपांच्या स्वरूपात राहात होता. त्या काळातील मानसिकतेचा पगडा माणसाच्या मनावर अजून शिल्लक राहिलेला आहे. त्या काळी 'टोळी नसलेला माणूस' ही संकल्पनाच माणसाला मानवत नव्हती. तसेच आजही बाजू नसलेली, तटस्थ वा वस्तुनिष्ठ विचाराची, स्वतंत्र भूमिकेची व्यक्ती अस्तित्वात असते यावर बहुसंख्येचा विश्वास नसतो. 'ती कोण आहे?' यापेक्षा 'ती कोणत्या गटाची आहे?' या प्रश्नाच्या उत्तराचा मागोवा घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. 'त्या व्यक्तीची वैय्यक्तिक ओळख काय?' हा प्रश्नच त्यांच्यासमोर नसतो. ती कोणत्या गावाची, घराण्याची, जातीची, धर्माची आहे या प्रश्नांच्या उत्तरांतूनच समोरच्या व्यक्तीची ओळख करुन घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. हे सारे गट जन्मदत्त असल्याने प्रत्येक व्यक्तीला आपातत: मिळालेले असतातच. त्यामुळे त्यातून त्या व्यक्तीची ती एक ओळख गृहित धरणे नेहमीच शक्य होते.

एखादा प्राणी नीलगाय म्हणून वा हरिण म्हणून जन्माला येतो तेव्हा 'कळपातील एक' एवढीच त्याची ओळख असते. त्या पलिकडे, त्या कळपात वा बाहेर, त्याची वेगळी ओळख नसते. त्याचे कारण म्हणजे त्याचे म्हणावे असे वैशिष्ट्य वा वेगळेपण त्याच्याकडे नसते. पेंग्विन्सचा कळप पाहिला तर एका पेंग्विनहून दुसरा वेगळा ओळखणे जवळजवळ अशक्यच असते, इतके ते एकसारखे दिसत असतात. बहुसंख्य मनुष्यप्राण्यांचा विचारही तसाच असतो.

विकसित समाजामध्ये मात्र जन्मदत्त कळपाखेरीज ती व्यक्ती कोणत्या राजकीय पक्षाची, कोणत्या सामाजिक विचाराची, कोणत्या बुवा-बाबाची भक्त आहे यावरुनही तिचा गट निश्चित होत जातो. तसा तो तुम्हाला करावाच लागतो. अन्यथा तुम्हाला लोक एकतर आपल्या गटात गृहित धरून टाकतात किंवा त्यांच्या गैरसोयीच्या अशा तुमच्या एखाद्या भूमिकेच्या प्रतिवादाच्या सोयीसाठी तुम्हाला त्यांच्या समोरच्या, विरोधी गटाचे ठरवून टाकतात. त्यानंतर त्या गटाच्या - त्यांच्या मते असलेल्या - चुकांची, दोषांची, पापांची जबाबदारी तुमची समजून तुम्हाला जाब विचारत राहतात. यांच्याशी होणाऱ्या चर्चेमध्ये, संवादामध्ये, वादामध्ये तुमची स्वत:ची अशी स्वतंत्र असलेली भूमिका कधी येतच नाही. याचे कारण वाद-विवाद वा संवाद हा एका गटाच्या भूमिकेला अनुसरूनच करायचा असतो असा यांपैकी बहुतेकांचा समज असतो. आणि त्यामुळे बहुतेक वेळा त्या संवादाचा निवाडा होतच नसतो.

या अशा बाजूबद्ध समाजामध्ये तटस्थता नि वस्तुनिष्ठता या दोन भूमिकांची बहुसंख्येला समजही नसते. 'तटस्थ म्हणवणारी व्यक्ती ही प्रत्यक्षात कुठल्या

तरी बाजूची आहे, फक्त ती तसे जाहीर मान्य करत नाही' असा त्यांचा ठाम समज असतो. त्याचबरोबर वस्तुनिष्ठ विचार करणाऱ्या व्यक्तीने एकदा केलेली निवड ज्या बाजूला वा गटाला धार्जिणी दिसते, तीच त्याची कायमची बाजू, तोच तिचा कायमस्वरूपी गट आहे, असा ग्रह करुन घ्यायलाही त्यांना आवडते. त्यामुळे अन्य संदर्भात त्या व्यक्तीने केलेली निवड, कुठल्या अन्य गटाला वा बाजूला धार्जिणी दिसली, की त्यांना त्यात दुटप्पीपणा दिसू लागतो. वैचारिकदृष्ट्या आळशी असलेल्या या गटनिष्ठ व्यक्ती मग अशा सारासारविवेकाला प्राधान्य देऊन जगणाऱ्या, कोणत्याही गटाची ताबेदारी न स्वीकारलेल्यांना वैचारिकदृष्ट्या भोंगळ समजू लागतात... कारण त्यांच्या स्वत:च्या वैचारिक आळसाला ते सोयीचे असते!

अशा समाजामध्ये एखादा मुद्दा, प्रसंग, प्रश्न यांच्यसंदर्भात प्रत्येकाच्या आकलन वा निवाड्याच्या आधारे बाजू तयार होऊन गट पडत नाहीत. कोणत्याही प्रश्नावर, मुद्द्यांवर, निवाडा-निष्कर्षावर आपले मत हे आधीच निश्चित केलेल्या आपल्या गटाला अनुसरूनच असावे लागते. अशा प्रश्नांची उत्तरे, मुद्द्यांचे निराकरण आणि त्यासंबंधी निष्कर्ष-निवाडे हे त्या-त्या गटाचे मुखंड अथवा नेते करत असतात, आणि उरलेला गट त्यांच्या हाताला हात लावून मम म्हणत असतो.

आता हे मुखंड काही विशेष गुणवत्ता वा लायकी दाखवून तिथे पोहोचलेले असतात असेही नाही. माणसाच्या अंगी असलेली विविध कौशल्ये, गुणवत्तेचे आयाम सुतरामसुद्धा नसलेल्या प्राण्यांमध्ये नेतृत्वाचा प्रश्न केवळ बळाने सोडवला जातो. माणसांच्या कळपातही परिस्थिती फार वेगळी नसते. फरक इतकाच की निव्वळ शारीरबलापलिकडे माणसांच्या दिमतीला संपत्ती, बुद्धी, तंत्रज्ञान, गवगवा आणि सर्वात प्रभावी म्हणजे बहुसंख्या यांसारखी अन्य बलेही असतात.

या अन्य बलांच्या साहाय्याने धुरिणत्व प्राप्त केलेले हे नेते, हे मुखंड, त्या त्या प्रश्नाशी, मुद्द्याशी निगडित साधकबाधक विचार करतील याची शाश्वती नसते. त्यांचे नेतृत्व हे गुणवत्तेऐवजी बलाने प्रस्थापित झालेले असल्याने, कदाचित त्यांच्याकडे ते कौशल्य वा ज्ञान नसतेच. आणखी एक शक्यता म्हणजे त्यांना तिथे प्रस्थापित करणाऱ्यांच्या अथवा स्वत:च्या सोयीसाठी त्यांना योग्यायोग्यतेऐवजी स्वार्थानुकूल भूमिका घ्यावी लागते. आणि त्यानंतर त्यांच्या गटातील इतर तीच भूमिका अनुसरत जातात.

आता या अनुचरांनाही गटातील धुरिणांनी घेतलेली ती भूमिका कदाचित न पटणारी असू शकते. परंतु तरीही तीच योग्य हा दुराग्रह ते इतरांसमोर- विशेषत: विरोधी गटांतील व्यक्तींसमोर- धरत असतात. कारण बहुतेकांच्या आयुष्यात सारासारविवेकबुद्धीऐवजी गट-बांधिलकीला अधिक प्राधान्य असते. अभ्यास-अनुभव-आकलन यांच्या आधारे योग्यायोग्यतेचा निवाडा करण्याऐवजी माणसे गटाच्या धुरिणांनी दिलेला पर्याय, निवाडा वा निर्णय स्वीकारून मोकळे होत असतात. त्यानंतर त्यांचे डोके फक्त तो योग्य कसा हे सिद्ध करण्यापुरतेच चालत असते. इथे वस्तुनिष्ठतेचा अभाव प्रकर्षाने दिसतो.

तटस्थता आणि वस्तुनिष्ठता या दोन वेगळ्या बाबी आहेत. तटस्थता ही प्राय: निष्क्रिय असते, तर वस्तुनिष्ठता ही सारासार विवेकबुद्धीचा वापर करुन क्रियाशील निर्णय घेणारी असते. तटस्थता ही बाजू घेत नाही. तटस्थता ही कायमस्वरूपी भूमिका म्हणून स्वीकारणे शक्य आहे. माणूस सदासर्वकाळ बाजूबद्धही राहू शकतो- बहुतेक माणसे तशीच असतात. परंतु एका समाजाचा भाग असलेला माणूस सदोदित वस्तुनिष्ठ राहू शकत नाही. संस्कार, जमाव-दबाव आणि सत्ता-दबाव यापुढे झुकून त्याला प्रसंगी बाजूबद्धता किंवा तटस्थता हीच भूमिका म्हणून स्वीकारावी लागते.

इतर दोन गटांतील व्यक्तींच्या तुलनेत वस्तुनिष्ठ व्यक्तीचे वेगळेपण असे की अधिक माहिती, अधिक ज्ञान, अधिक आकलन आणि बदलती परिस्थिती यामुळे एकाच प्रकारच्या प्रश्नाबाबत, निवडीबाबत, मुद्द्याबाबत वेगवेगळ्या प्रसंगी ती व्यक्ती वेगवेगळी भूमिका घेऊ शकते. त्यामुळे ती वेगवेगळ्या प्रसंगी, वेगवेगळ्या मुद्द्यांवर परस्परविरोधी बाजूंना दिसू शकते. परंतु ज्यांना त्यामागची कारणमीमांसा ज्यांना उलगडत नाही, अशा विचारविन्मुख लोकांना तो दुटप्पीपणा वाटू शकतो. त्यातून त्या व्यक्तीला चंचलतेचा, धरसोड वृत्तीचा, सर्व बाजूंना खुष करण्याचा म्हणजे कणाहीनतेचा आरोप सहन करावा लागतो. किंवा अशी व्यक्ती 'गावाचं एक नि या गावंढ्याचं दुसरंच असतंय' म्हणून झटकून टाकली जाते.

तटस्थतेचा प्रत्यक्ष(!) फायदा नसतो तसा प्रत्यक्ष तोटाही. कारण ती कुठलीच जबाबदारी घेत नाही. तिच्यात नेमकेपणाचा अभाव असतो. अपवादात्मक प्रसंगी तटस्थता निवडीमध्ये सहभागी नसूनही ठोस भूमिका असते. क्वचित तसे जाहीर करणे हाच विशिष्ट भूमिकेला वा मुद्द्याला नोंदवलेला विरोध असू शकतो. सोबत जोडलेला फोटो पाहा. पण हा अपवादच म्हणायचा.

वस्तुनिष्ठतेमध्ये नेमकेपणाला साधण्यासाठी अभ्यास, अनुभव नि आकलन यांना महत्त्व असते. त्यांच्या आधारे घेतलेला केलेली निवड वा घेतलेला निर्णय हा विचारांती घेतलेला असल्याने त्याची जबाबदारीही स्वीकारावी लागते. पण नेमकी हीच गोष्ट बहुसंख्येला नकोशी वाटत असते. त्यामुळे जिथे हा निर्णय आयता मिळतो, अशा एखाद्या गटाशी बांधिलकी स्वीकारून ते विचारांचे इंद्रिय बंद करून टाकतात.

ही बाजूबद्ध मंडळी विचारहीन असतील तर सुखी असतात. पण त्यांच्या दुर्दैवाने त्यांच्यात निर्णयक्षमता जिवंत असेल, तर आपली भूमिका नि आपल्या बाजूची भूमिका यातील अंतर्विरोधांचा सामना त्यांना करावा लागतो. त्यातून निर्माण होणारा संभ्रम त्यांना घेरून राहातो. तटस्थतेने मुद्द्यावर बाजूच न निवडल्याने, निर्णयाची कोणतीच जबाबदारी नसते. तर वस्तुनिष्ठतेला निर्णय घेतल्यावरही 'एखादे अनुषंग तपासायचे राहिले का, त्यामुळे आपला निर्णय वेगळा असू शकला असता का?' हा संभ्रम शिल्लक राहातो.

तटस्थता केवळ प्रासंगिक भूमिकाच असू शकते. त्यात सातत्य असले, की ती घेणाऱ्याची विश्वासार्हता संपुष्टात येते किंवा ती अदखलपात्र होऊन राहते. त्याचप्रमाणे केवळ बाजूंचा विचार करणाऱ्या गटांमध्ये वस्तुनिष्ठ भूमिका घेणाऱ्याची विश्वासार्हताही संपुष्टात येते. कारण त्यांना 'हा/ही आपल्या गटाची की दुसऱ्या?' याचे ठोस उत्तर न मिळाल्याने ते त्याच्यापासून दूर राहू लागतात. तेव्हा वेगवेगळ्या कारणाने का होईना, पण तटस्थता आणि वस्तुनिष्ठता ही दोन्हीही बाजूबद्ध समाजात उपरीच ठरतात.

वस्तुनिष्ठ राहू इच्छिणाऱ्याला कायमच एकीकडे भूस्खलनप्रवण डोंगर नि दुसरीकडे खोल दरी यांच्या दरम्यान असलेल्या अरुंद रस्त्यावर चालावे लागते. अभ्यास-अनुभव-आकलन यांच्या आधारे केलेली कारणमीमांसा आणि त्याआधारे घेतलेली भूमिका समजून घेण्यासाठी कष्ट करण्याची बहुसंख्येची मानसिकता नसते. त्यामुळे त्याची ती भूमिका कुठेच वाखाणली जात नसते. ज्याला इंग्रजीत thankless job म्हणतात तशी ही भूमिका असते. सदोदित true-to-the-cause राहण्यासाठी संघर्षप्रवण राहायचे की बाजूबद्धतेमधील सुरक्षितता निवडायची हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो.

तटस्थता म्हणजे काय हे बहुसंख्येला समजते. बाजूबद्धता वा गट-बांधिलकी तर इतकी महामूर आहे की त्याबाबत अधिक भाष्य करण्याची आवश्यकता नाही. परंतु 'वस्तुनिष्ठता म्हणजे काय?' याबाबत अनेकांच्या मनात गोंधळ असतो. त्याची भाषिक वा तार्किक व्याख्या नक्कीच करता येईल, पण त्याने आकलनात फार भर पडेल याची शक्यता कमीच

आहे. त्याऐवजी, ढोबळमानाने म्हटले तर गट-विचार न करता, पूर्वग्रहांना दूर ठेवून केवळ समोरच्या प्रश्नाच्या अंगे, उपांगे, अनुषंगे आणि संदर्भ यांच्या आधारे केलेला निर्णय हा वस्तुनिष्ठपणे घेतलेला असू शकतो. यातून अस्तित्वात असलेल्या गट अथवा बाजूंपैकी एकाच बाजूला सतत धार्जिणे राहण्याची शक्यता कमी होते.

सोप्या शब्दांत सांगायचे तर प्रत्येक बाजूचे, प्रत्येक संभाव्य निवडीचे बरे नि वाईट अशा साऱ्या परिणामांची जंत्री मांडून त्यांच्या आधारे एकप्रकारे गणिती ताळा मांडावा लागतो. त्यातून ज्या बाजूचा ताळेबंद अधिक शिलकीचा अथवा कमी तोट्याचा दिसतो, त्याची निवड करावी लागते. त्यासाठी प्रत्येक बाजूची अनुषंगे नीट समजून घ्यावी लागतात. आणि यात वैय्यक्तिक आवडीलाच निवडीचे रूप मिळणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे लागते.

आपल्याला हवा तोच निर्णय यावा, आपल्याला हवी तीच बाजू जिंकावी म्हणून केलेली मांडणी वस्तुनिष्ठ नसते. समोरच्या ग्राहकाला फसवण्यासाठी दुकानदाराने तागडी एका बाजूला बळाने झुकवावी तशी असते. तिला अभ्यासपूर्ण निवडीचा दर्जा देता येत नसतो. त्यातून अनेकदा वेगवेगळ्या प्रसंगी एकाच बाजू वा गटाच्या बाजूने, विरोधात वा तटस्थ अशी प्रासंगिक निवड होऊ शकते. यातील एकच निवड सातत्याने होत राहिली तर तुमचा निर्णय, निवाडा वा मुद्दा हा biased म्हणजे पक्षपाती आहे हे गृहित धरायला हरकत नाही.

तीन उदाहरणांच्या साहाय्याने थोडे विवेचन करुन हा मुद्दा स्पष्ट करण्याच्या प्रयत्न करतो.

तीन उदाहरणे:

मध्यंतरी ’कन्यादान’ विधीवरून समाजमाध्यमांत थोडा गदारोळ झाला होता. त्यानंतर त्या विधिबाबत एक पान शेअर करण्यात आले होते. ज्यात एक विधान असे होते, ’मुलीचे वडील आता वराला म्हणतात की या माझ्या मुलीवर आजपासून माझी काहीही सत्ता नाही.’ ते विधान मला अर्थातच आक्षेपार्ह वाटले.

जन्मदात्या बापाची मुलीवर सत्ता असते? टोळीव्यवस्थेकडून स्थिर अशा समाजाकडे संक्रमण होताना माणसांमध्ये निर्माण झालेल्या खासगी मालमत्तेची कल्पना वस्तुमात्रांना लागू झाली, तशीच स्त्री-दासांनाही. वास्तविक आता स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रिसूत्री आधुनिक जगात रुजल्यावर, त्या व्यवस्थेचा शोषक अवशेष असलेला हा विधी रद्दबातल व्हायला हवा. परंतु आपल्याहून अज्ञानी अशा पूर्वजांच्या परंपरा सोडताना परंपराप्रेमी माणसाची घालमेल होत असते. त्यामुळे होता होईतो त्या न सोडता, उलट त्या अर्वाचीन विचाराशी सुसंगत कशा आहेत हे सांगण्याचा त्याचा आटापिटा चालू असतो.

एक-दोघांनी असा युक्तिवाद केला होता की ’माझ्या मुलीला हवे असेल तरच मी तो विधी करेन.’ त्यांच्या मताचा आदर राखून मी त्याच्याशी संपूर्ण असहमती नोंदवतो आहे. एखाद्याला 'स्वत:हून गुलाम होऊन राहायचे असेल तर मी त्याचा मालक म्हणून वागायला तयार आहे’ या विधानासारखे आहे हे. एकदा ते मान्य झाले की ’संस्कारातून’ (संस्कार आणि ब्रेन-वॉशिंग यात फारच पुसट फरक असतो) त्या व्यक्तीला गुलाम होण्याकडे, किमान ’मी स्वत: माझ्या इच्छेने याचा गुलाम झालो’ हे जाहीरपणे कबूल करायला लावण्याची सोय करता येतेच. एका व्यक्तीचे वस्तुकरण करणारा हा विधी माझ्या बुद्धीला साफ अमान्य आहे. त्यामुळे या प्रसंगी ’कन्यादान’ हा विधी सर्वस्वी त्याज्य असावा असा माझा निर्णय झाला.

दुसरे उदाहरण आहे एका पुरोगामी विचारवंतांनी आपल्या मुलाची मुंज केल्याचे. एका पुरोगामी गटाने त्यांच्यासोबत असलेल्या उरलेल्या साऱ्या सहमतीला बुडवून, त्या एकाच ’पापा’बद्दल त्यांना थेट प्रतिगामी ठरवून टाकले आहे.

मुंज हा मुद्दा असेल, तर गृहकार्य या दृष्टीने इथे ते विचारवंत आणि त्यांची पत्नी असे माझ्या मते दोन पक्षधर आहेत. एकाचे मत मुंज व्हावी असे आहे तर दुसऱ्याचे नको असे आहे. आणि निर्णय कोणताही घेतला, तरी एका व्यक्तीवर अन्याय होणारच असतो. आयुष्यात बहुतेक निर्णय असेच असतात. निर्विवाद निर्णय फक्त आणि फक्त वैय्यक्तिकच असू शकतात किंवा मालक-गुलाम संबंधातच असू शकतात. हा तिढा त्यांच्या पत्नीला सोयीचा निर्णय घेऊन सुटला. यात त्या मुद्द्यापुरता त्यांच्या विचाराचा पराभव झाला असला, तरी त्याने त्यांचे उरलेले सर्व विचार थेट बुडित जाऊन शून्य होतात हा बाष्कळपणा आहे असे माझे मत आहे. शिवाय त्याचवेळी व्यक्तिस्वातंत्र्य हे पुरोगामी मूल्य त्यात जोपासले गेले आहे असे माझे मत आहे.

आपल्याला श्रेष्ठ असे काहीतरी समजले आहे, नि ते इतरांवर- सर्वात आधी कुटुंबियांवर - लादणे, हे पुरोगामित्व असूच शकत नाही असे माझे ठाम मत आहे. पुरोगामित्व हे वैचारिक असते, कृती हे व्यावहारिक बंधनांनी जखडलेली असते. ती विचारांना नेहमीच अनुसरते असे नाही. शिवाय अंमलबजावणीचा प्रश्न येतो, तेव्हा एकाहुन अधिक सहभागी व्यक्तींच्या विचारांचा, कलाचा, हिताऽहिताचा विचार करावाच लागतो. कायम एकाच बाजूला प्राधान्य देणारी व्यवस्था शोषकच असते.

यात आणखी एक मुद्दा महत्वाचा. मुंज या विधीमध्ये कोणत्याही शोषणाचा, वर्चस्ववादी वारशाचा अंतर्भाव नाही. आपले मूल हे स्नातक म्हणून गुरुहाती सोपवणे, त्याला एकप्रकारे निरोप देणे, इतपतच त्याचा अर्थ आहे. इथे त्याच विचारवंतांच्या मुलीच्या लग्नातील कन्यादान विधीचा मुद्दा असता, आणि त्यांनी तिथे माघार घेतली असती, तर मी व्यक्तिस्वातंत्र्याचा मुद्दा नावाजूनही तो विधी केल्याबद्दल त्यांची निंदा केलीच असती. मुंजीबाबत ती करण्याची माझी तयारी नाही.

'मुंज ही फक्त त्रैवर्णिकांतच होते, स्त्रियांची होत नाही सबब ती विभाजनवादी आहे' हा दावा चुकीचा आहे. विभाजनवादी आहे तो नियम, विधी नव्हे! त्यामुळे उद्या एखादा बाप म्हणाला, 'माझ्या मुलीची इच्छा असेल तर मी तिची मुंज करेन.' तर मी त्याचे स्वागतच करेन. सनातनी व्यवस्थेने तो हक्क नाकारलेल्या पूर्वास्पृश्यांमध्येच कुणाला आपल्या मुलाची मुंज करावीशी वाटली, आणि त्यासाठी तो लढा देणार असेल, तर मी त्याच्या सोबत असेन.

पण मुळात त्याने तसे त्याने करावे का? या प्रश्नाला माझे उत्तर नकारार्थी आहे. कारण 'ही कर्मकांडे अनावश्यक मानून सोडून द्यावीत' असे माझे वैय्यक्तिक मत आहे. परंतु नास्तिकता लादणे आणि धर्मांतर्गत समतेचा आग्रह या दोनपैकी दुसऱ्या पर्यायामध्ये पुरोगामित्वाचा अंश अधिक आहे असे मी मानतो. अर्थात तो अंतिम थांबा असू शकत नाही.

आणि मुंजीबद्दल माझी समज चुकीची असेल आणि त्यात काही अन्यायकारक, विषमतामूलक आढळले, तर मी त्याचाही विरोध नक्कीच नोंदवेन. अधिक माहिती, अधिक ज्ञान झाल्यावर निर्णय पुन्हा तपासून पहावा, आवश्यक वाटल्यास बदलावा, हा ही ज्ञानमार्गाचा आणि पर्यायाने पुरोगामित्वाचा अविभाज्य भाग असायला हवा.

तिसरे उदाहरण माझे वैय्यक्तिक आहे. वर्षभरापूर्वी माझ्या वडिलांचे निधन झाले. त्यांचे दिवस घालावेत का याचा निर्णय मी आईवर सोपवला होता. ते करावेत असा तिचा निर्णय होता. दिवस घालणे हे आत्मा नि पारलौकिकाच्या आधारे उभे राहिलेले कर्मकांड आहे. हे दोन्हीही माणसाच्या मनातून तयार झालेले काल्पनिक व्यूह आहेत असे माझे मत आहे. यात कुठे थेट शोषण मला दिसत नाही. (जमाव-दबाव हा मुद्दा अंमलबजावणीशी संबंधित आहे, विधीशी नव्हे.) काल्पनिक गोष्टींसाठी चार भातांचे पिंड करुन ते नदीत वाहवल्याने कोणताही अन्याय वा शोषण होते, असे मला वाटत नाही. त्यामुळे ते करण्यास माझी हरकत

नव्हती. माझ्या सुदैवाने मला भाऊ असल्याने ते विधी त्याने केले. पण मी एकटा असतो तरीही गमावलेल्या माणसासाठी नव्हे, पण जिवंत व्यक्तीच्या इच्छेखातर मी केले असतेच.

परंतु आईच्याबाबत मात्र तिने जिवंतपणी ती इच्छा बोलून दाखवली असेल, तरीही तिच्या माघारी मी ते करणार नाही. कारण मी जडवादी असल्याने, तिच्या जड देहाबरोबरच तिचे अस्तित्व माझ्या दृष्टीने संपुष्टात येते. तिच्या माघारी ती कर्मकांडे करण्याने कुणाही जिवंत माणसाचे समाधान मी करणार नसतो. आणि जिचे आयुष्य संपले, माती झाली तिला माझ्या कृतीने खेद वा संतोष होण्याचा प्रश्नच उद्भवत नसतो.

तीनही उदाहरणांबाबत थोडक्यात सांगायचे तर:

माझ्या मुलीने कन्यादानाचा आग्रह धरला तर तो मी साफ नकार देईन.

मुलाने मुंजीचा आग्रह धरला तर त्यात आनंदाने सहभागी होईन.

आणि श्राद्धाचा आग्रह केवळ जिवंत माणसाच्या इच्छेखातर नाईलाजाने मान्य करेन.

हे तीनही निर्णय माझ्या आजच्या आकलनानुसार आणि प्राप्त परिस्थितीनुसार घेतलेले असतील. परिस्थिती बदलली, माझे आकलन बदलले, अधिक माहिती हाती आली, तर ते बदलू शकतात हे मान्य करुनच अंमलात आणायचे असतात हे मी विसरणार नाही. कालचा निर्णय आज सकारण चुकीचा वाटतो हे लाजत नव्हे तर अभिमानाने सांगण्याची गोष्ट आहे. कारण कालच्यापेक्षा आज आपले ज्ञान अधिक आहे याचे ते निदर्शक असते.

या तीनहीमध्ये 'अख्खी ब्राह्मणी व्यवस्थाच शोषक आहे. नि तुम्ही थोडे असे नि थोडे तसे करत अप्रत्यक्षरित्या तिचे समर्थन करता.' हा तर्क मी हास्यास्पद मानून उडवून लावतो. प्रत्येक व्यवस्था- अगदी मार्क्सच्या समतावादी तत्त्वज्ञानावर आधारित व्यवस्थादेखील, शोषणाचे उपांग घेऊनच उभी असते. त्यातील केवळ न्यूने दाखवून संपूर्ण व्यवस्था शोषक म्हणणे अगोचरपणाचे आहे. बहुसंख्य मंडळी स्वीकारलेली व्यवस्था वा गट यांच्या संदर्भात नेमके असेच करत असतात.

आपल्या गटाचे गुण तेवढे प्रातिनिधिक मानावेत नि विरोधी गटाचे अवगुण प्रातिनिधिक मानावेत हा दुराग्रह या भूतली प्रत्येक बाजूबद्ध असलेल्या व्यक्तिचा असतो असे म्हटले तर ते फार टोकाचे होईल असे मला वाटत नाही. अमक्या व्यवस्थेत अधिक वाईट गोष्टी आहेत, तमकीमध्ये कमी आहेत हे विधान केवळ पूर्वग्रहनिदर्शकच असते. जगातील सर्व स्पर्धक व्यवस्थांचा संख्याशास्त्रीय अभ्यास करुन चांगल्या-वाईटाची गणना कोणीही केलेली नाही, करता येणारही नाही. आपल्या पूर्वग्रहाला अनुकूल असणाऱ्या गोष्टी आपल्याला अधिक ठळक दिसतात नि त्यांची जंत्री जमा करत आपण त्यांना अधिकाधिक बळकट करत नेतो इतकेच.

प्रत्येक व्यवस्थेमध्ये काही त्याज्य, काही चालवून घेण्याजोगे, काही निरर्थक असूनही साजरे करण्याजोगे असते. तारतम्याने, डोळसपणे, अधिकाधिक माहिती घेऊन त्याच्याआधारे निवड करायची असते. त्यामुळे त्यातील एक निवडले म्हणजे मी त्या पुऱ्या व्यवस्थेचे समर्थन करतो, नि एक नाकारले म्हणजे तिचा विरोध करतो हे दोनही तर्क हास्यास्पद आहेत. एका हातात झेंडा नि दुसऱ्या हाती धोंडा घेतलेल्या विचार-आळशी लोकांचे आहेत.

याच्याविरोधात एक अंतिम तर्क येतो तो सामान्यतेचा. 'तुम्हाला हे जमेल हो, सामान्यांना जमेल का? एकदा एक स्वीकारले की त्यासोबत उरलेले अन्यायकारक, शोषक अनुषंगही ते स्वीकारत जातील ना?' ही तर्कसंगती योग्य आहे.

पण माझे त्यावर उत्तर असे आहे, की ही 'माझी' निवड आहे! इतरांची तीच असावी असे नाही. सर्वांनी माझ्याच पद्धतीने जावे असा माझा आग्रह नाही, असूही नये. मी काही 'जगाच्या कल्याणा आदर्श व्यवस्था' निर्माण करण्याचा चंग बांधलेला प्रेषित


नाही. माझ्या साधकबाधक बुद्धीने मी निवड करत जाईन, तुमच्या साधकबाधक बुद्धीने तुम्ही निवड करा. तुमची निवड माझ्यापेक्षा वेगळी असली म्हणून तुम्ही माझे शत्रूच काय विरोधकही ठरत नाही. 'माझी निवड वा आकलन हे निर्विवाद योग्य, नि तुमचे ते निर्विवाद अयोग्य आहे.' हा दुराग्रह धरुन एकमेकांवर लादण्याचा प्रयत्न केला नाही तरी पुरेसे आहे.

जर सामान्यांचे सामान्यत्व मान्य करत असू, तर त्यांच्या सोयीचे म्हणून, मी माझी - माझ्या मते सामान्यांहून अधिक विकसित - साधकबाधक बुद्धी फेकून देऊन त्यांच्या सोबत नेणारे प्रवाहपतितत्व स्वीकारावे; किंवा त्याचा सर्वंकष विरोध करणारे दुसरे टोक स्वीकारावे, हे ही मला मान्य नाही.

एकारलेपण हे नेहमीच समाजाला घातक असते. सामाजिक बंध खिळखिळे करणारे असते. माझ्या पुरोगामित्वाच्या नि प्रबोधनाच्या व्याख्येत विचारस्वातंत्र्य, निवडस्वातंत्र्य हे मूल्य महत्वाचे आहे. एरवी जगण्याची एक चौकट पूर्णपणे, तंतोतंत स्वीकारणे जसे अगोचरपणाचे, तसेच ती पूर्णपणे नाकारणेही. धर्मामध्ये एका समुदायाला संपूर्णपणे वाळीत टाकणे, दुय्यम ठरवणे जितके घातक नि निषेधार्ह, तितकेच इतर सामाजिक विचार स्वीकारार्ह असणाऱ्याला एका कृतीमुळे वा एखाद्या मुद्द्यासंदर्भातील मतभिन्नतेमुळे पुरोगामी वर्तुळातून बहिष्कृत करणेही. या दोनही कृती टोळी मानसिकतेच्या आणि पुस्तकप्रामाण्य मानसिकतेच्याच दिसतात. पुस्तके वेगळी असतात इतकेच.

हे सारे ऐकून आमचा एक मित्र म्हणाला होता, "म्हणजे एक प्रकारे तुझी ही वस्तुनिष्ठता परस्परविरोधी भूमिका घेण्यास उपयुक्त ठरते तर." इतक्या विवेचनानंतरही हे सार काढणाऱ्यांना इतकेच सांगेन की, 'नवजात अर्भकाची नाळ कापणाऱ्या सुरीने माणसांना भोसकताही येते; नेट लावला तर ठारही मारता येते. तिचा उपयोग कसा करायचा हे ती धरलेल्या हातामागच्या मेंदूवर अवलंबून असते. त्या कृतीची जबाबदारी घ्यावी लागते हे मात्र विसरायचे नाही.'

टीप: वस्तुनिष्ठता हा खरंतर objective इंग्रजी शब्दाचा अपुरा अनुवाद आहे. पण आता प्रचलित झाला आहे, मराठी नि हिंदीतही. त्यामुळे इथे मी तोच वापरला आहे




Scanned with CamScanner

## आकार आणि अर्थ

---

आकार आपण पाहत असलेल्या प्रत्येक वस्तूला, पदार्थाला, पदार्थांच्या समूहाला, एवढंच काय आकाशाला, पाण्याला एक विशिष्टआकार असतो आणि त्या आकारामुळं आपल्याला त्या वस्तूचं किंवा पदार्थाचं आकाररूप ज्ञान होतं. हा झाला त्या आकारांचा नेहमीचा अर्थ. आपल्या सभोवती असंख्य आकार सारखे दिसत असतात, परंतु आपल्याला त्यांची केवळ आकार म्हणून जाणीव होत नाही. चित्रकाराला मात्र त्याच्या सभोवती असलेल्या आकारविश्वाची सतत जाणीव होत असते. ही जाणीव कधी कधी इतकी तीव्र बनते की, त्याला एकाच आकारात समाविष्ट असलेले अनेक लहान लहान आकार दिसू लागतात, आणि त्या लहान आकारांतून आणखी सूक्ष्मतर आकार जाणवू लागतात. आपल्या डोळ्यांच्या क्षमतेइतके लहान आकार त्याला दिसू शकतात. आणि ह्या सर्व आकारांकडे चित्रकार एक प्रकारच्या तटस्थतेनं, केवळ आकार म्हणून पाहू शकतो.

आकाशात ढग जमू लागले की, प्रथम ढगांचे आकार, ढग सोडून उरलेल्या आकाशाचे आकार, ढगांचे क्षणाक्षणाला बदलणारे आकार, नंतर त्या ढगांतील वेगवेगळ्या रंगांचे आकार, वाऱ्यानं पिंजलेल्या ढगांच्या पुंजक्यांचे आकार, अशी आकारमालिका सुरू होते. रात्री आकाशात पाहिलं तर ताऱ्यांच्या समूहाचे आकार, त्या ताऱ्यांना अदृश्य रेषांनी जोडून मनात तयार होणारे आकार, ताऱ्यांच्या कंपनामुळं तयार होणारे आकार, असे अनेक आकार मनात केंद्रित होत असतात. ह्या सर्व आकारांचा साहजिकच एक विशिष्ट अर्थ चित्रकाराला अभिप्रेत असतो. तो अर्थ आपल्या नेहमीच्या अपेक्षा निराळा असतो. ह्या आकारांच्या परस्परसंबंधाला आणि ते सर्व किंवा त्यांपैकी आकार एकत्र येऊन बनणाऱ्या आकृतीला, त्या त्या आकाराच्या पार्श्वभूमीशी असलेल्या नात्याला, इतकंच काय तर त्या वेळी आपल्या मनात असलेल्या अमूर्त चित्रसंदर्भात असणाऱ्या वरील आकारांच्या नात्याला, चित्रकार विशेष महत्त्व देत असतो; आणि त्यामुळेच आकारांच्या रूढ अर्थापेक्षा त्याला अभिप्रेत असलेला अर्थ पूर्णतः वेगळा असतो.

आकाराचा अर्थ हा बराचसा त्याच्या संदर्भावरही अवलंबून असतो. एखादा आकार त्याच्या संदर्भातून वेगळा केला, किंवा त्याला एका संदर्भातून काढून दुसऱ्या संदर्भात समाविष्ट केलं, तर त्या आकाराचा अर्थ लागत नाही. अशा आकाराला आपण अमूर्त आकार म्हणतो. आणि ह्याउलट जर आपण असे काही अमूर्त आकार एका विवक्षित पद्धतीनं एकत्र आणले, तर त्यांत आपण आपल्याला परिचित असे अर्थपूर्ण आकार पाहू शकतो. भिंतीवर चालणाऱ्या मुंग्या प्रथम आपल्याला केवळ काळे ठिपके दिसतात, परंतु ते चालतात म्हणून आपण त्यांना मुंग्या म्हणतो. कोणत्याही वस्तूची सावली, किंवा सावल्या, त्या मूळ वस्तूच्या आकाराशी साधर्म्य साधत असल्या, तरी आपण केवळ त्या सावल्यांचेच आकार जर निरखले, तर ते आपल्याला अमूर्तच वाटतील. म्हणजेच एखाद्या वस्तूची आपण फक्त सावलीच पाहिली, तर त्या सावलीच्या आकाराचा अर्थ आपल्याला जाणवेलच असं नाही.

काही आकार सारखे बदलत असतात, तर काही त्या मानानं अचल असतात किंवा निदान तसे ते भासतात. तांदूळ निवडत असताना, ताटातलं ते धान्य

आपला आकार सारखं बदलत असतं. नळातून पडणाऱ्या पाण्याचा आकार, कारंज्यातून उडणाऱ्या फवाऱ्यांचा आकार, दिव्यातून स्रवणाऱ्या प्रकाशाचा आकार, मंद तेवत असलेल्या समईच्या ज्योतीचा आकार, पावसाच्या कोसळणाऱ्या धारांचा आकार, आकाशात चमकणाऱ्या विजेचा आकार, मांजराच्या डोळ्यांतील बाहुलीचा आकार, असे नानाविध आकार आपलं स्वरूप सारखं बदलत असतात. चित्रकाराला त्याची प्रतिमा साकारताना आकाराच्या ह्या अनेक रूपांतून एक विशिष्ट रूप, कधी त्याच्या आकारवैशिष्ट्यामुळं तर कधी त्या प्रतिमेला ते अनुरूप ठरत असल्यामुळे, तर कधी चित्रावकाशाच्या संदर्भात अटळ वाटल्यामुळं, निवडावं लागतं. ही निवड आकाराच्या ज्या विशिष्ट अर्थावर किंवा गुणावर अवलंबून असते, त्याला आपण चित्रार्थ असं म्हणू.

मोठमोठ्या इमारती, भिंती, अजस्र डोंगर, सनातन वृक्षांची खोडं, रस्ते हे आकार त्या मानानं अचल भासतात. परंतु ह्या आकारांकडे पाहण्याचा कोन, म्हणजे त्या कोनातून दिसणारी त्या आकारांची विशिष्ट बाजू त्यांचे अर्थ ठरवीत असते. आणि कधी कधी अशा दोन भिन्न कोनांमध्ये अगदी बाजू, विरुद्ध चित्रार्थं सामावू शकतात. उदाहरणार्थ, आपण एखाद्या नाण्याच्या तिसऱ्या बाजूचा विचार केला, तर केवळ ती बाजू पाहून ही नाण्याचीच एक बाजू आहे यावर आपला विश्वासही बसणार नाही; इतकी ती नाणं ह्या कल्पनेपासून भिन्न असेल. परंतु चित्रकाराला मात्र कदाचित त्याच्या चित्राच्या संदर्भात तीच बाजू सर्वात योग्य वाटेल. अशा तऱ्हेनं कोणत्याही अचल आकाराकडे पाहताना, भिन्न दृष्टिकोणांतील फरकामुळे त्या आकाराचा चित्रार्थ कसा बदलतो, ह्याची आपल्याला जाणीव होते. आगगाडीत बसून एखाद्या पर्वताकडे पाहताना आपल्याला ह्या बदलाचा प्रत्यय येतो.

काही आकार एकटेदुकटे, तर काही फक्त समूहातूनच आपला अर्थ सांगतात. अनेक रोपांच्या समूहाला आपण शेत म्हणतो. अनेक पाती एकत्र येऊन गवत तयार होतं. अनेक धागे एकत्र आले की त्याला कापड, अनेक विटा एकीवर एक रचल्या की भिंत, अनेक वृक्ष एकत्र जाले की अरण्य, अनेक थेंबांचा पाऊस, अनेक शिळांचा पर्वत, अनेक माणसांची गर्दी, वाळूच्या अनेक कणांच वाळवंट, असे अनेक आकार एकत्र येऊन एक भिन्न असा अर्थ सांगतात. चित्रकार केवळ चित्रार्थाच्या संदर्भात ह्या दोन्ही शक्यतांचा विचार करतो.

कधी कधी दोन किंवा अधिक असे वेगवेगळे आकार एकत्र येऊन त्यांतूनच नवीन आकार उद्भवतो. अशा वेळेस त्या त्या आकाराचा मूळ अर्थ नाहीसा होतो किंवा समप्रमाणात नवीन अर्थात सामावतो. आकारातील एकाचं दुसऱ्याशी असलेलं प्रमाण बदललं तर चित्रामध्ये त्या आकारांना नवीनच अर्थ प्राप्त होतो. जवळ असलेली वस्तू मोठी व दूरची लहान, हा दृक्शास्त्राचा नियम बदलल्यास आकारांचा संदर्भ व पयार्यानं अर्थ बदलतो. एका आकारात दुसरा आकार समाविष्ट केल्यानं किंवा एकाच आकाराची अनेकदा पुनरावृत्ती केल्यानं त्या आकाराचा मूळ अर्थ बदलू शकतो. उदाहरणार्थ, एखाद्या चित्रात आपण एकाऐवजी अनेक चंद्र उगवलेले पाहिले, म्हणजेच ताऱ्यांची जागा चंद्रांनी घेतली, तर आपल्या चंद्रविषयक कल्पनेचा अर्थ बदलेल. म्हणजेच आकाराच्या मूळ स्वरूपात कोणताही भेद केल्यास, त्याचा रूढ अर्थ बदलून त्याची गणना अमूर्तामध्ये केली जाईल.

आकार आणि अर्थ यांच्यामधला आणखी एक दुवा लक्षात येतो तो असा प्रत्येक आकाराचा एखादा आंतराकार किंवा विशिष्ट भाग अमूर्त असतो, पण आकार म्हणून तो स्वतंत्र असतो. कधी कधी चित्रकाराला हा आंतराकारच जास्त जवळचा व महत्त्वाचा वाटतो. चित्रात हाच भाग त्या आकाराचा अर्क ठरतो. शिवाय ह्या आंतराकारातूनच हळूहळू पूर्ण आकार दिसू लागतो, आणि त्या आकाराचा रूढ अर्थ

समजतो. उदाहरणार्थ, एखाद्या पानावरचे डाग, मातीच्या घड्याचा फुटलेला भाग किंवा तडे, कपाळावरचा व्रण, पुस्तकाच्या पानावरच्या मजकुराचा आकार किंवा मजकुरामधल्या अवकाशाचा आकार, हे आकार स्वतंत्र असतात. म्हणजे ज्या पूर्ण आकारात ते समाविष्ट असतात त्या आकारापासून ते अगदी स्वतंत्र असतात. आणि त्याच वेळी त्यांचं मूळ आकाराशी अविभाज्य असं नातंही असतं. आंतराकाराची ही निगूढता, हेच त्या आकाराचं मर्म ठरतं.

वास्तविक ह्या विश्वात असणारे सर्व आकार हे भूमितीच्या मूलभूत आकारांतूनच जन्मलेले असतात. आणि म्हणूनच आपल्या भोवती वावरणारा प्रत्येक आकार हा वर्तुळ, चौकोन किंवा त्रिकोण ह्या मूलाकाराशी नातं सांगतो. आणि गंमत म्हणजे, ह्या मूलाकारांना त्यांच्या भूमितीतील चिन्हात्मक अर्थाखेरीज दुसरा अर्थ नाही. म्हणजेच हे मूलाकार शुद्ध व अमूर्त असे आकार आहेत. आणि म्हणूनच चित्रकार एखाद्या आकाराकडे केवळ आकार म्हणून पाहू शकतो; त्या आकाराच्या रूढ किंवा व्यावहारिक अर्थाला तो विशेष महत्त्व देत नाही.

मला असं वाटतं की, शब्दाला जसा अर्थ घट्ट चिकटून असतो, तसं आकाराच्या बाबतीत होत नाही. अनेक आकार एकमेकांत सहज एकरूप होऊ शकतात. तसं शब्दांचं होत नाही. चेहऱ्यावर जसे डोळे तसे आकारात आकार गुंफले जातात, सामावले जातात. निराकाराची कल्पना फक्त शब्दांत मांडता येईल, परंतु निराकार आकारातून व्यक्त करणं कठीण आहे. कारण आकार कितीही नाहीसा एकत्र करण्याचा प्रयत्न केला तरी जे उरेल किंवा जे शिल्लक राहील तो पुन्हा आकारच असेल. थोडक्यात सांगायचं म्हणजे अगदी कोरा कॅनव्हास घेतला तरी त्या कॅनव्हासची लांबी, रुंदी व जाडी ही येऊन एक आयताकृती आकार उरतोच.

आतापर्यंत आपण आकार आणि त्याचा अर्थ यांचं परस्परांशी असणारं नातं एका विशिष्ट पातळीवरून पाहिलं. पण हे नातं आणखी वेगवेगळ्या पातळ्यांवरून अजमावणं शक्य आहे. काही वेळा चित्रामध्ये एखाद्या आकाराची अनुपस्थितीच त्या आकाराची आठवण करून किंवा जाणीव करून देते किंवा एखादा आकार केवळ दुसऱ्या आकाराचा भास उत्पन्न करण्यासाठीच योजला जातो. आकाराकडून अर्थाकडे प्रवास करीत असताना एक गोष्ट लक्षात येते ती अशी की, वेगवेगळ्या आकारांचं एकमेकांशी असलेलं नातं आणि त्यांच्या अर्थाअर्थामधला परस्परसंबंध या दोहोंत काहीच साम्य असू शकत नाही. किंवा असंही म्हणता येईल की, आकार आणि अर्थ है चित्रकलेच्या संदर्भात एकमेकांशी फारसे निगडित नाहीत. शिवाय आकाराचा चित्रार्थ हा रूढार्थाप्रमाणं भिन्न असल्यामुळं वाङ्मयीन संदर्भात त्याचा अर्थ लावता येणार नाही. कारण आकारविश्व हे संपूर्णतः वेगळं विश्व जाहे, त्याची आपली स्वतःची अशी भाषा आहे आणि त्या भाषेतच केवळ कोणत्याही आकाराचा अर्थ समजू शकेल.

शब्दांचं मला तेवढं माहीत नाही, परंतु एखादा आकार हा दुसऱ्या आकाराच्या आधाराशिवाय पाहताच येणार नाही असं मला वाटतं. म्हणजे संदर्भाशिवाय आकार असूच शकत नाही किंवा मागंपुढे दोन आकार असल्याखेरीज कोणताच आकार दिसणार नाही. आकाराच्या जगात म्हणूनच अर्थ बिचकत बिचकत वावरत असतो.

आकार बहुरूपी आहे. चित्रामध्ये तो आपली अनेक रूपं दाखवीत असतो. कधी त्याला पंख फुटतात व तो आकाशात किंवा अवकाशात उंच उंच उड्डाण करतो. कधी तो मेणासारखा वितळतो, तर कधी मोठी शिळा होऊन निश्चल होतो. आकाराच्या ज्वाला होतात. आकार प्रकाश होतो, तर कधी तो पूर्ण अंधार होतो. आकार पाण्यासारखा वाहतो. आकार पतंगासारखा तरंगतो. आकाराचा स्फोट होतो आणि त्यातून

असंख्य आकारांच्या ठिकऱ्या उपजतात. कधी हाच आकार सूक्ष्म रूपात असून नसतो, आकार विरघळतो, आकार थरथरतो, आकार गतिमान होतो. आकार फुलासारखा उमलतो. आकार खोल होतो. आकाराच्या पायया होतात. आकार जळतो, आकार विझतो. थोडक्यात सांगायचं म्हणजे आपण जे जे कल्पू ते ते आकाराचं होऊ शकतं.

आकार स्वतंत्र आहे, स्वयंभू आहे. अर्थ आकाराला नायक आहे. अर्थ आकाराला स्पर्श करतो पण शब्दासारखा तो त्याच्या मानगुटीवर बसत नाही. त्यामुळे चित्रामध्ये आकाराचा वावर अगदी मोकळा असतो. आकार अर्थाच्या अधीन नाही.आकार हा अर्थाला सहज ओलांडून पलीकडे जाऊ शकतो.आकार अर्थाच्या खांबाला बांधलेला नाही.आकाराची बांधिलकी फक्त अवकाशाशी आहे.

**( कोरा कॅनव्हास या प्रभाकर बर्वे यांच्या पुस्तकामधून जाणकारांसाठी साभार )**



CS Scanned with CamScanner

# रंगरेषा

पल्लवी पंडित,नागपूर
नेट(दृशकला) एम. एफ. ए.(पेंटिंग)सुवर्णपदक विजेती
सांस्कृतिक मंत्रालय दिल्ली-भारत सरकार द्वारा फेलोशिप
सी.शिवराम यांच्या इंडिया पेंटिंग या पुस्तकाचा भारतीय चित्रकला नावाने अनुवाद नॅशनल बुक ट्रस्ट दिल्ली द्वारा प्रकाशित. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रकला प्रदर्शनात सहभाग ,एकल प्रदर्शने.सध्या नागपूर येथे अभ्यागत अधिव्याख्याता म्हणून कार्यरत.



**पल्लवी पंडित**
**नागपूर**

## अमृता शेरगील:एक महाचित्रकाव्य



**अमृता शेर-गील** (इ. स. 1913 - इ. स. 1941)

भारतीय चित्रकलेच्या क्षेत्रात सर्वप्रथम व्यावसायिक चित्रकार म्हणून मान्यता मिळालेल्या चित्रकर्ती म्हणजे अवनीन्द्रनाथ व गगनेन्द्रनाथ टागोर यांची बहीण सुनयनी देवी (इ. स. 1875 - इ. स. 1962) आणि अमृता शेर-गील. सुनयनी देवी या साध्या गृहिणी होत्या. त्यांच्या प्रसिद्धी आणि चित्रनिर्मितीचे स्त्रोत त्यांचे पती रजनीमोहन राय हे होते. पतीच्या मृत्यूनंतर त्यांचे प्रेरणास्त्रोत जणू लोप पावले व त्या काळाच्या पडद्याआड गेल्या. सुनयनी देवींच्या आधी व्यावसायिक चित्रकार म्हणून काम केलेल्या चित्रकर्ती म्हणजे राजा रवी वर्मा यांची बहिण मंगला बाई थमपुरत्ती, मात्र त्यांना म्हणावी तशी ओळख व प्रसिद्धी मिळाली नाही. इ. स. 1880 च्या दशकात कलकत्त्यातील कला प्रदर्शनांमध्ये ओळख मिळविणारी एकमेव स्त्री चित्रकर्ती लुसी सुलतान अहमद ही मूलतः इंग्रज होती. मात्र 1930 च्या दशकाच्या अखेरच्या कालखंडात सोसायटीच्या प्रदर्शनांमधील स्त्रियांची संख्या हळूहळू वाढू लागली. या काळात युरेशियन व पारशी वंशाच्या मुली सोडल्या तर कुणीही चित्रकलेचे रीतसर शिक्षण कलाशाळांतून घेतले नव्हते. उच्चभ्रू समाजातील लोक आपल्या मुलींना चित्रकलेचे धडे देण्यासाठी घरीच शिक्षक नेमत असत आणि चित्रकलेचे हे शिक्षण म्हणजे जणू अतिरिक्त उपलब्धी म्हणून गणल्या जात असे.मात्र पॅरिस येथे कला शिक्षण घेतलेल्या अमृता शेर-गील ह्यांनी स्वतःला व्यावसायिक चित्रकार म्हणून प्रस्थापित केले. अल्पावधीत त्यांना जशी प्रसिद्धी मिळाली तसेच

टिकेलाही सामोरे जावे लागले. मंगला बाई ते अमृता शेर-गील यांच्या प्रवासावरून आपणांस समाजातील स्त्रियांचे बदलते स्थान व परिणामी स्त्री चित्रकर्त्यांच्या बदलत्या परिस्थितीचा अंदाज घेता येतो.

युरोपीय अकॅडमिक कलेचे, हंगेरियन चित्रकारांचे संस्कार झालेल्या अमृताला भारतात आल्यावर कलेतील एका वास्तवाचा सामना करावा लागला. एका बाजूला अकॅडमिक वास्तववाद व दुसऱ्या बाजूला भारतीय कलेचा पुनरुज्जीवनवाद यांना सामोरे जाताना युरोपीय अकॅडमिक वास्तववादातील फोलपणाची आणि गतकालीन भारतीय कलेचे अंधानुकरण करण्याच्या निरर्थकतेची त्यांना परखडपणे चित्रकारांना व कलासमीक्षकांना जाणीव करून द्यावी लागली. प्राचीन भारतीय चित्रकलेतील सर्जनशीलता आणि आधुनिक युरोपीय कलेतील नाविन्य यांचा समन्वय साधत स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवणारी कलानिर्मिती करून आणि आधुनिक भारतीय कलेची दिशा सूचित करण्याचा प्रयत्न करून अमृता यांनी आधुनिक भारतीय कलेच्या इतिहासात स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले, यात दुमत होण्याचे कारण नाही.

मारी आन्तोइनेत गॉटस्मन ¼Marie Antoinette Gottesmann) आणि उमराव सिंग हे अमृताचे आई-वडील. उमराव सिंग यांचे पूर्वज अमृतसर जवळील मजिथिया येथे राहत. उमराव सिंग ह्यांची वैज्ञानिक दृष्टिकोनातून जीवनाकडे पाहण्याची वृत्ती होती. 1890 च्या सुमारास त्यांनी संस्कृत भाषा शिकायला सुरुवात केली. पर्शियन भाषेचाही त्यांनी अभ्यास केला होता. वाचनाची त्यांना विलक्षण आवड होती. कथा-कादंबऱ्यांची बरीच पुस्तके त्यांच्या संग्रही होती. प्राकृतिक विज्ञान, फलज्योतिष, ध्वनिशास्त्र, सुतारकाम यात त्यांना विशेष रस होता. शिवाय ते उत्तम छायाचित्रकारही होते. उमराव सिंग यांनी भगवद्गीतेचा व अमीर खुस्रोच्या काव्याचा अभ्यासही केला होता.

अमृताची आई मारी आन्तोइनेतचा जन्म हंगेरीतील बुडापेस्ट शहरातला. मारी यांना अनेक युरोपियन भाषा बोलता येत. इटली व लंडन येथे त्या चित्रकला आणि संगीत शिकल्या होत्या. त्या एक उत्तम पियानोवादक होत्या. 1910 च्या अखेरीस लाहोर येथे आल्या असता त्यांची ओळख उमराव सिंग यांच्याशी झाली व 1912 मध्ये त्यांचा व उमराव सिंग यांचा शीख रिवाजानुसार विवाह संपन्न झाला. त्यानंतर उमराव सिंग मारी आन्तोइनेतसह हंगेरी येथे (बुडापेस्ट) रहावयास गेले.

अमृताचा जन्म 30 जानेवारी 1913 रोजी बुडापेस्टला झाला. तर त्यांची लहान बहीण इंदिरा यांचा जन्म 1914 साली झाला. त्याकाळी पॅरिस, व्हिएन्ना सारखी शहरे कलासंस्कृतीची फार मोठी केंद्रे मानली जात असली तरी बुडापेस्टही त्याबाबतीत मागे नव्हते. इब्सेन, शॉ, गॉर्की, स्ट्रिंडबर्ग यासारख्या जगप्रसिद्ध नाटककारांच्या नाटकांचे प्रयोग तेथे होत. त्यावर चर्चा होत असे. सामाजिक व सांस्कृतिक वातावरण उदारमतवादी होते. चित्रकला, संगीतकला या क्षेत्रात बऱ्याच घडामोडी होत होत्या.

1914 साली सुरू झालेल्या पहिल्या महायुद्धाची सावली हंगेरीवरही पडली. युद्धाचे चटके जनतेला जाणवू लागले. एकूण परिस्थितीचा विचार करून शेर-

गील कुटुंब 1916 च्या सप्टेंबर मध्ये दुनाहारास्ती ¼Dunaharaszti½मधील अमृताच्या आजोळी राहायला गेले. हे गाव बुडापेस्टच्या सीमावर्ती भागात होते. युद्धामुळे त्यांना काटकसरीत दिवस काढावे लागले. दुनाहारास्तीच्या एका शाळेत अमृता जाऊ लागली. ग्रीम बंधू (Grimm Brothers) व हॅन्स अॅन्डरसन (Hans Christian Andersen) यांनी लिहिलेल्या लोककथा, परिकथा यावर आधारलेली चित्रे ती रंगीत पेन्सिलनी काढू लागली. रंगीत क्रेयॉन्सनीही काही घटना-प्रसंगांची चित्रे ती काढू लागली. कथा, कविताही लिहू लागली. अमृताच्या अंगी असलेले हे कलागुण मारीच्या दूरच्या नातेवाईक असणाऱ्या अभिनेत्री यासई मारी ¼Jaszai Mari½, लेखक अरपॅड (Pastor Arpad) व मानसशास्त्रज्ञ डॉ. उहेयी(Dr- Ujhelyi)यांच्या लक्षात आले व यासंदर्भात ते मारी यांच्याशी देखील बोलले.आपल्या चित्रकलेविषयी एके ठिकाणी स्वतः अमृताने लिहिले ते असे :

“मला वाटते मी चित्रकलेची सुरुवात अशी कधी केलीच नाही. कारण मी नेहमीच चित्र काढत असे. मला वाटते माझा जन्म केवळ चित्रनिर्मितीसाठीच झाला असून मी दूसरे काहीच करू शकत नाही.”

शेर-गील कुटुंबियांची परिस्थिती खालावली होती. त्यांना भारतात यायचे होते. मात्र आता नवीनच अडचण निर्माण झाली. युद्धादरम्यान क्रांतिकारी गदर पक्षाचे संस्थापक असलेल्या लाला हरदयाल, ज्यांना भारतातून हद्दपार केले होते व ज्यांनी जर्मनीत आश्रय घेतला होता, त्यांच्याशी उमराव सिंग यांचा संपर्क होता असे सरकारच्या लक्षात आल्याने सरकार त्यांना भारतात परतण्यास मंजुरी देत नव्हते. शिवाय राजा महेंद्र प्रताप व हरवंश सिंग अत्तारी या राजकीयदृष्ट्या नकोशा असलेल्या पुढाऱ्यांशी त्यांचे सख्य सरकारच्या डोळयात खुपत होते. मात्र उमराव सिंग यांचे कनिष्ठ बंधू सुंदर सिंग जे व्हाइसरायच्या इंपिरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सदस्य होते, त्यांच्या प्रयत्नांनी शेर-गील कुटुंबाचा भारतात येण्याचा मार्ग मोकळा झाला.जराही वेळ न घालवता जानेवारी 1921 मध्ये शेर-गील कुटुंबीय भारतात येण्यास निघाले. या प्रवासात दोन आठवडे ते पॅरिस येथे मुक्कामास राहिले होते. तेथे ऑपेरा व इतर मनोरंजनाच्या स्थळांव्यतिरिक्त त्यांनी तेथील प्रसिद्ध कलादालनांना भेटी दिल्या. अमृता तेव्हा आठ वर्षांची होती. प्रथमच ती थोर चित्रकारांच्या मूळ कलाकृती पाहात होती. पुढे बरोबर एक महिन्यानी ते मुंबईला पोहोचले. नंतर काही दिवस दिल्ली, लाहोर येथे मुक्काम करून त्यांनी सिमला येथे स्थायिक होण्याचे ठरविले.

**कला शिक्षण**

अमृता आणि इंदिरा ह्या दोघींना शाळेत न पाठवता इंग्लिश व फ्रेंच भाषांची शिकवणी सुरू केली. त्या सोबतच त्यांचे नृत्य, पियानो व व्हायलिन वादनाचे शिक्षणही सुरू होते. याच काळात अमृता आपल्या रेखाटनाच्या वह्यांत जलरंगात चित्रनिर्मिती करत होती. तिची चित्रकलेतील विशेष रुची लक्षात घेऊन तिच्यासाठी मेजर व्हिटमार्श (Major Whitmarsh) यांची कलाशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. परंतु त्यांचा अधिक जोर हुबेहूब चित्रणावर असे व ते पुन्हा पुन्हा अमृतास एकच एक वस्तू रेखाटण्यास

सांगत ज्याचा अमृताला कंटाळा येत असे. त्यामुळे मेजर काही काळापुरतेच तिचे कलाशिक्षक म्हणून कार्यरत होते. या काळातील तिची बरीच चित्रे हंगेरीतील आठवणींचे चित्रण करणारी होती. आपल्या अवतीभोवतीच्या वातावरणाचे निरीक्षण करण्याची सवय तिला लागली. त्याच सुमारास हॅल बेव्हन पेटमन (Hal Beven Petman) हे सोसायटी चित्रकार सिमला येथे वास्तव्यास होते. उच्चभ्रू वर्गाचे व्यक्तिचित्रण करणे व त्यांच्या मुलांना चित्रकला शिकविण्याचे काम ते करीत. काही काळ अमृताने त्यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रकलेचे धडे घेतले. त्यांनी अमृताने युरोपमध्ये जाऊन कला शिक्षण घ्यावे असे सुचविले होते.





याच सुमारास म्हणजे साधारणतः 1923 च्या उन्हाळ्यात जूलीओ चेझारे पास्क्वीनेल्ली (Giulio Cesare Pasquinelli) हे इटालियन शिल्पकार सिमला येथे आले. त्यांची व मारी यांची भेट झाली व परिणामी जूलीओ अमृताला चित्रकलेचे मार्गदर्श करू लागले. काही काळानंतर ते इटलीला परतले. खरे तर त्या काळात कलेचे शिक्षण घेण्यासाठी भारतीय विद्यार्थी इंग्लंडला जात. मात्र उमरावसिंग यांच्या दृष्टिने इंग्लंडमधील सांस्कृतिक व बौद्धिक वातावरण सर्वसामान्य प्रतीचे होते. त्यामुळे अमृताला कला शिक्षणासाठी इटलीला पाठविण्याचे ठरले. त्यानुसार अमृताची आई, अमृता व इंदिरा 1924 च्या जानेवारीत फ्लोरेन्सला गेले व फ्लोरेन्समधील सांता अuawसियाता (Santa Annunziata) या शाळेत अमृता जाऊ लागली. या शाळेचे वातावरण पारंपरिक व कडक शिस्तीचे होते. त्या शाळेचा उल्लेख अमृता ‘ प्रशस्त, सुसंस्कृत परंतु तिरस्करणीय’ असा करते. नग्न चित्रण केल्यामुळे शाळेतून अमृताला काढून टाकण्याची चेतावणी दिली गेली. त्यानंतर काही कारणास्तव त्यांनी इटली सोडून भारतात परतण्याचे

ठरविले. फ्लॉरेन्समधील त्यांचे वास्तव्य सहा महिन्यांपेक्षा थोड्या अधिक कालावधीचे होते. आपल्या या फ्लॉरेन्स  वास्तव्याच्या संबंधात अमृता लिहिते :

”कळत न कळत इटलितील वास्तव्याचा माझ्या कलात्मक प्रगतीवर प्रभाव पडला होता. प्रबोधनकालीन इटालियन चित्रकारांप्रती आवड मला येथेच निर्माण झाली आणि त्याची छाप माझ्या  तेथील वास्तव्याच्या मधल्या कालखंडातील कलाकृतींवर पडलेली दिसून येते. या संदर्भात कोणीतरी प्रतिक्रिया देताना म्हटलेले मला आठवते ते असे : ‘माझ्या कलाकृतीतून मी जणू व्हेनेशियन चित्रकारांची परंपरा चालवत आहे.”

पुढे ती असेही लिहिते :

“आमच्या इटालियन कलाशाळेतील सुसंस्कृत वृद्ध शिक्षिकेला ‘होतकरू विद्यार्थिनी’ गमवत असल्याने अत्यंत दुःख तर होत आहेच शिवाय ही कलाशाळा सोडल्याने माझेही किती नुकसान होईल हा विचार करून तिला माझी  दया येत आहे. कारण जर मी तेथेच शिक्षण घेतले असते तर या शिक्षिकेच्या मार्गदर्शनाखाली मी उत्कृष्ठ चित्रकार झाले असते असा  विश्वास ह्या शिक्षिकेला वाटत होता .”

भारतात सिमला येथे परतल्यावर अमृताला ‘जिजस अँड मेरी कॉन्व्हेंट’मध्ये दाखल करण्यात आले. तेथील वातावरणही धार्मिक होते. मात्र अमृताने आपण  ईश्वर अथवा धर्म या गोष्टी मानत नसल्याचे सांगितले. आपली मते मांडणारे एक पत्र तिने लिहिले जे तेथील प्रमुखांच्या  हाती पडले व परिणामी अमृताला शाळेतून काढून टाकण्यात आले आणि अमृताच्या औपचारिक शिक्षणाला पूर्णविराम मिळाला. येथून पुढे साधारणतः 1929 च्या सुरुवातीच्या काळापर्यंत अमृताने आपले आयुष्य सिमला येथील ‘समर हिल’ या घरात अथवा उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील सराया या गावी (थंडीच्या दिवसांत ते तेथे जातअसत.) व्यतीत केले. या कालावधीत तिने चित्रनिर्मिती, पियानो वादन व स्वशिक्षणावर लक्ष केंद्रित केले.

1927 हे वर्ष अमृताच्या दृष्टीने  अतिशय महत्त्वाचे ठरले. त्या वर्षी अमृताचे मामा एरविन बकताय (Ervin Baktay) सिमल्यात शेर-गील परिवाराकडे राहण्यास आले. ही एक अफलातून अशी असामी होती. त्यांनी आपली कारकीर्द चित्रकार म्हणून सुरू केली, स्वतःला बऱ्यापैकी प्रस्थापितही केले, परंतु आपण काही थोर चित्रकार होऊ शकत नाही असे वाटून चित्रकारिता सोडून भाषांच्या अध्ययनाला सुरुवात केली व बावीस भाषांवर प्रभुत्व मिळविले. तेही सोडून ते तिबेट येथे गेले. साधूंच्या सहवासात पाच वर्षे राहून बौद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला व इंडॉलॉजिस्ट (भारतीय संस्कृतिज्ञ) म्हणून स्वतःला प्रस्थापित केले. चित्रकारितेची पार्श्वभूमी असल्याने आपल्या वास्तव्यात एरविन यांनी अमृताची चित्रकलेतील गती, रुची, कौशल्य लगेचच ताडले. त्यांनी तिला आपल्या सभोवतालच्या प्रत्यक्ष जीवनाचे निरीक्षण करून चित्र काढ, असा सल्ला दिला. चित्रणाची ही पद्धत अमृताने आयुष्यभर जोपासली. एरविन यांनी अमृताला सर्वतोपरी प्रोत्साहन दिले. अमृताला आपल्या या मामाबद्दल

अतिशय प्रेम, जिव्हाळा आणि आदर होता. तिने त्यांना आपल्या भावना व्यक्त करताना पत्रात लिहिले :

“केवळ तुमच्यामुळेच मी रेखाटनावर प्रभुत्व मिळवू शकले.”

पेटमनप्रमाणेच एरविन यांनीही अमृताला युरोपमध्ये जाऊन कलाशिक्षण घेण्याचा सल्ला दिला. त्यानुसार पॅरिस हे कलाशिक्षणाचे माहेरघर निवडण्यात आले. सुरुवातीस उमराव सिंग या निर्णयाशी विशेष सहमत नव्हते. त्याचे कारण म्हणजे हंगेरीतील वास्तव्यादरम्यान आलेले कटू अनुभव. मात्र नंतर ते अमृताला पॅरिसला पाठविण्यास तयार झाले.

अमृतासाठी तर जणू स्वप्नच प्रत्यक्षात उतरत होते. तिची चित्रकार होण्याची इच्छा पूर्ण होणार होती. अगदी सुरुवातीपासूनच तिचे हे ध्येय होते. अनेक अडचणी, विपरित परिस्थिती यांच्यावर मात करत ती आपल्या ध्येयापर्यंत पोहचणार होती. एप्रिल 1929 मध्ये अमृता, इंदिरा व त्यांचे आई-वडिल पॅरिस येथे येऊन पोहचले. तेथे गेल्यावर एरविन बकताय यांच्या मित्राने, जोसेफ नेमेस (Joseph Nemes) यांनी अमृताची ओळख प्रो. पिअेर व्हाइलान्त (Prof. Pierre Vaillant) या ग्रँड शॉमिएर (Grande Chaumiere) मधील प्राध्यापकांशी करून दिली. अमृताच्या चित्रांनी प्रभावित होऊन त्यांनी तिला लगेचच ग्रँड शॉमिएर मध्ये दाखल करुन घेतले. तेथे अमृताने अतिशय उत्साहात कामाला सुरुवात केली. सुरुवातीचे काही महिने तिने मानवी आकृत्यांचे प्रामुख्याने चित्रण केले तेही विशेषतः नग्नाकृतींचे. मानवी शरीरशास्त्राचे आकलन होण्याच्या दृष्टीने हा अभ्यास महत्त्वाचा ठरला.

अमृताच्या प्रगतीवर नेमेस यांचे विशेष लक्ष होते. आता त्यांनी तिला’ इकोल नॅशनल द बोआर्ट’ (**École des Beaux-Arts** )मध्ये प्रवेश घेण्याचे सुचविले. त्याप्रमाणे त्यांनी तेथील प्रा. लुसियन सायमन(Lucien Joseph Simon) व अमृता यांची भेट घडवून आणली. अमृताच्या कलाकृती पाहून सायमन प्रभावित झाले. तेथील प्रवेशाची वयोमर्यादा अठरा वर्षे असून सुद्धा वयाने लहान असलेल्या अमृताला त्यांनी आपल्या कलाशाळेत दाखल करून घेतले. सायमन हे उत्कृष्ठ कला शिक्षक होते. आपल्या गुरुबद्दल अमृता म्हणते:

“सायमन यांनी ‘शिकविले’ कधीच नाही. त्यांनी आम्हाला स्वतःला विचार करायला आणि स्वतःचे तांत्रिक प्रश्न स्वतः सोडवायला सांगितले. जे विद्यार्थी आपल्या कलाकृतीत स्वतःच्या भावना व्यक्त करीत त्यांना ते विशेष प्रोत्साहन देत आणि माझ्या कलाकृतीत स्व-अभिव्यक्ती साधण्यासाठी मी नेहमीच जागरुक असे, नव्हे हाच तर माझ्या चित्रांचा गुणधर्म होता आणि माझ्या चित्रकार म्हणून जडण- घडणीचा पाया होता.”

अमृताला आपली विद्यार्थिनी म्हणून निवडल्यावर काही दिवसातच सायमन यांनी तिला उद्देशून लक्षवेधी उद्गार काढले. ते तिला म्हणाले :

“भविष्यात मला, तू माझी विद्यार्थिनी होती याचा सार्थ अभिमान असेल.”

इकोल दि बोआर्ट येथे कला शिक्षण घेत असतानाच अमृता ‘अल्फ्रेड कॉर्तो स्कूल’ (Alfred Cortot School) या संगीत शाळेत पियानो वादनाचे धडेही

घेत होती. आता मात्र या दोन कलांपैकी तिला एकीची निवड करायची होती. हा एक कठीण निर्णय होता कारण अमृताला चित्रकलेइतकीच संगीताचीही ओढ होती. मात्र अमृताने चित्रकलेची निवड केली. तरीही संगीत मात्र तिने कधीच सोडले नाही. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत तणावग्रस्त परिस्थितीत ती संगीताच्याच आश्रयाला जायची.

काही काळासाठी पॅरिसमधील दिखाऊ, उच्चभ्रू लोकांची, वातावरणाची अमृतावर भुरळ पडली. मात्र लवकरच ती त्याला कंटाळली आणि झपाटल्यासारखी चित्रनिर्मिती तिने सुरू केली. तीन वर्षे ती इकोल द बोआर्टची विद्यार्थिनी होती आणि तीनही वर्षे तिने तेथे व्यक्तिचित्रण आणि स्थिरचित्रणासाठी पारितोषिके पटकाविली होती. या काळात अमृताने पेन्सिल, चारकोलमध्ये असंख्य रेखाटने केली. तैलरंगात काम सुरू केले शिवाय फ्रेस्को चित्रणपद्धती शिकली.

1933 मध्ये अमृताने केलेले 'प्रोफेशनल मॉडेल'हे चित्र लक्षणीय आहे. शरीररचनाशास्त्राच्या अभ्यासासाठी तिने ह्या चित्राची दोनदा पुनःनिर्मितीही केली होती. ही दोन चित्रे 'अ स्टडी इन ब्राऊन' आणि 'स्टडी ऑफ मॉडेल (ग्रीन) ' म्हणून प्रसिद्ध आहेत. हे एका वृद्धेचे चित्रण असून उदास, दुर्लक्षित आणि वृद्धत्वाच्या भावनेनी ही स्त्री ग्रासलेली दिसते. आपल्या तरुणपणी चांगले जीवन जगणारी ही महिला परिस्थितीने हताश व खंगलेली दिसते. 1933 च्या सॅलॉन द सर्कल इंटरनॅशनल फेमिनन (Salon du Cercle International Feminin) येथे ही कलाकृती प्रदर्शित झाली असता डेनिस प्रॅाटु (Denise Proutaux) या पॅरिस स्थित कला समीक्षिकेने भारावून दिलेला अभिप्राय उल्लेखनीय आहे. त्या म्हणतातः

"ही एवढी तरुण मुलगी आपल्या आजूबाजूचे जग इतके स्पष्ट आणि कुठल्याही भ्रमाशिवाय बघावयास कुठे शिकली?"

भारतीय कला समीक्षक इला सेन अमृताच्या कलेसंबंधी लिहिताना म्हणतात :

"अनेक भारतीयांना अमृता शेर-गील यांचे कलाविषय करूप वाटतात पण अमृता यांची सौंदर्याची परिभाषा ही सर्वसामान्यांपेक्षा निराळी होती."




प्रोफेशनल मॉडेल

जेव्हा अमृता यांना त्यांच्या करूपतेबद्दलच्या आकर्षणाविषयी विचारले गेले तेव्हा त्यांनी मान्य केले की कुरूप आणि दुःखी व्यक्ती त्यांना सुंदर वाटतात आणि आपोआपच आनंदी, उत्साही व्यक्तींपेक्षा अशा

दुःखी-कष्टी, उपेक्षित लोकांचे चित्रण करण्याची ऊर्मी मनात दाटून येते.

1930 - 1932 या काळात अमृताने केलेल्या लक्षणीय कलाकृती म्हणजे 'सेल्फ पोर्ट्रेट', मारी लुईस (Marie Louise) या तिच्या प्रिय मैत्रिणीचे व्यक्तिचित्रण आणि 'टॉर्सो' ही कलाकृती. टॉर्सो 1932 च्या सॅलॉनच्या वार्षिक प्रदर्शनात प्रदर्शित झाली असता 'जर्नल दे आर्टस्'च्या (Journal des Arts) व इतर कलासमीक्षकांचे या कलाकृतीने विशेष लक्ष वेधून घेतले.


सेल्फ पोर्ट्रेट


मारी लुईस

1934 च्या प्रदर्शनात लावण्यात आलेले अमृताचे 'कन्वर्सेशन'(1932) चित्र जे 'यंग गर्ल्स' म्हणून ओळखल्या जाते तिच्या कारकिर्दीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठरले. या कलाकृतीमुळे अमृताची ग्रँड सॅलॉन येथे 'असोसिएट' म्हणून निवड करण्यात आली. अमृता या सन्मानासाठी निवडली गेलेली सगळयात कमी वयाची व पहिलीच एशियन व्यक्ती असावी. अतिशय भव्य आकाराची (52.5'' X 64.5'') ही कलाकृती असून निवड समितीसमोर ही कलाकृती सादर केल्यावर त्यांनी दिलेला प्रशंसापूर्वक अभिप्राय अमृतातील उत्कृष्ठ चित्रकाराची जाणीव करुन देतो. तो अभिप्राय असा :

"तू तर केवळ एक लहान मुलगी आहेस. हे चित्र तू रंगविणे खरंच शक्य आहे का? ही कलाकृती पाहून आम्हाला वाटत होते की, कमीत कमी तीस वर्षे चित्रनिर्मितीचा अनुभव असणाऱ्या व्यक्तीने ती साकारली असावी."

या आधी म्हणजे 1933 साली अमृताने केलेली लक्षणीय कलाकृती म्हणजे'रिक्लायनिंग न्यूड.' याच कालखंडात अमृता भारतात परतण्याचा गंभीरपणे विचार करू लागली. पॅरिसच्या वस्तुसंग्रहालयात भारतीय कलेचा एखादा नमुना जरी दिसला तरी ती हरखून जात असे. भारतीय कलेची मौलिकता तिला खुणावू लागे. आपण युरोपला गेलो नसतो तर कदाचित अजिंठ्याच्या असामान्य भित्तिचित्रांचे मोल आपल्याला कधीच कळले नसते, असे तिने म्हटले आहे. तिच्या या निर्णयाला सायमन यांनी उत्तेजन दिले. आपल्या प्रिय व विलक्षण कलागुण असणाऱ्या विद्यार्थिनीची होणारी ताटातूट दुःखद असली तरीही अमृताच्या कलाविष्कारासाठी स्टुडिओतील निस्तेज व धूसर वातावरणापेक्षा

भारतातील प्रकाशमान वातावरण अधिक योग्य आहे असे त्यांचे मत होते.



‘कन्वर्सेशन’



‘टॉर्सो‘


पॅरिसमध्ये कलाशिक्षण घेत असताना अमृतावर उत्तरदृक्-प्रत्ययवादी (Post Impressionist) कलाकारांचा विशेषतः व्हॅन गॉग (Van Gogh) व पॉल गोगॅ (Paul Gauguin) यांचा विशेष प्रभाव होता आणि मॉडिग्लियानी(Amedeo Modigliani) हा तिचा आवडता चित्रकार होता. तर रेन्वाच्या (Pierre-Auguste *Renoir)* चित्रकलेची ती विशेष चाहती होती. अमृताच्या सुरुवातीच्या चित्रांवर आपणास काही प्रमाणात रेन्वाची छापही दिसून येते. मात्र आपणांस तिच्या कुठल्याही कलाकृतीत या चित्रकारांची अनुकृती केलेली आढळून येत नाही. या सर्व थोर चित्रकारांकडून शिकून अमृताने स्वतःचा असा वेगळा मार्ग, वेगळी ओळख निर्माण केली होती.

गोगॅच्या केवळ रूप (फॉर्म) आणि रंगांनी अमृता भारावली नव्हती तर जुन्याचा आणि नव्याचा मेळ त्यांनी ज्या बेमालूमपणे आपल्या कलाकृतीत साधला होता त्या कौशल्याकडे ती आकर्षित झाली होती आणि ज्या तऱ्हेने फ्रांस सोडून मार्टिनीक आणि ताहिती या बेटावर गेल्यावर गोगॅमधील चित्रकार बहरला त्याचप्रमाणे आपल्यातला खरा चित्रकार आपल्याला भारतातच गवसेल असा तिचा ठाम समज होता. अमृतासाठी तिचा स्वतःचा आत्मा आणि भारतीयत्वाला जोडणारा गोगॅ हा जणू दुआ होता.

■ पल्लवी पंडीत, नागपूर

# कलाप्रवास

शरद तरडे,पुणे
ज्येष्ठ प्रतिथयश चित्रकार व चित्र समीक्षक
अनेक सोलो व ग्रुप प्रदर्शनात सहभाग, चित्रकार अरुण पाथरे या पुस्तकाचे लेखक व संपादक, स्वतःचा studio kaleido



शरद तरडे
पुणे

## मी आणि माझा कलाप्रवास

मी चित्रे काढायला लागल्यापासून त्या आधी मला ती काढावीशी का वाटली हे सांगणे मला महत्त्वाचे वाटते.


खूप वर्षांपूर्वी मी चित्रकलेचे प्राथमिक शिक्षण घेतले आणि नंतर मी माझ्या आवडीची फोटोग्राफीचे ही शिक्षण घेतले . त्यावेळी आमच्याकडे "याशिका" हा कॅमेरा होता त्यावरच मी माझा व्यवसाय चालू केला . तेव्हापासून फोटोचे कंपोजिशन , प्रकाश- छायेचा समातोलपणा या महत्वाच्या गोष्टी अंगात भिनल्या होत्या , तेव्हा काढलेले फोटो हे लोकांपेक्षा खूप वेगळे आहेत हे ही लक्षात आले एवढेच नव्हे तर त्यासाठी ते माझ्याकडे येतात हे लक्षात आले .

नंतरच्या काळात पाथरे सरांकडे शिल्पकला , म्युरल शिकताना त्यामध्ये निर्माण होणाऱ्या खोलीचे [ Depth ] महत्व मला आवडू लागले होते , त्रिमितीच्या पुढेही काही गोष्टी आहेत हे काम करताना कळू लागले आणि त्या विचारात मी गुंतुन जात होतो , एखाद्या शिल्पाचा मागील भागाचा विचार करताना मला खूप पर्याय सुचत आणि तो मी स्केच काढून अनुभवत असे . या माध्यमात खूप काम केल्यावर मी २-३ वर्षे कागदावर स्केचेस करीत चित्रांकडे वळलो .

या दरम्यान शेकडोनी केलेल्या स्केचेसचे याचे काय हा विचार मनात आल्यावर "कोलाज" हे माध्यम घेऊन मोठे पेन्टिंग करावे असे मनात आले .त्यावेळी माझ्या स्टुडिओत एका कपाटाचा मोठा दरवाजा मला खुणावू लागलं आणि त्यावरच पेपरवर केलेल्या स्केचेसचे ५-६ इंचाच्या पट्या कापून घेतल्या व रंगसंगीतानुसार मी आणि सुचिताने त्या दरवाज्यावर चिकटवून टाकले. काहीतरी वेगळे होते आहे हे लक्षात आल्याने खूप छान वाटत होते . नंतर हे सर्व एकसंध दिसावे म्हणून त्यावर पांढऱ्या आणि काळ्या रंगाने काम केल्याने स्केचमधील रंग खूप आकर्षक आणि उठून दिसू लागले. हेच माझे पहिले चित्र होते .

मी आता पुन्हा कृष्ण धवल रंगात काम करावे असे मला वाटू लागले कारण ते मला फोटोग्राफीमुळे जवळचे भासत होते . ग्रे रंगामध्ये हाय की , लो की मध्ये शेडींग करताना , त्यात खेळताना मला खूप मजा यायची ,ब्रश स्ट्रोक्स , नाईफचा प्रयोग त्यातून निर्माण होणारी खोली [ Depth ] यात मी गुंग होऊ लागलो . रंग वाळल्यावर छटा बदलली कि आणखीन मजा यायची .

नंतर रंगामध्ये काम करताना शिल्पामध्ये आत्मसात केलेली खोली चित्रामध्ये आणण्याचा प्रयत्न करू लागलो , गडद रंगाशेजारी उजळ रंगाचा वापर करून हे साधता येते हे कळले , रंगाचे शिकलेले व्याकरण बदलून ते वापरणे खूप काही शिकवून गेले .





ब्लु रंगाशेजारी ऑरेंज , क्रिमझन रंगाशेजारी पांढरा आणि ग्रे , घनदाट निळ्याशेजारी पिंक आणि यलो ऑकर अश्या रंगांनी चित्रात खूप खोली आणि वेगळंपण जाणवायला लागलं .

मी चित्र काढताना मलाच माहित नसते कि मी काय आणि कुठले काढणार आहे , मी फक्त रंगांशी आणि मनाशी खेळणे चालू असते , यावेळी मला बाकी काही आठवत नाही . ज्यावेळी माझ्या अंतर्मनाची अस्वथता कमालीची वाढते आणि ती माझ्या मनाला भिडते त्या वेळी जे चित्र तयार होते ते माझे चित्र असते असे वाटते .

प्रत्येक वेळी असे घडतेच असेही नाही , खूप वेळी चिथरातील रंगसंगती खूप भडक वाटते , मनाला त्यातले आकार पटत नाहीत अश्या वेळी मी काम बंद करतो आणि दुसऱ्या दिवशी त्या चित्रावर वेगळ्याच रंगाचा लेप पूर्ण लावत असे आणि मग ओल्या फडक्याने आतील गडद किंवा फिके रंग पुसून काढत असे ,अश्याने ते चित्र खूपच वेगळे होत राहायचे , हि प्रक्रिया मला खूप आवडायची , त्यातच रमून जावे असे वाटायचे . अशाने ते चित्र खूप

अमूर्त चित्र हे प्रत्येक रसिकाला वेगवेगळे आस्तित्व दाखविते त्यामुळे ते त्याच्याकडून समजावून घ्यायला मला खूप आवडते कारण त्यांच्यासारखा मी माझ्या चित्राकडे बघू शकत नाही . हि चित्रे जशी वेगवेगळ्या मूड मध्ये बघावीत तशी ती मनात बहरत जातात आणि क्षणाक्षणाला वेगळी भासतात हे महत्वाचे!

मी जमेल तेव्हा भरपूर वाचन ते ही वेगवेगळ्या विषयाचे तसेच आवडत्या प्रदेशात जाऊन तिथल्या लोकांमध्ये राहून त्याची संस्कृती समजावून घेण्याचा प्रयत्न करत असतो , ट्रेकिंग ला जात असतो , निसर्गाच्या सानिध्यात रहातो , त्याच्यातील क्षणाक्षणाला होणारा बदल अनुभवत असतो ! बाकीच्या चित्रकारांशी संवाद साधून त्यांचेकडून काय शिकता येईल ते शिकत असतो . कलेमधील सभ्यता शिकून घेतली तर आपल्यातील बदल आपण सहज स्वीकारू शकतो असे मला वाटते.

कलाकृतीही कधीही एकटी येत नसते तर सर्व बघितलेल्या , अनुभवलेल्या , स्वप्नातल्या गोष्टी एकत्र येऊन बनत असते . ज्या चित्रातून उर्जा वहात असते , सभोवताल प्रसन्न होत असतो तेच खरे चित्र! एकदा ते प्रदर्शनात लागले कि ते चित्रकारापासून अलिप्त होते आणि स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव रसिकांना दाखवते आणि माझी चित्रं त्यांच्या नजरेतून समजाऊन घेणे हि प्रक्रिया माझ्यासाठी खुप प्रेरणादायक असते हे नक्की!

खरं तर सर्व गोष्टी शिकून पुन्हा विसरून लहान मुलांसारखी निरागसता चित्रात आणणे ,त्यात पूर्ण रमणे हे जमले कि आपण आणि चित्र वेगळे रहात नाहीच असे मला वाटते.

**शरद तरडे**

Studio Kaleido.

21,Natasha,D.P.Road,Opp.D.A.V.Road,Aundh,

Pune:411007

Mob.9422010418.

# शरद तरडे यांची चित्रे





# कलाप्रवास

केदार श्रीरंग कुलकर्णी, नाशिक
मुक्तचित्रकार म्हणून काम सुरू आहे



केदार श्रीरंग कुलकर्णी
नाशिक

## रेखाचित्र एक माध्यम


मी केदार श्रीरंग कुलकर्णी. मी नाशिक येथे राहतो. मी रेखाचित्र आणि अमूर्त चित्र शैलीत माझे चित्र साकार करतो. जेष्ठ चित्रकार प्रभाकर कोलते सर हे माझे गुरू आहेत. सरांनी केलेलं मार्गदर्शन आणि वाचनाची लावलेली गोडी ह्यांमुळे एक चित्रकार म्हणून मी घडलो आणि घडत आहे. मी रेखाटत असलेल्या रेखाटनाविषयी मी काहीएक बोलण्याचा प्रयत्न करतो.खरे तर एका बिंदूतून तयार होणारी रेषा ही अनंतात विलीन होण्याची ताकद ठेवते. रेखाचित्र हे आपण अनेक माध्यमात साकार करू शकतो.


माझी रेखाचित्र मीही अनेक माध्यमात साकार केली आहेत.म्हणजे माझी सुरुवात ही खरी पेन्सिल पासून झाली अनेक महिने सुरुवातीच्या काळात मी माझी रेखाचित्रांचा सराव हा पेन्सिल मध्ये करत असे.मग त्यात मानवी चित्र, निसर्गचित्र,वस्तू चित्र, या सर्व गोष्टींचा समावेश होत होता.


रेखाचित्रांचा अभ्यास हा मी प्रथम पेन्सिलने सुरू केला.आधी रेखाचित्राचे तंत्र आणि मानवी आकार (मानवी शरीर ) याचा अभ्यास चालू झाला.सुरुवातीला रेखाचित्रांचा सराव नसल्याने माझे कित्येक चित्र ही फसली.मग अनेक प्रयत्न केले. रेखाचित्र हे माध्यम जितके दिसायला सोपे तितके ते अवघड आहे. मला रेखाचित्र हे माध्यम खूप अवघड जात होते.माझे निरीक्षण अणि माझ्या हाताचे समन्वय साधले जाईना.अशावेळी मी खूप निराशा होत असे. आपल प्रत्येक चित्र फसत्येय हे दिसत होतं.कित्येक चित्र ही अर्धवट सोडून दिले होते.

पण एकदा अचानक एक दिवशी ठरविले हातात स्केच बुक घेतले अणि स्केचिंगला सुरुवात केली समोरील बसलेल्या मॉडेलचे बारीक निरीक्षण केले अणि स्केचला सुरुवात केली. मॉडेल वर पडलेले छाया प्रकाश अणि त्या मुळे तयार होणारी रेषा याचे निरीक्षण केले. समोरील मॉडेलचा शरीर बांधा याचं निरीक्षण करत स्केच केले आणि ते स्केच पूर्ण झाल.नंतर ते पाहिले तर ते स्केच खूप चांगले झाले होते अर्थात त्यात चुका होत्या पण आता पर्यंत करीत आलेल्या सुरवातीचे ते पाहिले चांगले स्केच होते.

त्या चित्रापासून खरी माझ्या रेखाचित्र ला सुरवात झाली.या रेखाचित्रा पासूनच खरे तर मला रेखाचित्राची सुरवातही कळली. मग त्या नंतर रोजची दैनंदिनीच माझी रेखाचित्र झाली.जिथे जिथे वेळ अणि जागा मिळेल तिथे तिथे मी स्केचिंग करू लागलो. सगळीच स्केच चांगले किवा बरोबर होत नव्हती पण माझे निरीक्षण अणि स्केचिंगचा सराव मात्र चालू होता रोजचा सराव अणि निरीक्षणशक्ती हा सुद्धा रेखाचित्राचा पाया आहे असे मी समजतो. यात माझे महाविद्यालयातील चित्रकार प्रफुल्ल चव्हाण सर. अणि माझे गुरू श्री प्रभाकर कोलते सर यांचे मार्गदर्शन मला लाभले.









सरांचे मार्गदर्शन अणि माझे प्रयत्न यातून हळू हळू स्केच मध्ये सुधारणा होत होत्या.स्केचिंग मुळे निरीक्षण शक्ति सुद्धा चांगली होत होती. डोळे अणि हात याचं समन्वय साधल्या जाऊ लागले. रेषांचा अभ्यास अणि निरीक्षण यामुळे माझ्या चित्रात चांगले बदल आणि हळू हळू मी माझ्या रेषे पर्यंत जात होतो अणि त्यातून मला माझी अशी स्वतःची रेषा भेटली. माझ्या रेषेत लयात्मकता येऊ लागली. रेषेत सहजता अणि त्याच बरोबर रेखाचित्र सुद्धा सहज होऊ लागले.

रेखाचित्र यात चित्रकाराचे निरीक्षण त्या सोबत त्याचे डोळे अणि हात याचे समन्वय अणि माध्यम,रेखाचित्राचे तंत्र इथून रेखाचित्राची सुरवात होत असते असे मला वाटते.

रेषेने साकार केलेले चित्र म्हणजे रेखाचित्र.

रेखाचित्राची भाषा एकच ती म्हणजे रेषा.

समोरील वस्तू,घटक हा एक फक्त एक आकार आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे मग तो आकार सजीव की निर्जीव हे बाजूला टाकून त्या वस्तूवर असलेला छाया प्रकाश याचे निरीक्षण करून त्यावर झालेला बदल आणि त्या बदलातून निर्माण झालेल्या रेषा,रेषेचा आभास याचं निरीक्षण करून तयार होत असलेला आकार हा रेषेच्या माध्यमातून मांडणे.समोरील वस्तूच निरीक्षणातून वस्तूवर असलेला छाया प्रकाशाने रेषेचे बदल अणि त्या मुळे रेषेचे बदलते भाव हे खूप महत्वाचे असतात.वस्तूवर असणारा छाया प्रकाश याचा होणारा बदल हा वस्तू वरील रेषेत सुद्धा बदल करत असतो.

रेखाचित्र यात चित्रकाराचे कसब आणि त्याचं माध्यमावरील प्रभुत्व हे देखील महत्वाचे आहे.

तंत्र अभ्यास अणि माध्यमाचे प्रभुत्व हे महत्त्वाचे आहेच.

पण तंत्र अभ्यास,माध्यमा वरील प्रभुत्व,कौशल्य याने रेखाचित्र तर साकार होतील पण त्यात रेषेची भाषा तिची रेषात्मकता सुद्धा हवी.

रेखाचित्रात रेषेला खूप महत्त्व आहे. रेखाचित्र साकार करताना चित्रकाराला तंत्र,कौशल्य, माध्यम यावरील त् प्रभुत्व ,त्याचा योग्य तो समतोल अणि निरीक्षणशक्तिने वस्तूचा रेषेच्या भाषेत केलेला विचार आणि त्याला सृजनात्मक आणि उस्फूर्त पणे रेषेला दिलेली साद यातून रेषेची भाषा अणि तिची रेषात्मकता गवसत असते असे मला वाटते.

आपल्या दिसणारे दृश्य त्या दृश्याचा अनुभव त्या अनुभवला आपण आपल्या रेषेत द्वारे दिलेला प्रतिसाद म्हणजे रेखाचित्र असे मी समजतो.

तर रेखाचित्रात चित्रकाराची रेषा,रेषात्मकता, रेषेद्वारे दिलेला प्रतिसाद अणि समोरील वस्तूचे, दृश्याचे रेखाटन आणि वस्तूचा मुळे रुपात रेषेचा साह्याने केलेला आमूलाग्र बदल (transformation) त्याची सहजता रेषेत द्वारे केलेले दृश्याचा किवा वस्तूचा विचार हा खूप महत्त्वाचा असतो.

जशी रेषेत सहजता हवी तशीच सहजता रेखाचित्रात हवीत.

समोर काय आहे या पेक्षा ते आपल्या कसे दिसते आहे हे महत्वाचे आहे. मी करीत असलेल्या कामाचे वर्णन शब्दात करणे माझ्यासाठी खूप कठीण गोष्ट आहे.जे काही सूत्ररूपाने मांडण्याचा मी प्रयत्न केला तो समुद्राच्या किनाऱ्यावरील मूठभर वाळू उचलण्यासारखे आहे.हा प्रयत्न आपण समजून घ्यावा. माझे चित्रातून आणि रेषेतूनचे बोलणे अधिक स्पष्ट आहे.ते तुम्हाला भावेल असे वाटते.

**********

**केदार श्रीरंग कुलकर्णी**

# सिनेटोन

स्वप्नील चव्हाण ,जळगाव
कवी ,कथालेखक , चित्रपट ,नाटक याचे अभ्यासक ,सध्या सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथे पी.एचडी करिता संशोधन



**स्वप्नील चव्हाण**
**जळगाव**

## सिनेमा आणि प्रतिमा : 3
## फँड्री :एक मिथक,एक प्रतिमा

---




२०१४ मध्ये प्रदर्शित झालेला 'फॅन्ड्री' हा सिनेमा मराठी चित्रपटसृष्टीतला एक माईलस्टोन सिनेमा ठरला. 'फॅन्ड्री' पूर्वीचा सिनेमा आणि 'फॅन्ड्री' नंतरचा सिनेमा अशी मराठी सिनेमाची ठळकपणाने वर्गवारी करता येईल इतपत त्याचं महत्व अबाधित आहे. दिग्दर्शक म्हणूनही नागराज मंजुळे यांचा पूर्ण लांबीचा हा पहिलाच सिनेमा. तत्पूर्वीच्या बहुतांशी मराठी सिनेमाला व्यापून असलेली मनोरंजनप्रधानता , प्रेक्षकानुनयी आणि आकडेशरण असलेली रूढ चाकोरीबद्ध वृत्ती मोडून काढत नागराज काहीतरी हटके करू पाहतोय ह्याची दमदार चाहूल देणारा 'फॅन्ड्री' हा सर्वार्थाने एक पोएटिक सिनेमा. रूढार्थाने अभिनय म्हणजे नक्की काय? ह्याचा साधा मागमूसही नसणारी casting नागराज आपल्या सिनेमांमध्ये करत असतो. गावात काही समारंभ असला की हलगी वाजवणारा सोमनाथ अवघडे. रूढ समाजव्यवस्थेने परिघाबाहेरच ठेवलेल्या आणि ज्याचा अभिनयाशी आजवरच्या आयुष्यात दूर दूर पर्यंत कधी संबंध आलेला नाही अशा पोराला तो आपल्या सिनेमाचा

हिरो करतोय. त्यावर्षीचा Best Child Actore चा National Award त्याला मिळतोय. ही मराठीच नाही तर भारतीय सिनेमातील दुर्मिळ घटना म्हणावी लागेल.

- नागराजची Casting आणि अभिनयाचे तंत्र ह्यावर सविस्तरपणे बोलता येईल. चर्चा करता येईल. अभिनय विद्यापीठीय शिकण्यातून , तंत्रातून विकसित होतो. ही धारणाच नागराज आपल्या कामातून खोटी ठरवू पाहतोय. ज्यांना आजवरच्या आयुष्यात अभिनयाचा जराही गंध नव्हता. अशांकडून अभिनय करून घेतोय आणि तो अभिनय लोकं Aprisiet करताहेत हे 'सैराट' 100 कोटीत जातोय , ह्यावरून सहज सिद्ध होतंय. तूर्तास फॅन्ड्रीतल्या मला खास वाटलेल्या आणि फॅन्ड्रीचा इसेन्स असणाऱ्या एका मिथकावर आणि एका प्रतिमेवर बोलूया.

१) काळ्या चिमणीच्या राखेचं मिथक :

- साधारणपणे 'फॅन्ड्री' हा सिनेमा तुम्ही पाह्यलाय हे गृहीत धरून त्याच्या कथेची पार्श्वभूमी सांगणं टाळतो. तर चंक्या हा गावातला उपादीखोर मनुष्य (जब्याचा बाप कचरू त्याचा उल्लेख बाराचा असा करतो) ह्या चंक्या कडून जब्याला कळतं की काळ्या चिमणीची राख आपल्याला आवडणाऱ्या पोरीच्या डोक्यावर टाकली की ती आपल्याला वश होते. आणि मग पौगंडावस्थेतला जब्या त्याचा मित्र पिऱ्या सोबत काळी चिमणी घावायला हवी म्हणून माळरानं धुंडाळतो. जंग जंग पछाडतो. रात्री त्याला काळ्या चिमणीचीच स्वप्नं पडतात. की त्याने शालूच्या डोक्यावर चिमूटभर राख टाकताच ती त्याला संपूर्ण वश झालीये. त्याच्यावर जीव कुर्बान करू लागलीये. पण अखेर पर्यंत जब्याच्या हाताला काळी चिमणी काही घावत नाही. जगातल्या श्रेष्ठ कलाकृतींमध्ये काहीतरी एक समान आंतरसंबंध असलेला दिसून येतो. आता हाच धागा तुम्ही सॅम्युयल बेकेटच्या 'Waiting for Godot' ला लावून बघा. तिथं नाटकभर Godo येण्याची वाट पाहिली जातेय आणि Godo नाटकभर येत नाही. इथं काळी चिमणी हाती लागण्याची जब्या वाट पाहतोय जी सिनेमाभर त्याच्या हाती लागत नाही. भारतीय तत्वज्ञानात श्रेयस आणि प्रेयस ह्या दोन संज्ञांची चर्चा ओघाने येऊन जाते. थोड्या वेगळ्या अर्थाने सांगायचं तर ह्यातलं 'श्रेयस' म्हणजे जे करायला हवं ते. श्रेयस्कर , उचित ह्या अर्थाने. आणि 'प्रेयस' म्हणजे जे करतो वा नियती जे करवून घेते ते. माणसाचा आध्यात्मिक संघर्ष हा कायम ह्या श्रेयस आणि प्रेयस वर आधारभूत असलेला संघर्ष असतो. ह्यातलं श्रेयस फक्त एखाद्या शाब्दिक आभासी बुडबुड्यातून माणसाच्या समोर उभं केलं जातं जे कधी हाती लागतच नाही. Godo ची प्रतीक्षा , काळ्या चिमणीचा शोध ह्याचं आकलन तत्वज्ञानाच्या 'श्रेयस' ह्या संकल्पनारूपाने करता येऊ शकतं. जे हवंय , जे मिळवायला हवंय , ज्याला भेटायलाच हवंय असं सगळं जग सांगतंय आणि तरीही ते शोधता शोधता आयुष्य ओंजळीतून निसटून जातंय तरीही हाती लागत नाहीये असं अनाकलनीय श्रेयस.

- ह्या काळ्या चिमणीच्या मिथकाचा एक ह्याहून निराळा अर्थ जब्याच्या परिणामी वर्गव्यवस्थेतल्या खालच्या स्तरातील समूहमनात (आदिबंधात) शोधता येऊ शकतो. ते कसं तर बघूया. जब्या आणि जब्याला जी मुलगी आवडतेय ती शालू

ह्यांचा वर्ग पूर्णपणे भिन्न आहे. शालू ही गावच्या पाटलाची पोरगी. तर जब्या हा वेळ आलीच तर डुक्कर पकडून गुजराण करणाऱ्या , पिढ्यानपिढ्या शोषित म्हणून जगणाऱ्या कैकाडी समाजातील कचरू मानेचा पोरगा. जब्याला ती मनोमन आवडतेय. त्याला त्याचा एकमात्र मित्र पिऱ्या दुजोरा देतोय की 101 टक्के ती तुझ्याकडंच पाहत होती म्हणून. पण जब्याचं कुटुंब व समाजव्यवस्थेनं घडवलेलं दुसरं एक सुप्तावस्थेतलं सामूहिक मन आहे जे म्हणतंय की ती आणि आपण एकत्र येणं. तिचं आपल्यावर प्रेम बसणं हे ह्या जन्मात तरी शक्य नाही. जातीपातीने बरबटलेल्या आणि जातच आयडेंटिटी असणाऱ्या भारतीय समाजात तरी अजिबातच नाही. कितीही सामाजिक बदल झालेत , संविधानात्मक लोकशाही जरी आली तरी पाया आणि इमला एकत्रितपणे कसे काय नांदू शकणार? हे झालं पिढ्यानुपिढ्या जोपासलेलं न्यूनगंडात्मक समूहमन. मग असं मन आडमार्ग शोधू लागतं. जादूटोणा , मूठ मारणं , वशीकरण आणि तत्सम बंगाली बाबांचे Pamplet ह्या सरळमार्गावरील विश्वासच उडालेल्या न्यूनगंडात्मक समूहमनाला रिझवण्यासाठी दिवसांगणिक उत्पादित होतात. अर्थशास्त्रातील मागणी तसा पुरवठा ह्या नियमाप्रमाणे उत्पादित होत राहतात. काळ्या चिमणीच्या राखेचा अजूबा हा सुद्धा तशाच एका खच्चीकरणाचा आवाज म्हणून येतोय. त्या दृष्टीने पाहू गेल्यास त्या मिथकाची रचना अधिक स्वच्छपणे उलगडू शकते. जसं की कुणी पैसे लाटलेत आणि ते वसूल करण्याचे सगळे मार्ग थकलेत , कोसळलेत की आपण आतल्याआत तळतळाट करतो - परमेश्वर आहे ना तो बघून घेईल त्याला. भरेल. तसं काहीसं हे आहे. जब्या करून करून काहीही करू शकणार नाही. म्हणून चंक्या सारखी माणसं पिढ्यानुपिढ्या चालत आलेली अप्राप्य गोष्ट त्याच्या माथी नकळता मारताहेत. काळी चिमणी जशी जब्याच्या हाती लागणार नसते तशीच पाटलाची शालू सुद्धा लागणार नसतेच. आणि जरी यदाकदाचित लागलीच तर त्याचा शेवट किती भयानक होऊ शकतो हे नागराज पुढच्याच फिल्ममध्ये (सैराट) दाखवतोय. सर्जनशील फिल्ममेकर आपल्या सांस्कृतिक भवतालाला खुबीने पेश करणारी मिथकं रचत असतो. त्यामुळे सिनेमाची भाषा ही युनिव्हर्सल अशी पोएटिक भाषा होऊन जाते. फॅन्ड्री मधील काळ्या चिमणीच्या राखेचं मिथक हे पिढ्यानुपिढ्या शोषित , वंचित म्हणून जगणाऱ्या एका मोठ्या समूहाचा आदिबंध आपल्यात सामावून घेत प्रेक्षक म्हणून आपल्याला अंतर्मुख होऊन विचार करायला भाग पाडतं.

२) जब्याने हाणलेला दगड :

- जब्याचा बाप कचरूवर कुटुंबासकट गावातील डुकरांचा उपद्रव वाढल्याने एके दिवशी डुक्कर पकडायची आफतरुपी जबाबदारी येते. शेवटचा अर्धा तास सिनेमात डुक्कर पकडायचा थरारक सिन रुपेरी पडद्यावर हैदोस घालत राहतो. इथं 'फॅन्ड्री' आजवरच्या पार्क वा दिवाणखानाकेंद्री मराठी सिनेमाची परिभाषा मोडून काढतो. आणि सिनेमाचा संपूर्ण उत्तरार्ध पडदाभर निव्वळ डुकरांचा हैदोस दाखवतो ज्यांच्या नायनाटासाठी एक माणूस कुटुंबातील सर्व सदस्यांसकट पछाडला गेलाय. इथं कामाची निवड ह्या गोष्टीला कवडीचीही किंमत

नाहीये. किंबहुना गावपातळीवरचा सामाजिक दबावच एवढा जबरदस्त आहे की त्यापुढे नकार म्हणजे गावातून बहिष्कृत होणं. त्यात जब्याच्या बहिणीचं पुढल्याच दिवशी लग्न आहे. आणि आदल्याच दिवशी ती डुक्कर पकडायला मदत करतेय. इथं लग्नाच्या आधल्या दिवशी आधीच्या सिनेमातली उच्चवर्णीय वा मध्यमवर्गीय नवरीमुलगी कुठं असते आणि काय करत असते? ह्याची जरा कल्पना करून बघा. आणि त्या तुलनेत सामाजिक वास्तवातील हे विरोधाभासी समाजचित्राचे कंगोरे बघा. ह्या सगळ्यात जब्याला हा प्रसंग प्रचंड मानहानीकारक वाटतो. कारण हा सगळा प्रसंग त्याच्या शाळेसमोरच घडतोय. आणि गंमत पाह्यला शाळेतली पोरंपोरी , गावातलं टवाळखोर टोळकं कोंडाळं करून अंतर ठेवून उभी आहेत. जब्याकडे मजा म्हणून बघताहेत. त्यात शालू देखील आहे. इथं जब्याच्या निरागस वयातील स्वप्नाळूपणाला आग लागते. भावभावनांची राख होते. अपमान , अवहेलनेची आणि समाजाने ठरवून दिलेली आणि बळजबरी लादलेली हीच आपली लायकी ह्याची दुःखद जाणीव जब्याला मनोमन होते. तो त्वेषाने बळ एकवटून डुक्कर पकडतो. त्याच्या मुसक्या बांधतो. एका काठीला बांधून पुढे त्याची बहीण आणि मागे तो डुक्कर धरून नेताहेत. मागोमाग गावातल्या टवाळ दाणगट पोरांचं त्याला फॅन्ड्री - फॅन्ड्री (डुक्कर-डुक्कर) म्हणून अमानुषपणे हिणवणं सुरूय. हे सगळं शालूने सुद्धा पाह्यलंय. ती देखील कुत्सितपणे बघून ह्या सगळ्याची मजाच घेत होती. ह्याची जखम अजून ओलीच आहे. काठीला उलटं बांधलेलं डुक्कर शाळेच्या भिंतीजवळून जातंय , त्या भिंतीवर बाबासाहेब आंबेडकर , सावित्रीबाई फुले , गाडगेबाबा ह्यांच्या प्रतिमा चितारलेल्या आहेत. कॅमेरातून बॅगग्राऊंडला दिसणारे बाबासाहेब आंबेडकर , गाडगेबाबा , सावित्रीबाई जणू काही मुर्दाड समाजाला प्रश्न विचारताय की आमचा लढा , आमचा संघर्ष ह्याच दिवसासाठी होता का? किंवा असं म्हणूया की त्या प्रतिमा असं सांगताहेत की पुन्हा एकदा आंबेडकर , गाडगेबाबा ह्या महामानवांच्या विचारांकडे नव्याने बघण्याची वेळ कधी नव्हे ती आज येऊन ठेपली आहे. शिका , संघटित व्हा आणि संघर्ष करा. हा मूलमंत्र पुन्हा एकदा जीवनसूत्र करून लढण्याची वेळ आली आहे. काहीही असो ही फ्रेम अंगावर येते. संवेदनेची बत्ती विझवून स्वांत:सुखाय डुलक्या घेणाऱ्या प्रेक्षकांच्या सणसणीत थोबाडीत वाजवते. पुढे 'फॅन्ड्री - फॅन्ड्री' च्या अपमानकारक क्रूर अशा आरोळ्या वाढत जातात. त्यांचा गदारोळ जब्याच्या कानठळ्या बसवतो. त्याला साहवेनासा होतो. आणि मग एका पॉईंटला जब्या खांद्यावरचं डुक्कर खाली टाकतो आणि हातात दगड घेऊन त्वेषाने हाणतो. जो समोरचा रुपेरी पडदा फाडून थेट समोर बसलेल्या प्रत्येकावर आदळतो. ज्याचा दृश्य आणि साऊंड इफेक्ट तुम्हांला थिएटरच्या खुर्चीतल्या खुर्चीत काही क्षण फ्रीज करतो. जब्याने आपल्यावर हाणलेल्या दगडामागे त्याच्या कैक पिढ्यांचं समाज म्हणून आपण केलेलं खच्चीकरण अध्याहृत आहे. त्याहूनही पलीकडे हा हाणलेला दगड एका नव्या संघर्षाची , बस आता नाही सहन करणार , ह्या वेदना - विद्रोह - नकारची त्रिसूत्री नकळता सांगून जातो. खरं म्हणजे त्यानंतर जब्याचं आणि त्याच्या कुटुंबियांचं जगणं किती मुश्किल होऊन गेलं असणार? ह्या भयप्रद कल्पनेने सिनेमा संपतो. मात्र जब्याने पूर्ण त्वेषाने

हाणलेला दगड आपण पुढची कैक वर्ष विसरू शकत नाही. सिनेमा प्रेक्षकांना गुंगवणारा त्यांच्यावर संमोहन करणारा नसावा तर त्यांना जागं करणारा , त्यांना खोलवर अंतर्मुख करून आत्मभान देणारा , आरशात चेहरा दाखवणारा , आपण तसेच आपला समाज नक्की कुठल्या बिंदूवर उभे आहोत हे तपासून पाह्यला लावणारा असावा. अशी भूमिका ज्या थोड्याफार लोकांनी वेळोवेळी आपल्या कामातून घेतलेली आहे. त्या लोकांच्या प्रभावळीला उजागर करणारा 'फॅन्ड्री' हा एक अस्सल देशी वाणाचा सिनेमा आहे. ज्यातला जब्याने हाणलेला दगड माणूस म्हणून तुम्हांला स्वस्थ बसू देणार नाही. तो तुम्हांला समाज म्हणून स्वतःला जाब विचारायला आणि जाब द्यायला भाग पाडतो.

स्वप्निल चव्हाण , जळगाव
8484927072



# चवथी खोली

डॉ.सुकेशनी बोरकर-बन्सोड
ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपूर येथील नेवजाबाई हितकारणी महाविद्यालयात विज्ञानाच्या अधिव्याख्याता
स्त्रीवादी चळवळीवर विशेष लेखन, अनेक साहित्य संस्थांचे पदाधिकारी



डॉ.सुकेशनी बोरकर-बन्सोड

## स्त्रियांचे समाजातील स्थान

आजच्या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांचे स्थान हे दुय्यम दर्जाचे आहे. अनिष्ट रूढी परंपरेने जखडलेली बंदीनी,चूल आणि मूल यामध्ये गुरफटून हेच माझे विश्व म्हणणारी एक कामिनी, वखटलेल्या वासनेची शिकार झालेली बलात्कारीनी, जिचा उपयोग म्हणून भोग घेणारी भोगदासी अशा सर्रास बातम्या आपण वर्तमानपत्रांमधून वाचत असतो. आपण निर्भीडपणे कुठेही संचार करू शकत नाही किंवा कुठे काय होईल हे सांगता येणे कठीण आहे. दोन वर्षाच्या चिमुरडी पासून तर साठ वर्षाच्या म्हातारीपर्यंत असले शापित आयुष्य कुणाच्या तरी वाटयाला आलेले आहे, हे नाकारता येत नाही. इथे महिला सुरक्षित नाही तरी समाजाने कितीही महिलांच्या संदर्भात आदर्श निर्माण केला तरी वखवखणाऱ्या नजरा सुद्धा भेदूनच जात असतात. महिला सक्षमीकरणाच्या बाबतीत बोलायचे झाले तर, आर्थिक, बौद्धिक, वैचारिक अशा बोटांवर मोजण्या इतपत किती महिला सक्षम झाल्या आहेत? आज महिलांसाठी 'महिला आयोग' निर्माण झाले आहेत, अनेक महिलांचे संघटन उभे राहिले आहेत. अनेक संस्थेच्या माध्यमातून स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी लढा पुकारत आहेत. तरीपण, या समाजामध्ये स्त्रियांवरील अत्याचार, बलात्कार थांबले आहेत काय? आणि किती महिलांना माहित आहे त्या निर्भीडपणे आपले हक्क मांडण्यासाठी सरसावतील. नंतर माझे काय होईल? निंदानालस्ती, माझ्याकडे बघण्याचा दृष्टिकोन समाजाचा काय असेल? अशा अनामिक भीतीने त्या साध्या पोलीस स्टेशनमध्ये जायला नाकारतात व मुग गिळून गप्प बसतात. आठवा तो इतिहास, पोटाशी बाळ बांधून तलवार घेऊन लढणारी झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर, ताराबाई शिंदे अशा कितीतरी रणरागिनींची नावे घेता येईल. पुरोगामी विचारांपासून तर आज पर्यंत स्त्रियांचे मानसिक खच्चीकरण होत आहे. डॉ. बाबासाहेबांनी 'हिंदू कोड बिल' तयार केला, प्रसूती रजा भरपगारी करण्यात आली. "स्त्रियांना दुय्यम दर्जा देऊ नका रे" म्हणणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज खरोखरच वंदनीय ठरले.

भारतीय स्त्रिया म्हणजे त्यागमूर्ती,तपस्या,मुक्तसेवा, अलोट श्रद्धा व अमर आशावाद. निसर्ग ज्याप्रमाणे गाजावाजा न करता कामे करीत असतो, त्याप्रमाणे स्त्रीचे आहे. स्त्री ही अबला नाही पूर्वीच्या काळी स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. तिचे विश्व चार भिंतीच्या आतच सामावलेले होते. रांधा, वाढा, उष्टी काढा एवढेच स्त्रीचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. तत्कालीन स्त्रीचे जीवन अंधकारमय होते. ती शिक्षणापासून

वंचित होती. परंतु, हया अंधारात महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, आगरकर ह्यांसारख्या स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांनी ज्ञानाचा दीप लावला. स्त्रीला शिक्षणाचा परिसस्पर्श झाला व तिचे व्यक्तिमत्व उजळून निघाले. आज प्रत्येक क्षेत्रात तिने उत्तुंग भरारी मारली आहे. इतकेच नव्हे तर, अर्थार्जनाबरोबरच एक मुलगी, पत्नी, सून, आई ह्याही भूमिका तितक्याच तत्परतेने आणि तन्मयतेने पार पाडत आहे. या गोष्टींचा समतोल जाताना तिचे जीवन एक तारेवरची कसरत झालेली आहे. खरोखरच 'स्त्री' ही देवाने निर्मिलेली एक सर्वांग सुंदर अविष्कारच आहे. दया, ममता, नम्रता, सहनशीलता, शालीनता, सामर्थ्य या गुणांनी भरलेली ती मूर्तीच आहे. पण दुसऱ्या बाजूला ती एक अबला आहे. कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी, मानसिक छळ यांसारख्या समस्येची ती शिकार होत आहे. तोंडातून 'ब्र' न काढता, सारं काही सहन करत आहे कारण तिला कुटुंबाची प्रतिष्ठा, मान मरातब जपायचे असते. त्यामुळे ती स्वतःचाच कोंडमारा करून घेते. प्रत्येक स्त्री सक्षम बनली पाहिजे. स्त्रियांचे आदर करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. स्त्री म्हणजेच जगातील महान शक्ती. पुरुषांनी सुद्धा त्यांच्या प्रेमाला जिंकून, त्यांचा आदर केला पाहिजे. त्यांच्यावर सर्व समाज अवलंबून आहे. प्रत्येकाची मानसिकता बदलली पाहिजेत. प्रत्येक मुली उच्च शिक्षणापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. लढा देण्याकरिता सक्षम झाल्या पाहिजेत. वडाच्या झाडाला फेरे मारण्याचे दिवस गेले आता. जन्मोजन्मी हाच पती मिळो, म्हणून जप, तप, व्रत हे कशाला? आजच्या स्थितीचा विचार करा. म्हणून मला म्हणावेसे वाटते, "सावित्री, तू सावित्री बनू नको, कारण सत्यवानही बदलले आहेत आणि जिने प्राण वाचवले , तिला जिवंत जाळत आहेत." 'स्त्री' ही विश्वाची जननी आहे. केवळ भोगदासी नाही, तर ती माय आहे, बहीण आहे, अर्धांगिनी आहे. मांगलिक पवित्र वातावरणामुळे समाज मनावर होणारा संस्कार विलक्षण असतो. स्त्री म्हणजेच प्रेम, माया, ममता, स्त्री म्हणजेच नवनिर्मितीची शक्ती.

सावित्रीबाईंनी रोवलेल्या रोपट्यातून आज उभा राहिलेला महान असा स्त्री शिक्षणाचा 'वटवृक्ष' मला सतत प्रेरणादायी व आदरणीय वाटतो. भारत देश हा तेजस्विनीचे, विरांगणेचे उगमस्थान आहे. भारतातील महाराष्ट्राच्या राकट अश्या भूमीवर अनेक नारीरत्ने जन्मलीत. इतिहासात अनेक राजकारणी स्त्रिया प्रसिद्ध आहेत, पण समाज परिवर्तनाची कांस धरणारी सावित्रीबाई खरी 'मेरूमणी' ठरली. जातीभेद, वर्णभेद बालविवाह, केशवपण, सतीप्रथा, अंधश्रद्धा इत्यादी वाईट रूढी,चालीरीतीने समाज ग्रासलेला होता. महात्मा फुलेंच्या क्रांतिकारक विचाराला कर्तुत्वाची व आचरणाची जोड होती. भारतात त्या काळात स्त्री शिक्षणाचा पाया घालणारे ज्योतिबा हे पहिले 'युगपुरुष' ठरले. तर, ज्ञानार्जनाची सुरुवात करणारी सावित्रीबाई ही पहिली 'युगस्त्री' ठरली. अंधश्रद्धेपासून मुक्त होण्यासाठी शिक्षणाशिवाय मार्ग नाही तेव्हा त्या म्हणाल्या,

"स्त्रियांना सांगण्याजोगा

आई शिक्षण मार्ग हा

येई शिक्षणाने मनुष्यत्व

खरंच पशुत्व घडे पहा."

एकविसाव्या शतकात पदार्पण केले असतांना असे प्रकर्षाने जाणवते की, आधीच्या काळात स्त्रीपुढे जेवढी आव्हाने नव्हती, त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक आव्हाने आधुनिक युगात तिच्या पुढ्यात येऊन ठाकलेली दिसत आहेत. १९२० मध्ये अखिल भारतीय महिला परिषद मध्ये महिला शिक्षण व स्त्रियांचा मतदान हक्क या संबंधित प्रश्न मांडण्यात आले होते. ७० च्या दशकात वुमेन असोसिएशन आणि महाराष्ट्र भाववाढ मोहीम सुरू झाली, यात महिला गट व संघटना देशात सुरू झाले. १९८४ आणि १९८६ मध्ये महिला चळवळीने मागणी केल्यामुळे १९६१ हुंडा प्रतिबंधक कायद्यामध्ये बदल करण्यात आले. १९९२ मध्ये व्हिएतनाम मध्ये आयोजित 'मानवधिकारावर परिषद', मानवी हक्क म्हणून महिला अधिकार  ही लक्षणीय बाब ठरली. १९९५ मध्ये बीजिंग मध्ये महिला वर्ल्ड परिषदेमध्ये जगभरातील महिलांना जोडण्यात आले. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतीय राष्ट्रीय अग्रेसनेच्या प्रेसिडेंट सरोजिनी नायडू यांनी १०० महिलांना घेऊन एक चळवळ सुरू केली. काही काळाआधी आंध्रप्रदेश मधील रोंजला यांनी  प्रौढ शिक्षण घेतले. नंतर त्यांनी अशिक्षित स्त्रियांसाठी, तसेच दारू पिऊन शारीरिक त्रास देणाऱ्या पुरुषांविरुद्ध लढा दिला. स्त्रियांना हक्काची जाणीव करून दिली. सुमन मुळे सामाजिक कार्यकर्त्या, यांची स्त्रियांसाठी चळवळ आहे. वीस वर्षापासून त्या लहान बालके व महिलांच्या विकासासाठी झटत आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांकडे, त्यांच्या अधिकारांकडे, व्यक्ती स्वातंत्र्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन मात्र आजही संकुचित आहे.

महिलांना सक्षम करूनच आपण समाजाला आणि देशाला सक्षम, विकसित, महासत्ताक करू शकतो. स्त्रियांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणे आवश्यक आहे. 21 व्या शतकातील आधुनिक समाजाने स्त्रियांकडे निखळदृष्टीने पाहायला हवे. असा समाज घडविणे स्त्री व पुरुष दोघांची जबाबदारी आहे. प्रत्येक नारीला,तिच्या कर्तुत्वाला, तिच्या नेतृत्वाला, तिच्या सहनशक्तीला, तिच्या त्यागाला, तिच्या प्रेमाला माझा सलाम.

**डॉ. सुकेशिनी तुकाराम बोरकर**

टेलिफोन ऑफिस जवळ कुर्झा रोड, ब्रह्मपुरी. तालुका ब्रह्मपुरी जिल्हा चंद्रपूर.

भ्र.क्रं. ९३५९२५८७०८.

प्रा .डॉ.राहुल भोरे
रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला महाविद्यालयात संगीत विभाग प्रमुख, प्रसिद्ध गायक आणि गझलेचे अभ्यासक



**प्रा .डॉ.राहुल भोरे**
**भंडारा**

## गानहिरा हिराबाई बडोदेकर

---

गाणारी स्त्री म्हणजे स्त्रीत्वाला, समाजाला कलंक आहे. किंवा गाणारी स्त्री हमखास अकुलीनच असते ; अशी कुत्सित व विकृत सामाजिक दृष्टी बाळगणाऱ्याच्या काळात घर संसार सांभाळून शालीनता व नम्रपणे रसिकांना समाज-धुरीणांना जिंकून घेत हिराबाईंनी अविट व अविरत गाणे जेवढे लोकांना ऐकवले तेवढे गाणे कोणीही कधीही श्रोत्यांना ऐकविले नाही.

स्त्रियांना अशा बंधनातून मुक्त करून संगीताच्या आराधनेस प्रवृत्त करणाऱ्या कलावंत या नात्याने नंतरच्या सर्व स्त्री कलावंताच्या त्या आद्यगुरुच होत हे म्हणावयास प्रत्यावाय नाही.

हिराबाईंनी सतत पन्नास वर्षे संगीताची सेवा व प्रचार केला. हिराबाईंना महाराष्ट्रात व महाराष्ट्र बाहेर अफाट प्रसिद्ध मिळाली. त्या काळात पुरुष कलावंतांमध्ये अब्दुल करीम खान साहेबांना ज्या कीर्तीचा लाभ झाला तेवढीच किर्ती स्त्री कलावंतांमध्ये हिराबाईंच्या वाटेला आली. संगीत क्षेत्रात हिराबाईंचे नाव अजरामर झाले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील कर्तुत्ववान स्त्री-पुरुषांच्या नामावलीत हिराबाई बडोदेकर यांचे नाव अग्रगण्य आहे.

बालपण व शिक्षण:

तीन पिढ्यापासून चालत आलेला संगीताचा वारसा घेऊन जन्माला आलेल्या हिराबाई बडोदेकर यांचा जन्म २९ मे १९०५ रोजी मिरज येथे झाला. हिराबाईचे मूळ घराणे गोव्याचे होते आईचे ताराबाई होते हिराबाईला लहानपणी चंपूताई म्हणत असत. ही चार भावंडे होती पहिले सुरेशबाबू माने दुसरी हिराबाई तिसरे कृष्णराव चौथी सरस्वती राणे. आईची इच्छा खूप शिकावे डॉक्टर व्हावी अशी होती. पण चंपूताईचा ओढा गाण्याकडेच होता. ताराबाई मुंबईस आल्यावर वहीद खा नावाच्या गुरुकडे हिराबाईंचे संगीत शिक्षण सुरू झाले. यापूर्वी भाऊ सुरेश बाबू माने यांच्याकडून प्राथमिक गायनाचे शिक्षण हिराबाईला मिळाले होते. हिराबाईचे दुर्दैव असे की अब्दुल करीम खा हे वडील असून सुद्धा गाण्याची संपूर्ण तालीम त्यांच्याकडून मिळाली नाही. अब्दुल करीम खाँसाहेबांची इच्छा सुद्धा मुलीने गाणे शिकवू नये अशीच होती. गुरु वाहीदखाँ यांच्याकडून 1918 ते 1922 पर्यंत

हिराबाईना तालीम मिळाली. वाहीदखाँ हे कडक शिस्तीचे होते व ताराबाई सुद्धा कडक शिस्तीच्या असल्याने नियमित रियाजाला दिरंगाई होत नव्हती. उस्ताद वाहीदखाँ हे अब्दुल करीमखाँचे भाचे असल्याने किराण घराण्याची गायन शैली हिराबाईस आत्मसात करता आली. ताराबाई प्रसिद्ध गायिका नसल्या तरी उत्तम गात असल्यामुळे ताराबाई स्वतःपासून हिराबाईचा रियाज करून घेत असत. हिराबाईंना घडवण्यामध्ये संपूर्ण श्रेय ताराबाईचे होय. ताराबाईची मुलांसाठी सारखी धडपड चालू असल्यामुळे शिस्त, व्यवहार व गाणे हिराबाईना शिकता आले.

घेतलेले परिश्रम:

वाहीदखाँ यांचे वैशिष्ट्य असे की, गळ्याची जात ओळखूनच गाणे शिकवीत असत. बंदिशीचा त्यांच्याकडे फार मोठा खजिना होता. केवळ कलावंत निर्माण करणे एवढेच ध्येय त्यांच्यापुढे होते. त्यामुळे हिराबाईंना गायिका म्हणून यशस्वी होण्यासाठी कठीण परिश्रम करावे लागले. गंधार नीट लागत नाही, तोडी रागातील ऋषभ बरोबर लागत नाही, म्हणून गुरूंची थप्पड खावी लागली तरी रागाने उठून न जाता तसाच तंबोरा घेऊन गंधार लावून दाखविला आणि वाहीदखाँ साहेबाकडून शाब्बासकी मिळविली. हिराबाईंचा सकाळ व संध्याकाळ रियाज करवून घेतला जात असे. हिराबाईंनी कधी आळस केला नाही. अब्दुल करीम खा साहेबांचा मंत्र 'स्वराकडे लक्ष असू दे' याचे तंतोतंत पालन हिराबाईंनी केले. वाहीदखाँ शास्त्रीय संगीताचे गुरु तर ठुमरीची तालीम गोहरजान यांच्याकडून घेतली व नाट्य संगीताचे मार्गदर्शन बालगंधर्व, सवाई गंधर्व, गोविंदराव टेंबे यांच्याकडून मिळाले. बाळकृष्ण बुआ, कपिलेश्वरी, शंकर बुवा, फैज मोहम्मदखाँ, वझेबुवा यांच्याकडून सुद्धा गायकीचे मार्गदर्शन हिराबाईना मिळाले.१९२९ साली हिराबाईंनी नाट्य क्षेत्रात पदार्पण केले. नाटकात काम करणाऱ्या हिराबाईंना पहिल्या स्त्री कलावंत म्हणता येईल. ताराबाईंनी सुद्धा नाटक कंपनी काढली त्यात सर्व भावंडे काम करीत असत. त्यात हिराबाईंनी स्त्रीभूमिका केल्या. त्यांच्या सुभद्रा, सिंधू, भामिनी या भूमिका फार गाजल्या. काही दिवसांनी नाटक कंपनी कर्जापोटी बंद करावी लागली. कर्ज वसुलीसाठी देणेकरांनी हिराबाई यांना कोर्टात उभे केले. हिराबाईंची परिस्थिती पैसे देण्यासारखी नव्हती. तेव्हा न्यायाधीशांनी नादारी साठी अर्ज करण्यासाठी हिराबाईंना सांगितले तेंव्हा हिराबाईंनी उत्तर दिले की माझ्याकडे तर सूर आहे ते माझे भांडवल आहे. मी अशी लाचारी पत्करणार नाही. खरोखरच हिराबाईंनी अविश्रांत मैफली करून सावकाराचे सर्व कर्ज देऊन टाकले. गाण्यावरच कुटुंबाचा चिरतार्थ होता कोणाचेही आर्थिक सहाय्य नव्हते अशा बिकट परिस्थितीत गायनाचे जलसे करून आपला चरितार्थ चालविला व आपले गाणेही जोपासले.

योगदान:

हिराबाई वयाच्या १३ व्या वर्षापासूनच सुरेश बाबू माने यांच्या समवेत गाण्याच्या मैफिली करत असत. अशी कुठलीही संगीत परिषद नसेल की त्यात हिराबाई गायल्या नाहीत. हिराबाईंचे पहिले गाणे १९२१ साली गांधर्व महाविद्यालयाच्या संगीत परिषदेत झाले. १९३४-३८ या कालावधीत 'सुवर्ण मंदिर', 'प्रतिभा', 'संत जनाबाई, इत्यादी चित्रपटात त्यांनी काम केले. १९२१ साली 'नूतन संगीत विद्यालयाची' स्थापना हिराबाई यांनी केली. १९२४ साली हिराबाईंनी अत्यंत धाडसी विक्रम केला. तो

काळ कुठल्याही धनिक माणसाच्या सुपारीवर गाणे गावे लागत. असे पुण्याच्या आयर्भूषण थिएटर मध्ये तिकीट लावून स्वतःच्या गाण्याचा कार्यक्रम केला. यापूर्वी स्त्री कलावंताचा तिकीट लावून कार्यक्रम कधीही झाला नसल्याने त्यावेळी लोकांनी दोन रूपयात गाणे विकत मिळत आहे अशी टीकाही केली. पण आज सर्वत्र तिकीट लावून कार्यक्रम होत आहेत. अशा आदर्श संगीत -युगाची नवीन वाटचाल हिराबाईंनी केली. त्यावेळी हिराबाईंनी घेतलेला निर्णय मात्र धाडसी होता. १९२३ साली 'हीज मास्टर व्हॉइस' कंपनीने हिराबाईंची पहिली गाण्याची ध्वनीमुद्रिका तयार केली. त्यानंतर १७५ वर हिराबाईच्या गाण्याच्या ध्वनीमुद्रिका तयार झाल्या. १९३७ मध्ये वसंत देसाई यांच्या संगीतदीग्दर्शनाखाली 'उपवनी गात कोकिळा' हिराबाई गायलेली ही ध्वनीमुद्रीका सर्वाधिक खपाची झाली, हिराबाईंची खरी कीर्ती पसरली ती १९३७ साली कलकत्त्याच्या अखिल भारतीय संगीत परिषदेपासून.

* मानसन्मान:*

१५ ऑगस्ट १९४७ स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत म्हणण्याचा पहिला मान त्यांना मिळाला. इ.स १९३७ साली कलकत्त्याचे अखिल भारतीय संगीत परिषदेचे श्रोते खुष होऊन त्यांना बारा सुवर्णपदके दिले. पुण्याच्या किर्लोस्कर सभागृहात चुनीलाल मेहता यांच्याकडून 'गानहिरा' ही पदवी मिळाली. दादासाहेब खापर्डे यांच्याकडून 'गानकोकिळा' ही पदवी. इ. स.१९४९ ला आफ्रिकेचे सांगतिक दौरा. १९५३ ला सांस्कृतिक शिष्टमंडळाबरोबर चीनचा दौरा. बालगंधर्व पुरस्कार. १९६६ महाराष्ट्र शासनाकडून चांदीची विना, शाल, श्रीफळ देऊन सत्कार. १९६५ ला संगीत नाटक अकादमीचा राष्ट्रीय पुरस्कार. कलकत्त्याच्या आय.टी.सी. संगीत संशोधन संस्थेने 10 हजार रुपयाची पारितोषिक. आय.टी.सी. तर्फे आचार्य पदावर नियुक्ती. इ.स. १९७४ विष्णूदास भावे सुवर्णपदक. सुरसिंगर संस्थेतर्फे तीनवेळा सत्कार व 10 हजार रुपयांचा भवालका पारितोषिक. १९७० मध्ये पद्मभूषण पुरस्कार. १९८२ साली अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या संगीत परिषदेचे अध्यक्ष. षष्ट्याब्दीपुर्ती निमित्त औरंगाबाद येथे मोठा सत्कार. ई. स.१९४३ साली मुंबई साहित्य संघाने मराठी रंगभूमी शताब्दी साजरी केली त्यावेळी संगीत संवर्धन नाटकातील काम केले सरकारी व निमसरकारी संस्थाकडून असे अनेक बहूमान हिराबाईंना मिळाले.

गायकी:

हिराबाईंची गायकी किराणा घराण्याची होती. प्रत्येक सूरांचा सर्वांगीण विचार अनेक संभावनांची उकल करून राग प्रदर्शित करणे हे किराणा गायकीची वैशिष्ट्ये होय. त्यास सशक्त रूपाने सादर करण्याची क्षमता दमदारपणा हिराबाई मध्ये होती. चमत्कृतीपेक्षा माधुर्यावर त्या अधिक लक्ष देत असत. त्यांची गायकी किराणा घराण्याची असली तरीही जयपूर, आग्रा, ग्वाल्हेर, घराण्यात सुद्धा रमू शकतात. स्वरसौंदर्य सांभाळून, रागाची शुद्धता, विविध अंगाने संवादातील, स्वर संगतीचे रागानुरुप प्रयोजन या सर्व बंधनाचा आदर करून हिराबाईंनी आपले स्वतंत्र गायनशैली निर्माण केली. हिराबाईंनी किराणा घराण्याच्या गायकीपेक्षा आकृतीबंध व संरचना याचे कंपोझिशन अधिक विकसित केली होती. त्यामुळे एकाच रागाला भिन्न भिन्न आकृतीने सजविण्याचे वैशिष्ट्यपूर्ण कौशल्य त्यांच्यात होते. म्हणून स्वतःच्या शैलीने आपली गायकी अधिक परिपक्व केली होती.

विलंबित ख्याल गात असताना त्यात आलापी भरपूर व कल्पनाजन्य असत. विलंबित ख्याल आकर्षक व डौलदार पद्धतीने मांडल्यावर छोटा ख्याला मध्ये तानांचा उपयोग अधिक करीत असल्या तरी स्वरस्पष्टतेकडे त्यांचे लक्ष असे. कल्पनाजन्य स्वरविलास, अचूक स्वरफेक, स्वर, लय, शब्दावरील पकड, तारषडज लावण्याची वेगळी शैली. स्वच्छ दाणेदार व नागमोडी गिर्की व फिरकीच्या ताना अशी त्यांची गायनशैली होती. विलंबित व द्रुत ख्याल संपल्यानंतर त्या तराना गात असत. हिराबाई लोकप्रिय असे सर्वसाधारण यमन, मालकंस, भूप, शुद्धकल्याण, पटदीप,ललत,पुरीया, हे घेत असत. तरी पण मिश्र राग जसे मारुबिहाग, शुद्ध सारंग, पुर्वाकल्याण, अहिर भैरव, वसंत बहार यासारखे सुद्धा त्या तयारीने गात असत. रागगायानाची आकृती सुंदर व संतुलित असे. सुरुवातीस बंदिश रागाची सतत अनुशासनयुक्त बढत, शोभित बोलताने, गमकयुक्त, वजनदार ताना, अत्याधिक साफल्याने द्रुत चिजांचा विस्तार अशा प्रकारची पेश करणाऱ्या रागांची आकृती राहत असे. हिराबाई ठुमरी गात असत. त्यातील भावनांची आर्तता प्रभावीपणे साकार करीत असत. त्यांनी राग मांड, खमाज, भैरवी इत्यादी रागातील ठुमरी लोकप्रिय केल्या. लोकप्रिय झालेली नाटय गीतेही त्या गात असत. त्यांना 'राधे कृष्ण बोल' 'जमुना के तीर', वद जावू कुणाला शरण', पटदिप रागातील 'पिया नही आए',अशा गीताची फर्माईश श्रोत्यांकडून येत असत. हिराबाईंची गायकी रसिली होती, रंगीली नव्हती. महान साहित्यिक पु ल देशपांडे म्हणतात, हिराबाईंचा सूरमाला गाभाऱ्यातील नंदादिपप्रमाणे देवतांना दिसतो. कलावंतामध्ये व्यक्तित्व आवाज, परिश्रम बुद्धी, स्वभाव व कलेबद्दल प्रामाणिकपणा हे गुण असावेत त्याप्रमाणे हे गुण हिराबाई मध्ये होते म्हणून त्यांची कुठलीही मैफल असफल होऊ शकली नाही.

विद्यार्थ्यांना शिकविताना त्या म्हणात की 'केवळ रागांच्या चीजा गाऊन कोणी गायक होत नसतो. गायकी ही काही वेगळीच आहे' त्यांचे शास्त्रीय गायन ऐकताना सुगम होऊन जायचं यातील क्लिष्टपणा निघून जाई . त्याच प्रत्येक काम आरशासारखं स्वच्छ असायचं त्यांचा आवाज खेड्यापाड्यातही पोहोचला होता सामान्यपासून जाणकारापर्यंत सर्वांना गाण्यात आपलं असं काही गवसायचं.

शिष्यवर्ग :

हिराबाईच्या प्रमुख शिष्या मध्ये सरस्वती राणे, जानकी आय्यर, मिरा परांजपे, माणिक वर्मा, सुलभा ठकार, प्रभा अत्रे, मालती पांडे, शैला आपटे, बकुल पंडित, सुहासिनी मुळगावकर, मेनका शिरगावकर इत्यादी प्रसिद्ध गायक आहे.

स्वभाव:

हिराबाईंनी संगीताला शालिनीतेचा साज चढविला. हिराबाई डोळस सौंदर्य शोधक होत्या, त्याची वर्तणूक सोज्वळ, मृदूभाषी, शिस्तबद्ध काम, श्रम करण्याची प्रवृत्ती, अपार सहनशीलता, स्थिर बुद्धी, नितांत सामंजसपणा, बाणेदारव्रृत्ती या सर्व सद्गुणांचे मिलन म्हणजे हिराबाई. 20 ते 25 माणसांच्या कुटुंबाचा चरितार्थ हिराबाईच चालवत असत. त्याग, ईश्वरावर श्रद्धा, तत्त्वनिष्ठा, व्यवहारातील सतर्कता, हजर जवाबीपणा असे गुण हिराबाईकडे होते. थिल्लरपणा, छछोरेपणा यांचा लवलेशही त्यांच्यात नव्हता. त्यांच्या जीवनातील आदर्श व्यक्ती चार होत्या, आई ताराबाई, गुरु वाहीदखाँ, भाऊ सुरेश

बाबू माने आणि पती माणिकचंद गांधी. माणिकचंद गांधी यांच्याशी 1924 मध्ये गंधर्व - विवाह झाला. त्यांना एक मुलगा झाला याचे नाव गुरुनाथ उर्फ बाबा असे होते. आणि माणिकचंदच्या उतार वयात हिराबाईंने पतिव्रतेप्रमाणे त्यांची सेवा केली. अशा अव्वल दर्जाच्या गायका, उत्तम गृहिणी, उच्च कोटीच्या मार्गदर्शिका, उत्कृष्ट नटी, आदर्श युगाची दिशा देणार्या हिराबाईंचे २० नोव्हेंबर १९८९ मध्ये वयाच्या ८४ व्या वर्षी पुणे येथे निधन झाले. त्यांच्या बंगल्याचे नाव 'स्वर विलास' आहे. आजही त्यांच्या रेकॉर्डच्या माध्यमातून त्यांचा स्वर विलास ऐकावयास मिळतो.

**….. राहुल भोरे**



# स्वागत



डॉ अशोक इंगळे
आकोट

अशोक रामभाऊ इंगळे

नव्वदोत्तर पिढीतील आंबेडकरवादी जाणिवेचे कवी, समीक्षक व अभ्यासक म्हणून सुपरिचित. 'युद्धपक्षी' (कवितासंग्रह, २००४), आंबेडकरी साहित्यातील जीवनमूल्ये (समीक्षा लेखसंग्रह, २०१०), नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेची मीमांसा (समीक्षा, २०१८), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विद्यार्थ्यांसमोर दिलेली भाषणे (संपादन, २०१८), समकालीन साहित्य मीमांसा : नवी प्रारूपे (समीक्षा, २०२०), निरूपक - मोतीराम कटारे गौरव ग्रंथ (संपादन, २०२१), आयडेंटिटीचे ब्रॅंडेयुद्ध' (कवितासंग्रह, २०२२), कला संस्कृतीचे उपासक डॉ. बाबासाहेब आंबेडकर (संकीर्ण, २०२२) इत्यादी पुस्तके प्रकाशित. अनेक सन्मान आणि राज्यस्तरीय अनेक पुरस्कार प्राप्त विजेते.

## सुरेखा भगतांची संस्कृतीचा प्रतिवाद करणारी संघर्षनिष्ठ जाणिवेची कविता

पहिल्या पिढीच्या आंबेडकरी कवयित्री म्हणून सुपरिचित असलेल्या सुरेखा भगत यांचा "तरीही मुळं ओल धरून आहेत" हा अत्यंत अर्थगर्भित व आशयाची अन्वर्थकता सिद्ध करणारा दुसरा लक्षवेधी कवितासंग्रह होय. 'साक्ष' या बहुचर्चित ठरलेल्या पहिल्या कवितासंग्रहाच्या प्रसिद्धी नंतर तब्बल दोन दशकांनी त्यांची कविता समग्र काव्यरसिक व वाचकांच्या भेटीला येत आहे. संपूर्ण मराठी काव्यविश्वासाठी ही अत्यंत आनंदवर्धक आणि मूल्यदायी स्वरूपाची सांस्कृतिक घटना ठरते.

सुरेखा भगत यांच्या प्रस्तुत काव्यशीर्षकांतर्गत लढाऊ बाण्याचा चिव्वट संगर अनुस्युत आहे. दलित, आदिवासी, वंचित व उपेक्षित असलेल्या बहुसंख्य वर्गाला इथल्या सनातन विचारानं प्रेरित असलेल्या धर्मसत्ता व राजसत्तेच्या जुल्मी मानसिकतेनं मुळांपासून उखडून फेकण्याचा कैकदा यशस्वी प्रयत्न केला. पण इथला शोषित, वंचित असलेला सर्वहारा उपेक्षित माणूस मुळांसकट कधी छाटल्या गेलाच नाही, ही वस्तुस्थिती आहे. या जम्बुदिपातील मातीच्या कुशीत त्याची मुळं घट्ट रूजलेली आहेत. तरीही कित्येक शतकांचा आघात सहन करीत, ही ओल धरून असलेली मुळं अधिकाधिक खोल खोल रूजत असल्याचं प्रतीक म्हणून हे काव्यशीर्षक बोलकं ठरलेलं आहे.

आशावादाचं प्रतीक ठरलेल्या "तरीही मुळं ओल धरून आहेत" या शीर्षकामागे अर्थाचे नाना पदर दडलेले आहेत. 'तरीही' हा शब्द संघर्ष आणि संकटांचा निर्देशक असून 'मुळं ओल धरून आहेत' हा शब्दसमुच्चय आशावादाचं सूचन करतो. अर्थाच्या या बहुविध पदरांवर प्रस्तुत काव्यशीर्षक नेमकेपणानं बोट ठेवते. भारतीय समाजरचना व संस्कृतीचा ज्यांना अल्पसा जरी अभ्यास असला तरी त्यांना या संग्रहाच्या शीर्षकाची प्रचिती आल्याशिवाय राहणार नाही. चार्वाक, तथागत गौतम बुद्ध, संत कबीर, महात्मा बसवेश्वर आणि संत तुकारामांच्या प्रागतिक विचार आणि संस्कृतीची परंपरा लाभलेल्या या भूमीला परिवर्तनवादी विचारांची दीर्घ परंपरा लाभली आहे. या सर्व महामानवांनी बहुजन कल्याणाची मुळं इथं अडीच हजार वर्षांपूर्वी घट्टपणे रूजविली आहेत. ती खणून काढण्यासाठी इथली मूलतत्त्ववादी व्यवस्था

नेटानं भिडली आहे. म्हणूनच ती साम, दाम, भेद व दंडसंहितेचा समुचित वापर करून लोकशाही मूल्यांवर अधिष्ठित असलेली समतावादी व्यवस्था मूळापासून नष्ट करू पाहतेय. याशिवाय हजारो वर्षांच्या दु:ख आणि वेदनेचा इतिहास देखील या शीर्षकाव्दारे अंकित होतो.

कवयित्री सुरेखा भगत यांची कवितेवर निस्सीम श्रद्धा व निष्ठा आहे. कवितेच्या निष्ठेपायी त्या तसूभरही आपल्या भूमिकेशी तडजोड करीत नाहीत. एवढं सख्य्य त्यांचं कवितेसंबंधानं अनेकांनी अनुभवलेलं असेल. वस्तुतः सुरेखाताईंच्या निग्रहवादी संघर्षनिष्ठ भूमिकेचा खरा परिचय त्यांच्या कवितेतूनच होतो. त्यांचं लौकिक जीवनातील जगणंही याहून भिन्न नाही. त्या आपल्या भूमिकेत लिहितात की,"जन्माला आलो म्हणून नुसतेच जगावे का? तर नाही ! जगण्याला ध्येय असावे असे मला समज आल्यापासून वाटायचे." अशी सुस्पष्ट मनोभूमिका त्यांची मानवी जीवन जगण्यासंदर्भात राहिलेली आहे. कवी सुरेश भटांच्या शब्दात सांगायचं झाल्यास, "त्यांचे जगणे आणि लिहिणे" यात तसुभरही अंतर नाही. किंबहुना त्या जश्या जगत आहेत, तश्याच शब्दांमधून प्रकट होतात. त्यांच्या

कवितेला आतली व बाहेरची अशी दुटप्पी भाषा अवगत नाही. म्हणूनच त्यांची काव्याभिव्यक्ती प्रत्ययक्षम जीवनानुभव देणारी ठरते.

सुरेखाताईंनी आपल्या काव्यानुभवाचे तीन विभाग केले आहेत. 1) लढा जिवंत ठेवू या 2) स्त्री - बीद्रं, आणि 3) अत्त दीप भव असे हे तीन भाग आशयाच्या दृष्टीने पाडलेले जाणवतात. पहिल्या भागात सामाजिक व राजकीय आशय प्रकट करणा-या कविता असून दुसऱ्या विभागात स्त्री जाणिवेच्या समग्र कविता एकवटलेल्या आहेत. आणि तिसरा भाग हा थोर राष्ट्रपुरुष आणि समाज उन्नतीस्तव झिजणा-या महामानवांच्या प्रेरक ऊर्जा बळ देणा-या कवितांचा आहे.

सुरेखा भगत ह्या किरकोळ शरीरयष्टी लाभलेल्या पण लढवय्ये बाण्याच्या कवयित्री आहेत. अन्यायमूलक असलेली शोषक व्यवस्था, स्त्रीला दुय्यमत्व देणारी अहंकारी मानसिकता आणि महापुरुषांच्या तत्त्वांना पायदडी तुडविणा-या प्रवृत्तीविरूद्ध ही कविता विचारांचं शस्त्र बनून पुढं आली आहे. खरं तर, 'लढा जिवंत ठेवू या !' हे सुरेखा भगतांच्या कवितेचं बीद्र आहे. आणि हेच तिचं अंगभूत तत्त्व सुद्धा. म्हणूनच आंबेडकरी तत्त्व आणि सत्त्वापायी ही कविता सत्तेपुढे मुजरे घालताना दिसत नाही. तिचा हा मूलभूत बाणाच तिच्यात प्रखर तेज निर्माण करतो. वस्तुतः मानवी मूल्यं प्राणपणानं जपणं हेच या कवितेचं खरं तत्त्व आहे. त्यासाठी या कवितेनं बुद्ध मूल्यांचा चित्तध्वज हाती घेतला; असून तो सतत फडकवत ठेवण्याचं या कवितेचं मुख्य प्रयोजन असल्याचे जाणवते. त्यास्तव ही कविता आंबेडकरी तत्त्वमूल्यांचा लढा बुलंद आणि जिवंत ठेवण्याचं आव्हान देताना म्हणते की, " अन्यायाविरुद्ध आपण बुलंद लढू या/संपलो तरी चालेल/लढा जिवंत ठेवू या ! (पृ. 1)

मानवतेचा प्रदेश नितांत सुंदर करणे हे सुरेखा भगतांच्या आंबेडकरी कवितेचं ध्येय आणि ध्यास असून; आपल्या ध्यासापोटी ही कविता कटिबद्ध आहे. भारतभूमी मोठमोठ्या मंदिरांसाठी प्रसिद्ध असून; ह्या भूमीत माणसांच उत्थान सोडून देवादिकांसाठी सोन्याची घुमटं उभारली जातात. माणूसविहिन बाबींसाठी प्रार्थना, अर्चना केल्या जातात. पण माणसांच्या लौकिक उन्नयनास्तव कुणी पुढाकार घेत नाही. त्यांच्या ऐहिक उन्नतीसाठी कुणी देणं देत नाही. ह्या भूमीतील हे सर्रास नजरेत भरणारं चित्र पाहून कवयित्री गहिवरते आणि करूणेचा पाझर फोडून लिहिते, - " भव्य दिव्य आलये यांनी भारावून जाऊ नका/गहिवरून या दु:खी, पीडितांच्या वेदनेने/ त्यांच्यासाठी अस्वस्थ होऊ द्या, तुमची मने/तेव्हा थोडे गहिवरून या/माणुसकीच्या नात्यासाठी, माणसांचे देणे व्हा ! (पृ. 4)

सुरेखा भगतांच्या सामाजिक अभिव्यक्तीच्या कवितांचा सूक्ष्मता अभ्यास केल्यास असे ध्यानात येईल की, ही कविता अनुभुती, सूक्ष्म निरीक्षण व जीवनातील वेदनेतून साकार झालेली आहे. त्यामुळे माणसांकडे पाहण्याची या कवितेची दृष्टी

मानवतावादाची आहे.म्हणून मनुष्याला केंद्रस्थानी ठेवत, ही कविता समाजाच्या वास्तवाचा विचार अंकित करते. आणि मानवतेच्या हिताविरोधी असलेली कृती वा चित्र बघून अस्वस्थ होते. मनातली ही अस्वस्थताच या कवितेला ख-या अर्थानं जन्म देते. अशी जीवनाच्या भग्नावस्थेतून आकाराला आलेली ही कविता आणि त्यामधील काव्याशय सामाजिक अंगाने वळण घेणे स्वाभाविक ठरते.

भारतीय समाज वास्तव जातीयदृष्टया टोकदार असून मानसिक दृष्ट्या प्रारब्धवादी आहे. मात्र कवयित्री सुरेखा भगतांची कविता प्रयत्नवादाचा पुरस्कार करताना समतातत्त्व या मातीत रूजविते. आणि प्रारब्धवादाला अव्हेरते हे मूलभूत वैशिष्ट्ये ध्यानात घेऊनच या कवितेचा आस्वाद घ्यावा लागतो. हल्ली आंबेडकरी कवितेतील विद्रोह निस्तेज बनला अशी ओरड केली जाते. मात्र काळानुरूप आंबेडकरी कवितेतील विद्रोहीचं स्वरूप बदललेलं आहे. ही कविता आता कंठशोष न करता संयतपणे आपला विद्रोही स्वर प्रकट करताना दिसते. सुरेखा भगतांच्या कवितेत विद्रोहाचं बदलेलं रूप अनुभवायला मिळते. " ठेवून गहाण आसू हृदय पाषाण झाले/न्याय्य हक्क मागताना उलटे कुभांड आले/सोसू किती सोसणे प्राण कंठाशी आले/सूड घेण्यास दुष्टांचा मी चाल करून गेले " (पृ.7) दुष्ट विचारांवर बिनदिक्कत चाल करणारी ही कविता; विद्रोही बाणा जरूर प्रकट करीत असली, तरी ती बुद्ध विचारांवर आरूढ झाल्यामुळे प्रकृती स्वभावानं संयत बनली आहे.

सनातन संस्कृतीनं सत्तारूपी दरवाजे बंद केल्यामुळे आजवर इथल्या उपेक्षित, वंचितांना काळोखात दडून राहावे लागले. ज्ञान व शिक्षण हक्कापासून विमुक्त व्हावे लागले. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे ज्ञानाचा प्रखरसूर्य. म्हणून या प्रज्ञासूर्यानं दिलेला हा वसा घेऊन कवयित्री प्रकाशवाटा शोधताना लिहिते की,
" मी सूर्याचा वसा घेऊन/प्रकाश शोधतेय/तर ते काळोखात दडलेले/मी धम्माबद्दल गर्वाने बोलतेय/मात्र त्यांचे अज्ञानाने बंद दरवाजे" (पृ. 8) नवा विचार आणि नवी मूल्यसंहिता घेऊन निघालेली ही कविता सृजनाचा विचार पुढ्यात ठेवते. विशेष असे की सुरेखा भगतांच्या सामाजिक कवितांचा आशयविषय हा केवळ अनुभूतीचं संचित नसून; या कवितेतील विषयाचे बंध सामाजिक जीवनव्यवहाराशी निगडीत आहेत. धम्म आणि सामाजिक चळवळीचे अनुबंध परस्परांत अनुस्युत असले पाहिजेत. तरच समाजातील सामान्य माणसाचे मूलभूत प्रश्न, समस्याचं सुयोग्य भान चळवळकर्त्यांना प्राप्त होतं. याभानातून समाजाचे आणि चळवळीचे अनेकविध प्रश्न एकजुट व एकदिलाने सुटू शकतात. त्यासाठी सुरेखा भगतांची कविता शस्त्र बनून पुढे सरसावली आहे.

सामाजिक बांधिलकी हे मोठं कवच असतं, या कवचाव्दारे समाजातील व्यक्तीचं, समूहाचं संरक्षण करणं शक्य असतं. शिवाय आंबेडकरी माणसानं हे कवच परिधान केल्यास सामाजिक जीवनामध्ये पडलेल्या अन्यायमूलक चटक्यांचे व्रण सहज दूर करता येतात, असा ठाम विश्वास ही कविता सामान्य माणसाला देवू पाहतेय. प्रश्नांचा पहाड निर्माण करणारी ही कविता नवं विचारांचा ध्यास घेत पुढे सरसावली असल्यामुळं "जुनं आता कुजकं झालं/सृजनासाठी नवे विचार/आत्मसात करायला सांग" (पृ.9) असा सृजन विचार आत्मसात करायला प्रेरित करते. न्यूनगंडाच्या चिखलात फसण्यापेक्षा अहंगंडाच्या पर्वतावर उभे राहण्याची वृत्ती इथे प्रत्ययाला येते. सत्ताधारी व्यवस्थेवर शरसंधान करू पाहणाऱ्या या कवितेला आपला पूर्व इतिहास ज्ञात आहे म्हणून ती सजगतेनं म्हणते की, "बोली आमची, शिकणारे ते/ संस्कृती आमची, लिहिणारे ते/हतबल आम्ही, हसणारे ते/उघड्यावर आम्ही, झाकलेले ते/पीडा आमची, समाधानी ते/ सजग आम्ही निजणारे ते/टेहळणी आमची, सुरक्षित ते/संख्या आमची, कारभारी ते" ( पृ.11) जुलमी व्यवस्थेचं हे समीकरण बदलण्यासाठी सनातनी व्यवस्थेचा कपटी चेहरा ही कविता उघड करते आहे.

बुद्ध-फुले-आंबेडकर या क्रांतिकारक तत्त्वचिंतकांनी स्त्रीची अस्मिता ख-या अर्थानं जागृत केली. स्त्रीला आत्मभान प्राप्त करून दिलं, तिच्यातलं सत्व नि सृजनत्वाचा परिचय घडविला. त्यामुळे स्त्रीमधलं 'माणूसपण' जागं झालं. ती परंपरेच्या जोखडातून मुक्त झाली. आपल्या अस्तित्वाचा स्वतंत्रपणे विचार करू लागली. तेव्हा तिला आपली अनेक रूपं दिसली. स्त्री जन्मानंतर ती कुणाची भगिनी, माऊली, कामिनी, सौदामिनी अशी नाना रूपं तिला पाहायला मिळाली. आणि प्रत्येक रूपाच्या मोहात ती अडकून पडली. तिथंच तिच्या शोषणाला आरंभ झाला. परंतु भारतीय संविधानाच्या अस्तित्वामुळं तिला समानता व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क प्राप्त झाला. परिणामतः ती धाडसीपणानं मुखरित व्हायला लागली. " हो, मी बोलती झाली जसे कैक वर्षांनंतर/ बंद खिडकी उघडी झाली/हो, मी बोलती झाली/जशी नव्याने माझी ओळख मलाच झाली." (पृ. 49) अशी नवी ओळख झाल्यामुळं सुरेखा भगतांसारख्या करारी स्त्रीला अहंपणा, घमेंड, प्रतिष्ठेत मिरवायचं नसतं. तसंच कुंडीतल्या झाडासारखं नुसतंच देखणं जगणं तिला खुरटेपणाचं वाटतं. म्हणून ती बोन्साय व्हायचं नाकारते. हे नकारार्थी धाडस तिच्यातलं सत्वं आणि आत्मभान जागं झाल्यामुळं घडून आलं. कारण ही कविता बोन्साय बनून कुंडीतल्या झाडासारखं देखणं रुप धारण करीत नाही. उलट ती भोगालये सजविणा-या व्यवस्थेला आपण काही शोभेची वस्तू नाही असं ठणकावून सांगते. या कवितेला प्रत्यक्ष अनुभूती आणि वास्तवदर्शन यामध्ये आड पडदा ठेवून जगणं आवडत नाही. ती सरळ सरळ पुरूषी अधिसत्तेला धारेवर धरते. या कवितेतील स्त्री मुक्तीचा स्वर म्हणूनच उपरा ठरत नाही. स्त्रीत्व हेच सृष्टीचं मूलभूत तत्त्व असं ठणकावून सांगणारी ही कविता स्त्री ही मानवाच्या संस्कृतीची निर्माती असल्याचे नमूद करते.

सृष्टीचा उगम स्त्री देहातूच झाला, असं असलं तरी श्रेष्ठ, कनिष्ठत्वाचे भोग तिच्याच वाट्याला का आले ? 'शोध मी घेत आले' या काव्यरचनेत त्या लिहितात की, " मी एक माणूस !/तो श्रेष्ठ नि मी कनिष्ठ/कधी केव्हा कशी झाले/... शोध मी घेत आले/ मी पृथ्वी, दृष्टी, सृष्टी/माझ्यातून उमग, मीच समष्टी/कधी केव्हा डोळ्यांआड झाले/... शोध मी घेत आले." (पृ. 53) असा तटस्थ वृत्तीनं स्वशोध ही कविता घेते. बाई आणि बाईचे प्रश्न इथून तिथून सारखेच जाणवत असले तरी, तिच्या दुःखाची त-हा, दुःखानुभूतीचे वेगळेपण वर्ग नि स्तरनिहाय भिन्न असते. उच्चभ्रू कुटुंबातील स्त्री असो की, दारिद्रयाच्या दलदलीत फसलेली शोषिक स्त्री असो ती पुरूषांची अंकित असतेच. पुरूषसत्ताक व्यवस्थेचे चटके कमी-अधिक प्रमाणात तिला भोगावेच लागतात, हेच भारतीय समाजव्यवस्थेचं वास्तव चित्र आहे. सुरेखा भगतांची कविता या सर्वच प्रश्नांना थेट भिडते. यातनांचा प्रवास चढताना स्वतःची अस्मिता जागृत ठेवते. स्वतःला बांडगूळ बनण्यापासून वाचवते आणि स्वकतृत्वानं माणूसपण सिद्ध करते.

सुरेखा भगतांच्या कवितांमधील भावविश्व स्त्रीच्या मोहक रूपात वा श्रृंगारात अडकून पडत नाही, तर या कवितेला वैचारिकतेचं उत्तम भान आहे. या सजग भानातून तटस्थ वृत्तीनं विचार करताना ती म्हणते की, "आता तर कपाळावरची टिकलीच मला सांगते/चिकटून तर कुणीच राहात नाही म्हणून/तू असताना मीच तुला अधिक बिलगले/तू माझा वृक्ष अन् मीच तुझी वेल म्हणून/आता तर वृक्षच निखळला, गुरफटलेला विळखा सुटला." (पृ. 64) प्रखर स्वजाणीव झालेली ही कविता समग्र स्त्री जातीला सम्यक् दिशा देते. स्त्री वेदनेतून बाहेर पडण्याचा संदेश मुखर करते. स्त्री वेदनेची ही प्रचंड घुसमट अभंगरचनेतून अशी प्रकट होते." कसा सोसू दाह/असा अंगभर/दुःखाचा डोंगर/जन्मभर." (पृ. 71) अशी काटेरी वनातून फिरणारी आणि काट्यांशी जवळीक साधणारी ही कविता आहे. खरं तर, कविता म्हणजे नुस्ता शब्दच्छल नसतो. तर वास्तवानुभवाचा परिपाक शब्दाशब्दात दडलेला असावा लागतो. कवयित्री सुरेखा भगतांची कविता ही वास्तवाचा सच्चा धागा पकडून जीवनाशयाला मुखरित करते. स्वतः पती

विरहाच्या पाशातून मुक्त होण्याचा मनस्वी प्रयत्न करते. त्यामुळे ही परंपरागत स्त्री कवयित्रींच्या कवितेपेक्षा भिन्न ठरते. यापूर्वी मराठी स्त्रियांच्या कवितेचा अवकाश पती विरहाच्या कवितांनी व्यापलेला दिसतो. मात्र सुरेखा भगत याला अपवाद ठरतात. केवळ पतीविरहात न रमता ही कविता, सामाजिक अंगानं विचार करते. स्त्रियां, वंचित व उपेक्षितांचे मूलभूत प्रश्न, केवळ रेखांकित न करता ही कविता त्यावर उपाय सूचित करते. मेंदीभरल्या हाताची नक्षी तिला फार काळ स्वप्नांळू जगात गुंतवून ठेवू शकत नाही. त्यादृष्टीनं ही कविता परिवर्तनाची वाटसरू ठरली आहे.

कविता म्हणजे काही नुस्ता शब्दांचा खेळ किंवा लयीचा मेळ नसतो. उजेडाचं तत्त्वज्ञान आत्मसात केलेली ही कविता प्रतिमा, प्रतीकं या तकलादू मुलाम्यात अडकून पडत नाही. उलट अस्सल देशी लेणं बनून आलेली ही कविता एतद्देशीय महापुरुषांच्या तत्त्वज्ञानानं अलंकृत झालेली आहे. या कवितेतील हा प्रबोधन विचारच तिला काव्यमय रूप प्रदान करतो. 'अत्त दीप भव' या विभागातील कवितांमधून त्याचा प्रत्यय येतो. सुरेखा भगतांच्या कवितेतील कारूण्यभाव, क्रांतिभाव आणि गौरवयुक्त भाव जाणून घेण्यासाठी हा विभाग साहाय्यभूत ठरतो. इथला बेगडी व्यवहार पाहून कवयित्री कुणाशी समरूप होऊ शकत नाही. म्हणून ती लिहिते की, "कबीरा/सारं ऊन अंगावरून गेलं/पण छत नाही बांधता आलं/असं कसं तू मला वेडं केलं/ सदाचरणाच्या ज्योतीनं तू मला तेवत ठेवलं/अन् स्वतः उघडं राहून कारूण्यदोह्यांनी झाकलंस" (पृ.88) अशी मनातला सच्चा भाव प्रकट करणारी ही कविता आतून बाहेरून पारदर्शी प्रकृतीची आहे. आणि हेच या कवितेचं सामर्थ्य देखील म्हणता येते.


दलित/आंबेडकरी कवितेची पहिली पिढी लिहीत असताना सुरेखा भगतांची कविता 'अस्मितादर्श' व 'विद्रोही कविता' या प्रा. केशव मेश्राम संपादित कवितासंग्रहातून वाचकांच्या भेटीला आली. 'साक्ष' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह 1994 मध्ये प्रसिद्ध होतो. आणि त्यानंतर तब्बल सत्तावीस वर्षाच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर अर्थात 2021 मध्ये 'तरीही मुळं ओल धरून आहेत' हा नवा संग्रह वाचकांच्या भेटीला येतो. ह्या दोन्ही घटनांवरून सुरेखाताईचा संयतबाणा, शांतवृत्ती आणि धीरगंभीरपणा लक्ष वेधून घेतो. कविता निर्मिती ही अत्यंत गंभीर बाब असून ती अनुभूतीच्या गर्भातून जन्माला आली पाहिजे असं मानणारी ही कवयित्री आहे. हौसी वृत्ती आणि मिरवेपणा यापासून लांब असलेली ही कविता नेटानं आलेल्या असंख्य संकटांना तोंड देते. परिस्थितीनं खचून गेली तरी मनानं हतबल न होता ती पुन्हा पुनः संकटांच्या दलदलीशी दोन हात करते. निकरानं व नेटानं झगडते. हा तिचा कणखर लढाऊ बाणाच तिला 'अत्त दीप भव' होण्यास प्रवृत्ती करतो. "दिशा उजळू लागल्या आहेत/तत्त्वज्ञानाची किरणं घेऊन/तनामनाला उजळीत आहे" (पृ. 94) असा प्रांजळ भाव म्हणून त्यामधून प्रकट होतो.

प्रस्तुत कवितासंग्रहातील कवितांमध्ये संमिश्र भाव संवेदनेचं प्रकटीकरण झालेलं दिसून येते. अस्सलं लढाऊ व कणखर बाणा हे या कवितेचं प्राणतत्त्व. आणि सामाजिक बांधिलकी तिची मूळ प्रवृत्ती. ह्या दोन्ही घटितांमुळं सुरेखा भगतांची कविता संघर्षनिष्ठ बनते. आपल्या प्रेरणापुरूषांनी दिलेला हा संघर्ष कवितेच्या ओळीओळीत ठासून भरलेला आहे. म्हणून तो सामाजिक व सांस्कृतिक चळवळीसाठी पुरक नि प्रेरक ठरतो. कृतिशीलतेचा एक अविभाज्य भाग बनतो. 'शोकांतिका व अदृश्य खैरलांजी' ह्या कवितांमधून कवयित्रीच्या या उक्ती आणि कृतीचा प्रत्यय येतो. अशी निष्ठेनं चळवळीची बांधिलकी जपणारी ही कविता म्हणून कृतक ठरत नाही, तर अंतरीचा संयत भाव प्रकट करते. कुठेही ती आक्रसत नाही. अगदी टोकदार विचारही ती धीरगंभीरतेनं व्यक्त करते आणि हेच या कवितेचं खरं वैशिष्ट्य म्हणावं लागते.

'तरीही मुळं ओल धरून आहेत' या कवितासंग्रहातील प्रतिमा आणि शब्दकळा प्रतिकात्मक आशय सूचित करतात. म्हणून त्या तरल मनाचा ठाव घेतात. उदा. समता फ्रीजमधल्या थंडगार आवर्तात शाबूत ठेवली, त्याने तिला

सिगारेटसारखी ओढून घेतली, तंबाखू समजून ओठांत दाबली, मद्य समजून प्राशून घेतली, फुलं समजून चुरगळून टाकली, कार्बन काॅपी होणं, बोन्साय कुंडीतल्या झाडासारखं नुसतंच देखणं, शिष्टाचाराचं माप तोलून धरनं इ. प्रतिमा सांगता येतील. ज्यामुळं ही कविता मन:पक्षी बनून कर्तृत्ववाची सुंदर नक्षी कोरते. वेदनेचा संग करताना यातनांचा प्रवास घडवून आणते.

एकूणच, स्त्री मुक्त व्हावी, एक माणूस म्हणून तिची ओळख निर्माण व्हावी; यासाठी सुरेखा भगतांची कविता संघर्षरत आहे. या कवितेत पुरूषी अधिसत्तेविरूद्धचा चिव्वट संघर्ष, स्त्रियांच्या दुःख, वेदनेची भावानुभूती, तिच्या स्वअस्तित्वाचा शोध आणि उच्चविद्याविभूषित असून देखील तिचं कर्मकांडात अडकून पडणं अश्या विविधांगी जाणिवा साकार झालेल्या आहेत. प्रस्तुत संग्रहात काही ठिकाणी प्रिंटींगची सदोषता जाणवत असला तरी, तो भाग सर्वस्वी प्रकाशकांच्या अधीन आहे. त्यामुळे त्यात कवयित्रीचा दोष आढळून येत नाही. अंतिमतः गजानन घोंगडे याचं सुलेखन, आशयाला अनुरूप असं आशीष बोदडे याचं मुखपृष्ठ आणि मराठीतील ख्यातनाम कवी तथा समीक्षक डॉ. महेंद्र भवरे यांची कवितासंग्रहाचं सामर्थ्य उलघडून देणारी मूल्यगर्भ प्रस्तावना आणि सोबतच सुप्रसिद्ध कवी डॉ. युवराज सोनटक्केचं भारदस्त बर्ल्ब यामुळं कवितासंग्रहाला वेगळेच वजन प्राप्त झाले आहे.
**********



प्रा. डॉ. अशोक रा. इंगळे
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट जि अकोला
मो. 9421747417

❑❑❑

# <u>स्वागत</u>

नितीन साळुंखे, सातारा
आयन रँड यांच्या 'अँथम' आणि एनगुगी वा थ्योंगो या केनियन लेखकाच्या 'मातीगारी' या पुस्तकांचा मराठी अनुवाद त्याच नावाने प्रसिद्ध.
मासिक 'ग्राम गौरव' चे पुणे, मुंबई आणि कोकण विभागीय ब्यूरो चीफ म्हणून कार्यरत.



**नितीन साळुंखे**
**सातारा**

## अवकाळी पावसाचा दरम्यानची गोष्ट:एक आकलन

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत महाराष्ट्रात सरंजामी, संपूर्णपणे शेती आधारित अर्थव्यवस्था होती. शवहरांची संख्या आणि वाढ मर्यादितच. त्यातली बहुतांश लोकसंख्या दरबारी नोकर किंवा व्यापारी आणि त्यांच्याकडचे कामगार. बाकी जनता खेड्यात. शेतीभोवती एकवटलेली. ती शेतीही पावसावर अवलंबून. धरणे आणि कालवे, वीज, पंप, रासायनिकी खते, संकरित बी बियाणे नव्हतीच. खेडी बऱ्याच अंशी स्वयंपूर्ण होती. तसं शंभर टक्के स्वयंपूर्ण किंवा हल्लीच्या भाषेत आत्मनिर्भर कोणीही कधीही असू शकत नाही. पण खेड्यांचं बाह्य जगावरचं अवलंबित्व खूपच कमी होतं.

ब्रिटिश अमदानीत सुनियोजित व्यवस्था निर्मितीचं काम सुरू झालं. तोवरची सरंजामी व्यवस्था क्षीण होत जाऊन तिची जागा प्रशासकीय उतरंड घेऊ लागली. सरकारचं अस्तित्व जाणवू लागलं. कारकुनी कामं करण्यासाठी का असेना, स्थानिकांना संधी मिळू लागली. पोस्ट, रेल्वे अशा संपर्क आणि दळणवळणाच्या सेवा देशपातळीवर नव्याने अस्तित्वात आल्या. मुलकी कामं वाढू लागली. त्यासाठी वाढत्या संख्येनं मनुष्यबळ शासकीय सेवेत समावून घेतले जावू लागलं. हे मनुष्यबळ शिक्षित असणं आवश्यक होतं. त्यामुळं तोवरचा, ठराविक वर्गाला पाठशाळेतून शिक्षण, हा प्रघात संपून पाटी पेन्सिल वह्या पुस्तकांच्या आधारे सर्वांना शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू झाल्या. त्यांच्या व्यवस्थापन आणि शिकवण्यासाठी पुन्हा मनुष्यबळाची आवश्यकता वाढली. बँका, विमा अशा सेवा नव्याने उदयाला आल्या.

याच काळात औद्योगीकरणातून कापड गिरण्या उभ्या राहिल्या. तेथे कुशल, अकुशल मनुष्यबळाची गरज मोठी होती. यातून शहरांची वाढ होत राहिली. संपूर्णपणे शेतीवर आधारलेल्या ग्रामीण भागातील लोकसंख्येला या शेतीवरचा भार कमी करण्यासाठी शिक्षण घेऊन शहरात नोकरीला जाण्याचा एक सक्षम पर्याय उपलब्ध झाला.

गावाकडून शिक्षण घेऊन शहराकडे जगण्यासाठी गेलेली पिढी. यांची मुळं गावाकडे असतात. पण हळूहळू तिथून नाळ सुटत ती शहराशी जोडली जाते. शहरी मध्यमवर्गीय जीवनशैली आत्मसात करत असताना हातात येणारा पगार मुळातच अपुरा पडत

राहतो. त्यातच गावाकडं वडील किंवा शेतीसाठी तिथे थांबलेल्या भावाची अपेक्षा राहते की शेतीच्या कामासाठी यानं पैसे पाठवावेत. शहरातल्या सांसारिक जबाबदाऱ्या वाढतील तसं शहरातून पैसे येणे हळूहळू कमी होत अखेर बंदच होतं.

अशावेळी मग मिळेल तेवढं सोसायटीतनं, कमी पडेल ते खाजगी सावकाराकडून घेणं, याला पर्याय नसतो. अशात निसर्गानं साथ दिली आणि भरपूर पीक सुरक्षित घरात आलं, बाजारपेठेत दर कोसळले नाही, आणि सरकारने दर कोसळतील किंवा विक्रीत अडथळे येणार नाहीत असे काही निर्णय घेतले नाहीत, तर सोसायटी कर्ज नवं जुनं करून, सावकाराचं मूळ कर्ज तसंच राहिलं तरी व्याज तरी भागवता येतं. पण हे तीनही घटक जुळून येण्याचे समसमासंयोग शेतकऱ्याच्या आयुष्यात क्वचितच कधीतरी येतात.

निसर्गाच्या लहरीपणाचा भाग म्हणजे अवकाळी पाऊस. पीक ऐन कापणीला आलेलं असताना, किंवा खळ्यात असताना नेमका पाऊस आला की तयार झालेलं धान्य भिजतं. आणि काळं पडतं. अशा धान्याला दर कमी मिळतो. सातारा जिल्ह्यातल्या, कराड आणि खटाव तालुक्यांच्या हद्दीवर असलेल्या, माणदेशच्या काठावरच्या एका दुष्काळी गावात असाच एकदा अवकाळी पाऊस पडला. आणि त्यानं एका शेतकरी कुटुंबाची, त्यातल्या लोकांच्या स्वप्नांची कशी धूळधाण केली, याचं वास्तव, विदारक चित्र नजरेसमोर उभं करणारी गोष्ट सांगितली आहे डाव्या चळवळीत सक्रिय असलेल्या आनंद विंगकर या संवेदनशील कवी, लेखक कार्यकर्त्याने. अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट, याच नावाने.

जी. ए. कुलकर्णी त्यांच्या दीर्घकथा सांगताना माणसाच्या विपन्नावस्थेचं, जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आधाराच्या संपूर्ण अभावाचं, दैन्याचं आणि त्या अवस्थेत अपरिहार्यपणे येणाऱ्या पराभूत मानसिकतेचं, भकास भवतालाचं वाचकाला उदास करणारं वर्णन करतात, त्याची हे पुस्तक वाचताना सतत आठवण येत राहते. विंगकर यांनी सांगितलेली गोष्ट वाचताना त्यातल्या कुटुंबातल्या माणसांच्या आयुष्याची परवड बघून डोळ्यांत पाणी येतं. गेल्या कित्येक वर्षांपासून आत्महत्या करणाऱ्या एकूण शेतकऱ्यांची ही गोष्ट आहे. शेतकरी म्हणजे जणू आमच्या जीवावर, आम्ही भरलेल्या करांवर फुकट जगतो, असा आव आणून बरळणाऱ्या असमंजस, असंवेदनशील शहरी मानसिकतेची ही गोष्ट आहे.

गाव सोडून शहरात स्थायिक झालेल्या भावाच्या, दोन मुलांतल्या एकालाच शिकवण्याची चैन परवडते म्हणून बारावीपर्यंत शिकूनही शेतीत राहिलेल्या भावाला मदत करता आली नाही म्हणून होणाऱ्या वांझ तडफडीची ही गोष्ट आहे. ती तडफड वांझ यासाठी की, त्याला डोळ्यांसमोर दिसतंय या न परवडणाऱ्या आतबट्ट्याच्या शेतीत भाऊ आणि त्याचं अवघं कुटुंब सडतंय. पण त्यालाही मिळणारं उत्पन्न त्यालाच अपुरं पडतंय, त्यामुळं तोही असहाय आहे.

भावानं आणि वहिनीनं आपल्यासाठी काय केलं हे त्यांनी आत्महत्या केल्यानंतर लक्षात येणाऱ्या भावाला आठवतं की, आपण आल्यावर तिनं शेजारून कपबशी आणून आपल्याला आवडतो आणि लागतो म्हणून चहा करून दिला. म्हणजे एरव्ही घरात चहा करून पिणं, ही सुध्दा त्यांच्यासाठी न

परवडणारी चैन असते. आणि पायांतल्या चपला घ्यायला जमत नाही, तिथं कपबशा कुठून घेणार?

या एकाच पुस्तकात ग्रामीण भागातल्या, विशेषतः दुष्काळी ग्रामीण भागातल्या अनेकानेक समस्या, निसर्ग निर्मित आणि मानव निर्मितही, मांडण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे. समाजाच्या धारणा, जातीभेद, भावकी, या सगळ्यातले परंपरेनं चालत आलेले ताणेबाणे, नातेसंबंधांच्याही वरचढ ठरणारा स्वार्थ आणि स्वतःच्या किरकोळ फायद्यासाठी दुसऱ्याला कितीही किंमत मोजायला लावण्याची मानसिकता, हे सगळंच गोष्टीच्या ओघात आलं आहे.

मुलगा हवा, ही आस लोकांना, मग ते शहरी असोत की ग्रामीण, ठार निरक्षर असोत की उच्चशिक्षित, आणि जतिधर्म निरपेक्षपणे सारासार विचार आणि माणुसकी सोडायला लावते. पुरुष वर्चस्ववादी वृत्ती मुलीच जन्माला येतात, यासाठी पत्नीला आणि त्या मुलींनाच जबाबदार धरतात.

शहरांच्या विकासासाठी हजारो कोटी रुपये खर्च करताना कोणतीच सरकारे मागेपुढे बघत नाहीत. पण देशातली अर्ध्यापेक्षा जास्त जनता ज्या शेतीवर अवलंबून असते, त्या शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठीच्या योजना वर्षानुवर्षे निधीसाठी खितपत पडलेल्या असतात. पर्यायाने शेतकरी खितपतो. त्यातून मार्ग काढण्यासाठी शेतकरी कर्ज काढून बोअर वेल घेतो. सुरुवातीला त्याला पाणी मिळतेही. उत्साहानं मग तो उसासारखी जास्त पाणी ओढणारी पिकं चांगले पैसे मिळतील या आशेनं घेतो. कालांतरानं बोअर वेलची संख्या वाढत जाते, आणि पाण्याची पातळी खाली जाते.

मुलांचंच शिक्षण धड करता येत नाही. मुलींचं कधी करणार? आणि मग, पाळी आल्यानंतर मुलगी घरात ठेवून तरी काय करणार? म्हणून लहान वयातच मुलींचं लग्न लावून दिलं जातं. तिला शिकायचं असतं तरीही. आणि तिला इतक्या लहान वयात लग्न करायचं नसलं तरीही. तिच्या शरीर, मनाच्या विकसित असण्या नसण्याची, शरीर संबंधांसाठी शरीर, मनाची तयारी असण्या नसण्याची फिकीर कोण करतो?

शेतीला पाणी पुरवठा करायचा असेल तर त्यासाठी वीज लागते. ती ग्रामीण भागात फक्त रात्रीच असते. थंडी, अंधार, साप किरडू, जंगली जनावरं या कशाचाही विचार न करता त्यानं रात्रीच जाऊन शेताला पाणी पाजावं, अशी धोरण कर्त्यांची अपेक्षा असते. जणू शेतकरी म्हणजे माणूस नव्हे.

भरमसाठ व्याजानं कर्ज देणाऱ्या खाजगी सावकाराचा शेतकऱ्याच्या जमिनीवर डोळा असतो. शेतकऱ्याला ते कर्ज फेडता येत नाही. आणि शेतजमीन विकून कर्ज भागवावं, तर वाडवडिलांनी सांभाळलेली शेती विकली तर लोक काय म्हणतील याची भीती, आणि मग खायचं काय, याची काळजी. त्यामुळं अशी आणीबाणीची वेळ आली तर स्वतःला संपवणं, हा एकच पर्याय शेतकऱ्याला मानसिक आणि व्यावहारिक दृष्ट्या उपलब्ध असतो.

या प्रश्नाला उत्तर म्हणूनच सहकारी पतसंस्था सुरू झाल्या. पण त्यांचीही कर्जवसूली संबंधित कर्जदार किती गरीब, तळातला आहे, त्यानुसार अधिकाधिक कठोर होत जाते. आणि सहकारी बँका, पतसंस्थांना वसुलीसाठी सहजी आणि एकतर्फी मिळणारा कलम १०१ चा दाखला म्हणजे कर्जदाराला सहकुटुंब रस्त्यावर आणण्याचा आणि देशोधडीला लावण्याचा

त्या वसुली अधिकाऱ्याला मिळालेला निरंकुश परवानाच जणू.

इतर अनेक आवश्यक सोयी ग्रामीण भागात उपलब्ध नसतात, तशाच वैद्यकीय सेवा सुध्दा उपलब्ध नसतात. किरकोळ सर्दी पडशा पलीकडं काहीही झालं तरी किमान तालुक्याच्या ठिकाणी जावं लागतं. मग ती कितीही तातडीची, अडचणीची वेळ असूदे. कितीही खराब अवस्थेतले रस्ते असूदे. अनेक ठिकाणी वाहने नसतात. किंवा त्यांना येण्यासाठी रस्ताच नसतो. अशा वेळी तिथले लोक त्या रुग्णाला प्रसंगी बाजल्यावर झोपवून चालत ते अंतर पार करून आणतात. त्यात किती मौल्यवान वेळ औषधोपचाराविना वाया जात असेल, आणि पेशंट वाचण्याच्या शक्यता कशा कमीकमी होत असतील.


असे सारे मुद्दे लेखकानं या गोष्टीत नीट गुंफले आहेत. यातल्या बऱ्याच प्रश्नांवर, शेतकऱ्यांनी स्वतःच्या धारणा बदलणे, हा उपाय असू शकतो. प्रशासकीय यंत्रणेत एक किमान माणुसकीची जाणीव असणं, हा उपाय असू शकतो. स्थानिक राजकीय नेतृत्त्वाला या समस्यांचं भान असणं, आणि त्या सोडविण्यासाठी लोकांवरील आपल्या प्रभावाचा वापर करून त्यांचं प्रबोधन करण्यासाठी प्रयत्न करणं, लोकांचं जगणं सुसह्य करण्यासाठी प्रशासनावर अंकुश ठेवणं, गरज पडली तर विधिमंडळात आवाज उठवणं आवश्यक असतं. डाव्या चळवळीत काम केलेलं असल्यानं लेखकाला हे माहित असणार हे निश्चित. पण समाजाला, प्रशासनाला आणि राजकीय नेतृत्त्वाला त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देण्याची लेखकाची क्षमता असूनही त्यानं ते टाळलं आहे.

या गोष्टीत एक प्रेमकहाणी सुध्दा आहे. पण प्रेमापुढं परीस्थिती आणि कर्तव्य भावना वरचढ ठरलेली. त्यामुळं ही प्रेमकहाणी अधुरी आणि असफल आहे. मोकळेणाने दुसऱ्या कोणावर काय, स्वतःवर सुध्दा नीट प्रेम करण्याइतकी कोणतीच सवड या लोकांना नाही. जणू ती माणसं नाहीत, जी. ए. कुलकर्णींच्या कथेतल्या पात्रांसारखी खेळणी आहेत नियतीच्या हातातली. व्यवस्थेच्या काठावरली. शेतांमध्ये फाटके कपडे घालून उभे केलेल्या अचेतन बुजगावण्यांसारखी. पिढ्यांमागून पिढ्या स्वतःच्या घामाची, रक्ताची आणि प्रसंगी जीवाची आहुती देऊन काळया आईच्या उदरातून सोन्यासारखं धान्य पिकवून शेतकरी ते मातीमोलानं समाजाला देतोय. त्याचं कर्तव्य पार पाडतोय. पण त्याच्या कष्टाची योग्य किंमत करण्याची ना सरकारची ऐपत आहे. ना समाजाची पात्रता. ना प्रशासनाकडे मानवी दृष्टिकोन. ना स्थानिक राजकीय नेतृत्त्वात या जबाबदारीचं भान. हे सगळं या गोष्टीत आणखी टोकदारपणे आणता आलं असतं.

ख्रिस्ती धर्मोपदेशक वडिलांबरोबर दीर्घकाळ चीनमध्ये राहिलेल्या, साहित्याचं नोबेल पारितोषिक मिळवणारी पहिली अमेरिकन लेखिका पर्ल बक यांच्या, द गुड अर्थ, या गाजलेल्या पुस्तकाचा नितांतसुंदर मराठी अनुवाद भारती पांडे यांनी केला आहे. त्यात चितारली आहे चीनमधल्या सामान्य शेतकऱ्याची अवस्था. त्याची, आनंद यादव यांनी लिहिलेल्या झोंबी या आत्मचरित्राची, व्यंकटेश माडगूळकर यांच्या माणदेशी माणसं या पुस्तकाची, नांगरून पडलेली जमीन सर्वत्र, नुसताच शुकशुकाट ... या स्तब्ध करणाऱ्या ओळीतून सुरुवात करून पुढं

वाचकाला हेलावून, अंतर्बाह्य हलवून टाकणाऱ्या ना. धों. महानोर यांच्या रानातल्या कविता अशा या विषयावरच्या इतर साहित्याची पुन्हा आठवण करून देतं हे पुस्तक.

लेखकाला वाचकांपर्यंत जे पोचवायचं आहे, ते अतिशय परिणामकारकपणे पोचलं असावं, म्हणून तर पाच वर्षांत या पुस्तकाच्या पाच आवृत्त्या निघाल्या आहेत. पुढच्या आवृत्तीत हे बदल करता आले तर वर उल्लेख केलेल्या अन्य साहित्याप्रमाणे हे पुस्तकसुध्दा वाचणाऱ्या समाजमनाच्या दीर्घकाळ लक्षात राहील, हे निश्चित.



## स्वागत

किरण डोंगरदिवे, मेहकर
कवी , लेखक ,समीक्षक



**किरण डोंगरदिवे**
**मेहकर**

# वर्तमानाचे वर्गचरित्र मांडणारी प्रगल्भ कविता : असहमतीचे रंग

अशोक नामदेव पळवेकर हे समकालीन वास्तवाचे वेगवेगळे प्रस्तर उलगडणारे आंबेडकरवादी जाणिवेचे कवी म्हणून मराठी साहित्यविश्वात ओळखले जातात. तसेच ते एक चिंतनशील समीक्षक म्हणूनही ख्यातकीर्त आहेत. १९८० सालापासून ते वेगवेगळ्या नियतकालिकांतून व साहित्यपत्रिकांतून सातत्याने काव्यलेखन करत आहेत. या दीर्घ कालावधीतील त्यांच्या काही निवडक कवितांचा (एकूण कविता १००) 'असहमतीचे रंग' हा त्यांचा काव्यसंग्रह अलीकडेच प्रकाशित झाला आहे. या काव्यसंग्रहतून सभोवतालच्या समकालीन वास्तवाचा एक व्यापक पट उलगडत गेलेला असून पळवेकरांच्या या कवितेतून सभोवतालच्या एकंदरीत मानवी जगण्याचे आणि समकालीन व्यवस्थेच्या वास्तवरुपाचे विवेकनिष्ठ चित्रण अगदी सहजीभावाने व चिंतनशील वृत्तीने आविष्कृत झालेले आहे.

सामाजिक जाणिवेचे कवी व साहित्यिक म्हणून अशोक नामदेव पळवेकर यांची निश्चित अशी एक भूमिका आहे. मागील दोन तपापासून ते आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. महाराष्ट्रातील चोखंदळ रसिक आणि साहित्यिक त्यांच्या या भूमिकेसंबंधी जाणून आहेतच. कवी पळवेकरांची ही भूमिका प्रस्तुत काव्यसंग्रहातही कायम आहे. म्हणूनच 'आजच्या घडीला आपण सगळे भारतीय लोक आपल्या देशातील एतद्देशीय हुकुमशाहीवादाच्या प्रचंड वादळात सापडलेले आहोत!' ही जाणीव ठेवून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे; आणि अशा वास्तवात आपली जबाबदारी झटकून कोणतीही ठोस भूमिका न घेणाऱ्या व अन्याय्य सत्तेच्या विरोधापासून अगदी नामानिराळे राहणाऱ्या लेखकवर्गाला त्यांनी खडे बोल ऐकवत त्यांचा 'मृत्यू' जाहीर केला आहे. ते म्हणतात-

'मी माझ्या समकालीन त्या सर्व कवींना
माझी श्रद्धांजली अर्पण करतोय
जे बोलत नाहीत
सर्वसामान्यांचे मरण डोळ्याने पाहूनही
सिंहासनातील कुठल्याच दुर्गंधीच्या विरोधात'

-अशा सर्व लेखकवर्गाला त्यांनी आपली श्रद्धांजली अर्पण केली आहे. कारण जे लोक सर्वसामान्यांच्या

दुःखाने कळवळत नाहीत, ज्यांचे शब्द राजसत्तेला घाबरून सर्वसामान्यांच्या दुःखाला वाचा फोडत नाहीत, त्या साहित्यिकांना त्यांनी त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली आहे. आजच्या वर्तमानात सर्वसामान्यपणे जे चित्र आपल्याला दिसते, ते फार भयानक आहे. म्हणूनच त्यांनी आपल्या शीर्षक कवितेत आजच्या दडपशाहीचे व असहिष्णूवृत्तीचे स्वरूप सांगताना-

'तू म्हणू शकत नाहीस
पांढऱ्याला 'पांढरे' किंवा काळयाला 'काळे'
सध्या, असेच हे इथले वातावरण आहे!'

हे भयंकर वास्तव अधोरेखित करत त्यातील धोके नमूद केले आहेत. कारण 'जेव्हा सत्ता चूक असते; आणि तुम्ही बरोबर असता, तेव्हा तुम्हाला भयंकर धोका असतो', हे व्होल्तेअरने सांगितलेले वास्तव आजही सत्यच आहे! याच भयाने आज व्यवस्थेमध्ये सर्वसामान्य माणसाचे शब्द गोठले आहेत, सत्य बोलण्याची हिंमत उरलेली नाही. हे वास्तव जरी खरे असले, तरी कोणीतरी ही हिंमत दाखवलीच पाहिजे आणि त्यासाठी धर्मवादी राजसत्ता आणि रूढ व्यवस्थेला काही प्रश्न विचारणारे, प्रसंगी त्यांच्याविरुद्ध उभे ठाकणारे लोक तसेच विचारवंत व साहित्यिक पुढे आले पाहिजेत, असे कवीला वाटते. कारण ही जबाबदारी याच वर्गावर अधिक आहे. हीच भूमिका घेऊन कवीने आपली वाट चोखाळली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळापासून या देशात आपल्या धर्मनिरपेक्ष व लोकशाही समाजवादी व्यवस्थेने आपल्या राज्यघटनेनुसार प्रत्येक भारतीय नागरिकाला त्याच्या जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन त्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य जगण्याचे हक्क व अधिकार बहाल केले आहेत. परंतु १९८० सालापासून या देशातील धर्मवादी विचारसरणीने मूलतत्त्ववाद आणि जमातवादी राजकारणाला खतपाणी घालत या स्वातंत्र्याच्या विरोधात सतत एक लोकमानस घडवण्याचा प्रयास चालवलेला आहे. आणि मूलतत्त्ववादी विचारसरणीचे लोक देशात सत्तेच्या केंद्रस्थानी आल्यानंतर तर या देशातील 'व्यक्ती' आणि 'अभिव्यक्ती'ची सारखी गळचेपीच चालवली गेली आहे. त्यातून भारताच्या धर्मनिरपेक्ष व लोकशाही समाजवादी व्यवस्थेला मोठाच धोका उत्पन्न झाला आहे. हा धोका नष्ट करणे हे भारतीयांचे परम कर्तव्य आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत काव्यसंग्रहाचे मोल अधिक आहे.

म्हणूनच अगदी प्रारंभापासून या देशातील धर्मवादी व्यवस्थेकडून सर्वसामान्य माणसाच्या अधिकाराचे हनन करून त्याचे शोषण अबाधित करण्याच्या ज्या जागा निर्माण केल्या गेल्या आहेत, त्या जागा आपण समजून घेणे पहिल्यांदा गरजेचे आहे. त्यासाठी या कवितासंग्रहातील 'काळ नसतो बदलत कधी!', 'मी, जाहीर केलाय ईश्वराचा मृत्यू!', 'ओ, जीनिअस!', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', 'सिद्धार्थ गौतम बुद्ध', 'भूक' वगैरे तत्त्वचिंतनात्मक कवितांमधून डॉ. अशोक नामदेव पळवेकर यांच्या तत्त्वज्ञानाची व त्यांच्या जीवनदृष्टीची जी तात्त्विक बाजू स्पष्ट झालेली आहे ती आकळून घेणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच 'अजेंडा', 'अँटिक फरक', 'एन्कौन्टर', 'मी!', 'असहमतीचे रंग', 'भूमिका', 'कबीरा', 'एक निवेदन' अशा काही कवितांमधून त्यांची एक निश्चित भूमिकाही जाहीर झालेली आहे.

तीही लक्षात घेणे गरजेचेच आहे. 'मी!' या कवितेत ते म्हणतात-

'मला त्याचे तत्त्व पटणार नाही.
मला त्याचे विचार रुचणार नाही.
मला त्याची टीकाही सहन होणार नाही.
तरीही, मी त्याच्या शब्दाला विराम मात्र देणार नाही.'

उलट, या दडपशाहीच्या काळात-

'हं, भांडेन जरूर त्याच्याशी प्राणपणाने अगदी टोकदार
:
माझ्या तत्त्वासाठी.../ माझ्या विचारासाठी.../ माझ्या सत्यासाठी..,
तसेच, त्यालाही देईन तेवढाच स्पेस त्याच्या भूमिकेसाठी आरपार'

याच भूमिकेने त्यांनी लेखकवर्गाला अन्याय्य सत्तेच्या व व्यवस्थेच्या विरोधात लढण्याचे आवाहन केले आहे, ते फार महत्त्वाचे आहे.

अलीकडच्या काळात अविवेकी भक्तांचे मळे खूप पिकलेले आहेत. विरोधासाठी विरोध ही त्यांची वृत्ती आहे. म्हणूनच अविवेकीपणाने कोणत्याही गोष्टीचे उदात्तीकरण करणाऱ्या भक्तांच्या अविवेकी वृत्तीवर सडेतोड हल्ला चढवताना-

'त्यांची श्रद्धा
अंधश्रद्धेचेच एक विवर असते काळे
त्यात ते राहतात वळवळत कृमी होऊन..
तेच त्यांच्या जगण्याचे आनंदतळे'

हे त्यांचे वृत्ती-वर्तन कवीने जाहीर केलेले आहे. या वृत्ती-वर्तनापोटीच राजकारणातील भक्तीमुळे कोणत्याही राजकीय पंथात हुकूमशाही प्रस्थापित होत असते. जातीच्या अस्मिता आत्यंतिक टोकदार केल्या जाण्याच्या आणि अविवेकी मानस तयार होण्याच्या काळात हा धोका भारतीय लोकशाहीला फार गंभीर स्वरूपाचा आहे. म्हणूनच 'मनू', 'जातअळी', 'जात', अशा काही कवितांमधून जातीयतेचे विष हे मानव्यविरोधी व राष्ट्राच्या एकत्मातेविरुद्ध आहे हेही त्यांनी स्पष्टच केले आहे. कारण 'जाती ह्या राष्ट्रविघातक असून प्रत्येक 'जात' व त्या जातीचे समूह हे स्वतःला 'राष्ट्र'च मानत असतात'; आणि 'जात-भांडवला'चा सतत गैरवापर करत असतात. हिंदू राष्ट्रवादाच्या मतप्रणालीचे समर्थक असलेल्या लोकांचा म्हणूनच जातिअंताच्या प्रक्रियेला कायम विरोध असतो. या विरोधाच्या विरोधातून उद्भवणारा संघर्ष हा अपरिहार्यच आहे; तो आपण नेटाने पुढे नेला पाहिजे, ही कवीची भूमिका आहे.

डॉ. अशोक नामदेव पळवेकर यांच्या चिंतनाचे अनेक विषय आपल्याला ठाऊक आहेत. त्याशिवाय इतरही काही विषयांवरील कविता आपल्याला या काव्यसंग्रहात भेटतात. जसे- 'पाहोम' ही कविता. या कवितेत रशियन साहित्यिक लिओ टालस्टॉय यांच्या कथेला त्यांनी आधुनिक संदर्भ दिला आहे. समाजात मालकी हक्काची प्रचंड लालसा असलेली एक वृत्ती असते. त्या वृत्तीत कधीही एक न संपणारी तृष्णा एक असते. ती अलीकडच्या काळातही आहे. त्यामुळे आधुनिक काळात वाढत चाललेली ही तृष्णा आपल्याला आपल्या नैसर्गिक जगण्यापासून कशी परावृत्त करते, हे वास्तव सत्य टालस्टॉयच्या कथेचा संदर्भ देत कवीने त्या कवितेतून खूपच मार्मिकपणे सांगितलेले आहे. धनसंपत्तीच्या लालसेने जीवनाचे मर्म व जीवनातला आनंद विसरलेले वर्तमानातील लोक यांच्या मानसिकतेवर कवीने केलेल्या भाष्याची एक सुरेख गुंफण

आपल्याला या कवितेत दिसून येते. तसेच ‘पारधी, कबूतर आणि मुंगी यांच्या कथेविषयी’ या कवितेतही परोपकाराची जाणीव विसरलेल्या स्वार्थी व स्व-केंद्रित लोकांच्या मानसिकतेविषयी कवीने जळजळीत भाष्य केलेले आहे. जुन्या बोधकथांना काव्यात आधुनिक संदर्भ देण्याचे कवीचे हे कसब वाखाणण्याजोगे आहे. खरेतर, त्या कविता म्हणजे  टी. एस. एलियट यांच्या जगप्रसिद्ध ‘Tradition and Individual Talent’ या निबंधाचे उपयोजित रूपच आहेत. वानगीदाखल त्यातील एक मूळ कविता वाचण्यासारखीच आहे. या कवितेत पूर्वार्धानंतरच्या दुसऱ्या भागात ते म्हणतात-

‘अजूनही तिथे :
झाड आहे. कबुतर आहे. मुंगी आहे. तळे आहे. आणि पारधीही आहे.
पण, मुंगीला पाणी पिताना पाण्यात पडल्याचे पाहून
कबुतर आता झाडाचे पान तोडत नाही.
तिच्या पुढ्यात ते टाकत नाही.
मुंगी पाण्यात बुडते. मरून जाते.
कबुतर नामानिराळे...!
पारधी येतो. कबुतरावर नेम धरतो. बाण मारतो.
कबुतर खाली कोसळते. मरून जाते. पारधी शिकार उचलतो. निघून जातो.
झाड मात्र अस्वस्थ..’

वर्तमान काळात स्व-केंद्रित वृत्तीने जगताना हरवलेल्या मानवी मनाची संवेदना व एकमेकांना मदत न करण्याची वृत्ती यामुळे व्यवस्था सतत आपला गैरफायदा घेते; आणि आपला नाहक बळी जातो. हे परखड सत्य सांगताना एकेकाळी येथील माणसा-माणसामधील आपापसातील जिव्हाळा आणि स्नेह जवळून पाहणारे झाड म्हणजे तत्त्व आणि व्यवहार यांतील अनुबंध जपणारी पिढी व तत्त्व आणि व्यवहार यांतील फारकत घेऊन जगणारी पिढी : या दोन पिढ्यांमधील बदलत गेलेली वृत्ती आणि त्यांच्या वाट्यास येत गेलेले वास्तव यांतील ताण झाडाच्या अस्वस्थतेतून कवीने कमालीच्या सामर्थ्याने अधोरेखित केला आहे. हा ताण आजच्या सभोवतालच्या वातावरणात माणसाला सामाजिक अंगाने अंतर्मुख करणारा आहे.

प्रस्तुत काव्यसंग्रह वाचताना या संग्रहात कवींने विविध विषयांना स्पर्श केला आहे हे लक्षात येते. त्या सर्व विषयांतून अस्वस्थ वर्तमान आणि परिवर्तनाची दिशा याबाबत कवीने केलेले लेखन अधिक गंभीरतेने व प्रखरतेने आले आहे, असे आपल्या लक्षात येते. तूर्तास देशात जे वातावरण आहे, ते लोकशाही व्यवस्थेला अत्यंत मारक आहे. भारतीय संविधान निर्मितीच्या काळात ज्यांना भारतीय संविधानाची निर्मितीच मान्य नव्हती, अशा लोकांच्या हाती केंद्रीय सत्ता एकवटल्यानंतर त्यांनी देशातील विद्यमान लोकशाही यंत्रणांचा गैरवापर करत लोकशाही व्यवस्थेलाच सर्वात मोठा धोका उत्पन्न केला. त्यातून मीडिया आणि न्याय यंत्रणा सुद्धा सुटली नाही. ह्या यंत्रणा सत्तेच्या बटिक झाल्या आहेत. हे वास्तव भयंकर आहे. जबाबदार व देशप्रेमी पत्रकारांची नवी व्याख्या समाजासमोर मांडली जात आहे. सत्तेच्या बाजूने उभा राहणारा आणि सरकारची चापलुसी करणारा पत्रकार हा जबाबदार व देशप्रेमी पत्रकार! तर सरकारच्या जनहितविरोधी धोरणांवर सरकारला पर्यायाने सत्तेला प्रश्न विचारणारा, जनतेच्या बाजूने उभा ठाकणारा पत्रकार हा बेजाबदार व देशद्रोही पत्रकार, अशी व्याख्या समाजासमोर रूढ

केली जात आहे. दिल्लीचे ज्येष्ठ पत्रकार विजय नाईक यांनी म्हटल्याप्रमाणे- जनतेच्या मनातील आणि सरकारच्या विरोधातील प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांची सारखी मुस्कटदाबी सुरू आहे. त्यामुळेच हा मीडिया 'पिपांत मेल्या उंदरावर' आणि 'अयोध्येच्या राम मंदिरावर' बोलतो. परंतु जनसामान्यांच्या प्रश्नांकडे तो सतत दुर्लक्ष करतो हे सत्य कवीने अधोरेखित केले आहे. सोबतच 'काय, चाललंय काय, या देशात?' या कवितेतही कवीने 'पुलवामा' हल्ल्याच्या संदर्भात बरोबर बारा दिवसांनी सरकारच्या संगनमताने मिडीयाने तयार केलेली बदल्याची स्क्रिप्ट कशी देशाची दिशाभूल करणारी आहे हे सांगत सरकार व मीडियाला धारेवर धरले आहे. त्यातून सत्ता व मीडियाचे साटेलोटे स्पष्ट होते! तसेच सत्तेच्या बळावर आणि भांडवलाच्या जोरावर घटनात्मक तरतुदींना बगल देत सत्तेच्या इशाऱ्यावर बदलत चाललेले न्यायव्यवस्थेचे आजचे भ्रष्ट वर्तनरूप लक्षात घेतानाही कवीने 'न्यायदेवता' या कवितेत थेट न्यायव्यवस्थेलाच प्रश्न केला आहे. तो प्रश्न लाख मोलाचा आहे. ते म्हणतात-

'माझी अनाथ फिर्याद कुठल्या कोर्टात नेऊ
की, न्यायासाठी नागवलेला मीच कायदा हातात घेऊ...?'

या प्रश्नाने सामान्य माणसाच्या मनातील विद्रोहाची भाषाच या कवितेतून प्रकट झाली आहे. सामान्य माणूस कायदा हातात घेतो तेंव्हा एक अराजक निर्माण होत असते हे खरे असले तरी, एखादी सत्ता संविधानाचा कायदा झुगारून न्यायव्यवस्थेला स्वतःच्या स्वार्थासाठी वेठीस धरते आणि न्यायव्यवस्थाही सत्तेच्या इशाऱ्यावर काम करते तेव्हाही देशात अराजकच निर्माण झालेले असते! हे वास्तव कवी पळवेकरांनी याठिकाणी मांडून ठेवले आहे, ते खूपच गंभीर स्वरूपाचे आहे. खरेतर, आजच्या वातावरणात असे सत्य मांडणारे, अशी भाषा बोलणारे लोक कमी आहेत. कारण दडपशाहीचे तंत्र सररास अवलंबिले जाते, असेच आजचे चित्र आहे. परंतु हे सत्य मांडण्याची नितांत गरज आहे. ही गरज या कवितेने पूर्ण केली आहे. सभोवतालच्या वास्तवाचे कवीने विवेकवादी अंगाने काही कवितांतून मांडलेले चिंतनही अतिशय मौलिक स्वरूपाचे आहे. त्यात- 'महात्मा गांधी : एक निमित्त', 'ओ जीनियस', 'रोहित वेमुला', 'जोतीराव गोविंदराव फुले', 'कबीरा', 'सिद्धार्थ गौतम बुद्ध', 'डॉ. माईसाहेब आंबेडकर', 'रमाई',' डॉ. बाबासाहेब आंबेडकरां'वरील तीन कविता, 'ब्रेख्त', 'पाब्लो', 'फिडेल', 'जॉर्ज' यांच्यासह 'हिटलरची चरित्रकथा' इत्यादी कवितांचा समावेश करता येईल. या सर्व कवितांमधून कवीने संवादात्मक शैलीने चिंतनात्मक पातळीवर मांडलेले वास्तव वाचकाला उपरोध आणि उपहासाच्या अंगाने अंतर्मुख करणारे आहे. व्यक्तिविषयक काव्यातून कवींचा काव्यविचार जसा आपल्याला भेटतो, अगदी त्याच पद्धतीने 'सीरिया', 'खैरलांजी', 'उन्नाव-कठूआ' अशी ठिकाणं आणि त्यावरील काव्यसंवाद माणसाला अवस्थ करणारा आणि हादरून टाकणारा ठरतो. व्यक्ती किंवा ठिकाणे याबाबत लिहिलेल्या कवितांतून खऱ्याअर्थाने शोषणकर्ते आणि शोषित यांच्या वृत्ती आणि अमानुषांच्या अमानवी प्रवृत्तीवर कवीने सडेतोड हल्ला चढवलेला आहे. मात्र 'बरे झाले गांधी तुम्ही आज नाही. अन्यथा व्यवस्थेने तुम्हालाही फासावर

लटकवले असते' किंवा 'बरे झाले कबीरा आज तू नाहीस. अन्यथा तुलाही देशद्रोही ठरवले गेले असत्ते', असे जेव्हा कवी म्हणतात तेव्हा त्यातून आपल्याला एका कालस्वभावाचे व हुकुमशाही प्रवृत्तीचे भयंकर दर्शन घडते.

वर्तमान काळातील अनेक बाबींवर / घटना-प्रसंगांवर अशोक नामदेव पळवेकर यांनी अतिशय सूक्ष्मपणे व वेधकपणे या कवितासंग्रहात प्रकाशझोत टाकला आहे. व्यंग आणि उपरोध यांचा वापरही या कवितेत लीलया केला गेला आहे. 'गावात आलेल्या मदाऱ्याची गोष्ट', 'राजकारण', 'दे आर टोटली मिस्फीट फॉर दॅट', 'कोण पेटवतोय देश', 'जंतरमंतर' 'हा देश विकणे आहे' अशा विविध कवितांमधून आजचे राजकारण / त्यांची राजकीय खेळी, संविधानाला नाकारणारी वृत्ती आणि लोकशाहीचा गळा घोटणारी प्रवृत्ती तसेच भांडवलशाहीचे मांडलिकत्व स्वीकारणारी सत्ता या सर्वांच्या संगनमताने देशात चाललेली कट- कपट-कारस्थाने कवीने बेछूटपणे उघड केलेली आहेत. तूर्तास, लोकशाही व्यवस्थेला बळकटी देणाऱ्या सर्व यंत्रणा राजकीय सत्तेच्या अंकित झालेल्या असल्यामुळे विद्यमान लोकशाही यंत्रणेला कोणताही अर्थ उरलेला नाही, ती यंत्रणा फक्त नावापुरतीच अस्तित्वात असल्याचे चित्र आहे. त्यामुळेच-

'पुराणवस्तू संग्रहालयातले
भुसा भरलेले प्राणी आणि
कागदावरची लोकशाही
दोन्ही सारखेच असतात लोकांसाठी'

-अशा शब्दात कवीने भारतीय लोकशाहीची अवस्था अधोरेखित केली आहे. खरे म्हणजे ही लोकशाही फार समर्थ आणि प्रबळ आहे. परंतु व्यवस्थेचा ठेकेदारांनी आणि केंद्रस्थानी सत्तेत असलेल्या आजच्या सत्ताधीशांनी स्वतःच्या मतलबासाठी लोकशाही यंत्रणांचा त्यांच्या सोयीने वापर करत लोकशाहीचा प्राणच नष्ट करून टाकला आहे. त्यामुळे लोकशाही फक्त कागदावर आहे. लोकशाहीच्या नावाखाली आज सर्वत्र पुन्हा एकदा प्रत्यक्ष हुकूमशाही अस्तित्वात आली आहे, असा एकंदरीत सूर या काव्यसंग्रहातून ऐकायला येतो.

या कवितासंग्रहात सरकारच्या फसलेल्या नोटबंदीपासून तर अणूचाचणीपर्यंत अनेक घटनांची अत्यंत परिणामकारक नोंद कवीने आपल्या कवितेत घेतली आहे. ती मुळात वाचण्यासारखी आहे. तसेच या संग्रहामध्ये 'झाड' ही वेगळ्या पातळीवरची एक विलक्षण कविता आहे. त्याच पद्धतीने काही जुन्या लोकांच्या विचारठेवीतून किंवा लोकम्हणीतून किंवा तत्त्वचिंतनात्मक अभिव्यक्तीतून काही कविता जन्माला आलेल्या आहेत. जसे- 'एक मार्च' या कवितेत बापाचे मुलाला- 'शहाण्याचे जोडे डोक्यावर घे, पण मूर्खाच्या सावलीत उभा राहू नकोस' असे सांगणे असो, किंवा तत्त्वज्ञानाच्या पातळीवरील 'भूक' ही कविता असो, त्या कवितांतील चिंतन फारच प्रभावी आहे. उदाहरणार्थ-

'भूक नसतेच मुळी वाईट
वाईट असते तिची कोंडी करणारे व्यवस्था, फक्त!'

अशा ओळीतून जीवनाचे प्रभावी तत्त्वज्ञान मांडणारी समर्थ कविता आपल्याला सातत्याने ह्या संग्रहात वाचायला मिळते. तात्त्विक अंगाने अभिव्यक्त झालेल्या कवितांमध्ये आणखी पळवेकरांची 'बकरा' ही कविता आपल्या भांडवलीवृत्तीचे आणि

सामान्यांच्या जगण्यातील ऱ्हासमय स्थितीचे अत्यंत प्रभावी प्रकटन आहे. ते म्हणतात-

‘माणूस : मालक असो, खाटीक असो की ग्राहक
पैशाने बकऱ्याची शिकार करत राहिला
बकरा जिवानिशी जात राहिला
माणूस नित्यनेमाने ढेकर देत राहिला’

-अशारीतीने अतिशय प्रभावीपणे ‘बकऱ्या’च्या प्रतीकातून शोषित आणि पीडित यांच्या जगण्यातील भांडवली वृत्तीने हिरावलेले त्यांचे सर्वस्व शेवटी त्यांना अत्यंत निर्दयपणे कोणत्या ऱ्हासमयतेकडे घेऊन जाते यासंबंधीचे अतिशय विदारक चित्रण या कवितेतून आले आहे. या कवितेत शेवटच्या चार ओळीतूनच सर्व सार सांगितले जाते, तरीही खाटकाच्या दुकानातील प्रसंगाचे अतिशय सूक्ष्मपणे केले गेलेले वर्णन खरोखर गरजेचे होते का? असाही एक प्रश्न या कवितेच्या संदर्भात काही अभ्यासकांनी उपस्थित केलेला आहे. प्रसिद्ध विचारवंत सुधाकर गायकवाड यांनीही या कवितेच्या दुसऱ्या भागाबाबत ‘हे वर्णन येणे गरजेचे होते का? असा एक आक्षेप नोंदवलेला आहे. अर्थात, तो पळवेकरांच्या शैलीचाही एक भाग असू शकतो. कारण ‘साहित्यात वास्तवाचे केवळ चित्रण असून भागत नाही, तर त्या चित्रणाची गतिमानता लेखकाला मांडता आली पाहिजे’ हा विचार खुद्द पळवेकरांना मान्य आहे. तो त्यांनी अनेकदा बोलून दाखवलेला आहे. त्याचाही तो परिपाक असू शकतो. वास्तव-चित्रणाच्या गतिमानतेसाठीही ते वर्णन आलेले असू शकते.

मराठी साहित्यात ‘बैल’ या विषयावर विठ्ठल वाघ, वसंत सावंत, लोकनाथ यशवंत वगैरे अनेक कवींनी कविता लिहिलेल्या आहेत. परंतु त्या सर्व कवींच्या तुलनेत अशोक नामदेव पळवेकरांची कविता वेगळी आहे. लोकनाथ यशवंत ह्यांची ‘बैल’ ही कविता शेतमजुरांच दुःख अधोरेखित करत व्यवस्थेला प्रश्न विचारते, तर अशोक नामदेव पळवेकर ह्यांची ‘बैल’ ही कविता शेतमजूर आणि शोषित ह्यांच्या पलीकडे जाऊन शोषित आणि शोषणकर्ता ह्या अंगाने आपले लक्ष वेधून घेते. ‘बैल’ ही शोषितांची आदिम काळापासूनची प्रतिमा आहे. परंतु व्यवस्थेने त्या प्रतिमारूपाचे सांस्कृतिक उदात्तीकरण केले आहे. कोणत्याही शोषणरूपाचे सांस्कृतिक उदात्तीकरण करून ते शोषण कायम सुरू ठेवणे हे शोषक-व्यवस्थेचे शास्त्रच असते. ते शास्त्र धर्माच्या अंगाने त्या शोषणाला रूढ करते. त्यामुळे त्या शोषणाविरुद्ध शोषितसमूह बंड करून उठत नाही. याच धर्तीवर बैलाचा मालक (शोषणकर्ता) एक दिवस बैलाची पूजा करून त्याच्या शोषणाला सांस्कृतिक उदात्तीकरणाचा मुलामा देतो आणि त्याचे सर्वस्व खच्चीकरण करतो. हे खच्चीकरण पिढ्यानपिढ्या बिनबोभाट सुरू असते. म्हणूनच कवी अशोक नामदेव पळवेकर यांनी ‘बैल’ या प्रतिमेतून गुलामी आणि शोषणाच्या सांस्कृतिक उदात्तीकरणाचे रूप लीलया नाकारले आहे.

सोबतच ‘स्त्रीसूक्त : तुमच्या नजरेत मी’, ‘Mee Too!’, अशा कविता भारतीय स्त्रीजीवनातील काळोखे वास्तव मांडत स्त्रीच्या मानवीपणाची ओढ प्रकट करणाऱ्या आहेत. ‘स्त्रीसूक्त’ या कवितेत तर-

‘माझे अस्तित्व म्हणजे
फक्त- एक योनी, दोन स्तन नि एक गर्भाशय
बस्स, एवढाच माझ्या अस्तित्वाचा आशय
तुमच्या लेखी...! हे नकोय मला

मला हवंय : विश्वजाहीरनाम्याच्या पानावर उमललेलं-
'All human beings are born free and equal in dignity and rights.'
हे एवढंच एक सुगंधी मन!'

-असे स्पष्टच त्या स्त्रीमनाने बजावलेले आहे. ही भावना व्यक्त करणारे मन म्हणजे खरेतर मनूवाद आणि कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील स्त्रीविरोधी सूत्रांना स्पष्टपणे नकार देणारे तसेच स्त्रीवाद व आंबेडकरवादाला प्रमाण मानणारे आहे. त्यामुळेच स्त्रीवरील बलात्काराच्या विरोधातले एक तीव्र संवेदन या काव्यसंग्रहात आहे. 'फुलन', 'संजली गौतम', 'पंचकुला' अशा काही कवितांमधून त्या संवेदनाची आपल्याला सहज प्रचीती येते. फूलनदेवीवर केल्या गेलेल्या अत्याचाराच्या विरोधात तिने घेतलेल्या भूमिकेचे समर्थन करणारी 'फुलन' ही कविता स्त्रीच्या बंडखोरीचे दर्शन घडवणारी असून 'संजली गौतम' ह्या लहानशा मुलीवर झालेला अत्याचार आणि सातारा जिल्ह्यातील तूरची फाटा येथे आठ महिन्यांच्या गरोदर स्त्रीवर आठ नराधमांनी केलेला बलात्कार ह्या घटनांची पार्श्वभूमी त्या सर्व कवितांच्या मूळाशी आहे. 'पंचकुला' ही कविता तर रामरहीमसारख्या बलात्कारी नराधमाच्या समर्थनार्थ हातात शस्त्रे घेऊन नंगा नाच करत रस्त्यावर उतरणाऱ्या लोकांच्या मानसिकतेविरोधात प्रचंड चीड व्यक्त करणारीही आहे. कारण कोणत्याही बलात्कारी पुरुषाच्या विरोधात चीड व्यक्त करणाऱ्या, त्याचा निषेध करणाऱ्या लोकांऐवजी केवळ धर्मभावनेच्या अंगाने त्याचे समर्थन करणारे लोक हे महाभयंकर आहेत! ते आपल्या मानवतेवरच प्रश्न उपस्थित करणारे आहेत. तसेच, 'कुक्कुस', 'गु-घाणीच्या राजकारणातील नौटंकी' 'स्टिल विथ अस' ह्या कवितांमधून आलेले आजचे सामाजिक वास्तव माणसाला भयंकर अस्वस्थ करणारे आहे. ते मुळात समजून घेण्यासारखे आहे.

ऐतिहासिक व वर्तमानाच्या सत्यावर भाष्य करणाऱ्या 'भीमा कोरेगावची लढाई' या विषयावरील दोन कविता या कवितासंग्रहात आहेत. त्यापैकी एक कविता भीमा कोरेगावची लढाई ही पोटासाठी नव्हती; तर समतेसाठी, अस्मितेसाठी आणि न्याय-हक्कासाठी होती याची जाणीव करून देणारी आहे; तर दुसरी कविता या विजयस्तंभाचा राजकीय षडयंत्रसाठी वापर करणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध तसेच सत्तेच्या पक्षपाती धोरणाविरुद्ध आहे. यावरून आपल्या असे लक्षात येते की, अशोक नामदेव पळवेकर हे इतिहासातील वास्तव सांगत त्या इतिहासातील सत्य अधोरेखित करतात, तसेच इतिहास आणि वर्तमान यांची सांगड घालून नेमके कोठे काय होते आणि कोठे काय असावे, याचेही भान आपल्याला आणून देतात.

म्हणूनच 'असहमतीचे रंग' या कवितासंग्रहातील प्रत्येक कविता वाचकांना विचार करायला बाध्य करणारी असून कवी अशोक नामदेव पळवेकरांच्या गंभीर आणि चिंतनशील व्यक्तिमत्त्वाचे पडसाद त्या कवितांत अधोरेखित झालेले आहेत. स्वतः कवी ज्या विशिष्ट भूमिकेत जगत आले आहेत त्याचे प्रतिबिंब त्यांच्या शब्दातून समोर आल्यामुळे त्यांची कविता अधिक सजीव वाटते. कवी पळवेकर यांच्या कवितेचा एकंदर सूर हा सामान्यत: वर्तमानावर आणि त्या वर्तमानातील विसंगतीवर बोट ठेवणारा आहे. आजच्या काळात सत्ताधिकारी वर्गाच्या

विरोधात बोलणे म्हणजे स्वतःला 'देशद्रोही' हे बिरुद लावून घेणे होय. त्यामुळे साहित्यिक सुद्धा भूमिका घेऊन बोलणे टाळत आहेत. असहमतीची स्पेस कुठेच उरलेली दिसत नाही.

'तुम्ही त्यांची लाचारी पत्करावी, त्यांचीच 'री' ओढावी
तुम्ही त्यांच्याच भाषेत बोलावे, त्यांच्याच इशाऱ्यावर चालावे
ते तुम्हाला जड जवाहर देतील, हत्ती-घोडे देतील
भोई-पालखी देतील, मेणा-मेनका देतील, राज-राजवाडे देतील
तुम्ही त्यांच्या भाषेत बोलायचे नाकारले तर-
ते तुमची घोर नाकेबंदी करतील
ते तुम्हाला घेरुन मारतील!'

अशाही स्थितीत कवी पळवेकर मात्र निर्भीडपणे आपले मत मांडण्याची भूमिका घेतात. दडपशाही करणाऱ्या लोकांच्या बाबतीत कुणाला काय निर्णय घ्यायचा आहे, तो त्यांनी घ्यावा. ते त्यांचे स्वातंत्र्य आहे. परंतु, 'मी मात्र त्यांच्या भाषेत बोलणार नाही. किंवा त्यांच्या बोटाच्या दिशेने चालणार नाही. माझी भूमिका ठरलेली आहे, माझी दिशा ठरलेली आहे', असे ते बिनदिक्कत जाहीर करतात. यातून त्यांचा दडपशाहीच्या विरोधात स्वातंत्र्यासाठी कायम लढत राहण्याचा निर्धार व्यक्त झालेला दिसतो. आपले स्वातंत्र्य जेवढे मौलिक आणि महत्त्वाचे तेवढेच आपल्या सभोवतालातील इतरही लोकांचे स्वातंत्र्य मौलिक व महत्त्वाचेच आहे! ही कवीची स्वातंत्र्यासंबंधीची भूमिका आहे. स्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीची गळचेपी होण्याच्या आणि असहिष्णूतेच्या काळात ही भूमिका फार मोलाची आहे. विरोधासाठी विरोध न करता अपरिहार्य कारणांसाठी विरोध हा त्यांच्या भूमिकेचा सकारात्मक पैलू आहे.

फसव्या घोषणा करून जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर देशाला महासत्तेची गोंडस स्वप्ने दाखवणाऱ्या सत्तेला फटकारताना अजूनही या देशात दलित, आदिवासी, भटके आणि इतर समूह हे निम्न पातळीवरचे जीवन जगत आहेत, त्यांच्या वाट्याला हे शतक अजून आलेलेच नाही, ह्याही गोष्टीचा विचार होण्याची नितांत गरज कवीने प्रतिपादन केली आहे. तरीही, या गोष्टीकडे कानाडोळा करणारी आणि भांडवलदारी वर्गाला पोषक असलेली आजची सत्ता आणि सत्ताधिकारी यांची धोरणे नेमकी कशी आहेत, हे सांगत असताना ते एका कवितेत म्हणतात-

'तरीही, सत्ता भरल्यापोटी
तिची आयाळ कुरवाळत सिंहासनावर / बेफिकीर ढेकर देत आहे.'

हे वास्तव भयंकर आहे. 'मॉब लीन्चिंग' आणि 'एन्कौन्टर' या कविता सुद्धा राजसत्ता आणि भांडवली सत्ता यांच्या संगनमताने आखल्या जाणाऱ्या अर्थकारणाचे आणि अल्पसंख्य व आदिवासी समूहाला विरोधाचे लक्ष्य करणारे धोरण उजेडात आणणाऱ्या आहेत. तसेच, 'रोझा', किंवा 'सलमान भाय' या कवितांमधून तर धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व नाकारून एका विशिष्ट धर्माच्या सरसकट सर्व लोकांना सतत आपल्या विरोधाचे लक्ष्य करणाऱ्या कट्टर धर्मवादी मानसिकतेला फटकारत त्या अल्पसंख्यांक समूहातील बहुतांश लोकांची मानसिकता देशविरोधी किंवा मानव्यविरोधी नाही तर धर्माच्या पलीकडे जाऊन या देशावर नितांत प्रेम

करणारी आणि मानवता व माणुसकीला आपला धर्म मानणारी आहे, हेही सत्य त्यांनी आवर्जून सांगितलेले आहे. आजच्या धार्मिक असहिष्णुतेच्या काळात हे सत्य समजून घेण्याची नितांत गरज आहे.

समाजात फोफावत चाललेल्या असहिष्णुतेबरोबरच या कवितासंग्रहात कवीने जगभरातल्या युद्धखोर प्रवृत्तींचाही निषेधच केलेला आहे. हा निषेध करणारी कवीची भूमिका बुद्धाच्या व्यापक मानवतावादाला आणि कारुण्याभावाला प्रमाण मानणारी आहे. म्हणूनच 'युद्धोन्माद' या कवितेत निरपराध जनतेवर युद्ध लादणाऱ्या प्रवृत्तीवर आसूड ओढताना ते म्हणतात-

'त्यांच्यासाठी युद्ध : असतो एक खेळ, पोरखेळ जिंकण्या-हरण्याचा
किंवा, व्यापार शस्त्र-विक्रीतल्या नफेखोरीचा
किंवा, उन्माद रक्ताच्या खुमखुमीचा
जो सैन्याच्या जीवावर असतो पोसलेला, उदार
देतो झोकून सर्वांनाच / मरणाच्या, अपंगतेच्या, रोगराईच्या, भुकमारीच्या खाईत
हे नसते त्यांच्या ध्यानीमनी, की-
युद्धात नसते कुणीच जिंकत वा हारत
केवळ पराभूत होत असते एकटी मानवता युद्धात'

कारण 'युद्धविराम' या कवितेत म्हटल्याप्रमाणे-

'सीमेच्या अलीकडे / उभे आहेत हे सैनिक
आणि
सीमेच्या पलीकडे / उभे आहेत ते सैनिक
दोघेही माणसेच आहेत!'

ही भावना, हा विचार फार महत्त्वाचा आहे. म्हणूनच राजकीय नेतृत्वाची सत्तेसाठी एकमेकांवर चाललेली कुरघोडी करण्याची वृत्ती, सत्तास्थानावरील जबाबदार व्यक्तींची सर्रास आणि सराईतपणे खोटे, बेताल तसेच चिथावणीखोर वक्तव्ये करण्याची भूमिका ह्या सर्व बाबींचा कवीने आपल्या काव्यसंग्रहात योग्य व सडेतोड समाचार घेतलेला आहे. तसेच, लोकांमध्ये धार्मिक उन्मादाला खतपाणी घालणाऱ्या सत्तेच्या विरोधात सर्वसामान्य जनतेच्या मनात प्रचंड राग व असंतोष आहे हे सांगताना कवीने 'एक बातचित : नसिरुद्दीन शहाशी' ह्या कवितेत- "साहब, लोगोमे गुस्सा बहुत है!" असे नसिरुद्दीन शहाच्या चित्रपटातील एक वाक्य नेमकेपणाने वापरले आहे. आणि देशातील धार्मिक उन्मादाच्या पार्श्वभूमीवर 'करवान-ए-मोहब्बत'मध्ये नसिरुद्दीनने 'डरा नहीं, गुस्सा हुं' हे विधान केल्यानंतर त्याविरोधात देशभरातून उमटलेल्या कडवट प्रतिक्रियांच्या संदर्भात कवी अशोक नामदेव पळवेकर यांनी उपरोध आणि उपहासाच्या अंगाने हे विधान नसिरुद्दीन शहाने करायला नको होते, तर ते विधान हरियाणाचा पहलू खान, मुस्तैन अब्बास, राजस्थानचा अफराजूल, दिल्ली-मथुरा ट्रेनमधील प्रवासी जुनैद, शहजाद अहमद, सिबतुल्लाह, झारखंडचा इम्तियाज मजलूम, महाराष्ट्रातील प्रियंका, इतर राज्यांतील आसिफा, संजली, बिहारमध्ये दिवसाढवळ्या नग्न केल्या गेलेली स्त्री, गुजरातमधील इशरत जहा, सोहराबुद्दीन, कौसर, प्रजापती, हरेन पंड्या, उनातला दलित तरुण, जज्ज लोया, नजीब, रोहित वेमुला, अंकित सक्सेना आणि सुबोध सिंह ह्या लोकांनी ते बोलायला पाहिजे होते, असे म्हटले आहे. कारण हे सर्व लोक धर्मद्वेष आणि धार्मिक कट्टरतावादाचे तसेच दडपशाहीचे शिकार झालेले आहेत! म्हणूनच तो राग, तो संताप आपल्या काव्यातून व्यक्त करताना आपल्या शब्दांना धार

लावून सभोवतालात जे जे विसंगत आहे त्यावर हल्ला करणाऱ्या मोजक्या लढवय्या कवींमध्ये या कवीची नोंद घेतली जाते.

'असहमतीचे रंग' या कवितासंग्रहातील कवी अशोक नामदेव पळवेकर यांच्या कवितेचे एक वैशिष्ट्य म्हणजे ही कविता अतिशय साधी, सोपी आणि सरळ; तितकीच अभिजात आहे. या कवितेची स्वतंत्र भाषाशैली आहे. अनेकदा अनेक कवींच्या कविता वाचल्यानंतर वाचकाच्या हाती काहीच लागत नाही. किंवा, लागले तरी त्याचे प्रमाण अल्प असते. परंतु या कवितेच्या बाबतीत मात्र असे घडत नाही. कारण आपल्याला आपल्या वाचकाला नेमकेपणाने काय सांगायचे आहे, शिवाय आपण ते कोणाला सांगणार आहोत याचीही जाणीव कवीला आहे. म्हणूनच आपण जे सांगणार आहोत ते समोरच्या वर्गाला सहज समजले पाहिजे अशी त्यांची धारणा असल्याने त्यांची प्रत्येक कविता वाचकाला अगदी सहजपणे भावते आणि आकळतेही! खरे पाहता, अशोक नामदेव पळवेकर ह्यांची प्रत्येक कविता ही एक कथानक घेऊनच वाचकांना भेटते. त्यांच्या प्रत्येक कवितेत एक 'स्टोरी' असतेच! त्यामुळे त्या कवितेचा एक स्वतंत्र घाट आहे, एक स्वतंत्र शैली आहे. त्यात आशय व मांडणीची एक शैलीदार सलगता आहे, प्रमाणबद्धता आहे. म्हणूनच या कवितेची अभिव्यक्ती अगदी सहजसुंदर वाटते.

या काव्यसंग्रहात आपल्या समकाळाचा एक व्यापक आणि विस्तृत पट आलेला आहे. त्यातून आपल्याला आपल्या समकाळाचे स्वभावदर्शन तर घडतेच, सोबतच कवीची आंबेडकरवादी विचारसरणी आणि मानवतावादी जीवनदृष्टी यांचाही सतत प्रत्यय येत राहतो. थोडक्यात, या कवितेत : भारतीय समाजव्यावास्थेतील सामान्य माणसाच्या जगण्यातील ताण-तणाव आहेत. समाजातील धार्मिक-जातीय असहिष्णुता आहे, क्रौर्य आहे, दहशत आहे. पुरुषसत्ताक व्यवस्थेतील हिंस्रता आहे. सत्ताधीशांच्या वर्तनातील सामाजिक-राजकीय पाखंड आहे. मूलतत्त्ववादी विचारसरणीतून फोफावत जाणारा धार्मिक व सांस्कृतिक उन्माद, कट्टरतावाद आहे. सभोवतालात सर्वच क्षेत्रांत होत चाललेली नैतिकतेची प्रचंड पडझड आहे. तसेच, भांडवली आक्रमकता आणि सत्ताशरण मीडिया, प्रशासन व न्याययंत्रणा यांची भ्रष्ट वास्तवरुपेही आहेत. अलीकडच्या काळात जीन ड्रेझ यांनी 'द रिव्होल्ट ऑफ दी अप्पर कास्टस' या ग्रंथात संघाच्या व केंद्र सरकारच्या भूमिकेबद्दल म्हटल्याप्रमाणे- 'लोकशाहीविरूद्धचे उच्च जातींचे अत्यंत शांततापूर्ण असणारे बंड लोकशाही संस्थांवर आता अधिक प्रखर हल्ल्याचे स्वरूप धारण करीत आहे. त्याची सुरुवात विरोधी मत व्यक्त करणाऱ्या 'व्यक्ती' व 'अभिव्यक्ती' स्वातंत्र्यावरील हल्ल्याने झालेली आहे.' परिणामी, आपल्या विरोधी मताची 'स्पेस' संपुष्टात आली आहे. हेच वास्तव वेगवेगळ्या घटना-प्रसंगांतून वेगवेगळ्या अंगाने या कवितासंग्रहात अधोरेखित झालेले आहे. म्हणूनच प्रख्यात कवी, समीक्षक व विचारवंत डॉ. यशवंत मनोहर यांनी या कवितेची भलावण करताना त्यांच्या प्रस्तावनेत- 'समकाळाचे वर्गचरित्र आणि असहमतीचा आकृतिबंध मांडणारी कविता' असा या कवितेचा सार्थ गौरव केला आहे. तसेच, कवितासंग्रहाच्या अगदी प्रारंभीच उद्धृत केलेल्या- 'मी तुमच्या मताशी असहमत असेल, पण ते मत तुम्हला मांडता यावे या

तुमच्या अधिकारासाठी मी प्राणपणाने लढेन!' या विधानाने प्रस्तुत काव्यसंग्रहाची संपूर्ण 'थीम'च अधोरेखित झालेली आहे. कवितासंग्रहाच्या मुखपृष्ठावर प्रसिद्ध छायाचित्रकार संजय दळवी यांनी टिपलेले 'एकाच भूमीतून आपला जीवनरस घेणाऱ्या पिंपळवृक्षाच्या फांदीवरील फुटव्याच्या वेगवेगळ्या रंगांच्या पानांचे' छायाचित्र आहे. ते अतिशय समर्पक आहे. पुस्तकमार्केट प्रकाशन, पुणे या ग्लोबल प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेला आणि प्रशांत पब्लिकेशन्सने पुनर्मुद्रित केलेला प्रस्तुत काव्यसंग्रह अतिशय दर्जेदार आहे.

किरण शिवहर डोंगरदिवे

(7588565576)

कवितासंग्रह : असहमतीचे रंग


कवी : अशोक नामदेव पळवेकर

प्रकाशक : पुस्तकमार्केट प्रकाशन, पुणे / पुनर्मुद्रण : प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव

आवृत्ती : २६ जानेवारी, २०२२ / पुनर्मुद्रित आवृत्ती : १२ जून, २०२२

किंमत : २०० रुपये / ३९५ रुपये (Hard Bound Copy)

०००



# स्वागत

प्रा.डॉ.अरुण ठोके
प्रसिद्ध समीक्षक व स्तंभलेखक



**प्रा.डॉ.अरुण ठोके**
**नाशिक**

## ‘उजेड गाभाऱ्यातला’ रोमँटिक जाणिवेची कविता

---

कवी बाळकृष्ण सोनवणे हे मराठीतील विविध नियतकालिकांत गेल्या चाळीस वर्षांपासून कवितालेखन करीत आहेत. त्यांचे सन २००५ मध्ये ‘स्त्री सूक्ताच्या कविता’, सन २००७ मध्ये ‘उजेड गाभाऱ्यातला ’ व सन २०१४ मध्ये ‘समजूतदार जाणिवांचे कवडसे’ असे तीन कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. प्रस्तुत निबंधात त्यांच्या ‘उजेड गाभाऱ्यातला ’ या कवितासंग्रहांतील कवितांच्या विशेषांचा उलगडा करण्याचा करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. आता आपण त्यांच्या ‘उजेड गाभाऱ्यातला ’ या कवितासंग्रहांतील कवितांचे विशेष पाहू.

‘उजेड गाभाऱ्यातला’ या संग्रहातील कवितांत रोमँटिक जाणिवांचे धीट आविष्करण झालेले आहे. यात अध्यात्मिक जाणिवांची रोमँटिक जाणिवांत सरमिसळ झालेली असल्याने अभिव्यक्तीतील तरलता प्रत्ययाला येते. कवितेतील ‘मी’ चे प्रेयसीला गुपचूप भेटणे, प्रेयसीला केलेले आवाहन, निवेदन संसूचक आहे. कवितेतील ‘मी’ च्या नेणिवेतील अनेक आठव भावतरंग बनून काव्याभिव्यक्तीचे कारण ठरतात. त्याचे नित्यनेमाने तिच्या अंगणातून मंदिरात जाणे, त्यावेळी परस्परांच्या नजरेनेच एकमेकांशी बोलणे, परस्परांच्या सान्निध्यातून प्राप्त झालेल्या आनंदानुभूतींसह घरी परतणे, हे ठरलेले. तिने भेटीसाठी यावे, यासाठी त्याने केलेली प्रेमातुर आवाहने अनेक कवितांतून आलेली आहेत. तिच्या असण्याची त्याच्यावरील छाप वरवरची नसून खोलवरची, आत्म्याच्या पातळीवरची असल्याचे त्याच्या निवेदनातून कळते. तिने माझी दैवरेखा सहजच शोषून घेतलीय, असे तो म्हणतो. दोघांच्या प्रेमाचे साक्षी म्हणून मंदिर, गाभारा, त्यातील मूर्ती, पखवाजी, पुजारी असे सजिवंत वा वस्तुरूप व्यक्तित्वे प्रेमानुभूतींच्या अटळ आविष्काराची निकड म्हणून आलेली आहेत. दोघांचे असे परस्परांना भेटणे इतरांच्या डोळ्यांत खुपणारे ठरते. यातून उद्भवलेले दुःख सोसण्यासाठी त्याने तिला केलेले आवाहन खासच आहे. उदाहरणार्थ,

वेदनेच्या उन्हाला असू दे लाखभर पदर
दिपू देऊ नकोस डोळे
खात्री असू दे
मला करता येते कवितेच्या पाकळ्यांनी डोळ्यांची
उघडझाक

(‘उजेड गाभाऱ्यातला’ पृ.५)

तिने धीरोदात्तपणे परिस्थितीला सामोरे जावे. वेदनेचे ऊन म्हणजे अपमान, दुःखाला सोसून प्रेमाविषयीच्या वल्गनांचा सामना करावा. आपल्या वाट्याला येणाऱ्या दुःखावर मात करण्याचे कसब आपण कवितेतून हाशील केले आहे, असे तो म्हणतो. दुरूनच एकमेकांना पाहणे परस्परांच्या आकर्षणात भर घालणारे ठरत राहते. कवितेतील प्रेयसीची प्रतिमा ही पारंपरिक स्वरुपाची असल्याने ती काही धीटपणे त्याच्या भेटीला येत नाही. म्हणून तोही तिला भेटण्याचे कल्पित दृश्य 'स्पर्शाचे कोवळे ऊन' या कवितेत चितारतो. तो प्रेयसीला त्याच्या स्पर्शाच्या कोवळ्या ऊन्हाने न्हाऊन निघण्याचे आवाहन करतो. तिने मंदिरालगतच्या बागेत आवडत्या फुलवेलीजवळ उभे रहावे. तिच्या देहाच्या वैभवी सहवासाने ती वेल थरारून येईल. प्रेयसीने त्या वेलीला हलकेच स्पर्श केला तर त्या स्पर्शाची अनुभूती भूपाळी आळवण्यासारखी ठरेल. वेलीलाही प्रेयसीच्या देहावर स्वतःला पसरवून घ्यावेसे वाटेल. या वर्णनातून प्रेयसीच्या रूपवान देहाचा प्रत्यय येतो. अशा रूपवान प्रेयसीने त्याच्या झोळीत भरजरी भिक्षा घालावी, यासाठी तो तिला आर्जव करतो. तिच्यासाठी जोगी होण्याचीही त्याची तयारी असते. तिने त्याला भेटायला न येणे, त्याच्यासाठी विरहव्याकुळता वाढवणारे ठरते. म्हणून तुला एखाद्या कोनाड्यातून न पाहता तुझ्या डोळ्यांत मी माझे नाव नांगरून उमटवेल असे, तो म्हणतो. त्यासाठी तिने निकट भेटीसाठी यावे, असे प्रेमळ आवाहन करतो.

या कवितांत ऊन हे प्रतीक निरनिराळ्या अर्थांचे सूचन करण्यासाठी येते. टोकदार ऊन, दग्ध टोकदार ऊन, चटकेदार ऊन अशा उन्हाच्या विविध छटा काव्याशय घडविण्यासाठी पूरक ठरतात. दोहोंतील विरहाची तीव्रता दर्शविण्यासाठी प्रियकर प्रेयसिला मध्यान्हीचं चटकेदार ऊन सहन करण्याचे आवाहन करतो. इथे 'मध्यान्हीचं' हा शब्द दुहेरी अर्थबोध करणारा आहे. 'मध्यान्ह हा शब्द दुपार असा घेतला तर वाच्यार्थ दर्शवितो. या अर्थाने खरोखरचे दुपारचे ऊन. मात्र त्याच्या योजनेतील लक्षणीयता हेरली म्हणजे 'मध्यान्ह हा दोघांच्या प्रेमातील आरंभ व शेवटातील मध्यान्ह आहे. आरंभ सुखद होता. दोघांच्या प्रेमाची गावभर चर्चा झाल्याने दोहोंत निर्माण झालेला दुरावा; विरहाचा थांबा म्हणजे हा मध्यान्ह होय. म्हणून यातील एकेक क्षण हा चटके देणारा असल्याचे यातून सूचित होते. या अर्थाने कवितेतील प्रियकर त्याच्या प्रेयसीला विरह सोसण्याचे आवाहन करतो. तू स्वतःला एकटे समजू नये, वारा वा चांदणे यांच्या रूपांत मी तुझ्या सभोवतीच असेल. या शब्दांत तिला आश्वस्त करतो. प्रेमातील स्पर्शानुभूतींमागे असलेल्या तृषार्त मनाचे आवेग सांभाळणे तिला कठीण जाते. हा अनुभव तिने स्पर्शसूक्ताचं सहस्रावर्तन सुरु केल्याच्या कल्पितातून साकारलेला आहे. तो जवळ नसल्याने तिचे बेचैन होणे, विरहाने तळमळणे, तो जवळ नसण्याच्या छोट्याशा कालावधीला तिने युग संबोधणे , यातून तिची मानसिक व दैहिक तगमग सूचित होते. तिच्या त्याच्यातील अंतराने तिची तगमग होत असतानाच तिने विरक्त होण्याचे केलेले नाटक कृत्रिम असल्याने तिचे गोंधळणे स्वाभाविक ठरते. दोहोंच्या प्रेमाची गावभर चर्चा झालेली असतानाच तो तिला ठिणगीच्या ज्वाळा होऊ न देण्याची हमी देतो.

तिने तिची ओढणी धुवून वडिलांच्या सोवळ्यासमवेत वाळू घालू नये, असे त्याला वाटते. या वर्णनातून हे सूचित होते की, ती ब्राम्हण कुटुंबातील असून तो ब्राम्हणेतर कुटुंबातील आहे. ब्राम्हण व ब्राम्हणेतर प्रियकर -प्रेयसी असा सामाजिक ताणाबाणा दर्शविणारे वास्तव जातिभेदाच्या अस्तित्त्वाचे सत्य अधोरेखित करते. 'धुवून वाळवू नकोस' या वरवर साध्या वाटणाऱ्या कवितेतील वस्रनिवडीमागे हेतुपूर्वकता नसली तरी त्यातून नियत झालेला आशय व्यापक अर्थनिर्देश करतो. 'सोवळे' हे वस्र सनातनी वृत्तीचे निदर्शक आहे. तर ओढणी हे वस्र आधुनिक जीवनशैलीचे निदर्शक आहे. याचा अर्थ ओढणी घेणारी हरेक स्री आधुनिक विचारांची पुरस्कर्ती असेलच असे नाही! कवितेतील प्रेयसी ही परंपरेचे बंध तोडू शकत नाही, हे वास्तवही यातील चित्रणातून अधोरेखित होते.

तिच्या अस्तित्त्वाने त्याच्या मनःपटलावर केलेला परिणाम ' वारा रतिरंगी' या कवितेतून आविष्कृत झालेला आहे. सोनचाफ्याप्रमाणे तिने त्याला स्वतःकडे आकृष्ट करून घेतले आहे. प्रेमप्रभावाची अनुभूती तो अशी व्यक्त करतो,

पूर्ण संमोहित करून
सोनचाफी शब्दशरांचे तळ ढवळले
पाणी शिंपड जरा
माझ्या संज्ञेच्या तापट धमनीतून
तुझ्या दैहिक रांगोळीवर हुकूम
सुसाटतोय रतिरंगी वारा

('उजेड गाभाऱ्यातला' पृ.१३)

या ओळींतून प्रेमात आकंठ बुडालेल्या प्रेमी युगूलाच्या भावानुभूतींचा उत्कट प्रत्यय येतो. तिचे दुरावणे, त्याला स्वीकारणे जड जाते. 'रंग गाभाऱ्यातले' या कवितेत प्रियकराचा मनदाह शमविण्यासाठी कल्पित घटितांद्वारे तिच्या अनुपस्थितीला पुसट करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. तिच्या जाण्याचे दुःख काव्याभिव्यक्तीद्वारे साजरे करणेच त्याच्या हाती उरते. प्रेयसीला केलेली मनोहारी आर्जवे हा सोनवणे यांच्या 'उजेड गाभाऱ्यातला' या कवितासंग्रहातील कवितांचा नितांतसुंदर विशेष आहे. मंदिरात जाण्याच्या बहाण्याने दोहोंच्या भेटी होत असल्या तरी त्यांच्यातील प्रेमाला मांगल्याचे कोंदण ओतप्रोत आहे. यामुळेच प्रेयसीचा चेहरा मंदिराच्या गाभाऱ्यासारखा झगमगलेला वाटणे, तुळशीच्या नेसूला चंदनाचा काठ होणे, यासारख्या शुभानुभूतींचा दरवळ काव्याशयाची व्यापकता दर्शवितो. अशा रीतीने विलक्षण विरळया कल्पित प्रेमानुभवांची निर्मिती करून कवी आपल्या प्रातिभिक आविष्काराने वाचकांना अचंबित करतो. आणखी एक संहिता पहा,

माझ्या प्राणाच्या तळयात
पहा प्रतिबिंब
वासनेच्या वेलींनी सुवासिक झालेलं
किंवा
तळखोल लेवून पहा
वासनेचा प्राणप्यारा निखारा
फिरेल देहावर तुझ्या हवाहवासा पिसारा

('उजेड गाभाऱ्यातला' पृ.१८)

यातील प्रियकर परस्परांच्या आकर्षणामागे असलेल्या तृष्णापूर्तीच्या आसक्तीची कबुली देतो. तो सर्जनशील निर्मिती करणारा असल्याने आपल्या तृष्णांना लौकिक पातळीवरून अलौकिक पातळीवर घेवून जातो. त्यातून मिळणाऱ्या निखळ आनंदाचे कारण कविता असल्याचे सांगतो. प्राणाच्या तळ्यातील प्रतिबिंब, वासनेच्या वेलींनी सुवासिक होणे या दोन परस्पराश्रयी प्रतिमांतून रंग, स्पर्श व गंधसंवेदनेची अनुभूती प्रत्ययास येते.

'मी नाही पाहू शकत' या कवितेत प्रियकर त्याची प्रेयसी दुःखी झालेली पाहू इच्छित नाही. मात्र तिच्या उदासीन, दुःखी चेहऱ्याकडे पाहून, त्यावरील भाव करुण असल्याने त्या भावाची तीव्रता दर्शविण्यासाठी 'चेहऱ्यावर करुण दिवसाचं / पार्थिव आभाळ' असे काव्यात्मक विधान केलेले आहे. शरीराचे पार्थिव होणे स्वाभाविक आहे. कारण ते नष्ट होणारे आहे. आभाळाचे पार्थिव होणे, ही अनोखी कल्पना करून प्रचलित अर्थाचे उल्लंघन करण्यात आलेले आहे. पार्थिव होऊन ते संपत नाही अनानंदी विकल आरशात प्रतिबिंबित होऊन उरते. या कवितेत पार्थिव आभाळ, अनानंदी विकल आरसा, कुमारार्त केसांचं चविष्ट गवत या नवार्थबोधक शब्दयोजनांतून आभाळ, आरसा व गवत या प्रतीकांचे अर्थ बदललेल्या स्वरुपात अनुभवाला येतात.

प्रियकर- प्रेयसीने केलेल्या प्रेमाचे तटस्थ परीक्षणही या कवितेतील 'मी' च्या कथनातून सहजपणे आविष्कृत झालेले आहे. कुमारवयात केलेल्या प्रेमाला शरीरातील बदलांची, दैहिक आकर्षणाची किनार होती. प्रगल्भ झाल्यावर केवळ शारीर पातळीवरील आकर्षण हे गवताप्रमाणे अल्पायुषी, पुन्हा-पुन्हा उगवून येणारे असले तरी ते फारसे मौलिक नाही. गवताला गृहीत धरले जाते, पिकातून उपटून फेकले जाते, बाजूला केले जाते. तसे प्रगल्भ अवस्थेतील प्रेम कळाल्यावर निष्ठेच्या मांडीवर मान ठेवून सिद्धी प्राप्त करून घेता येते. आणि अशी सिद्धी प्राप्त झालेली व्यक्ती कविता लिहून त्याद्वारे अभिव्यक्त होते. ही सिद्धी या कवितेतून अनुभवता येते. अशा सकारत्मक प्रेमानुभवाचे आविष्करण व प्रेयसीने आनंदी रहावे, यासाठीचे आवाहन कवितेतून करण्यात आलेले आहे.

या कवितांतील प्रियकराचा विरह त्याच्यातील कल्पक मनोवृत्तीमुळे सतत एकमेकांच्या सान्निध्यात असल्याची कल्पित दृश्ये रंगवतो. असे करणे त्याचा मनदाह शमविणारे ठरते. प्रेयसीने भोगाची कोवळी सावली त्वचेवर सांडल्याने ती त्याच्या रोमारोमात भिनलेली आहे. दूर असतानाही ती समोर आहे,सोबत आहे असे गृहीत धरून त्याने केलेल्या कल्पना, रचलेल्या गोष्टी अनेक कवितांतून आलेल्या आहेत. उदाहरणार्थ तो तिला म्हणतो, आपण अशा गावात वस्ती केलेली आहे की, जिथे कधीच कोंबडा आरवत नाही. याचा अर्थ तिथे निरव शांतता आहे. भय नाही. दोघांच्या प्रेमात अडसर निर्माण करतील अशी माणसे नाहीत. त्यामुळे एकमेकांप्रती प्रकट करावयाच्या निष्ठेच्या आणाभाका सहजपणे घेता येतील. तर 'तुझी पसरतेय आभा' , 'देहाचा सुळका बोचतोय', ' तू झाकू नकोस' या कवितांत प्रेयसीच्या देहाला देव, गाभारा, प्राण, सुळका, ताटवा अशा विविध उपमा योजण्यात

आलेल्या आहेत. तरल प्रेमानुभूती व्यक्त करताना तिच्या देहाचा सुळका नाजूक प्राणपताकेला बोचल्याची लटकी तक्रारही करण्यात आलेली आहे. या वर्णनातून प्रियकर व प्रेयसी या दोहोंचे देह भिन्न असले तरी प्राणतत्त्व एकरूप झाल्याचा सूचक भाव व्यक्त झालेला आहे.

प्रेमातून विश्वरूपाशी एकरूप झाल्याचा अनन्य अनुभव व प्रेयसीच्या अस्तित्वाला, तिच्या देहाला दिलेली दिव्यत्वाची उपमा यांचा विलक्षण प्रभाव कसा व्यक्त झालेला आहे, ते पहा-

ब्रह्मांडाच्या नाभीवर तरारून
दैवी देहबिंबाचा ताटवा
तुझी पसरतेय आभा
मोहरल्या आत्म्यावर माझ्या
('उजेड गाभाऱ्यातला' पृ.२४)

अशी दैहिकतेच्या पार आत्म्याच्या पातळीवरील मिलनातून साकारलेली तृष्णापूर्ती प्रेमभावनेच्या उदात्त शृंगारिकतेचा परिपोष साधणारी ठरते. कृष्णाचे राधा होऊन जाणे किंवा राधेचे कृष्ण होऊन जाणे नेमके कसे असेल ? हे आपण पाहिलेले वा अनुभवलेले नाही. मात्र या कवितेतील प्रियकराचे असे आत्म्याच्या पातळीवरील मिलन व दैहिक अनुभूतींचा कल्पित घटितांच्या योजनेतून केलेला उत्कट आविष्कार तरल मधुराभक्तीचा प्रत्यय देतो. ती कुठेही असली तरी तिच्या पावलांचा माग काढून आसक्तीच्या गाभाऱ्यात पोहचून तिच्या देहदेवाला शरण जाणे आणि दशसहस्र चुंबनांचे दिवे चेतविणे, ते प्रकाशल्यानंतर शेजारती, मिलन होणे अशा कल्पित घटितांची पखरण या कवितांत झालेली असल्याने तरल, आदर्श, सुफी प्रेमानुभवाचा आनंददायी प्रत्यय अनुभवता येतो.

कल्पनेच्या जगातून वास्तवात आल्यानंतर भौतिक जीवनातील समस्यांनी तिचे त्रस्त होणे, त्यातून तिला आलेली उदासीनता, तिच्या मनात निर्माण झालेले प्रश्न, संभ्रम हे आपल्या दुःखांना पोषक ठरतात. आपल्या दुःखांना आपण रंग देऊ नये, असे आवाहन तो तिला करतो. विषण्णता सोडावी, स्वप्ने पहावीत. स्वप्नांच्या पुलाने आपल्या आयुष्याची टोकं जोडलेली आहेत, असे म्हणून तो तिला त्यांच्यातील दुरावा मिटविण्यासाठीचा उतारा सांगतो. दोघांचे विलग होणे त्यांना स्वीकारणे भाग पडते तेव्हा तो आपल्या स्वप्नांना ॲनिमिया झाला असल्याचे सांगतो. तिच्या जवळ असण्याच्या बहाण्याने, कल्पनेने त्याला स्वप्नांच्या काल्पनिक जगात मन रमविण्याचा सोस होता. ती दुरावल्याचे सत्य पचविताना तो स्वतः विकलांग झाल्याच्या अनुभवाची कबुली देतो. तिच्याप्रमाणेच पक्षी, झाडे, फुले यांनीही आपल्याशी अबोला धरलाय. त्यांनीही त्याच्याकडे पाठ फिरवली आहे. किंबहुना स्वतःच्याच सावलीने मला शह दिला, असे कथन करतो.

या संग्रहातील शेवटच्या भागातील कवितांतून विरह पचविल्याच्या अनुभूती व्यक्त झाल्या आहेत. तसेच प्रेयसीसमवेत केलेल्या संवादातून प्रियकराचे आक्रंदनही प्रकट झाले आहे. तिच्या जाण्याने त्याची झालेली विकल अवस्था रक्तात प्रलयंकारी काळोखाचा महापूर वाहत असल्याच्या अनुभवाद्वारे व्यक्त झालेली आहे. त्याच्या साथीला त्याला सुचणारी कविताच उरल्याने, प्रेयसीने त्याच्या

कवितेतून  उगवून यावे, असे आर्जव तो तिला करतो. त्याच्याप्रमाणे तिलाही हा विरह पचविणे जड गेले असेल म्हणून तो तिला म्हणतो की, तुझ्या ठायी वस्तीला आलेले वेदनेचे मांजर हाकलू नकोस. ती दूर असताना तो  कल्पना करतो की, तिने जवळ यावं. तो लिहित असलेल्या कवितेचा ती विषय व्हावी. मात्र कवितेची निर्मिती वा सत्त्व अनुभवताना कविप्रमाणे तिलाही दाह, घुसमट, अस्वस्थता सोसावी लागेल म्हणून तो तिला कवितेचा  व्रण धारण करण्याचे आवाहन करतो. तिने त्याला त्याच्या कवित्वासहित समजून घ्यावे. त्याच्या कवितेत ईश्वराप्रमाणे अवतरावे, यासाठी तिला केलेली आर्जवे कवितांत पुन्हा- पुन्हा येतात. प्रेयसीपासून दुरावल्यानंतर कवितेमुळे त्याच्या जगण्याची उमेद टिकून राहते. आपल्या मनमंदिरात त्याने सजवलेली तिच्या अस्तित्वाची विविध रूपे तो कवितेतून साकारतो. तिच्या देहाचा सुगंध त्याच्या सुजाण ओंजळीत मोहरून आल्याची अनुभूती प्रकट करतो. प्रेयसीच्या प्रतिमेचे साक्षात विठ्ठलाच्या प्रतिमेशी केलेले साधारणीकरण हा या कवितेचा अमोघ सौंदर्यविशेष होय. उदाहरणार्थ,

मला आवडतो
स्वतःपासून तुझ्यापर्यंत
करायला प्रवास

आनंदाची धरून पारंबी
उतरतो खोल
तुझ्या लावण्याच्या उजेडात
शब्दांची करतो आरास
मांडतो खेळ
तुला आणि मलाही भावलेला
आणि तू धुक्याची साय बाजूला सारून
साक्षात उभी ठाकतेस
विटेवर कवितेच्या !

('उजेड गाभाऱ्यातला' पृ.७८)

प्रेयसीला असे ईश्वरी रुपात पाहिल्यावर तिचे प्रकाशमान झालेले लख्ख बिंब त्याच्या डोळ्यांत उतरते. त्याच्या प्रत्येक कृतीवर, शब्दाक्षरांच्या पाकळी- पाकळीवर तिचीच अधर खूण असल्याचे सांगतो. त्याच्या कवितेत येत असलेले सत्त्व, सकारात्मक आशय, ज्ञानात्मक जाणीवा यांचे श्रेय तो प्रेयसीला देतो.किंबहुना तिच्या अस्तित्त्वाचे    अवघे अवकाश कवितेत साकारून तिच्या वाटेवरील घोट - घोट तीर्थ घेत असल्याची अनुभूती प्रकट करतो. थोडक्यात प्रेयसीला सर्वोच्च स्थान देवून तिच्या दुराव्यानंतरही ती प्रियकराची व त्याच्या कवितेची जीवनदायी उर्जा बनते. बाळकृष्ण सोनवणे यांच्या कवितेतील ही स्त्री-प्रतिमा भारतीय दर्शन परंपरेच्या प्रवाहाला खळाळ प्राप्त करून देणारी आहे. सोनवणे हे कवितेच्या रूपाचा सूक्ष्मतेने विचार करणारे कवी आहेत. यामुळे त्यांनी लिहिलेल्या मुक्तछंदातील कवितांतही संवेद्यता प्रत्ययास येते.  साठोत्तरी कवितेतून चित्रित झालेल्या प्रेमानुभूतींपेक्षा सोनवणे यांच्या कवितेतील प्रेमानुभूती वेगळ्या आहेत. या अनुशंगाने ना. धों. महानोर व पुरुषोत्तम पाटील यांच्या प्रेम कविता व  बाळकृष्ण सोनवणे यांच्या कवितांचा

तौलनिक अभ्यास करणे रंजक ठरेल. अशी एक अभ्यासाची दिशा सुचवावीशी वाटते.

**-- अरुण ठोके**

संवाद :९१७५१६४७९९

संदर्भ : सोनवणे बाळकृष्ण, उजेड गाभाऱ्यातला, सुजय प्रकाशन, धुळे,२००७.




CS Scanned with CamScanner

# स्वागत

सुनील साळुंके ,सोलापूर
ज्येष्ठ कवी ,लेखक व स्तंभलेखक



**सुनील साळुंके**
**सोलापूर**

## नशकाप्रमराश्री अर्थात ऋषिकेश गुप्ते

-----------------------------------------------------------------------------------------------------

कथेच्या अनेक उपप्रकारापैकी गुढ कथा रहस्य कथा आणि मनोविश्लेषणात्मक कथा यांचा वावर तसा दबकतच झालेला आहे. अंतरकरांचे नवल सोडले तर तसा माध्यमांचा दुष्काळच. शिवाय अभिजात साहित्यामध्ये गणना न झाल्याने फारशी प्रतिष्ठा या साहित्याला मिळालेली नाही. अपवाद आहे तो मनोविश्लेषणात्मक कथांचा.

कथेतील गुढार्थ हा निसर्गाशी निगडित असतो .तर रहस्य कथा ही दृश्य स्वरूप आणि घटिते यावर आधारित असते .ज्याचा उलगडा होऊ शकतो. परंतु निसर्गातील एखादे गुढत्व जाणवते तेव्हा त्याविषयी आपण अनुमान करू शकतो. मात्र तिचे गुढत्व अनाकलनीय आणि संदिग्धच राहते. मनोविश्लेषणात्मक कथांमध्ये वर्तमानकालीन अनेक शक्यतांचा विचार केला जाऊ शकतो. परस्पर संबंध, नातेसंबंध यामधून निर्माण होणारे गणिती व्यवहार ,परस्परांच्या मनातील प्रतिमा ,अंतर्मन बहिर्मनाच्या कक्षेत येणारा सभोवतालचा वर्तमान, भावनिक घटक त्याची परिणामकारकता, अस्तित्वाविषयीचे प्रश्न स्वकेंद्रित विचारांचा मनोगंड इत्यादी. याव्यतिरिक्त वस्तूदर्शक अथवा भौतिक सुखाची साधने आणि स्वाभाविक गुण दोषांचे अवलोकन अधिक आढळते .जाणिवा, संवेदना, भावनिकता, मानसिक दौबल्य या घटकांचा देखील प्रभाव प्रकर्षाने आढळतो.

मनोविश्लेषणात्मक कथेमध्ये मनाने केलेल्या कल्पितांचा वर्तमानाशी असलेला संबंध आणि हे कल्पित वास्तवदर्शी किंवा अस्तित्वात आहे का? असल्यास त्यातील व्यामिश्रता, गहनता, अस्तित्व पूरक नोंदी ,वास्तव आणि कल्पितांमधील सांधा , सूक्ष्मता , परस्परपूरक असलेल्या आणि त्यातून मनोद्वंद निर्माण होईल अशा गोष्टींचा शोध घेणे उचित ठरते.

निसर्गातील सर्व ज्ञात अज्ञात अशा सर्व घटनांचा प्रकृतीशी संबंध असतोच असतो. तद्वतच अंतर्मनाचा संबंध हा त्रयस्त मनाशी हा अतिद्रियांशी असतो. अंतरद्वंद्वातून निर्माण झालेला पेच वर्तमानाच्या भौवऱ्यात सापडतो .भास आभास संघर्ष खऱ्या खोट्या प्रतिमेमुळे मनाची अवस्था संदिग्धच होते अंतरद्वंद्वामुळे मनातल्या निरनिराळ्या प्रतिमांचे भावभावनांचे, विकारवशतेचे जाणीव संवेदनाचे संभ्रमित रूप सामोरे येथे. कथेचा प्राणवायू म्हणजे सतत विचार करणारे अंतर्मन बहिर्मन आणि त्या अनुषंगाने सभोवतालाशी असलेला परस्पर संबंध तू कसा आहे ,का आहे, कोणत्या अर्थाने आहे ,की मनोकल्पित आहे त्यामध्ये वास्तवाचा अंश किती

आहे, असे अनेक कोड्यात टाकणारे प्रश्न उपस्थित होतात .अस्वस्थ भावनेतून देखील मनाची ज्ञात - अज्ञात दारे किलकिली होतात. त्यामुळे आपल्या सुप्त अवस्थेत असलेल्या आपल्याच अनभिज्ञ प्रतिमेचे दर्शन होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यासंदर्भात ऋषिकेश गुप्ते

यांची कथा समकालीनामध्ये वेगळी वाटते .आशय,अभिव्यक्ती आणि आपल्या आतच असलेले परंतु वास्तवात व्यक्त न होणारे मनाचे दुसरे रूप. तथापि वास्तवाचा सांधा धरूनच व्यक्त होणारी मनाची दुसरी बाजू हे त्यांच्या कथेचे बलस्थान.

आपल्या आतील मन हे नेहमी सकारात्मक व नकारात्मक पातळीवर कार्य करीत असते .सकारात्मक या अर्थाने की आयुष्यात एखादी गोष्ट राहून गेल्यास मनातून त्याअ व्यक्त प्रतिमेस उजाळा मिळतो. आणि नकारात्मक मन हे सभोवतालच्या परिस्थितीचा त्याचा आपल्यावर होणाऱ्या विपरीत परिणामांचा धांडोळा घेत राहते. संबंध तपासून तिला घेण्याचा सोस लागतो.

प्रत्येकाच्या आयुष्यात काहीतरी गुढत्व असतं. अंतर्मनात क्रिया न करणारा एक कप्पा असतो .आपण तो स्वतःच निर्माण केलेला असतो. वर्तमान अनुभवाशी तो जोडला गेलेला असतो. यामध्ये विसंगतीचाच अधिक तर प्रभाव असतो. ऋषिकेश गुप्ते यांच्या कथांच्या वाटा या संदिग्ध धूसर आहेत. या वाटेवर प्रतीकात्मक अर्थाने एक झाड असते त्याला चांदण्या लगडलेल्या असतात .किंवा त्या वाटेला अंत नसतो. किंवा त्या वाटेवर असंख्य काटेरी झुडपं असतात किंवा मोत्याने लगडलेली असतात किंवा त्या वाटेवरील हवेला अचानकच कोणीतरी शोषून घेतो मग त्या वाटेवरील प्रवासी गुदमरून जातो. ऋषिकेश गुप्ते यांच्या कथा वाङ्ग्यात अशी प्रतीकात्मक अर्थाने आलेली असंख्य उदाहरणे आहेत. त्यामागे काही अद्भुत रहस्यमय गोड अथवा भय अभिप्रेत नाही. त्यामागे निश्चित असा अर्थ आहे तो तुमच्या आयुष्याशी निगडित आहे .जाणीव संवेदनाच्या रूपातून तो व्यक्त झालेला आहे .घटना प्रसंग वर्तमान स्थितीच्या प्रक्रियेतून तो उलगडत गेलेला आहे.

घनगर्द या संग्रहात एकूण पाच कथा आहेत. घनगर्द पानगळ पावसात आला कोणी आणि रमल वाटा या पाचही कथा मधून एक समांतर सूत्र आढळते, म्हणजे काळ. इथे वर्तमानावर बर्फाच्छादित भूतकाळाची छाया आहे आणि हा भूतकाळ वर्तमानास प्रभावित करतो .त्यांच्या कथेतील पात्रांचे भौतिक आयुष्य वर्तमान भूतकाळाच्या संधी प्रकाशात उलगडत जाते. परंतु यामागे एक सूत्र आहे हे आपल्याला विचार करायला प्रवृत्त करते. कथेतील गुंतागुंता व्यामिश्रता आपल्याला बधीर करून टाकते.घनगर्द कथेतील पौगंडावस्थेच्या उंबरठ्यावर असलेली गार्गी, तिच्या मनाने कल्पिलेली क्रिकेटर युवीची प्रतिमा, सापाला घेऊन फिरणारा स्नेक ओनर, त्याच्या डोळ्यातून प्रकट होणारी आदिम वासना तिचं वयात येणं किंवा स्त्री त्वाच्या भावनेचा तिच्यात कोंब फुटणं या अर्थाने कथेतील प्रतीकात्मक शहरी जंगल, वानर नावाचा गार्गीच्या अंगावर येणाराआदिम पुरुष या साऱ्यामध्ये एक प्रतिकात्मक सूत्र आहे. गार्गीच्या वयात येण्याच्या मनोवस्थेशी त्याचा परस्पर संबंध आहे .पावसात आला कुणी या कथेत जो कोणी अपरात्री लेखकाच्या घरी अवेळी आलेला आहे तो कोणी प्रत्यक्षात नाही. कथेतील लेखकाने आपणासमोर एक कल्पित वास्तव उभं केलेलं आहे. जे त्याच्या मनातून निर्माण झालेलं आहे. कारण लेखकाचे लेखन गेल्या तीन वर्षापासून थांबलेलं आहे. दिवाळी अंकाची निमंत्रण सातत्याने येत आहेत लेखकाला वाटतं की दिरंगाई झाली. रिकामा आणि लेखनरहित काळ गेला की लेखन

हातातून निसटतं. त्यामुळेच त्याला नवं लेखन सुचत नाही .त्याची घुसमट होते आहे. मग त्यांनीच एक पात्र म्हणजेच एक कल्पित पात्र उभं केलं म्हणजे त्याच्या मनोरचनेतून निर्माण झालं. अवेळी लेखक त्याला आत घेतो डोकं पुसायला टॉवेल देतो कॉफी करून देतो. वास्तविक लेखकाचा स्वभाव हा एकलकोंडा आहे तरीदेखील याआगंतुक पाहुण्याला त्याने घरात घेतलेलं आहे. सुप्तावस्थेत घुसमट होत असलेल्या मनाचाच हा अविष्कार आहे.

ऋषिकेश गुप्ते यांची नशकाप्रमराश्री ही एक अतिशय वेगळ्या धाटणीची कथा. अतिशय गुंतागुंतीची, पुन्हा पुन्हा वाचावी लागते. कथेतील परस्पर संबंधाची घटना तंत्राची सांगड घालावी लागते. ऋषिकेश गुप्ते यांनी या कथेची वीण अतिशय सूक्ष्म पणे केलेले असून रचना तंत्र देखील कौशल्यपूर्ण आहे. वाचता वाचता कथेच्या वातावरण निर्मितीत स्वतःला आपण पारखे होतो. ज्याचा तळ सापडत नाही अशा खोल काळोख्या विवरात आपण चाचपडत जातो. मन चक्रावून जाते .सत्य असत्याच्या गर्तेत सापडते .कथा शब्दशः आपण अनुभवत आहोत असा भास होत राहतो. ऋषिकेश गुप्ते यांची शैली, निर्मिती एखाद्या चलचित्राप्रमाणे आहे . निखिलेश चित्रे यांनी घनगर्द या संग्रहाच्या प्रस्तावनेत सिनेमा तत्वाचा उल्लेख केला असून त्याची प्रचिती आपणास त्यांच्या अनेक कथेतून मिळते. गुप्ते यांच्या कथा बारकाईने वाचल्या तर लक्षात येते की, त्यांच्या अनेक कथांची सुरुवात देखील विलक्षण आहे .किंवा पारंपरिक पद्धतीनेच कथेचा गर्भितार्थ नियोजूनच तिची सुरुवात होते .वाचकाला काहीतरी वेगळेपण आणि संदिग्धतेचा भास होत राहतो. त्यानंतर एक संपूर्ण प्रवाहीपण कथेस प्राप्त होते.

गुप्ते यांच्या कथेतील एक ठळक वैशिष्ट्य असे की कथेतील वातावरण निर्मिती. त्यांच्या कथेतील हा एक अत्यंत प्रभावी घटक. ज्यामुळे कथेतील आशय वर्तमान काळ अधिक परिणामकारक ठरतो .किंबहुना या वातावरणास देखील निश्चित असे व्यक्तित्व प्राप्त झालेलं आहे . घनगर्द कथेतील पौगंडावस्थेत असलेल्या गार्गीचं दरीत कोसळणं तेथील जंगलात हरवणं, ज्यामध्ये खूप झाड आहेत. अक्राळविक्राळ . भीतीदायक. हे सर्व प्रतीकात्मक अर्थानेच व्यक्त झालेलं आहे. पानगळ मधील देवधरवाडीतील देवधर काकूचं घर ,वाड्यातील हापूस आंब्याचं झाड माजघर, माज घरातील काळोख. पावसात आला कोणी कथेतील लेखक आणि आगंतुक घरात आलेले व्यक्ती, त्याचा घरातील सहज वावर, दोघांमधील संवाद, बाहेरचा पाऊस. नशकाप्रमराश्री मधील ऊर्जा टावरची लिफ्ट बंद असल्याने जास्वंदीचा जिने उतरताणाचा प्रसंग ,सभोवतालचा किन्न अंधार,जास्वंदीच्या मनातलं भय ,तिची विवशता या जिन्यात दिवसा उजेडी देखील असलेले अंधाराचे साम्राज्य, लेखकाने केलेले ही वातावरण निर्मिती भय कथेच्या अंगाने व्यक्त होत असली तरी कथेला पोषक ठरलेली आहे.ं मघापासून सोबतीला असलेला तो अंधुक पिवळट पण प्रकाश आता नावालाही उरला नव्हता. चौथ्या मजल्यावरून तिसऱ्या मजल्याकडे खाली वळलेल्या जिन्यावर काळासार अंधार एखाद्या अजगरासारखा सुस्त पडला होता ं अशीही प्रसंगोचित वातावरण निर्मिती.

आणखी एक वैशिष्ट्य असे की पात्राची मनोवस्था किंवा सहजावस्था व्यक्त करण्याचे कसब लेखका जवळ आहे .घनगर्द मधील ंगार्गीने तिला नकोसे असलेले दिवे घालवले.ं किंवा ं फांदीच्या तकलाधोपणाचा अंदाज घेत तिने पायाच पूर्ण भार खाली टाकला' किंवा नशकाप्रमराश्री या कथेमध्ये वस्तू आणि वातावरणाचा संबंध कसा असतो तो सुचित केलेला आहे.ं तिच्या सँडल्सच्या लॅपटॉप

आवाजाने मजला भरून गेला होता.ं'तसेचं वाहनांच्या गदारोळात धक्काबुक्कीतही माझं लक्ष तिच्याकडेच खेळून होतं पण सिग्नलच्या इशाऱ्या सोबत गाडी पुढे सरकली .आणि माझ्या नजरेलाही पुढे सरकावं लागलं.ं' उजेडाचा एकसंध तुकडा ती पुढे सकेल तस तसा पुढे सरकत होता तिला त्या वातावरणात कुणाची तरी उपस्थिती जाणवत होती .अशीही अशी ही छोटी छोटी निरीक्षणं कथेच्या वातावरण निर्मितीला बळ देतात.

ऋषिकेश गुप्ते यांच्या कथेत कौटुंबिकता, सामाजिकता नाममात्र डोकावून जाते .कल्पित वास्तव मात्र केंद्रस्थानी आहे. अनाकलनीय असंभवनीय वर्तमानाची त्यावर दाट छाया आहे. आपल्या समजूतीच्या पलीकडचं हे जगआहे. सुप्तावस्थेत दबा धरून असलेल्या मनाचं आहे .आपण कोण आहोत? इथे येण्याचं प्रयोजन काय आहे? वर्तमानाशी आपला संबंध काय आहे ?आपली मनोधारणा ,आपले अस्तित्व, सभोवतांचे अप्रमाणित, बहुरेषीय संमिश्र व्यवस्थेशी आपलं नातं काय आहे? असे काही प्रश्न निर्माण होतात. अंतरद्वंदात सापडलेंली आपली मानसिकता ज्या वर्तमानात आपण जगत असतो, त्याचा आपल्या अस्तित्वात असलेल्या परस्पर संबंध या क्रियेतूनच सुरू होतो .एक अनामिक खेळ .निःशब्द प्रवास. चोरवाटांचा .आडवाटेचा .या वाटा आपल्या अंतर्मनातून जातात. अंतर्मनातील सुप्त इच्छा भावनांना प्रज्वलित करतात. घनगर्द, नशकाप्रमराश्री, पानगळ, परफेक्टची बाई इत्यादी, कथेतून आपणास त्याचा प्रत्यय येतो.

अंतर्मनाचा बहिर्मनाशी किंवा बहिर्मनाचा अंतर्मनाशी सातत्याने संघर्ष सुरू असतो .ही दोन्ही मनं परस्परांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करीत असतात. ज्ञात अज्ञाताचे आकलन करून घेण्याचा त्यांना लळा असतो. आपण अंतर्मुख होतो तेव्हा आपल्या आतील प्रतिमेला उजाळा मिळतो. त्यामुळे बाहेरच्या वास्तविक जगात प्रकट होताना तो कधी स्वप्नावस्थेत भास आभासाच्या खेळात तर कधी भ्रमावस्थेत त्याचे रूपांतर होते .या भौतिक जगात प्रकट होण्याच्या प्रबळ महत्वाकांक्षेतून मग नशकाप्रमराश्री सारखी कथा जन्म घेते .यातील संवेदनशील मन स्थूल रूपाने व्यक्त होण्यासाठी अधीर, उत्सुक झालेले आहे. आपल्या अंतस्थ लाटा प्रवाहित करण्यासाठी त्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू आहे. आपली आयडेंटिटी खरी ओळख त्याला व्यक्त करावयाची आहे .परंतु आततायी भावनेतून जगत असताना तो स्वतःचा तोल हरवून बसतो. त्याने जे आभासी जग निर्माण केलेले असते तेच त्याला खरे वाटू लागते .भावनातिरेकामुळे त्याच्या आत मनोगंड उत्पन्न होतो.

ऋषिकेश गुप्ते यांची नशकाप्रमराश्री वाचताना आपण चक्रावून जातो. वास्तव कल्पितेच्या गर्तेत सापडतो .अबोध अतर्क्य पातळीवर हेलकावे घेत राहतो . ऊर्जा टॉवर मधील लेखकाने उभा केलेला जिन्यातील प्रसंग, जास्वंदीचा वावर, अक्षरशः अंगावर शहारे आणतो .वाचताना आपले एकाकीपण अधिक तीव्र होते. कथेतील गुंतागुंत संदिग्धता , अवकाश, घटनानुक्रम, चाकोरीबाहय निवेदनशैली ,संभाव्य घटीते यांचा आदमास घेता घेता आपली दम छाक होते. अभिजीत, जास्वंदी, डॉक्टर उदय, म्हातारी, भावड्या यांच्यातील परस्पर संबंध वास्तविकता आकलन सुलभ नसली तरी जाणून घेण्याची तीव्र उत्कट इच्छा निर्माण होते..

नशकाप्रमराश्री म्हणजेच श्रीराम प्रकाशन .दृश्य आणि वास्तवा पलीकडील जग. संधी प्रकाशाच्या सीमेवर उभं असलेलं. भूत आणि वर्तमानाच्या मगर मिठीतलं. आपण जे आरश्यात पाहतो ती प्रतिमा खरी नसतेच मुळी. तर अनेक चेहरे घेऊन जन्माला आलो आहोत. जे आतले आहेत आणि त्यांच्यावर तुमचं प्रेम अधिक

आहे. नशकाप्रमराश्री मधील एका प्रूफ रीडरचा हा अगम्य प्रवास. ही कथा म्हणजे त्याचे स्वागत समजावे,? की एका अपयशी लेखकाची आत्मकथा?. की वैफल्यग्रस्त साधारण पुरुषाची मनोकांक्षा? ऋषिकेश गुप्ते यांचे लेखन तसे गुंतागुंतीचे. कथेचा सांधा सलग नसतो तो एकाच वेळी भूत आणि वर्तमानाच्या सीमेवर उलगडत जातो .अंतस्थ मनाचे कंगोरे व्यक्त करीत जातो. जसे की नशकाप्रमराश्री कथेची सुरुवात होते.

कथा मग ती कोण कुणाची कधी आणि कशी पूर्ण करेल याचा भरवसा नाही .अभिजीत जास्वंदीपासून कथेला प्रारंभ होतो. संततधार पावसात जास्वंदी अभिजीतला त्याच्या ऑफिसमध्ये भेटायला आलेले आहे .त्यांच्या लग्नाला अजून सहा महिन्याचा अवकाश आहे .जास्वंदीने अभिजीतच्या ऑफिसमध्ये नोकरी करावी अशी त्याची अपेक्षा आहे .परंतु जास्वंदीला ते नको आहे. लिफ्टने ती वर येते. परंतु ऑफिस बंद आहे. तेथून ती जायला निघते .आणि कथेतूनच आणखी एक कथा आकार घेऊ लागते. जास्वंदीचा जिने उतरतानाचा प्रसंग मुळातूनच वाचावा. जणू लेखक अलिप्तपणे जास्वंदीच्या हालचाली जिन्यातील वातावरण शब्दबद्ध करतो आहे. हा एक दीर्घ प्रसंग आहे .कथेच्या निमित्ताने आलेली इतर पात्र म्हणजे म्हातारी भावड्या डॉक्टर उदय बहुतुले यामधील वास्तवाचा अंश म्हणजे डॉक्टर उदयबहुतुले मानसोपचारतज्ज्ञ आहे .ज्यामुळे कथेचे सूत्र उलगडत जातं .विश्वास दातार उर्फ अभिजीत प्रकाशक बापट, डॉक्टर उदय बहुतुले यांचा अपवाद वगळता बाकी इतर पात्रे काल्पनिक असल्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु ती काल्पनिक न वाटता वास्तवातीलच असल्याचा संभ्रम पडावा..

कथेचा संपूर्ण अवकाश उर्जा टॉवरच्या जिन्याभोवती फिरतो.नशकाप्रमराश्री म्हणजेच श्रीराम प्रकाशन ही प्रकाशन संस्था योगायोगाने याच बिल्डिंगमध्ये आहे .कथेतील दुसरी कथा इथेच घडते.

आयुष्यभर प्रुफ रीडिंग चे काम करणारा विश्वास दातार हा मनोरुग्ण आहे श्रीराम प्रकाशन कडील कथा कादंबरीची प्रुफे तपासता तपासता एका मानसिक अवहेलनेतून तो मनोरुग्ण झालेला आहे .काम करता करता त्याच्या आत लेखकपणाचे बीज अंकुरलेलं आहे .या कासाविशीतूनच त्याने स्वतःची कथा लिहिली .तो एकटा आहे .एकाकी आहे .आई-वडील नातलगापासून दुरावलेला आहे .या साऱ्याला सुरुवात झाली ती ऊर्जा टॉवरचे जिने ही कथा लिहायला घेतल्यानंतर. आयुष्यात या अनाकलनीय कल्पित घटनांचा संदर्भ होता तो म्हणजे उर्जा टॉवरच्या त्या जिण्यात स्वतःला शोधणं. या जिण्यातच जास्वंदी भेटते त्याच्या कल्पनेतून.

स्वप्न आणि सत्याच्या मध्ये अलीकडे पलीकडे असे काही प्रदेश असतात का जिथे तर्कला सुसंगतीला काहीच थारा नसतो? अतर्क्य अनाकलनीय अविश्वसनीय हाच तिथला कार्यकारणभाव असतो का?. विसंगती आणि संभ्रम हेच तिथल्या बुद्धीप्रामाण्यवादाचे मूलनियम असतात का? म्हणूनच लेखक म्हणतो तो प्रदेश माझ्याच कल्पनेतला होता तो प्रदेश अंतर्मनातला होता .लेखक म्हणजेच विश्वास दातार हा कल्पनेत जगत असल्याची आपणास प्रथम जाणीव होते ती तो बापटाच्या ऑफिसला आल्यावर.

अकाउंट मधला बाईने प्रुफ रीडिंग केलेल्या प्रती पानाचा हिशोब करून त्याला चेक दिला .परंतु चेक पेक्षा त्याला बापटांची भेट घ्यावयाची असते तो त्यांच्या केबिनमध्ये जातो .आणि आपल्या संग्रहाचा विषय काढतो. तेव्हा प्रकाशक बापट म्हणतात ,दोन वर्षे फुकट काम करावं लागेल मग संग्रह प्रकाशित होईल पुढे असेही म्हणतात, दातार या क्षेत्रातला तुम्हाला अनुभव आहे तुम्ही प्रूफ रीडर आहात प्रूफ

तपासा लेखक बनायचं काम करू नका. निघा आता. एवढी वर्षे काम केल्यावर तुम्हाला लेखक व्हावेसे वाटणे साहजिकच आहे पण तो तुमचा प्रांत नव्हे.


यावरून कळते की तो लेखक नसून एक प्रुफरिडर आहे अभिजीत  दातार नसून विश्वास दातार आहे .आयुष्यभर प्रुफ रिडिंगचे काम केल्यामुळे त्याच्या आतला आवाज शब्द रुप घेतो आहे .लेखक नसतानाही लेखकपणाच्या काळ तो पोसतो आहे .लेखक असल्याच्या अविर्भावात तो जगतो आहे. त्याने लेखन केलेलं आहे पण ते अप्रकाशित आहे. लेखक म्हणून तो पराभूत झाल्याचा परिणाम त्याच्या मानसिकतेवर झालेला आहे .परंतु त्यामुळे त्याची कल्पना शक्ती तीव्र होऊन त्याचे रूपांतर वैफल्यग्रस्त मनोवस्थेमध्ये झालेले आहे. त्याच्या आतला आवाज आपली घुसमट व्यक्त करण्याचा मार्ग खंडित झाला असल्याने मुळाक्षराच्या पावसात तो येथे यथेच्छ भिजत आहे दिसत आहे .त्याचे शरीर देखील छापील कागदाचा एक हिस्सा झालेलं आहे. त्याच्या शरीराच्या प्रत्येक जागा आता अक्षराने व्यापून गेलेली आहे.

आज तो डॉक्टर उदय बहुतुलेच्या हॉस्पिटलमध्ये बंदिस्त आहे. खिडकीबाहेरचं आभाळ भिंतीचा गुलाबी रंग एवढेच त्याचे विश्व आहे .अजून देखील त्याच्या आतला लेखकीय उमाळा टिकून आहे. तो आपल्या कल्पना विश्वातच जगतो आहे .त्याच्या जगण्याचा एवढाच एक मार्ग शिल्लक आहे .विश्वास दातारच्या भाषेत सांगायचं झालं तर,

समजा एखाद्याला जग हातावर घेऊन उलट पाहायचं असेल तर ,सत्य असत्य स्वप्न वास्तव या शब्दाचे अर्थ उलटे असते तर, जसे की नशकाप्रमराश्री की श्रीराम प्रकाशन.?

*********

**सुनील साळुंके,सोलापूर.**



# संशोधबोध

डॉ.मनोहर नरांजे, नागपूर
ज्येष्ठ कवी ,लेखक व पुरातत्व संशोधक



**डॉ.मनोहर नरांजे**
**नागपूर**

## प्राचीन विदर्भातील बुद्ध धर्म

---

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी तत्कालीन मध्यप्रांत आणि वऱ्हाडची राजधानी असलेल्या नागपूर शहरात भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली आणि भारताच्या इतिहासात एका महान प्रकाश पर्वाची सुरुवात झाली. त्यानंतर केवळ विदर्भातच नव्हे तर महाराष्ट्रासह भारताच्या अनेक राज्यात बाबासाहेबांच्या लाखो अनुयायांनी हा धर्म स्वीकारला आधुनिक काळातील हे एक महान धर्म परिवर्तन होते .

परंतु विदर्भाच्या भूमीत हा बुद्ध धर्माचा प्रथम परिचय नव्हता तर एका विस्मृतीत गेलेल्या धर्माचा तो पुनर्प्रवेश होता .त्यापूर्वी किमान २३०० वर्षांपूर्वीच विदर्भाच्या या भूमीने बुद्ध धम्मास अंगीकारले होते. प्राचीन काळी विदर्भात बुद्ध धम्माचा प्रवेश नेमका कधी झाला हे निश्चित करणे अवघड असले तरी; तथागतांच्या जीवनकाळातच काही बौद्ध भिक्षू या भूमीत धर्मप्रसारार्थ येणे अगदीच असंभवनीय नाही.

विदर्भात बुद्ध धर्माचा प्रवेश नेमका कधी झाला हे स्पष्ट सांगणे अवघड आहे एका विद्वानाने आपल्या प्रबंधात सुरापान जातकातील कथेचा आधार घेत असे म्हटले आहे की तथागताचा सांगत नावाचा एक सेवक (थेर) श्रावस्तीवरून भांदक म्हणजे भद्रावती येथे आला होता आणि त्याने अंबतिथ्थ नागाचे दमन केले .पण हे मत ग्राह्य मानले जात नाही कारण सुरापान जातकात वर्णित भद्रावती व अंबतीथ्थ ही स्थाने कौशांबीच्या निकटच होती हे सखोल निरीक्षणांती स्पष्ट झालेले आहे .

पश्चिम महाराष्ट्रातील सोपारा जिल्हा ठाणे म्हणजे प्राचीन शुर्पारक येथील व्यापारी पूर्ण हा आपल्या मित्रांसमवेत श्रावस्तीला गेला होता .परत आल्यावर त्याने तिथे बौद्ध संघाची स्थापना केली या पूर्णला स्वतः गौतम बुद्धांनी दीक्षा दिली होती असे मानले जाते .वर्तमान सोपारा जिल्हा ठाणे म्हणजे प्राचीन शुर्पारक या व्यापारी बंदराच्या स्थळी सम्राट अशोकाचा एक शिलालेख सुद्धा प्राप्त झालेला आहे

.तसेच तेथे एका प्राचीन स्तूपाचे अवशेष अद्यापी विराजमान आहेत .तर बावरी  हा पूर्वी कोसलचा रहिवासी असून तो राजा पसेनजीच्या पुजाऱ्याचा पुत्र होता. पुढे तो संन्यास घेऊन गोदावरी नदीच्या तीरावर आश्रम बांधून राहू लागला.त्याचे अनेक शिष्य होते व त्यापैकी काहींना त्याने गौतम बुद्धाकडे उपदेश ग्रहण करण्यासाठी पाठविले होते .या बावरीच्या  शिष्यांनी पुढे बहुतेक गोदावरी काठी म्हणजे मराठवाड्यात, तेलंगणात बौद्ध धर्माची मुहूर्तमेढ रोवली असावी असे मानले जाते. पूर्ण व बावरी प्रमाणे विदर्भात धर्मप्रसार करणाऱ्या प्रथम बौद्ध भिक्षूचे नाव मात्र आढळत नाही. परंतु या प्रदेशातील भोन  जिल्हा बुलढाणा व पवनी जिल्हा भंडारा येथे आढळून आलेल्या प्राचीन स्तूपांच्या भग्नावशेषावरून बुद्ध महापरिनिर्वाणाच्या लगेचच किंवा प्रत्यक्ष गौतमाच्या हयातीतच या भूमीत बौद्ध  धर्माच्या प्रसारार्थ भिक्षु आले असावे  असे मानायला पुरेसा वाव आहे. विदर्भात हा धर्म प्रसार पाचव्या शतकाच्या उत्तरार्धात झालेला असावा .

विदर्भात उपलब्ध पुरातत्त्व पुराव्यांचा मागोवा घेऊ जाता आपल्या असे निदर्शनास येते की सम्राट अशोकाच्या पूर्वीच विदर्भातील भंडारा जिल्ह्यात असलेल्या  पवनी या प्राचीन बौद्ध स्थळी एका विशाल बौद्ध स्तूपाची निर्मिती करण्यात आलेली होती. आज हा स्तूप जगन्नाथ टेकडी स्तूप म्हणून ओळखला जातो. स्तूपाच्या टेकाडावर आधुनिक काळात बांधलेले जगन्नाथाचे देवालय असल्यामुळे यास जगन्नाथ टेकडी स्तूप म्हणून संबोधले जाते. या स्थळी इसवी सन १९६९ मध्ये उत्खनन करण्यात आलेले होते  त्यात हा स्तूप अशोक पूर्वकाळात बांधला होता हे निश्चित झाले म्हणजे इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकाच्या अगोदरच या स्तूपाची निर्मिती झालेली होती. अर्थात त्यापूर्वीच विदर्भाच्या भूमीत बुद्ध धर्माने प्रवेश केलेला होता.

पवनी येथील या स्तूपाने आपली अतिशय उन्नत अवस्था पुढे शुंगकाळात गाठली म्हणजे इसवीसनाच्या दुसऱ्या शतकात हा स्तूप वैभवाच्या जणू शिखरावर होता आणि यापूर्वीच पवनी येथे आणखी.एका स्तूपाची निर्मिती सुद्धा करण्यात आलेली होती. चांडकापूर स्तूप म्हणून त्यास ओळखले जाते .पवनी गावाच्या बाहेर उत्तरेला सुमारे दोन तीन कि.मी.अंतरावर एका पावसाळी ओढ्याच्या काठावर या प्राचीन स्तूपाचे अवशेष अद्यापही पाहता येतात. या स्तूपाचे सुद्धा उत्खनन झालेले असून इसवीसन पूर्व पहिल्या शतकात हा स्तूप बांधला गेला होता हे त्यातून

निश्चित झाले. साधारणपणे याच कालखंडात नागपूर जिल्ह्यातील अडम येथे सुद्धा एक स्तूप बांधण्यात आलेला होता. सातवाहन काळात पवनी आणि अडम येथे संपन्न नगरे नांदत असताना या प्राचीन स्तूपाची निर्मिती झालेली होती .

या स्तूपाच्या निर्मिती बरोबरच विदर्भात अनेक ठिकाणी बौद्ध श्रमनाच्या वर्षावासासाठी लेणींची सुद्धा निर्मिती करण्यात आलेली होती .नागभीड ,पवनी .अडम या पूर्व विदर्भातील तत्कालीन बौद्ध धर्मक्षेत्राच्या निकट कोरंबी, भिवकुंड, पुल्लर,भिवापूर,मोहाडी, भद्रावती, देवूरवाडा,

सातभोकी, चांडाळा ,कुणघाडा इत्यादी अनेक ठिकाणी इसवीसन पूर्व पहिल्या दुसऱ्या शतकातच

लेणी निर्मितीला सुरुवात झालेली होती .भद्रावती येथे असलेली विजासन लेणी या दृष्टीने फार महत्त्वपूर्ण ठरावी प्रारंभी हिनयान काळात निर्माण झालेली ही लेणी नंतर महायान काळात महायान रूपात परिवर्तीत होऊन या लेणीत बुद्ध मूर्तीची सुद्धा निर्मिती उत्तरकाळात करण्यात आली होती. विदर्भात निर्माण झालेल्या प्रारंभिक लेणी या हिनयान पंथीयांनी निर्माण केलेल्या होत्या त्यामध्ये बुद्ध प्रतिमेचा संपूर्ण अभाव असल्यामुळे ही गोष्ट स्पष्ट होते .भद्रावती येथील विजासन लेणी ही सुद्धा सुरुवातीला हीनयान पंथीयच होती पण नंतर महायान पंथाच्या प्रभावांमध्ये त्यामध्ये बुद्ध मूर्तीची निर्मिती करण्यात आली.

स्तूप निर्मितीची परंपरा विदर्भात इसवी सन सहाव्या शतकापर्यंत सुरू होती असे आपल्याला म्हणता येते कारण मणसर येथील वाकाटक कालीन राजवाड्याच्या भग्णावशेषावर उत्तर काळात निर्माण करण्यात आलेला स्तूप व महाविहार त्याची साक्ष देतात .पवनी, अडम, मनसर या विदर्भातील प्रसिद्ध स्तूप स्थापत्याच्या स्थळांबरोबरच वर्धा आणि नागपूर जिल्ह्याच्या सीमारेषेवर असलेला भोकरबर्डीचा स्तूप हा सुद्धा इसवी सनाच्या प्रारंभापूर्वीच निर्माण करण्यात आलेला असावा असे म्हणत येते .प्रस्तुत लेखकाने स्वतःच्या समन्वेषना द्वारे हा स्तूप शोधलेला असून त्यावर संशोधनात्मक लिखाण सुद्धा केलेले आहे. नागपूर जिल्हा गॅझेटियरमध्ये भोकरबरडी येथील स्तूपाचा उल्लेख एक बौद्ध स्तूप म्हणून करण्यात आलेला आहे ही गोष्ट अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

मौर्यकाळात विदर्भाच्या या प्रदेशात सम्राट अशोकाचा अंमल चालत होता आणि त्याच्या धर्म महामात्राने दिलेल्या आज्ञा या परिसरातील लोक पालन करायचे असा पुरावा पूर्व विदर्भाच्या या भूमीत आढळलेला आहे .चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड नजीक असलेल्या देवटेक येथील सम्राट अशोकाच्या धर्म महामात्राचा अभिलेख की ज्यात जीव हत्या करू नये अशी स्वामींची म्हणजे सम्राट अशोकाची आज्ञा आहे असे स्पष्ट वर्णिलेले आहे .हा अभिलेख सम्राट अशोकाच्या राज्यारोहणाच्या चौदाव्या वर्षी कोरण्यात आलेला होता. सद्य:स्थितीत हा अभिलेख असलेली शिळा नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयात संरक्षित करण्यात आलेली आहे या अभिलेखा बरोबरच विदर्भातील अनेक प्राचीन लेणींमध्ये आढळलेले अभिलेख सुद्धा तत्कालीन विदर्भातील बुद्ध धर्माच्या अस्तित्वाचा पुरावा म्हणून आपल्यासमोर उभे राहतात .यामध्ये सर्वात महत्त्वाची अभिलेख हे पवनी येथील जगन्नाथ स्तूपाच्या उत्पन्नातून आढळलेले अभिलेख होय. या अभिलेखाचा विचार 'तत्रैव' मध्ये यापूर्वीच प्रकाशित एका स्वतंत्र लेखात करण्यात आलेला आहे म्हणून येथे त्याची पुनरुक्ती टाळत आहे.

पूर्व विदर्भातील प्राचीन बौद्ध शिल्पांचा विचार करावयाचा झाल्यास सर्वप्रथम आपल्या नजरेसमोर येथे ते पवनी हेच स्थळ. केवळ विदर्भातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील अति प्राचीन शिल्पांमध्ये पवनी येथील शिल्पांची गणना होते .पवनी या स्थळाव्यतिरिक्त पूर्व विदर्भामध्ये भद्रावती ,पवणार(दत्तपूर) ,हमलापुरी इत्यादी स्थळी सुद्धा बौद्ध शिल्पे आढळलेली आहेत .1969मधे डॉ. शां.भा.देव आणि श्री जगत्पती जोशी यांनी उत्खनन केलेल्या पवनी येथील जगन्नाथ स्तूपामधून अनेक

प्राचीन शिल्पे प्रकाशात आली. या शिल्पांचे मोल फार मोठे आहे महाराष्ट्रातील प्राचीन शिल्पांमध्ये या शिल्पांची गणना होते. मानवी शिल्पांकन, धार्मिक चिन्हांचे अंकन आणि वृक्षवेली प्राणी, फुले पशुपक्षी, भौमितिक चिन्हे अशा विविध प्रकारात ही शिल्पे आपल्याला आढळून येतात. मानवी शिल्पांकनामध्ये पुरुष प्रतिमा ,यक्ष प्रतिमा ,चामरधारी सेविका म्हणजे यक्षी, खरमुखी यक्ष , हत्तीवरील मिरवणूक ,(शरीरावशेष यात्रा )आणि सर्वात महत्त्वाचा म्हणजे मुचलिंद नाग शिल्पपट इत्यादी शिल्पे फारच महत्त्वाची आहे.

पवनी येथील शिल्पांमध्ये विविध धार्मिक चिन्हांचे अंकल आढळून येते त्यामध्ये पाच शाखा असलेला बोधिवृक्ष वेदिका वेष्टित भद्रासन म्हणजे वज्रासन धम्मचक्र जे की चौकोनी भद्रासनावर स्थापित आहे आणि तीन कमानीच्या चैत्याकाराखाली त्यावर पुष्प माळा सोडलेल्या आहेत वेदिका वेष्टित अंड भाग व हर्मिका आणि त्यावर त्रिरत्न व पुष्प माळा. इत्यादी शिल्पे सुध्दा महत्त्वाची आहेत.

हीनयान काळात बुद्ध मुर्ती कोरण्यात येत नव्हत्या . बुद्धाशी संबंधित प्रतीके पुजल्या जात होती जन्माचे प्रतीक हत्ती ,ज्ञानप्राप्तीचे प्रतीक बोधिवृक्ष व वज्रासन धर्मचक्र प्रवर्तनाचे प्रतीक धम्मचक्र व तथागतांच्या निर्वानाचे प्रतीक म्हणून स्तूप या प्रतीकांचीच पूजा करण्याचा प्रघात होता. बोधीवृक्ष, वज्रासन ,धम्मचक्र आणि स्तूप या चारही धार्मिक प्रतीकांचे अंकन पवनी येथे आपणास आढळून येते .अलंकरणासाठी वृक्षवेली, प्राणी ,फुले ,पशुपक्षी आणि भौमितिक चिन्हांचा वापर करण्यात आलेला आहे पवनी येथील प्राचीन शिल्पांची वैशिष्ट्यै पुढील प्रमाणे आहेत .

या शिल्पांवर भरहुत येथील शिल्प परंपरेचा व्यापक प्रभाव जाणवतो, हीनयान पंथाच्या धर्मप्रतिकांचे प्रस्तुतीकरण यामध्ये केलेले आहे. बुद्ध प्रतीके साध्या परंतु प्रभावी रूपात ही शिल्पे अभिव्यक्त करतात .उभ्या शिल्पपट पद्धतीचा वापर इथे केलेला आहे आणि कमी उठावात चित्रण केलेले आहे.

कथाशिल्पे हे पवनी येथील शिल्पांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य या कथा शिल्पांमध्ये मुचलिंद नाग शिल्पपट आणि शरीरावशेष यात्रा या दोन महत्त्वपूर्ण कथा शिल्पांचा समावेश करता येईल. त्यापैकी मुचलिंद नाग शिल्पपट हा अतिशय महत्त्वाचा शिल्पपट असून तो सध्या नवी दिल्ली येथील राष्ट्रीय संग्रहालयात संरक्षित करण्यात आलेला आहे . या शिल्पपटामध्ये मुचलिंद नावाचा नागराज जो की पाच फण्याचा दर्शविलेला आहे हा वज्रासनास वेटोळे घालून व त्यावर छत्र धरून उभा आहे या शिल्पावर मुचलिंद नागो असा ब्राह्मी लिपीतील अभिलेख सुद्धा कोरलेला आहे .बुद्ध चरित्रातील एका कथेशी संबंधित हा शिल्पपट आहे.अशाच प्रकारचा शिल्पपट भरहुत या प्रसिद्ध बौद्ध स्थळी सुद्धा आढळलेला आहे तो सध्या अलाहाबाद संग्रहालयात संरक्षित आहे .

पवनी येथील शिल्पांमध्ये मानवी शरीराकृतींचे प्रभावी अंकन आपणास दिसून येते या शिल्पांची पारंपारिकता ,प्रवाहीपणा, ग्रामीण साधेपणा इत्यादी प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील. मानवी मुखावर शांती आणि संतोष याचे प्रगटीकरण कौशल्याने साधलेले आहे. बहुतेक मानवी आकार हे बलदंड शरीरयष्टीचे

असून त्यांचा चेहरा तेजस्वी भासतो. येथील शिल्पांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असे सांगता येईल की ही सर्व शिल्पे ही नागरी संस्कारापासून मुक्त आहे. निसर्गदृश्याचे विविध रूपात प्रगटीकरण ही शिल्पे आपणांसमोर करतात. भद्रावती येथील विजासन लेणीतील शिल्पे त्यामानाने कमी आकर्षक वाटतात .ही लेणी सुद्धा सुरुवातीला हीनयान पंथीय होत्या परंतु उत्तरकाळात तिथे महायान पंथाचा प्रभाव वाढल्यानंतर तिथे बुद्ध प्रतिमांचे अंकन करण्यात आले. येथील शिल्पे कलात्मक दृष्ट्या फारशी वैशिष्ट्यपूर्ण नाहीत .



पूर्व विदर्भातील सर्वोत्कृष्ट प्राचीन बुद्ध प्रतिमांमध्ये आपणास दत्तपुर जिल्हा वर्धा आणि हमलापुरी जिल्हा नागपूर येथील बुद्ध प्रतिमांचा उल्लेख आवर्जून करावा लागेल. त्यापैकी दत्तपूर येथे आढळलेली प्रतिमा सध्या विनोबाजींच्या पवणार आश्रमात संरक्षित केलेली आहे हे एक दगडी शिल्प आहे तर हमलापुरी येथे तथागतांच्या तीन ब्रांझ प्रतिमा आढळून आलेल्या होत्या .दत्तपूर येथे आढळलेली बुद्ध प्रतिमा ही लाल रंगाच्या पाषाणात निर्मित करण्यात आलेली असून तिचा डोके आणि उजवा हात नष्ट झालेला होता तो नंतर नव्याने निर्माण करण्यात आला. सडपातळ अंगकाठी वस्त्राच्या बारीक चुन्याचे अंकन असलेली मानवाकाराच्या आकाराची ही प्रतिमा वैशिष्ट्यपूर्ण आहे .तथागतांनी डाव्या हाताने चिवराचे (वस्त्राचे)टोक धरून उजव्या हात अभय मुद्रेत ठेवलेला आहे .ही प्रतिमा वाकाटक ..गुप्तकाळात मथुरा कला केंद्र निर्माण करण्यात आली असावी असा अंदाज पुरातत्त्वज्ञानी व्यक्त केलेला आहे.

रामटेक नगरधन नजीकच्या हमलापुरी येथे आढळलेल्या तथागतांच्या तीन कांस्य प्रतिमा म्हणजे प्राचीन धातू शिल्पाचा एक अद्वितीय नमुना आहे त्यापैकी एक प्रतिमा आकाराने मोठी असून दोन त्या मानाने छोट्या आहेत तिन्ही प्रतिमा दिसायला अगदी सारख्याच आहे केवळ उंची आणि पादपीठाचा फरक आहे या प्रतिमांमध्ये तथागत गौतम बुद्ध अभय मुद्रेत उभे असून त्यांनी अंगावर संघाटी धारण केलेली आहे डाव्या हातात संघाटीचे दुसरे टोक आहे. डोक्यावर कुरळे केस त्यावर उष्णिष ,द्रूष्टी समोर कान लांब

आणि अंगावरचे तलम वस्त्र रेषांद्वारे चित्रित केलेले आहे. डोक्याभोवती बहुदा प्रभावलय असावे .या तिन्ही प्रतिमा सध्या नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयात संरक्षित आहेत या प्रतिमा बरोबरच एक धूपदाणी व कडेवर मूल घेतलेली एक स्त्री प्रतिमा जी बहुधा  हारीतीची असावी आढळून आलेली होती परंतु  नंतर त्या गहाळ झालेल्या आहेत .वर्धा जिल्ह्यातील पवणार उत्खननामध्ये  दगडावर अंकित एक लघु बौद्ध बुद्ध प्रतिमा व त्रिरत्न आढळून आलेले होते .वरील सर्व पुराव्यांवरून नागवंशाची भूमी असलेल्या या विदर्भभूमीत बुद्ध धर्माची बीजे फार प्राचीन काळीचम रुजलेली होती या भूमीतूनच बुद्ध धर्म सुदुर दक्षिणेत पोहोचला असावा व म्हणूनच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मदीक्षेसाठी या भूमीची केलेली निवड ही अगदी सार्थ होती हेच खरे.

**--- मनोहर नरांजे**



देवानंद घरत
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था भंडारा येथे विषय सहाय्यक म्हणून कार्यरत,नवीन शिक्षण प्रवाहाचे अभ्यासक, प्रयोगशील शिक्षक म्हणून ख्याती.



**देवानंद घरत**
**भंडारा**

# शिक्षणातील नवे विचार प्रवाह
# मिश्रित अध्ययन (ब्लेंडेड लर्निंग)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये अनेक नवे शिक्षण विषयक विचार प्रवाह निर्देशित करण्यात आले आहे.२१व्या शतकातील कौशल्य व जागतिक पातळीवर सातत्याने होणारे बदल त्याचे परिणाम सामाजिक परिवेशांमध्ये दिसतात त्यामुळे शिक्षणातील नव्या विचार प्रवाह जाणून घेणे गरजेचे आहे.मागील वीस वर्षाचा आढावा घेतल्यास ज्ञान क्षेत्र अधिक विस्तारित झाल्याचे आपल्या निदर्शनात येते.व्यापक आधार सामग्री,यांत्रिक शिक्षण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या सारख्या क्षेत्रातील विविध लक्षवेधी वैज्ञानिक आणि तंत्रज्ञान विषयक प्रगतीमुळे जगभरातील बऱ्याच कुशल कामगारांच्या ठिकाणी यंत्र काम करत असतील तर दुसरीकडे माहितीशास्त्र, संगणक शास्त्र आणि गणितीय क्षेत्रात कुशल कारागिरांची गरज आणि मागणी वाढेल जे की विज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि मानव विद्यासारख्या विविध विषयात सक्षम असतील.[1]

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे प्रत्येक व्यक्तीच्या सृजनात्मक क्षमतेच्या विकासावर विशेष भर देते शिक्षणातून साक्षरता आणि संख्याज्ञान या मूलभूत क्षमतांबरोबरच चिकित्सक विचार आणि समस्या निराकरण यासारख्या उच्चस्तरीय बौद्धिक क्षमतांचा विकास तसेच नैतिक, सामाजिक, भावनिक क्षमता आणि प्रवृत्ती या स्तरावरील व्यक्तीचा विकास देखील झाला पाहिजे या तत्त्वावर धोरण आधारित आहे.[2]

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील नमूद केलेल्या उद्देशांची पूर्तता करावयाची असेल तर नवे शिक्षण प्रवाह, नाविन्यपूर्ण अध्यापनशास्त्र तसेच समग्र आणि समावेशित नाय्य शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर नवीन शिक्षण प्रवाहाचा अभ्यास करणे अतिशय गरजेचे आहे मग हे शिक्षण प्रवाह कोणते? त्यांचा

[1] राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

[2] तैत्रव

विद्यार्थी विकासात कसा सहभाग असणार आहे? नवीन शिक्षण प्रवाह अमलबजावणी करताना कोणती आव्हाने असणार आहेत? नवीन शिक्षण प्रवाहाचे परिणाम केव्हा दिसतील? या प्रश्नांचा विचार करून अंमलबजावणी करणारे घटक यांचे सक्षमीकरण करण्यात यावे,त्याचबरोबर सातत्याने कौशल्य आणि गरजाधिष्टित शिक्षण देण्यासाठी अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात यावी. शिक्षण प्रणाली आखताना विद्यार्थी हा चांगला नागरिक, विज्ञाननिष्ठ आणि अखंड ज्ञान लालसा असलेला असावा अशी उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवली जातात ही उद्दिष्टे जरी समान राहत असली तरी कालानुरूप शिक्षण प्रणाली मध्ये नवे प्रवाह येतात काही बदल घडून येतात शिक्षण प्रणाली मध्ये विषयांची संख्या, आशयाची मांडणी, अध्यापन पद्धती, अध्यापन तंत्र, अध्यापन शास्त्र,अध्यापन-अध्ययन विषयक दृष्टिकोन यामध्ये कालापरत्वे कोणते बदल झाले आहेत आणि भविष्यात कोणते प्रवाह येण्याची शक्यता आहे याचा आढावा घेणे संयुक्तिक ठरेल.[3]

कोरोना सारख्या वैश्विक महामारीमुळे शिक्षण क्षेत्रामध्ये अनेक बदल झाले ज्या प्रवाहांची गरज कदाचित पुढील दहा वर्षानंतर निर्माण झाली असती पण या महामारीमुळे ते बदल आत्ताच झालेले दिसतात त्यामुळे शिक्षण पद्धती सुद्धा बदलायला हवी अन्यथा त्याचे दुरगामी परिणाम भारताच्या मनुष्यबळावर होतील, अशी परिकल्पना करायला हरकत नसावी. या महामारी मध्ये शाळा दोन वर्ष बंद होत्या त्यामुळे औपचारिक शिक्षणाचे मार्ग बंद झाले होते त्यामुळे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम जगभरात सुरू होते त्यामुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान हाताळण्यास सोपे व सुलभ झाले आहे परंतु त्याचा योग्य वापर तर झाला नाही तर विद्यार्थ्यांना शारीरिक, मानसिक व भावनिक परिणामांना सामोरे जावे लागेल त्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य दिशा व सवय लागावी यासाठी आपल्या सगळ्यांना जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. कोरोनाची परिस्थिती आता कमी झाली आहे तसेच शाळा पण सुरू झाल्या आहेत त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणातून कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे,पण तसे झाल्यास विद्यार्थी त्याचा दुरुपयोग करतील अशी भीती कायम आहे. म्हणूनच **मिश्रित अध्ययन** (ब्लेंडेड लर्निंग) या नव्या शैक्षणिक विचार प्रवाहाचा उपयोग हा दैनंदिन व्हावा अशी अपेक्षा आहे.त्यामुळे हा शैक्षणिक प्रवाह काय आहे याविषयी माहिती पाहूया.

**मिश्रित अध्ययन (ब्लेंडेड लर्निंग) :**

**"A style of education in which student learn via electronic and online media as well as traditional face to face teaching"[4] ऑक्सफर्ड डिक्शनरी नुसार मिश्रित अध्ययन (ब्लेंडेड लर्निंग) ही शिक्षणाची अशी एक शैली आहे ज्यामध्ये विद्यार्थी**

[3] लोकसत्ता २०१३

[4] Oxford dictionary

**इलेक्ट्रॉनिक आणि ऑनलाइन माध्यमांद्वारे तसेच पारंपारिक अध्यापनाद्वारे शिकतात"**


ई लर्निंग आणि पारंपारिक वर्गखोलीतील शिक्षण यांचा समन्वय म्हणजेच ब्लेंडेड लर्निंग म्हणता येईल. जे विद्यार्थी कोरोना काळात ऑनलाईन स्वरूपात शिक्षण घेत होते ते विद्यार्थी आता शाळेमधील औपचारिक शिक्षण घेत आहेत पण त्यांना आता तंत्रज्ञान या साधनाचा परिचय झाल्यामुळे विविध प्रकारची माहिती, ज्ञान त्याला मोबाईलच्या माध्यमातून घरीच प्राप्त होते त्याचबरोबर ज्या गोष्टी त्याला वर्गखोलीमध्ये शिकता येत नाहीत त्या गोष्टी तो तंत्रज्ञानामुळे घरीच शिकतो. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात ह्या नवीन विचार प्रवाहाचा जाणीवपूर्वक उपयोजन व्हायला पाहिजे.

हा नवीन विचार प्रवाह शाळा स्तरावर अंमलबजावणी करताना शिक्षक, पालक यांनी त्याबद्दलची माहिती करून घेणे गरजेचे आहे ब्लेंडेड लर्निंगमुळे विविध शैक्षणिक संकल्पना व त्याचा सराव वर्ग स्तरावर होत नाही किंवा संकल्पना संबोध समजण्यास अडचणी निर्माण होतात त्या ब्लेंडेड लर्निंग मुळे सुटू शकतात त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे बुद्धिमत्तेचे विविध असतात त्यामुळे शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ जाऊन शिक्षण देणे शक्य नसते अशा वेळेस ब्लेंडेड लर्निंग मुळे विद्यार्थी स्वतः काही संकल्पना अभ्यासून त्याचं उपयोजन वर्गात करू शकतात.


मिश्रित अध्ययन( ब्लेंडेड लर्निंग) मॉडेल्स:

हेलगा कोलिंस्की नुसार सहा प्रकारचे ब्लेंडेड लर्निंग मॉडेल्स सांगितले आहेत.


१.**फेस टू फेस मॉडेल**: ब्लेंडेड लर्निंग चा हा पारंपारिक मॉडेल असून ज्यात विद्यार्थी हे वर्ग खोलीमध्ये शिक्षण घेत असतात, यात जे विद्यार्थी वर्ग खोलीमध्ये शिक्षण घेताना अडचणींचा सामना करतात त्याच बरोबर त्यांच्या वैयक्तिक गरजा नुसार शिक्षण घेत असतात या प्रकाराला फेस टू फेस मॉडेल म्हणतात.





२. **ऑनलाइन मॉडेल**: हा मॉडेल पूर्णता ऑनलाइन स्वरूपाचा असून त्यात विद्यार्थी ऑनलाइन वेबिनार, कॉन्फरन्स प्रकारचे शिक्षण घेत असतात. या प्रकारामध्ये डिजिटल साधनांची आवश्यकता असते त्याचबरोबर इंटरनेटची उपलब्धता हा घटक सुद्धा महत्त्वाचा असतो अन्यथा ब्लेंडेड लर्निंग मध्ये अडथळे निर्माण होतात.





३. **रोटेशन मॉडेल**: ब्लेंडेड लर्निंग मध्ये हा प्रकार अतिशय नाविन्यपूर्ण आहे यामध्ये विद्यार्थ्यांचे लहान लहान गट तयार करून काही कृती ऑनलाईन व काही कार्य फेस टू फेस स्वरूपात दिल्या जातात. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे रोटेशन सुद्धा केले जात असल्याने दोन्ही प्रकारच्या संधी सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध असतात त्यामुळे शिकण्याची प्रक्रिया अधिक जलद होत असते.




४. **फ्लिपड् क्लासरूम** : या प्रकाराचा मोटो हा "ऑनलाईन शिक्षण आणि ऑफलाइन उपयोजन" असा आहे ज्यात विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन शिक्षण व ऑफलाईन प्रात्यक्षिक करून घेतले जाते. उदाहरणार्थ, एखादा प्रयोग कसा करायचा? याची माहिती ऑनलाइन स्वरूपात दिली जाते व ते प्रयोग/प्रात्यक्षिक वर्गखोलीमध्ये किंवा प्रयोगशाळेत ऑफलाइन स्वरूपात करावे लागते. या ब्लेंडेड लर्निंग मॉडेल मध्ये विविध प्रकारचे चर्चासत्र, केस स्टडी, त्याचप्रमाणे प्रकल्प कार्य दिले जातात.





५.**फ्लेक्स मॉडेल:** या प्रकारामध्ये अध्ययनार्थ्यांचे नियंत्रण त्याच्या शिकण्याच्या प्रक्रियेवर असते. यात विद्यार्थी त्याच्या गरजा आणि गतीनुसार पुढील कृतीवर जात असतो. ह्या कृती या ऑनलाइन व ऑफलाइन स्वरूपाच्या असतात यात शिक्षकांची भूमिका अतिशय महत्त्वाची असते या मॉडेलमध्ये आवश्यक तिथे शिक्षक मदत करत असतात.




६. **वैयक्तिक रोटेशन मॉडेल:** या प्रकारात अध्यायानार्थी एका प्रक्रियेतून दुसऱ्या प्रक्रियेत जात

असतो पण ही प्रक्रिया वैयक्तिक स्वरूपाची असून जी विशेष अलगोरिदमने तयार केलेली असते. यामध्ये प्रत्येक ठिकाणी भेट देण्याची विद्यार्थ्याला गरज नसते त्याच्या वैयक्तिक गरजेनुसार ते ऑनलाइन व ऑफलाइन रोटेशन मॉडेलचा उपयोग करू शकतात.




मिश्रित अध्ययन( ब्लेंडेड लर्निंग)चे फायदे:

१. **सुरक्षित शैक्षणिक वातावरण**: कोरोना महामारी मुळे आपल्याला एक गोष्ट लक्षात आली की,अध्ययनार्थ्याला ऑनलाइन स्वरूपाचे शिक्षण घेताना अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते त्याचप्रमाणे सर्वांना स्क्रीनवर बघताना असह्य वाटते. पण ब्लेंडेड लर्निंग मध्ये विद्यार्थी ऑफलाइन व ऑनलाइन स्वरूपात शिक्षण घेत असताना ऑनलाईन तास कमी प्रमाणात असल्यामुळे शैक्षणिक वातावरण सुरक्षित वाटते.


२. **परस्पर संवादी शैक्षणिक प्रक्रिया**: ब्लेंडेड लर्निंगमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला परस्पर संवाद करण्याची संधी उपलब्ध होते त्यामुळे शिक्षणात निर्माण होणारे अडथळे सहज दूर होतात. ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया आनंददायी व कृतीशील वातावरणात प्राप्त होत असल्यामुळे शिक्षणाचा स्तर उंचावतो.

३. **अध्ययनार्थी केंद्रित प्रक्रिया:** ब्लेंडेड लर्निंग हे अध्यायनर्थी केंद्रित प्रक्रिया असून ज्यात प्रत्येकाला त्याच्या आवडीनुसार शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होते, त्याचप्रमाणे त्याची गरज आणि गती लक्षात घेता समतामुलक शिक्षण मिळते.


■ देवानंद घरत, भंडारा

# जाहिराती



## राजहंस प्रकाशन पुणे





## अनुवाद प्रकाशन , पुणे




## पुरंदरे प्रकाशन, पुणे




## वर्णमुद्रा प्रकाशन, शेगाव




# थोडे मुखपृष्ठाविषयी

शरद तरडे यांचे चित्र बहुतांश अमूर्त शैलीकडे झुकणारे असतात.त्यांनी जगभरच्या अमूर्त शैलीकारांच्या चित्रांचा जाणीवपूर्वक अभ्यास केलेला आहे. प्रसिद्ध अमूर्त शैलीचे चित्रकार अरुण पाथरे यांचा विलक्षण प्रभाव त्यांच्यावर आहे.परंतु शरद तरडे निसर्ग आणि निसर्गाशी असलेले मानवी नाते,मानवी नात्याची विलक्षण गुंतागुंत आपल्या चित्रातून मांडतात.ही दृष्टी त्यांना इतर अमूर्त चित्रकारांपासून पृथगात्म करते.

मुखपृष्ठावर असलेल्या चित्रात एका निळसर अवकाशात विखंडीत निळे , हिरवे ,लाल रंगाचे गतिशील फटकारे दिसत आहेत.त्यातून मानवी गर्दीचा विभ्रम निर्माण होतो. गर्दीत समाविष्ट मानवी आकृत्या विन्मुख आहेत.त्यांचे चेहरे दिसत नाही.पण ते कुठल्यातरी एका दिशेने निघालेल्या आहेत हे स्पष्ट जाणवते.त्या मानवी आकृत्यांच्या एकत्रित व अधिक जवळीकतेमुळे त्यांचे कुठलेसे उद्दिष्टही एक असल्याचे जाणवते.कुठल्यातरी शोधात ही सगळी गर्दी निघालेली आहे.हा शोध एखाद्या भौतिक गोष्टीचा असू शकेल ,कदाचित एखाद्या अप्राप्याचाही असेल पण तो संघटित आहे.

चित्रकाराने मानव सहजीवन , मानवी गरजा, मानवी जीवनदिशा या चित्रातून प्रकट केले आहे. त्या मानवी समूहाला निळसर प्रदीर्घ अवकाश खुणावत आहे.मानवी जीवनातील मानसिक आणि भावनिक गुंतागुंत इथे चित्रकाराने प्रकट केली आहे.हे चित्र उजळ रंगात केले तरी ते उदास वाटते आहे. यातूनही चित्रकार काहीएक सांगू पाहतो.चित्राचा अर्थ नेमका पकडता न येणे हेच चित्रकाराचे यश आहे.त्यातील एक सापेक्षता अर्थनिर्णयनाला विविध आयाम प्रदान करते.



# धक्काचित्र

